
# मून अँड सिक्सपेन्स

लेखक - सॉमरसेट मॉम

अनुवाद - जयंत गुणे



# मून अँड सिक्सपेन्स

## मूळ इंग्लीश लेखक – सॉमरसेट मॉम

## मराठी अनुवाद – जयंत गुणे

© जयंत गुणे
सर्व हक्क अनुवादकाच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादकाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
पत्ता - मधु मधुरा, प्रार्थना समाज, विले पार्ले, मुंबई 400057
टेलीफोन – 9619016385, इमेल – jayant.gune@gmail.com
ब्लॉग - jayantgune.blogspot.com

# मून अँड सिक्सपेन्स

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मून अँड सिक्सपेन्स

अनुवादक : जयंत गुणे
ए१३/७०९, एक्झर्बिया-हिंजवडी, नरे-दत्तवाडी, मारूंजी रोड, ता. मुळशी.
जि. पुणे ४११०३७ (महाराष्ट्र)
Email : jayant.gune@gmail.com
Mobile : ९६१९०१६३८५. (फक्त व्हॉट्सअॅप)
ब्लॉग : https://jayantgune.blogspot.com/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com


esahity@gmail.com

प्रकाशन : ३ जून २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अनुवादकाची ओळख –



श्री. जयंत गुणे: बँकींग आणि आय.टी क्षेत्रातून निवृत्त. प्रसिद्ध अनुवादित कादंबऱ्या - लोकवाङ्मयगृह – मुलॉं रूज, मेहता - झॅप्ड, प्रॉफेट मर्डर, किस मर्डर.

विशेष रूची - साहित्य, चित्रकला, शिल्पकला आणि इतर दृश्यकला, विज्ञान विषयक लेख. लेखक आणि वाचन - प्रामुख्याने मराठी आणि थोडेफार इंग्रजी. कथा-कादंबऱ्या सकट बौद्धिक समाधान देणारे काहीही पण मनोरंजनाचे वावडे नाही. उदा. पु. ल. देशपांडे ते भालचंद्र नेमाडे. बौद्धिक - राजवाडेः इतिहासाचार्य आणि अहिताग्नी. अ. ज. करंदीकरःमहाभारताचे उगमस्थानः पश्चिम आशिया वगैरे यादी खूप वाढवता येईल. इंग्रजीमध्ये जेम्स हॅडली चेस पासून सुरूवात करून वुडहाऊस, हेमिंग्वे, स्टाईनबेक करत करत कार्लोस कास्तानेडा, स्टीफन हॉकिंग, रिचर्ड डॉकिन्स, मॅट रिडले काहीही व्यर्ज नाही. उदा. नुकतेच वाचलेले पुस्तकः नसीम निकोलस तालेबचे ब्लॅक स्वान.

मून अँड सिक्सपेन्सच्या धर्तीवर मुलाँ रूजची सचित्र ई-आवृत्ती प्रसिद्ध करणे हा माझा पुढचा प्रोजेक्ट आहे. ड्रीम प्रोजेक्ट म्हटला तर द्युमाज क्लब आणि सेल्फिश जीन ही दोन पुस्तके माझ्या डोळयासमोर आहेत पण प्रकाशनाचे हक्क मिळवणे हा मोठा प्रश्न आहे. असो नोबेल प्राईज मिळवलेली एखाद्या कादंबरीचा अनुवाद करण्याची संधी मला मिळेल अशी आशा. बाकी नितीन रिंढेनी लीळा पुस्कांच्या या पुस्तकामध्ये उल्लेखलेल्या पुस्तकांपैकी कोण्तयाही पुस्तकाचा ड्रीम प्रोजेक्ट होउ शकतो.

ब्लॉग - https://jayantgune.blogspot.com/

संपर्क पत्ताः ए१३/७०९, एक्झर्बिया-हिंजवडी, नरे-दत्तवाडी, मारूंजी रोड, ता. मुळशी. जि. पुणे ४११०३७. फोन - ९६१९०१६३८५. (फक्त व्हॉट्सअॅप)

साहित्यात जशी बुक्स ऑन बुक्स ही एक कॅटेगरी आहे तसेच बुक्स ऑन आर्ट अँड आर्टिस्ट अशीही आहे. लास्ट फॉर लाईफ हे त्याचे एक ठळक उदाहरण.

कला आणि कलावंतांविषयी सर्जनशील लेखकांनी लिहीलेल्या अशा **पुस्तकांमध्ये सॉमरसेट मॉमच्या** 'द मून अँड सिक्सपेंन्स'चा क्रम फार वरचा आहे. सत्य आणि कल्पित यांचे अद्‌भुत मिश्रण करून मॉमने लिहिलेली ही अप्रतिम कादंबरी पॉल गोगँ या महान चित्रकाराच्या जीवनाचे आणि कलाध्यासाचे गहिरे रंग रेखाटते.

"मनुष्य त्याच्या विकारांचा आणि नियतीचा बळी आहे.' या विधानाचे सर्जनशील प्रतिपादन म्हणजे ही अप्रतिम कादंबरी. अवहेलना, अपयश आणि अपार परिश्रमातून मिळालेले श्रेयस यांचे विलक्षण दर्शन मॉमने या कादंबरीत घडवले आहे.

ही अभिजात साहित्यकृती मराठीत आणण्याचे मोलाचे काम केल्याबद्दल मराठी वाचक जयंत गुणे यांचे कायमचे ऋणी राहातील. ओघवती भाषा आणि मूळ आशय पोचवण्याची अपार धडपड हे गुणे यांच्या अनुवादाचे वैशिष्ठ्य त्यांच्या आधीच्या अनुवादाप्रमाणेच इथेही दिसून येते.

मराठी रसिक या अनुवादाचे स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**- संजय भास्कर जोशी**
समीक्षक व लेखक

## मून अँड सिक्सपेन्स ... ब्लॉग वरील एका रसिक जाणकार वाचकाची प्रतिक्रिया¬

कादंबरीचा झपाटा, लेखकाची गुंगवून टाकणारी शैली, पोतडीतून एक एक अशी रहस्य बाहेर काढत वळणा वळणाने पुढे जाणारं कथानक आणि अनुवादकाने त्याचा बरोबर पकडलेला नेमका सूर या सगळयात माझ्यासारख्या वाचणाऱ्याला धाप लागते आणि मग प्रतिक्रिया द्यायची तर आहे पण पुढल्यावेळी देऊ असे करत राहून जातं. मलातर आत्तापर्यंत यातली मुख्य व्यक्तिरेखाच ध्यानात येत नव्हती. नक्की ही गोष्ट कोणाची आहे (अजूनही कदाचित मोठा ट्वीस्ट असला पुढे तर या कल्पनेने थांबावं लागत आहे) हेच ध्यानात येत नव्हत. चित्रकाराच्या ठाम फटका-यासारखे प्रत्येक व्यक्तिमत्वाचे ठाशीव रेखाटन वाचताना मजा येत आहे. लेखकाच्या लेखनाचं मर्म अनुवादकाला समजलं तर अनुवाद सशक्त होतो असं जाणकार म्हणतात. त्याचा प्रत्यय इथे येतो. चित्र आणि चित्रकलेविषयीची अनुवादकाची स्वतःची जाण या आधीच्या मुलॉ रूजमध्ये प्रत्ययाला आली होती. इथे त्याच्या पुढला पल्ला गाठलेला दिसतो. निवडलेली चित्र याची पुरेपूर साक्ष देतात. पुढील भाग वाचण्याची उत्कंठा आहे.

... आनंद पत्की

## मनोगत

व्हॅन गॉग, तूलुज लोत्रेक आणि पॉल गोगँ हे पोस्ट इंप्रेशनिस्ट कालखंडातील तीन चित्रकार समकालीन तर होतेच शिवाय त्यांचा एकमेकांशी परिचयही होता. तिघेही चित्रकार म्हणून थोर होतेच शिवाय त्यांची जीवनकहाणी ही विलक्षण म्हणता येईल अशी आहे. या तिन्ही चित्रकारांना असामान्य प्रतिभेचं देणं लाभलं होतं. तिघांच्याही आयुष्यात संघर्ष, उपेक्षा आणि अवहेलना आहेत. पण या सर्वांचा सामना करत आपली स्वतंत्र शैली प्रस्थापित करण्यात त्यांना यश आले. पण त्यासाठी त्यांनी काय किंमत दिली याची प्रचिती त्यांची जीवनकहाणी वाचल्या शिवाय येत नाही. व्हॅन गॉगच्या जीवनावर आधारीत अर्विंग स्टोनच्या लस्ट फॉर लाईफचा अनुवाद माधूरी पुरंदरेंनी फार पूर्वीच केला आहे. तुलूज लोत्रेकच्या जीवनावर आधारीत पिएरे ल मूरच्या मुलँ रूजचा मी केलेला अनुवाद २०११ मध्ये प्रसिद्ध होताच मी पॉल गोगँच्या जीवनावर आधारीत सॉमरसेट मॉमच्या मून अँड सिक्सपेन्सचा अनुवाद करण्याचा दुसरा संकल्प सोडला होता.

गोगँची रंगांची हाताळणी आणि त्याची सिंथेटीस्ट या नावाने प्रसिद्ध झालेली शैली इंप्रेशनिस्ट चित्रकारांपेक्षा अगदी वेगळी होती. ताहिती बेटांवर तैलरंगांच्या उपलब्ध न झाल्यामुळे गोगँने शिल्पकला, लाकडावरचे कोरीवकाम आणि सेरॅमिक्स ही माध्यमेही कॅनव्हास एवढ्याच ताकदीने हाताळली आहेत. त्याने आपली कला व जीवनाविषयी भूमिका वृत्तपत्र आणि नियतकालिकांमधून ठाम पणे मांडली. आपल्या ताहितीमधील वास्तव्यात तेथील फ्रेंच अधिकारी आणि चर्च यांच्या रोषाची पर्वा न करता त्याने तेथील आदिवासींची बाजू मांडली. सिंबॉलिस्ट चित्रकारांचा तो एक आदर्श होता. प्रिमीटीव्हिजन आणि खेड्याकडे वळा अशा चळवळींनी गोगँकडून प्रेरणा घेतली आहे. नवचित्रकलेचे उद्गाते पाब्लो पिकासो आणि हेन्री मातिस यांच्यावर गोगँचा प्रभाव होता.

मून अँड सिक्सपेन्स ही मॉमची सर्वात गाजलेली आणि त्याची स्वत:चीही आवडती कादंबरी आहे. ही कादंबरी मॉमच्या *'मनुष्य त्याच्या विकारांचा आणि*

*नियतीचा बळी असतो'* या लाडक्या संकल्पनेवर बेतलेली आहे. पण मॉमने कादंबरीच्या कथानकात पॉल गोगँच्या जीवनकहाणीपासून बरीच फारकत घेतल्याने त्याने कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखेचे नाव बदलले आहे. मूळ इंग्रजी भाषेतील कादंबरीत कित्येक ठिकाणी फ्रेंच भाषेतील संवाद तसेच ठेवले आहेत. अनुवाद करताना त्यांचा उच्चार आणि अर्थासाठी गुगल ट्रान्सलिटरची मदत घेतली आहे. तसेच कादंबरी चित्रकाराच्या जीवनावर असल्यामुळे प्रसंगोपात पॉल गागँची चित्रे उध्दृत करण्याचा मानस ही चित्रे विकीपिडीयावर पब्लिक डोमेनमधे उपलब्ध असल्यामुळे शक्य झाले.

अनुवाद करण्याचा संकल्प माझ्या हातून लगेच पूरा झाला तरी प्रसिद्धीचा योग काही जूळून येत नव्हता. शेवटी माझ्या ब्लॉगवर क्रमश: प्रसिद्ध करावा असा विचार आहे. पूर्वी एपीएस वापरून केलेले काम इ-आवृत्तीसाठी युनिकोडमध्ये रूपांतरीत करण्याचे काम मुळ अनुवादा एवढे कठीण नसले तरी चिकाटीची मागणी करणारे आहे. रूपांतर करताना काही दोष राहून गेले असल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी माझी आहे. वाचकांचा प्रतिसाद मिळाला तर माझ्या आनंदात भर पडेल आणि ब्लॉग नियमीत चालू ठेवण्यासाठी उत्साहाचे बळ मिळेल.

जयंत गुणे

११ जानेवारी २०१८, कार्लसबाद, सॅन दिआगो.

# मून अँड सिक्सपेन्स

# १

चार्ल्स स्ट्रिकलँडला मी जेव्हा पहिल्यांदा भेटलो तेव्हा पुढे भविष्यकाळात तो केवढा मोठा प्रसिद्ध माणूस होणार आहे याची यत्किंचीतही चुणूक मला त्याच्यात दिसली नव्हती, ही गोष्ट इथे मी कबूल करतो. आज बघायला गेलं तर त्याच्या मोठेपणाबद्दल कोणाचेही फारसे दुमत होणार नाही. एखादा राजकीय पुढारी किंवा पराक्रमी सेनानी जेव्हा वरच्या पदाला जाऊन पोचतो आणि त्याला लोक मोठा समजू लागतात तेव्हा त्यात बऱ्याच वेळा त्याच्या कर्तुत्वापेक्षा तो ज्या पदावर बसला आहे त्या पदाचा भाग जास्त असतो. नशीबाचे फासे कसे पडतात त्यावर सर्व काही अवलंबून असतं. पंतप्रधानसुद्धा एकदा आपल्या पदावरून पायउतार झाला की त्याची भाषणबाजी पोकळ वटवटीसारखी वाटू लागते. आणि सैन्याशिवाय सेनापती म्हणजे एखाद्या गल्लीतील दादासारखा. पण चार्ल्स स्ट्रिकलँडचं मोठेपण अगदी वेगळ्या प्रकारचं म्हणावं लागेल. तो एक मनस्वी आणि कलंदर पण अलौकिक प्रतिभेचं दैवी देणं लाभलेला चित्रकार होता. माणूस म्हणून भला विक्षिप्त असेल पण कलाकार म्हणून पहाल त्याची शैली स्वतंत्र अगदी शंभर ट्क्के अस्सल होती. त्याची चित्रं, पेंटींग कदाचित तुम्हाला आवडणार नाहीत पण एक एक अव्वल दर्जाची चित्रकला म्हणून त्यांचा विचार केल्याशिवाय आपल्याला पुढे जाता येणार नाही. त्याच्या कलाकृती आपलं लक्ष वेधून घेतात आणि आपल्याला अस्वस्थ करतात. एके काळी स्ट्रिकलँड आणि त्याच्या कलाकृती चेष्टेचा विषय व्हायच्या, आणि त्याची चित्रं त्याच्या सारखीच विकृत आहेत अशी टीका व्हायची. कोणी त्याची बाजू घेउन जरा त्याच्या विषयी बरं बोललं तर त्या बाजू घेणाऱ्याचं डोकं फिरलंय असं म्हटलं जाई. कोणी त्याच्या चित्रांविषयी थोडी जरी सहानभूती दाखवली तरी तो त्या चित्रांच्या कर्त्यासारखाच विकृत असला पाहिजे असं समजलं जाई. पण तो काळ आता मागे पडला आहे. आता स्ट्रिकलँडच्या दोषांकडे त्याच्या गुणवत्तेचा एक अपरिहार्य भाग म्हणून बघितलं जातं. कलाविश्वात त्याचे स्थान

कोणते यावर समिक्षकांमध्ये चर्चा होते. त्याच्या कलेचे मुल्यमापन करताना समीक्षकांनी केलेली प्रशंसा त्याच्यावरील टीकेपेक्षा जास्त अडचणीची ठरण्याची शक्यता आहे. काहीही झालं तरी त्याला अलौकिक प्रतिभेचं देणं मिळालं होतं यावर कोणाचं दुमत होणार नाही. माझ्या मते एखाद्या कलाकृतीपेक्षा ती निर्माण करणाऱ्या कलाकाराचं व्यक्तिमत्व हे जास्त महत्वाचं असतं आणि जर असं व्यक्तिमत्व जर एकमेकाद्वितीय असेल तर त्याला हजार गुन्हे माफ करायला हरकत नसते. सर्वसाधारणपणे वेलास्केजला एल ग्रेकोपेक्षा मोठा चित्रकार समजलं जातं. पण मला मात्र एल ग्रेकोच जास्त आवडतो. कारण एल ग्रेको मायकेल अँजेलोच्या सावलीतून जाणीवपूर्वक बाहेर आला आणि त्याने आपली स्वतंत्र शैली प्रस्थापित केली. चित्रकार, शिल्पकार, कवी आणि संगीतकार त्यांच्या कलेच्या माध्यमातून आपल्याला एक उत्कट अनुभूती देत असतात. ती अनुभूती एक प्रकारे लैंगिक अनुभूतीसारखी असते. त्यातील सृजन आणि विध्वंसक शक्तिसकट. कलाकार आपल्या प्रतिभेतून केलेली निर्मिती रसिकांसमोर ठेवतो. त्या कलाकृतीच्या निर्मितीमागील कारणमीमांसा जाणून घेणे एखाद्या गुप्तहेर कथेतील रहस्याची उकल करण्याएवढे उत्कंठावर्धक असू शकते. पण बऱ्याच वेळा त्यामागील सर्व कारणं आपल्याला अज्ञात रहातात. चार्ल्स स्ट्रिकलँडच्या एखाद्या नगण्य चित्रातूनसुद्धा त्याच्या व्यक्तिमत्वातील विक्षिप्तपणा, त्याचा सल, त्याच्या वेदना आपल्याला थोड्यातरी दिसून येतील. त्यामुळेच त्याची चित्र ज्यांना आवडत नाहीत त्यांनासुद्धा त्याच्याकडे दुर्लक्ष करणं शक्य होत नाही. या वैशिष्ट्यामुळेच बऱ्याच जणांना त्याची जीवनकहाणी, त्याचं व्यक्तिमत्व आणि त्याचा कलाप्रवास यात त्यांना रस वाटू लागतो.

मॉरीस ह्युरेने स्ट्रिकलँडच्या मृत्यु पश्चात चार एक वर्षांनी मर्क्युर द फ्रान्समध्ये लिहीलेल्या एका लेखामुळे तोपर्यंत विस्मृतीत गेलेल्या या चित्रकाराकडे लोकांचं लक्ष गेलं. एवढेच नव्हे तर त्याच्यावर काही ना काही लिहीण्याची एक प्रकारे रीघच लागली. फ्रान्समध्ये बऱ्याच वर्षांनी अहमिकेने लिहायला लोकांना एक नवा विषय मिळाला होता. मॉरीस ह्युरेच्या लेखात थोडी फार अतिशोयक्ती असली

तरी त्याची छाप पडल्या वाचून रहात नव्हती. पण जसजसे अधिक पुरावे मिळू लागले, अधिक सखोल आणि चौफेर समिक्षा होऊ लागली तशी त्याच्या दाव्याला पुष्टी मिळत गेली. त्यामुळे दिवसें दिवस चार्ल्स स्ट्रिकलँडची ख्याती जगभर पसरत गेली. त्याची किर्ती ज्या वेगाने वाढत गेली तो कलेच्या इतिहासातील एक अद्‌भूत अध्याय म्हणता येईल. तो चित्रकार म्हणून केवढा थोर आहे ते सिद्ध करण्याच्या फंदात मी पडणार नाही. मी त्याच्या कलाप्रवासाविषयी सांगणार आहे. सर्वसामान्य लोकांना कलेतील काहीच कळत नाही. चित्रांचं प्रदर्शन पहायला आलेल्यांनी गप्प बसणं हाच त्यांचा शहाणपणा. चित्र आवडलं तर सरळ पैसे मोजून विकत घ्यावं नाही तर तोंड फिरवून तेथून काढता पाय घ्यावा पण कोणत्याही परिस्थितीत आपलं तोंड उघडू नये. आपल्या चित्रांबद्दल इतरांना काय वाटतं याला कस्पटाएवढीसुद्धा किंमत न देणाऱ्या आढ्यताखोर चित्रकारांशी मी सहमत आहे अशातला भाग नाही. कलेचे आकलन कलाकारांशिवाय दुसऱ्या कोणालाही जास्त चांगल्या रीतीने करता येणं शक्य नाही हा कलाकारांचा प्रचलित पूर्वग्रह म्हणजे एक मोठा गैरसमज आहे. कलेचा आविष्कार हा भावनांच्या उद्रेकातून होत असतो आणि कलाकृतीत जर भावना उतरल्या असतील तर त्या लपून रहात नाहीत. त्या सर्वांपर्यंत पोचतात. ज्या समीक्षकांना कलेच्या तांत्रीक अंगांची नीट माहिती नसते त्यांच्या मताला फारशी किंमत कोणी देत नाही याची मला कल्पना आहे. माझे चित्रकलेचे ज्ञान तसे यथातथाच आहे. त्यामुळे त्याच्या कलेची समीक्षा करण्याच्या फंदात मी पडणार नाही. माझ्या सुदैवाने या राखीव प्रांतात मुशाफिरी करण्याच्या धाडसाची जोखिम अंगावर घेण्याची मला गरज पडली नाही. कारण माझे एक दुसरे जाणकार लेखक मित्र मि.एडगर लेगॅट यांनी चार्ल्स स्ट्रिकलँडवर एक छोटीशी पुस्तिका लिहून माझं काम सोपं केलं. लेगॅट स्वत: एक बऱ्यापैकी चित्रकार म्हणून प्रसिद्ध आहेत. अशा प्रकारच्या शैलीदार लिखाणाची परंपरा इंग्लंडच्या मानाने फ्रान्समध्ये चांगली जोपासलेली आहे याची सुज्ञ वाचकांनी नोंद घ्यावी.

लोकांना कलाकारांच्या खाजगी आयुष्यात खूप रस असतो. लोकांचं कुतुहल किंचीत भागेल इतपतच स्ट्रिकलँडचं खाजगी आयुष्य मॉरीस ह्युरेने आपल्या लेखात

आणलं आहे. त्याला चित्रकलेत एक कला म्हणून रस होता. स्ट्रिकलँडच्या कलेकडे एक कलाप्रकार म्हणून तटस्थपणे पहाण्याची क्षमता त्याच्याकडे आहे. एखादी नवनिर्मिती त्याच्या बघण्यात आली तर त्याच्याकडे जाणकार रसिकांचं लक्ष वेधून घ्यायला त्याला आवडतं. तो पत्रकार म्हणून चांगला असला तरी मानवी स्वभावाचं त्याचं ज्ञान तोकडे असल्याने स्ट्रिकलँडवरचा त्याचा लेख जेवढा प्रभावी व्हायला हवा होता तेवढा प्रभावी झाला नाही. पण त्याच्या लेखाचा एक चांगला म्हणता येईल असा एक परिणाम मात्र झाला. तो परिणाम म्हणजे स्ट्रिकलँडला ओळखणारे लंडन मधील काही लेखक, मोंमार्त्रमधल्या कॅफेमध्ये नेहमी पडीक असणारी स्वत:ला महान समजणारी चित्रकार मंडळींना आपण इतके दिवस ज्याला एक भुक्कड भणंग चित्रकार समजत होतो तो किती प्रतिभावान होता हे समजून आश्चर्याचा धक्का बसला. अशा लोकांनी फ्रान्स आणि अमेरीकेतल्या नियतकालीकांत एका मागून एक असे लेख लिहिण्याचा सपाटा लावला. त्यातले काही लेख त्याची बेफाट स्तुती करणारे होते तर काहीत त्याला शिव्यांची लाखोली वाहिली होती. त्यामुळे एकाच वेळी स्ट्रिकलँडच्या किर्ती आणि अपकिर्तीत सारखीच भर पडली आणि त्यामुळे वाचकांचे कुतुहल शमण्याऐवजी वाढलेच.

एखाद्या गोष्टी भोवती अद्भूततेचं वलय निर्माण करण्यात लोक वस्ताद असतात. कथित आणि कल्पित अशा प्रत्येक घटनेत विस्मय आणि रहस्य यांचे असे काही मिश्रण होते की मग त्यातून एक दंतकथा तयार होऊ लागते. कालांतराने लोकांचा त्यावर ठाम विश्वास बसतो. कंटाळवाण्या जीवनक्रमात विरंगुळा म्हणून मारलेल्या गावगप्पांतून हळू हळू एका आख्यायिकेचा जन्म होतो. एकदा आख्यायिका तयार झाली की तिचा नायक अमर झालाच म्हणून समजा. एक थोर तत्ववेत्ता गमतीने म्हणायचा, की इंग्लंडचा राष्ट्रध्वज अमेरीकेत फडकवण्यात सर वॉल्टर रॅले यांचा कितीही मोठा हात असला तरी आज त्यांच्या अमेरीकेतील प्रदीर्घ आणि दैदीप्यमान कारकीर्दीपेक्षा त्यांनी व्हर्जिन मेरीला वस्त्रे अर्पण केली ही किरकोळ घटनाच लोकांच्या जास्त लक्षात राहिली आहे. तसा चार्ल्स स्ट्रिकलँड कोणत्याही प्रकारच्या प्रसिद्धीपासून कटाक्षाने दूर रहात असे. आपल्या आयुष्यात

त्याने मित्रांपेक्षा शत्रूच जास्त निर्माण केले. त्यामुळे ज्यांनी स्ट्रिकलँडवर लिहीले त्यांनी त्याच्या विषयीच्या ऐकीव कथांना आपल्या पदरच तिखट मीठ लावून त्यात भर घातली यात नवल ते काय. या असल्या सांगोपांगी गोष्टींमुळे चटकदार लेखनाला आयतीच सामुग्री मिळाली असावी. ते काही असले तरी त्याचे आयुष्य अगदी विलक्षण होते हे मात्र निर्विवाद सत्य. तो एवढा पराकोटीचा माणूसाघाणा होता की त्याची पुढे जी काही दुर्दशा झाली, जे भयंकर भोग त्याच्या वाटेला आले त्याबद्दल कोणालाही सहानभुती वाटणं शक्य नव्हतं. हळू हळू त्याच्या आख्यायिकेवर शहाण्यासुरत्या माणसांचाही विश्वास बसू लागला आणि मग त्या आख्यायिका इतिहासात समाविष्ट झाल्या.

त्याचे सुपुत्र रेव्ह.रॉबर्ट स्ट्रिकलँड यांनी आपल्या वडिलांबद्दल पसरलेले गैरसमज दूर व्हावे म्हणून एक त्यांचे एक छोटेखानी चरित्र लिहीले. कारण त्या गैरसमजामुळे त्यांच्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेला बाधा येत होती. त्या चरित्रात त्यांनी ते गैरसमज दूर करण्याचा त्यांच्यापरीने चांगला प्रयत्न केला आहे. कोणत्याही प्रतिष्ठीत कुटुंबाची कुचंबणा होईल अशा अनेक गोष्टी चार्ल्स स्ट्रिकलँडविषयी प्रचलित होत्या. मी ते पुस्तक मोठ्या चिकाटीने वाचले. अशा अर्थाने की ते अगदी रटाळ आणि कंटाळवाणे होते. रेव्ह. स्ट्रिकलँडनी आपल्या वडिलांचे चित्र एक आदर्श पती, आदर्श पिता, कुटुंबवत्सल आणि कर्तव्यतत्पर सद्गृहस्थ वगैरे वगैरे असे खूप तपशीलात जाऊन रंगविले होते. पाद्र्यांना एखाद्या अडचणीत आणणाऱ्या गोष्टीचा खुलासा करायचा झाला तर तो लोकांना खरा वाटावा यासाठी कसा अभ्यासपूर्ण पद्धतीने सादर करावा याचं शिक्षण देत असावेत की काय याची मला हल्ली शंका यायला लागली आहे. या पाद्रीबाबांनी आपल्या पिताश्रींची जीवन कहाणी आदर्शवत भासावी अशी रंगवली खरी पण त्यांना पित्याच्या आयुष्यातील काही गैरसोईच्या घटनांचा सोईस्कर विसर पडला होता. त्यांच्या या कौशल्यामुळे त्यांची लवकरच आर्चबिशपच्या जागेवर बढती होण्याचा संभव आहे असं मला वाटतं. स्ट्रिकलँड एक आदर्श पिता वाटण्यासाठी त्याच्या चरित्रात थोडे फार फेरफार करण्याचा प्रयत्न तो चरित्रनायक आपला पिताच असल्याने एक वेळ स्तुत्य मानता येईल पण त्यात एक

मोठा धोका संभवतो. कारण कित्येकांना चार्ल्स स्ट्रिकलँड हा माणूस म्हणून अजिबात आवडत नसे इतका की त्यांना त्याची घृणा येई. पण त्याचा जो करूण व भीषण शेवट झाला त्यामुळे त्यांना त्याची दयाही येई. तिरस्कार व सहानभूती या दोन पराकोटीच्या भावनांमुळे बऱ्याच जणांचे त्याच्या चित्रांकडे लक्ष गेले हेही तितकेट खरे आहे. मुलाने फेरफार करून पुनर्मांडणी केलेल्या पित्याच्या चरित्रामुळे चार्ल्स स्ट्रिकलँडच्या चहाते अस्वस्थ झाले. हे चरित्र प्रसिद्ध झाल्या झाल्या बऱ्याच चर्चा व वादविवाद झाले. परिणामी पाठोपाठ झालेल्या सॉदबीच्या लिलावात स्ट्रिकलँडच्या 'वुमन ऑफ ताहिती' या ऑईल पेंटींगला अवघे २३५ पौंड मिळाले. फक्त नऊ महिन्यापूर्वी झालेल्या याच पेंटींगच्या लिलावात एका प्रख्यात संग्राहकाने विक्रमी बोली लावली होती. जगावेगळया गोष्टींचे लोकांना एक आकर्षण असतं. स्ट्रिकलँड चरित्राच्या या सुधारित आवृत्तीत त्याला चाकोरीतून जाणाऱ्या एखाद्या सर्वसामान्य संसारी स्थासारखा दाखवण्याचा प्रयत्न केला होता. त्यात चाकोरीबाह्य, मुलखावेगळं असं काही नव्हतं. कदाचित त्यामुळे संग्राहक, खरेदीदार वगैरे मंडळींची निराशा झाली असावी. स्ट्रिकलँडची शैली कितीही स्वतंत्र आणि वेगळी वाट शोधणारी असली तरीही लोकांच्या निराशेची रसिकांच्या गैरसमजाचे निराकरण झाले.

मानवी स्वभाव कल्पना करता येणार नाही इतका विचित्र असतो असे मानणाऱ्यांपैकी डॉ.वेब्रेख्ट हे एक आहेत. काही इतिहासकारांना इतिहासातील थोर व्यक्तिंना सर्वसामान्या संसारी जनांचे घरेलू सद्‌गुण उगाच चिकटवण्यात एक प्रकारचं विकृत समाधान मिळत असावं असं माझं मत आहे. अशाने वाचकांचे थोडे बहुत रंजन होते, पण प्रबोधन मात्र डॉ.वेब्रेख्ट सारख्या रोखठोक माणसांच्या लिखाणानेच होत असते. ऐतिहासिक दृष्ट्या तपासायला गेलं तर अँटनी आणि क्लिओपात्रा यांचे एकमेकांशी संबंध होते एवढेच सिद्ध होऊ शकेल. ते प्रेमसंबंध होते हे सिद्ध करणारे पुरेसे पुरावे आजमितीला तरी मिळू शकलेले नाहीत म्हणून ते संबंध फक्त आर्थिक व्यवहारापुरतेच होते असं मानायला मलासुद्धा आवडणार नाही. पाद्रीबाबांनी सुधारीत चरित्रात आपल्या वडिलांचे एक सरळमार्गी आणि

कुटुंबवत्सल गृहस्थ असे जे चित्र रंगवले होते त्याचा समाचार डॉ.वेब्रेख्टनी आपल्या लेखात असा काही घेतला आहे की त्या बिचाऱ्या पाद्रीबाबांची कोणालाही किंव यावी. पाद्रीबाबांचा मितभाषीपणा ही एक मुद्दाम पांघरलेली झूल आहे, त्यांनी जेथे पाल्हाळ लावला होता तेथे त्यांना काहीतरी लपवायचे होते आणि त्यांनी ज्या बाबतीत मौन बाळगले आहे त्याल तर बदमाशी शिवाय दुसरं काही नाव देता येणार नाही. मुलाने आपल्या वडिलांच्या बाबतीत काही खोटेपणा केला तर ते एक वेळ चालू शकेल पण हाच खोटेपणा लेखकाला मात्र अक्षम्यच असतो. नाही तरी आपले अँग्लो-सॅक्सन लोक ढोंगीपणा, लबाडी, धूर्तपणा आणि बेचव स्वयंपाक याबद्दल प्रसिद्धच आहेत. पाद्रीबाबांच्या माता-पित्यांचे संबंध मुळीच चांगले नव्हते. तरीही ते चांगले होते हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी आपल्या वडिलांनी पॅरीसमधून लिहीलेल्या एक पत्राचा उल्लेख केला आहे. त्यात त्यांनी '*माझी पत्नी एक चांगली गृहीणी आहे*' असं लिहीलं होतं. ही त्यांची मोठी घोडचूकच ठरली. कारण डॉ.वेब्रेख्टना ते मूळ पत्र सापडलं आणि त्यांनी त्या पत्राचे मुद्राचित्रच वृत्तपत्रात प्रसिद्ध केलं. आपल्या मित्राला लिहीलेल्या त्या पत्रात स्ट्रिकलँडने आपल्या पत्नीचा उल्लेख करून असं लिहीलं होतं *'कोण म्हणतं माझी पत्नी एक चांगली गृहीणी आहे. देवा का बरं असली बाई माझ्या वाट्याला दिलीस. तिचं तळपट होवो.'* चर्चची जेव्हा चलती होती त्या काळात त्यांनी आपल्याला गैरसोईच्या वाटणाऱ्या पुराव्यांची अशीच वासलात लावली असेल.

डॉ. वेब्रेख्टना चार्ल्स स्ट्रिकलँड चित्रकार म्हणून अतिशय प्रिय होता. त्यांची निरीक्षणशक्ति अतिशय विलक्षण होती. एखादी चुकीची गोष्ट मग ती कितीही साळसूदपणे केलेली असो त्यांच्या नजरेतून सुटणं शक्य नसे. ते स्वत: एक मनोविकार तज्ञ होते शिवाय चित्रकलेचे अभ्यासक. त्यांच्या सुक्ष्म दृष्टीला वर वर साध्या गोष्टीत लपलेला गूढ अर्थ दिसायचा आणि त्यांच्यातील मनोविकार तज्ञ लगेच त्याचे शब्दांकन करायचा. आपल्या आवडत्या कलाकाराच्या आयुष्यातील प्रत्येक गोष्टीची त्यांनी ज्या कठोरतेने मीमांसा केली आहे ते पहाण्यासारखं आहे. ज्या प्रसंगातून चार्ल्स स्ट्रिकलँडचा दुष्टपणा अथवा त्याची क्षुद्रवृत्ती दिसत असेल तो

प्रसंग वर्णन करायला चित्रकारावरील त्यांच्या प्रेमामुळे त्यांना मनापासून जरी आवडत नसले तरी ते एक लेखक म्हणून असेलेले आपले कर्तव्य पार पाडायला चुकले नाहीत. पाद्रीबाबांनी पितृप्रेमापोटी केलेल्या चलाख्या जेव्हा त्यांना पुराव्यासकट सापडल्या तेव्हा ते त्यांच्यावर केवढ्या त्वेषाने तुटून पडले ते पहाणं मोठं गमतीचं होतं. अगदी क्षुल्लक गोष्ट सुद्धा त्यांच्या नजरेतून सुटली नव्हती, मग ते चार्ल्स स्ट्रिकलँडचं एखादं लाँड्रीचं बिल असो की त्याने उधार घेतलेला एखादा क्राऊन असो.



Title - Two women of Tahiti, Artist - Paul Gauguin, Year 1891

Medium - oil on canvas, Dimensions 69 cm × 91 cm (27.2 in × 35.8 in)

Location - Musée d'Orsay, Paris. Source: Wikipedia, Public Domain

## २

चार्ल्स स्ट्रिकलँडवर आतापर्यंत एवढं लिहलं गेलंय की मला अधिक काही लिहीण्याची आवश्यकता उरलेली नाही. चित्रकाराचं खरं स्मारक त्याची चित्रंच असतात. त्याच्यावर ज्यांनी लिहीलं त्या सर्वांपेक्षा मी त्याला जास्त ओळखत होतो हे खरं आहे. तो चित्रकार होण्याच्या कितीतरी आधीच त्याची माझी भेट झाली

होती. तो पॅरीसमध्ये अतिशय खडतर परिस्थितीत दिवस कंठत असतानाही मी त्याला बऱ्याच वेळा भेटलो होतो. जर युध्दाच्या निमीत्ताने मी ताहितीत गेलो नसतो तर मी माझ्या आठवणी शब्दबद्ध केल्या असत्या का नाही ते मला सांगता येत नाही. आपल्या आयुष्याच्या अखेरीला त्याचे वास्तव्य त्या कुप्रसिद्ध ताहिती बेटांवर होते. माझ्या ताहिती बेटांवरील मुक्कामात मला त्याच्या परिचयाच्या काही व्यक्ति भेटल्या. त्यामुळे कोणाला माहिती नसलेल्या त्याच्या आयुष्याच्या अखेरच्या काळावर प्रकाश टाकण्याची संधी मला मिळाली. स्ट्रिकलँड हा एक महान कलाकार होता असं ज्यांना वाटतं त्यांना ही चतुर्वैसत्यम माहिती महत्वाची वाटू शकेल. ज्यांना सोळाव्या शतकातील एल ग्रेको हा स्पॅनिश चित्रकार माहिती असेल त्यांना मला स्ट्रिकलँडबद्दल काय म्हणायचंय ते कळू शकेल.

चित्तशुद्धीसाठी प्रत्येकाने आपल्याला आवडत नाही अशी एक तरी गोष्ट रोज केली पाहिजे, असं ज्याने मला सांगितलं होतं त्याचं नाव आता या क्षणी मला आठवत नाही. पण मी सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यंत हा नियम कटाक्षाने पाळतो. माझ्या स्वभावातच थोडं फार वैराग्य आहे. मी बऱ्याच वेळा स्वत:ला खूप त्रास करून घेतो. शारिरीक तसाच मानसिकही. मी सहसा टाईम्स लिटररी सप्लिमेंट वाचण्याची संधी सोडत नाही. ज्या प्रमाणात आज पुस्तकं प्रसिद्ध होत आहेत ते बघता त्याची नुसती माहिती घ्यायची असेल तर अशी शिस्त लावून घ्यावीच लागते. सगळया लेखकांना आपलं पुस्तक कधीतरी प्रसिद्ध होईल, त्याला कोणीतरी वाचक मिळेल अशी आशा असतेच. ढीगभर प्रसिद्ध होणाऱ्या एवढ्या पुस्तकातून आपल्या पुस्तकाच्या नशीबी काय वाढून ठेवलं आहे, कोणी त्याची दखल घेईल का हे प्रश्न लेखकाला छळत असतात? बरीच गाजलेली पुस्तकं चार दिवसांनी लोक विसरूनही जातात. आपले पुस्तक वाचून वाचकाला दोन घटका विरंगुळा मिळावा म्हणून त्या बिचाऱ्या लेखकाने किती परिश्रम घेतले असतील, कोणकोणते बरे वाईट अनुभव त्याच्या वाटेला आले असतील, त्याने काय काय यातना भोगल्या असतील ते एका परमेश्वरालाच ठाऊक. परिक्षण वाचून आपलं मत बनवायचं तर यातील बरीचशी पुस्तकं लेखकाने खूप मेहनत घेऊन विचारपूर्वक लिहीलेली

असतात, कित्येक पुस्तकं तर लेखकाच्या आयुष्यभराच्या परिश्रमाचे फलित असतात. एवढं करून त्यातील किती पुस्तकं किती लोक वाचतील, जाणकार त्याची कितपत दखल घेतील ते काहीच सांगता येत नसतं. तात्पर्य काय तर लेखकाने आपल्या लेखनाची कोण आणि किती जण दखल घेतात, त्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव होतो की त्याच्या वाटेला कठार टीका येते याचा फारसा विचार न करता त्याने आपल्या लेखन-कामाठीतच समाधान मानावे हेच खरं.

आमच्या पिढीने आमच्या तरूणपणीच देवपूजा वगैरे करणं सोडून दिलं होतं. परंतु या युद्धाच्या दिवसात हल्लीचा तरूण वर्ग पुन्हा देवपूजेच्या मागे लागला आहे. पुढची पिढी कोणत्या मार्गाने चालली आहे ते आपल्याला यावरून कळून येईल. या पिढीला आजच्या गोंधळाच्या परिस्थितीची शक्तिस्थाने चांगलीच ठाऊक आहेत. आपली जागा घ्यायला ही तरूण पिढी तयार आहे. पण काही जेष्ठ मंडळी आपले दिवस आता गेल्यात जमा आहेत हे मानायला अजून तयार होत नाहीत. त्यांनी तरूणांसारखा कितीही आरडा ओरडा केला तरी त्यात काही दम नसतो हे लक्षात येतं. तारूण्याचा भर ओसरलेल्या वेश्येने कितीही रंगरंगोटी केली तरी त्याने गेलेली जवानी परत येणार नसते. शहाणी मंडळी आपला आब राखून वेळीच बाजूला होतात. त्यांचा आब त्यांच्या मिश्किल हास्यात दडलेला असतो. त्यांच्या तारूण्यात त्यांनी हेच केलेले असते. पुढची पीढी एक प्रकारे मागच्याच पिढीचे अनुकरण करत असते. काळ बदलला असला तरी शब्द तेच असतात. फक्त लंबकाचा झोका दुसऱ्या टोकाला गेलेला असतो एवढंच.

लेखकाचं मुल्यमापन कालसापेक्ष असू शकत नाही. एके काळी प्रसिद्धिच्या शिखरावर असलेल्या लेखकाचे कालांतराने एवढे अवमुल्यन होते की तो अगदी नगण्य होऊन जातो. जॉर्ज क्रॅब आता कोणाला आठवेल तरी का. एके काळी तो केवढा प्रसिद्ध कवी होता. जाणकार रसिकांनी त्याला अगदी डोक्यावर घेतलं होतं. त्याची प्रतिभा वादातीत होती. पण काळ बदलला आणि त्यामुळे आलेल्या व्यामिश्रतेपुढे त्याची कविता अगदी बाळबोध वाटायला लागली. त्याच्या कवितांवर

अलेक्झांडर पोपचा प्रभाव होता. त्याच्या कवितेत जागो जागी बोधवचनांची पखरण केलेली असे. तेवढ्यात फ्रेंच राज्याक्रांती झाली आणि पाठोपाठ झालेल्या नेपोलियनच्या युध्दांमुळे कवितांचे विषय बदलले, गाण्यांचे सूर बदलले. पण क्रॅब महाशय मात्र तीच जुनी नितीमत्तेचे बोधामृत पाजणारी कविता उगाळत बसले होते. क्रॅबने जगात खळबळ उडवणारी नव्या जाणिवांची कविता वाचली नसेल असं काही म्हणता येणार नाही. पण वाचली असली तरी त्याला ती आवडली नसणार याची मला खात्री आहे. अर्थात बरीचशी नवकविता त्याच लायकीची होती म्हणा. बऱ्याच प्रमाणात कीट्स आणि वर्ड्सवर्थ, कोलरीजच्या दोन तीन, शेलीच्या आणखी काही अपवाद म्हणाव्या लागतील. पण क्रॅबने मात्र जुन्या वळणाच्या बोधप्रद कवितांचा रतीब घालणे काही थांबवले नाही. तरूण पिढीचे काव्य मी थोडेफार वाचले आहे. कीट्सच्या काव्यात तळमळ आहे, शेलीच्या काव्यातून स्वर्गीय आनंद मिळतो. या दोघांच्या बऱ्याच कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. पण काळाच्या ओघात त्यातिल किती टिकून रहातात आणि किती वाहून जातात ते सांगणं कठीण आहे. त्यांच्या कवितेतील सफाई विलक्षण आहे. त्यांनी एवढ्या लहान वयात प्रसिद्धीचं शिखर गाठलं आहे की त्यांना उदयोन्मुख कवि म्हणणं तसं प्रस्तुत होणार नाही. त्यांची शैली कितीही सुरेख असली तरी त्यांचं काव्य माझ्या तरी मनाला भिडत नाही. त्यांच्या कवितेतील शब्दकळा पाहून रॉजेटचा थेसॉरस त्यांनी पाळण्यात असतानाच घोकून तोंडपाठ केला असावा की काय अशी शंका येते. माझ्या मते त्यांच्या काव्यातून त्यांचे माहितीचे ज्ञानभांडार आणि त्यांच्या भावना या दोन्ही गोष्टी खूपच उघडपणे व्यक्त होतात. त्यांच्या कवितेचं असं अंगावर येणं माझ्या पचनी पडत नाही. माझ्या मते त्यांच्या काव्यात जोश थोडा कमी पडतो. त्यांची स्वप्नं थोडी फिकी वाटतात. मला ते फारसे आवडत नाहीत. तसं बघायला गेलं तर मी कुंपणावर बसलेलो आहे. मला आपल्या साध्या, सरळ, सोप्या, बोधकथा लिहायला आवडतील. पण अशा कथा लिहीण्यामागे माझा स्वप्नरंजन सोडून दुसऱ्या कोणताही हेतू असला तर त्याच्या सारखा दुसरा मूर्खपणा असणार नाही.



Artist: El Greco (1541–1614)

Title: The Vision of Saint John, or The Opening of the Fifth Seal

Date between circa 1609 and circa 1614, Oil on canvas, 87.5 × 76 in (222.3 × 193 cm)

Current location: Metropolitan Museum of Art, NY. Source: Wikipedia, Public Domain

## ३

हे झाले थोडेसे विषयांतर.

मी माझं पहिलं पुस्तक लिहीलं तेव्हा मी अगदी तरूण होतो.

सुदैवाने माझ्या पहिल्याच पुस्तकाकडे लोकांचं लक्ष गेलं आणि बरेच लोक मला ओळखू लागले.

लंडनच्या साहित्यिक वर्तुळात माझी उठबस सुरू झाली. माझा स्वभाव थोडासा उतावीळपणाचा असला तरी सुरवातीला भिडस्तपणामुळे मी मागेमागेच रहायचो. माझ्या भटकंतीच्या दिवसात सगळा आनंदी आनंद होता असं काही म्हणता येणार नाही. काही अगदी मन विषण्ण करणारे प्रसंगही येत. पण त्याला आता खूप काळ लोटला आहे. कादंबर्यांत वर्णन केलेल्या गोष्टी आणि घटना बऱ्याच अंशी अचूक असल्या तरी काळानुसार त्यातील काही तपशील आता बदलले आहेत. उदाहरणार्थ काही स्थळं. चेल्सी आणि ब्लुम्सबेरीने आता हॅम्पस्टीड, नॉटींग हिल गेट, हाय स्ट्रीट आणि केनिंगस्टनची जागा घेतली आहे. त्या काळी एखाद्याचा चाळीशीच्या आत साहित्यिक वर्तूळात समावेश होणं म्हणजे मोठा बहुमान समजला जायचा. पण आता पंचवीस वर्षावरील साहित्यिकाला अडगळीत काढलं जातं. त्या काळी आम्ही आमच्या भावनांचं प्रदर्शन करायला थोडे लाजायचो. आपली चेष्टा हाईल या भितीमुळे का होईना आमचा ढोंगीपणा थोडा काबूमध्ये असायचा. आम्ही फार सोज्वळ होतो अशातला भाग नाही, पण आजच्यासारखा चौफेर स्वैराचार मात्र आमच्या काळी नव्हता. क्वचित कधीतरी पाऊल वाकडं पडलं तर त्याची वाच्यता करण्याऐवजी आम्ही मौन बाळगत असू. आम्ही फावड्याला फावडं म्हणणारी अगदी सरळसोट माणसं होतो. स्त्रियांनी त्यांची मर्यादा त्याकाळी ओलांडली नव्हती हे ही एक महत्वाचं कारण होतंच म्हणा.

मी व्हिक्टोरिया स्टेशनजवळ रहात असे. तेथून मी माझ्या साहित्यिक मित्र मंडळींना भेटण्यासाठी बसने शहरात ठिकठिकाणी जात असे. अशा माझ्या

भटकंतीतील एक भेट मला आजही नीट आठवत आहे. भिडस्तपणामुळे मला दार ठोठावण्याचा धीर होत नव्हता. त्यामुळे धीर येण्यासाठी मी रस्त्यावरून फ़ेऱ्या मारत होतो. अशा बऱ्याच फ़ेऱ्या मारून झाल्यावर शेवटी धीर करून मी दार ठोठावले. दार उघडून कोणीतरी मला आत घेतल्यावरच माझा जीव भांड्यात पडला. आतल्या गर्दीत मी बुजऱ्यासारखा वावरत होतो. तेथे यजनामीण बाईंनी बऱ्याच मोठ्या लोकांशी माझी आवर्जून ओळख करून दिली. त्यांनी माझ्या पुस्तकाची जी स्तुती केली त्याने तर मी पार अवघडून गेलो होतो. मी लेखक असल्याने संभाषण चतुर असेन असं त्यांना वाटत असावं. पण बोलायला चातुर्यपूर्ण असं काहीतरी सुचेपर्यंत पार्टी संपून गेली होती. माझा अस्वस्थपणा लपवण्यासाठी मी चहाचा कप आणि पावाचा कसातरी कापलेला तुकडा हातात घट्ट धरून उभा होतो. माझ्याकडे कोणाचेही लक्ष जाऊ नये असं मला वारंवार वाटत होतं. कारण मला त्या सगळया सुप्रसिद्ध मंडळींकडे डोळे भरून पहायचं होतं आणि त्यांचं चातुर्यपुर्ण बोलणं माझ्या कानात साठवून घ्यायचं होतं.

तेथे जमलेल्या स्त्रिया नाकेल्या, टपोऱ्या डोळयांच्या आणि चांगल्या धष्टपुष्ट होत्या. त्यांनी घातलेले कपडे अंगावर घातलेल्या चिलखतासारखे दिसत होते. हळू आवाजात बोलत इकडे तिकडे फिरताना आपल्या अवतीभोवती काय चालंलय याच्यावर त्यांचं बारीक लक्ष होतं. पावाला लोणी लावतानासुद्धा हातमोजे न काढण्याचा हट्ट आणि कोणाचं लक्ष नाही असं पाहून हळूच खुर्चीला हात पुसण्याची चलाखी माझ्या अजूनही लक्षात आहे. फर्नीचरच्या दृष्टीने तसं करणं चांगलं नव्हतं पण यजनानीणबाईंनी त्याचा बदला त्या जेव्हा त्यांच्या मैत्रीणीकडे पार्टीला जातील तेव्हा तेथल्या फर्नीचरला हात पुसून घेतला असता. काही जणींनी अद्ययावत फॅशनचे कपडे घातले होते. एखाद्याने कादंबरी लिहीली आहे एवढ्यावरून त्याला गबाळेपणाने रहाण्याचा हक्क मिळतो असे नाही असं त्यांचं मत होतं. छाप पाडण्यासाठी चांगले रूबाबदार कपडे घालायला हरकत नसते. लेखकाने झकपक कपडे करून वर चकचकीत बूट घातले तर त्याचे लिखाण नाकारायची संपादकाची हिम्मत होणार नाही. पण काही स्त्रियांच्या मते व्यवस्थित कपडे केल्याने त्यातून

थिल्लरपणा दिसतो. कलाकारासारखे दिसण्यासाठी त्या मुद्दाम गबाळे कपडे करून आल्या होत्या. त्यांनी घातलेले दागिने तर अगदी बघवत नव्हते. पुरूष सहसा असा आचरटपणा करत नाहीत. त्यांचा पहेराव अगदी कुठल्याही ऑफिसमध्ये खपून जाईल असा होता. बहुतेकजण थकलेले आणि कंटाळलेले दिसत होते. तेथे जमलेल्या लेखक मंडळींपैकी बऱ्याच जणांशी माझा पूर्वपरिचय नव्हता. त्या तद्दन खोट्या आणि तकलादू वातावरणात मला अगदी अवघडून गेल्या सारखे वाटायला लागलं.

तेथे जमलेल्या मंडळींच संभाषण ऐकण्यासारखं होतं. कोणाची पाठ वळताच त्याची खिल्ली उडवली जायची. एखाद्या व्यक्तिच्या चारित्र्याची टिंगल उडवावी तशाच थिल्लरपणाने त्याचे गंभीर लेखनसुद्धा टिंगलीचा विषय होऊ शकतो हे मला नव्याने कळलं. मला समयोचित आणि हजरजबाबी बोलता येत नाही याचं मला वाईट वाटतं. त्या काळी संभाषणचातुर्य हे एक मोठं शास्त्र होतं. मार्मिक आणि चपखल उत्तर देणं ही एक कला होती. भट्टीमधील फुटाण्यासारखा ताडताड बोलणारा लेखक पार्टीमध्ये भाव खाऊन जाई. संभाषणात चुटके आणि चारोळया पेरून खोटी नाटकी रंगत आणली जाई. आता मला त्यातील फारसं काही आठवत नाही. पण मला वाटतं संभाषण जेव्हा लेखन व्यवसायाच्या प्रमुख अंगाकडे वळायचे तेव्हा कित्येकांना ते अडचणीचं वाटायचं. एखाद्या पुस्तकाच्या गुणवत्तेचा विषय निघाला की त्या पुस्तकाच्या किती प्रति विकल्या गेल्या, लेखकाला किती मानधन देऊ केलं आहे, त्यातील किती त्याला आगाऊ मिळाले, असे प्रश्न हटकून उपस्थित व्हायचे. मग आम्ही या ना त्या प्रकाशकाविषयी बोलत असू. एकाचं औदार्या तर दुसऱ्याचा कंजूषपणा यांची तुलना व्हायची. घसघशीत मानधन देणाऱ्या प्रकाशकाकडे जावं की चांगल्या दर्जेदार पुस्तकांसाठी प्रसिद्ध असलेल्याकडे जावं. काही प्रकाशक जाहिरात चांगली करत तर काहींच जाहिरातीकडे पूर्ण दुर्लक्ष. नंतर एजंट आणि संपादकांचा विषय निघायचा. कोणता एजंट एकदा मान्य केलेलं मानधन वेळीच रोख देतो आणि कोणता नुसते वायदे करत बसतो? पुस्तकाचा खप वाढण्यासाठी संपादकांचा तसा उपयोग होतो का? अशा लेखकांच्या आतल्या वर्तुळात आपला समावेश झाल्याबद्दल मला त्यावेळी आतून फार बरं वाटायचं.



Victorian high tea party, Photograph on glass plate, Circa 1900.

Source: Wikipedia, Public Domain

४

त्या दिवसात रोज वॉटरफोर्डने दाखवली तेवढी आपुलकी मला दुसऱ्या कोणी दाखवली नव्हती. तिच्यात पुरूषांची बुद्धी आणि स्त्रियांची कुटीलता या दोघांचा मिलाफ होता. ती ज्या कादंबऱ्या लिहायची त्या अगदी स्वतंत्र आणि अस्वस्थ करणाऱ्या असत. तिच्या घरी एके दिवशी चार्ल्स स्ट्रिकलँडच्या पत्नीशी माझी

ओळख झाली. मिस वॉटरफोर्डने चहापानाला तिच्या घरी बोलावलं होतं. तिचं लहानसं घर आमंत्रितांनी भरून गेलं होतं. प्रत्येक जण बोलत होता. मी एकटाच अवघडून गप्प बसलो होतो. नव्याने ओळख झालेल्यांशी आपण होऊन बोलायला मला थोडं संकोचल्यासारखं वाटत असे. मिस वॉटरफोर्ड एक चांगली यजमान होती. तिने माझी अडचण ओळखली आणि ती आपण होऊन पुढे आली.

“तुम्ही मिसेस स्ट्रिकलँडशी बोला. त्यांना तुमचं पुस्तक खूप आवडलं आहे.”

“त्या काय करतात?” मी विचारलं.

माझ्या अज्ञानाबद्दल मी सजग होतो. जर मिसेस स्ट्रिकलँड लेखक असत्या तर मला माहित असलेलं बरं.

“त्यांना लोकांना पार्टीला बोलवायला खूप आवडतं. त्यांच्याशी कोणी थोडंसं गोड गोड बोललं तर लगेच पुढच्या पार्टीचं आंमत्रण मिळतं.”

रोज वॉटरफोर्डला सगळ्या गोष्टीत खोड काढायची सवय होती. दुसऱ्याचं खाजगी आयुष्य चिवडून त्यात आपल्या कादंबरीसाठी काहीतरी कथासूत्र मिळतंय का हे ती शोधत असायची. आपल्याला भेटणारी सगळी माणसं तिला कथालेखनासाठी कच्ची सामुग्री आहेत असं ती गृहीत धरत असे. कोणी तिची थोडीशी तारीफ केली की काही तरी कारण काढून तिच्याकडच्या पार्टीचं आमंत्रण मिळालंच समजा. साहित्यिकांबद्दल लोकांना वाटणाऱ्या आदराची तिला चांगली कल्पना होती. साहित्यिक वर्तूळातील मोठ-मोठ्या पार्ट्यांना तिला आवर्जून आमंत्रण असे. त्यामुळे आपल्या आमंत्रणाचा अव्हेर होणार नाही याची तिला खात्री होती. त्यामुळे ती पाहुणी किंवा यजमान या दोन्ही भुमिकेत मोठ्या दिमाखाने वावरत असे.

तिने माझी मिसेस स्ट्रिकलँडशी ओळख करून दिल्यावर आम्ही दहा एक मिनीटे एकमेकांशी बोलत होतो. तिचा आवाज मंजूळ होता यापेक्षा त्या भेटीतील

काहीही मला आठवत नाही. वेस्टमिनीस्टर या भागात तिच्या मालकीचा एक फ्लॅट होता. त्या फ्लॅटमधून बांधकाम चालू असलेल्या कॅथेड्रलचे दृश्य दिसे. मी सुद्धा त्याच भागात रहात होतो. एकाच विभागात रहाणाऱ्या लोकांत उदाहरणार्थ नदी आणि सेंट जेम्स पार्क याच्यामधील विभाग जसा आर्मी अँड नेव्ही  स्टोर्समुळे जसा एकप्रकारचा आपलेपणाचा भाव आपोआपच प्रस्थापित होत असे तसा आमच्यात मैत्रीचा धागा आपसूकच निर्माण झाला. थोड्याच दिवसात तिच्या घरच्या एका लन्शन पार्टीचे मला आमंत्रण मिळाले.

मला फारसं कामच नसायचं. त्यामुळे कोणत्याही पार्टीचे आमंत्रण मी आनंदाने स्विकारीत असे. पार्टीला मी थोड्या उशीरानेच गेलो. खूप लवकर गेलो तर बरे दिसणार नाही म्हणून मी कॅथेड्रील भोवती तीन चार फ़ेऱ्या मारल्या. परीणामी खूपच उशीर झाला. मी पोचलो तेव्हा पार्टी संपत आली होती. मिस वॉटरफोर्ड आणि मिसेस जे, रिचर्ड ट्विनींग आणि जॉर्ज रोड हे हजर होते. आम्ही सगळे लेखक होतो. वसंत ऋतुची सुरवात होती. त्या दिवशी हवा फार चांगली पडली होती. खेळकर वातावरणात गप्पा रंगल्या होत्या. आमच्या बोलण्यात शेकडो विषय येत होते. मिस वॉटरफोर्ड आपल्या ऐन तारूण्यात कोणत्याही पार्टीला सहसा शेवाळी रंगाचा ड्रेस घालून जात असे आणि हातात डॅफोडिल्सची फुलं असत. पण आता तारूण्याचा बहर ओसरला होता. तरूणपणीच्या अभिरूचीची जागा प्रौढत्वात येणाऱ्या उच्छृंकुलपणाने घेतल्यामुळे ती उंच टाचांचे बूट, पॅरीस फॅशनचा नवा कोरा ड्रेस आणि नवी हॅट अशी नटून आली होती. नटल्यामुळे असेल पण तिचा उत्साह उतू जात होता. तिथे अनुपस्थित असलेल्या आमच्या लेखक मित्रांबद्दल एवढं आकसाने बोलताना तिला यापूर्वी मी कधी पाहिलं नव्हतं. मोठ्याने बोलून दुसऱ्यावर विनोद करणं अनुचित दिसलं असतं याची कल्पना मिसेस जेला असल्यामुळे ती अगदी हळू आवाजात कुजबुजत होती. रिचर्ड ट्विनींग काही तरी गमतीजमतीच्या गोष्टी सांगत होता. जॉर्ज रोडला बोलायला विषय न मिळाल्यामुळे त्याचे तोंड गप्प होते, फक्त खाण्यापुरते उघडत होते. मिसेस

स्ट्रिकलँड फारशी बोलत नव्हती. न बोलता संभाषण चालू कसं ठेवयचं ती कला तिला चांगलीच अवगत होती. जेव्हा संभाषणाच खंड पडे तेव्हा एक दोन मोजक्या शब्दांत आपले मत व्यक्त करून ती संभाषण पुढे चालू रहाण्यास मदत करत होती. ती सदतीस वर्षांची होती. थोडी भरल्या अंगाची. तरीही तिला लठ्ठ म्हणता आलं नसतं. ती फार सुंदर होती अशातला काही भाग नाही, पण तिचा चेहेरा आकर्षक होता. मुख्यत: तिच्या टपोऱ्या बदामी डोळयांमुळे. तिची अंगकांती किंचीत तांबूस होती. तिचे काळसर केस व्यवस्थित विंचरलेले होते. तेथे उपस्थित असलेल्या तीन स्त्रियांपैकी मेकअप न केलेली अशी ती एकटीच होती. इतरांच्या तुलनेत तिचे सौंदर्य साधे वाटत असले तरी त्यात एक प्रकारचा डौल होता.

जेवणघराची सजावट साधी म्हणता येईल अशी असली तरी त्यात तत्कालीन अभिरूची दिसत होती. भिंतीवर उंचापर्यंत पांढऱ्या लाकडाचे जोडकाम केले होते. त्यावर लावलेल्या हिरवट रंगाच्या वॉलपेपरवर व्हिसलरची इचिंग काळया रंगाची शिसवी फ्रेम करून लावली होती. उंच खिडक्यांवर मोराचे डिझाईन काढलेल्या हिरव्यागार रंगाचे पडदे लावले होते. झाडाझुडपात बागडणाऱ्या पांढऱ्या शुभ्र सशांचं चित्र असलेलं हिरव्या मखमली रंगाचं जाजम जमिनीवर अंथरलेलं होतं. एकूण सजावट आणि रंगसंगतीवर विल्यम मॉरीसच्या शैलीची छाप होती. निळया रंगाचं नक्षीकाम केलेलं चिनीमातीचं भांड फायरप्लेसच्या कठड्यावर ठेवलेलं होतं. त्यावेळी लंडनमध्ये अशा प्रकारची सजावट केल्या शेंपाचशें तरी डायनिंग रूम असाव्यात. सजावट कितीही कलात्मकतेने आणि टापटीपीने केली असली तरी ती एकंदरीत यांत्रिक आणि त्यामुळे निरस वाटत होती.

मी मिस वॉटरफोर्ड बरोबर बाहेर पडलो. बाहेर छान उन पडलं होतं. त्यात तिची हॅटही नवीन होती. त्यामुळे आम्ही बागेतून फेरफटका मारायचं ठरवलं.

“पार्टी छान झाली, नाही!”

“खायचे पदार्थ काही खास नव्हते. मी तिला अगदी बजावून सांगितलं होतं. लेखक मंडळींना बोलावलं आहेस तर त्यांना चांगलं खिलवलं पाहिजे.”

“तुमचा सल्ला चांगला आहे. पण मला एक सांगा या बाईसाहेबांना मुळात लेखकांना बोलावून पार्टी द्यायची एवढी हौस का आहे.”

मिस वॉटरफोर्डने मान हलवली.

“तिला त्याची खूप हौस आहे. तिला सगळ्या साहित्यिक चळवळीत भाग घ्यायला मनापासून आवडतं. तिला बिचारीला असं वाटत असतं की आपण म्हणजे एक अगदी साधी गृहिणी आहोत आणि आपल्याकडे येणारे साहित्यिक म्हणजे कोणी खास माणसं आहोत. आपल्यासारख्या लेखकांना पार्टीला बोलावल्यामुळे तिला मनापासून आनंद होतो आणि हा आनंद तिला मिळू देण्यात आपलं काहीच नुकसान नाही. मला तिचं हे फार आवडतं.”

आपल्या पार्टीला साहित्यिक वगैरे मंडळी यावीत असं वाटणाऱ्या तिच्यासारख्या उच्चभ्रू महिला हॅम्पस्टीड ते चेने वॉकपर्यंत डझनावारी मिळाल्या असत्या. लेखकांना आपल्या गटात ओढण्यासाठी त्यांच्यात नेहमी अहमहमिका लागायची. मागे वळून पहाताना आता मला असं वाटतं की त्या अतिविशाल महिलांत मिसेस स्ट्रिकलँड त्यातल्या त्यात बरी म्हणता आली असती. तिचं बालपण ग्रामिण भागात गेलं होतं. मुडीच्या लायब्ररीतून येणाऱ्या पुस्तकांमुळे लंडनच्या सांस्कृतीक जीवनाशी तिचा परिचय झाला होता. तिला वाचनाची खरीखूरी आवड होती. तिच्यासारख्या महिलांमध्ये हे अपवादानेच आढळलं असतं. कारण बहुतेकांना लेखकाच्या पुस्तकापेक्षा किंवा चित्रकाराच्या पेंटींगपेक्षा त्याच्या खाजगी आयुष्यातच जास्त रस असतो. तिचं स्वत:चं असं एक कल्पनाविश्व होतं. नेहमीच्या रहाटगाड्यात न मिळणारं स्वातंत्र्य तिला तिच्या कल्पनाविश्वात मनमुराद घेता येई. इतके दिवस ती साहित्यिकांचं जग प्रेक्षकाच्या भूमिकेतून बघत असे. लेखकांशी जला परिचय होऊ लागला तसा पडद्यामागच्या जगात तिचा प्रवेश झाला.

कलाकारांचं नाट्यमय आयुष्या तिला अगदी जवळून बघता येऊ लागलं. साहित्यिक मेजवान्यांना ती आवर्जून उपस्थित राही. लेखकांना आपल्या घरी बोलवून ती त्यांचं चांगलं आदरातिथ्य करी. तिने साहित्यिक जगाची संस्कृती चांगलीच आत्मसात केली. पण तिने आपला स्वतंत्र बाणा कधीच सोडला नव्हता. लेखकांची विक्षीप्त वर्तणूक, चित्रविचित्र पेहेराव, भन्नाट कल्पना आणि चक्रमपणा या सगळयांनी तिचं चांगलं मनोरंजन होत असावं, पण त्याचा परिणाम तिच्यावर झालेला कधी दिसला नव्हता.

“मिस्टर स्ट्रिकलँड काय करतात?”

“इथेच रहातात. लंडनमध्ये त्यांचा शेअर दलाली की काहीतरी व्यवसाय आहे. ते बिचारे अगदी साधे आहेत.”

“मला एक शंका आहे. त्या दोघांचं आपापसात जमतं?”

“न जमायला काय झालं. चांगलं जमतं. त्यांच्याकडे कधी डिनरला जायची वेळ आली तर तुमची त्यांची भेट होईलच. पण त्यांच्याकडचं आमंत्रण सहसा डिनरचं नसतं. मिस्टर स्ट्रिकलँडना लोकांत मिसळायला आवडत नसावं. साहित्य, कला वगैरे गोष्टींमध्ये त्यांना रूची नाही.”

“सुसंकृत आणि बहुश्रुत स्त्रिया अशा अशा नीरस पुरूषांशी का बरं लग्न करतात?”

“कदाचित बुद्धीमान पुरूषांना सुसंकृत आणि बहुश्रुत स्त्रियांशीच लग्न करायला आवडत असावं.”

यावर चांगलं प्रत्युत्तर मला सुचलं नाही. म्हणून मी त्यांना मुलं आहेत का याची चौकशी केली.

“एक मोठा मुलगा आणि धाकटी मुलगी आहे. दोघंही शाळेत जातात.”

त्या विषयात बोलण्यासारखं काही उरलं नाही म्हणून आम्ही दुसऱ्या विषयाकडे वळलो.



Zaandam, the Netherlands, c. 1889 - etching by James McNeill Whistler

Source: Wikipedia, Public  Domain

## ५

त्या उन्हाळयात मिसेस स्ट्रिकलँडची आणि माझी बऱ्याच वेळा भेट झाली. तिने दिलेल्या छानशा लंच पार्टी नंतर मी बऱ्याच वेळा त्यांच्या घरी जायचो. त्या पार्टीला काही औरच मजा आली होती. आम्हाला एकमेकांशी गप्पा मारायला खूप आवडायचं. मी खूप तरूण होतो. लेखक म्हणून माझी कारकीर्द नुकतीच घडत होती. लेखनकामाच्या खडतर मार्गावर माझं बोट धरून मला घेऊन जाण्याची कल्पना तिला खूप आवडली असावी. अडचणीच्या वेळी लहानमोठी मदत करायला, आपलं म्हणणं, आपुलकीचा सल्ला ऐकणारा कोणीतरी मिळाला तर तिला ते हवंच होतं. दुसऱ्याचं म्हणणं सहानुभूतिने ऐकण्याची कला तिच्याकडे होती. बरेच जण या कलेचा दुरूपयोग करतात. सहानुभूती दाखवता येईल अशी कोणी व्यक्ति मिळते का याकडे असे लोक टपून बसलेले असतात. एकदा का एखादा दुर्दैवी माणूस अशा लोकांच्या तावडीत सापडला की लागलीच त्याच्यावर सहानुभूतिचा एवढा वर्षाव सुरू होतो की त्याला बिचाऱ्याला ओशाळल्यासारखं होतं. त्यात त्यांना काय समाधान मिळते देव जाणे. माझे काही जीवलग मित्र अशा लोकांच्या सहानुभूतिचे शिकार झाले आहेत. मिसेस स्ट्रिकलँटमात्र सहानभूती दाखवताना अशा खूबीने दाखवायची की तिचं सहानुभूतिचं बोलणं ऐकणाऱ्याला असं वाटावं की तिचं बोलणं ऐकून तोच तिच्यावर उपकार करीत आहे. मी या विषयी जेव्हा रोज वॉटरफोर्डशी बोललो तेव्हा ती म्हणाली,

“दूध चवीला छान लागतं आणि त्यात ब्रँडी घातलेली असेल तर फारच छान. पण गाईच्या आचळात साठलं तर मात्र गाईची आचळं भरून येतात आणि तिला केव्हा धार काढतायत असं होऊन जातं.”

रोज वॉटरफोर्ड फटकळ होती. तिच्यासारखं भोचक बोलणं कोणाला जमलं नसतं, तसंच तिच्यासारखं मिश्किल बोलणंही कोणाला जमणं कठीण होतं.

मिसेस स्ट्रिकलँडची आणखी एक गोष्ट मला आवडायची. तिचं वागणं, बोलणं आणि रहाणी यातून तिची उच्च अभिरूची दिसून येत असे. तिचा फ्लॅट व्यवस्थित सजवलेला असे. घरात ताजी फुले ठेवलेली असत. त्यामुळे सजावट साधी असली तरी नेहमी स्वच्छ आणि प्रसन्न वातावरण असे. डायनिंग हॉल लहान असला तरी मोठ्या कलात्मकतेने सजवलेला असल्यामुळे तेथे भोजन घेणे म्हणजे एक आनंददायक अनुभव असे. टेबल सुंदर होतं. काय हवं नको ते बघायला दोन नोकराणी मोठ्या तत्परतेने सज्ज असत. अन्न चांगलं रुचकर असे. दिवाणखान्यात तिच्या मुलाचे आणि मुलीचे फोटो होते. सोळा वर्षांच्या रॉबर्टचा रग्बी खेळतानाचा एक, फ्लॅनेल आणि क्रिकेटीची कॅप घातलेला आणि टेल कोट व स्टँडिंग कॉलरचा शर्ट असे आणखी काही फोटो होतो. तो नीट नेटका आणि सुदृढ प्रकृतीचा दिसत होता. त्यामुळे मिसेस स्ट्रिकलँड यजमानीणबाई म्हणून जेवढी आतिथ्यशील आहे तेवढीच आई म्हणूनही एक गृहकर्तव्यदक्ष गृहीणी असावी याची खात्री पटे.

“तो काही फार हुशार आहे असं काही म्हणता येणार नाही, पण तो एक फार गोड आणि आज्ञाधारक मुलगा आहे.”

मुलगी चौदा वर्षांची होती. तिचे खांद्यावर रुळणारे केस तिच्या आई प्रमाणेच दाट आणि गडद रंगाचे होते. आईसारखाच गोड चेहेरा आणि शांत नजर.

“दोन्ही मुलं तुमचंच रूप घेऊन आली आहेत.”

“खरं आहे. दोन्ही मुलं वडिलांपेक्षा माझ्यावरच जास्त गेली आहेत.”

“तुम्ही अजूनही त्यांची माझ्याशी ओळख करून दिलेली नाही.”

“ओळख करून घ्यायला आवडेल तुम्हाला?”

ती गोड हसत लाजत म्हणाली. तिच्या वयाच्या स्त्रिया एवढ्या लाजत नाहीत. तारूण्याचा बहर ओसरून गेल्यावरसुद्धा आकर्षक दिसण्याचं रहस्य तिच्या या साधेपणातच असावं.

“तुम्हाला माहित नसेल म्हणून मी आगाऊ सूचना देऊन ठेवते. त्यांना या साहित्य वगैरे गोष्टींमध्ये मुळीत रस नाही. माझे यजमान म्हणजे अरसिकतेचा एक नमुनाच आहेत.”

आपल्या नवऱ्याला कमी लेखण्याचा हेतू तिच्या मनातसुद्धा नव्हता. किंबहुना मला तरी त्यात तिचं आपल्या नवऱ्यावरचं प्रेमच दिसलं. उलट आपल्या पतीच्या दोषांची आगाऊ कल्पना देऊन आपल्या मित्र-मैत्रीणींची संभाव्य शेरेबाजी टाळण्याचा तिचा उद्देश असावा.

“ते शेअर बाजारात असतात. ते अगदी हाडाचे शेअर ब्रोकर आहेत. मला वाटतं त्यांच्याशी गप्पा मारायला तुम्हाला खूप कंटाळा येईल.”

“तुम्हाला कंटाळा येतो?” मी उलट विचारलं.

“हे पहा मी त्यांची धर्मपत्नी आहे आणि माझं त्यांच्यावर खूप प्रेमही आहे.”

हे बोलताना ती किंचीत लाजली आणि ते लपवण्यासाठी ती मुग्ध हसली. मला वाटलं की मी तिचा उपहास करीन अशी तिला भिती वाटली असावी. कारण रोज वॉटरफोर्डने माझ्यासमोर अशी कबुली कधीच दिली नसती. ती थोडी गांगरली आणि तिच्या डोळयात पाणी तरळले.

“आपण कोणी महान आहोत असं ते कधीच भासवत नाहीत. शेअर बाजारात ते फार पैसे मिळवतात असेही नाही. ते कसंही असलं तरी ते अतिशय चांगले आणि शांत स्वभावाचे आहेत.”

“मला त्यांच्याशी गप्पा मारायला आवडेल.”

“मी एकदा फुरसतीने तुम्हाला जेवायला बोलावीन. पण तुमची संध्याकाळ फुकट गेली म्हणून मागाहून मला नाव ठेऊ नका.”



The Bank of England and the Royal Exchange

Photograph by Sir William Tite, 1844, Source: Victorianweb.org

## ६

शेवटी एकदाची माझी चार्ल्स स्ट्रिकलँडशी भेट झाली. पण वेळ अशी होती की फक्त ओळख करून घेण्यापलीकडे काही झालं नाही. एके दिवशी सकाळीच मला मिसेस स्ट्रिकलँडची चिठी आली. तिने संध्याकाळी मला डिनर पार्टीला बोलावलं होतं. तिच्या एका पाहुण्याने ऐन वेळी नकार दिला होता म्हणून त्याची जागा भरून काढण्यासाठी मला आमंत्रण दिलं होतं. त्या चिठीत तिने लिहीलं होतं:

“तुम्हाला कदाचित कंटाळा येण्याची शक्यता याची मी आगाऊ सुचना देत आहे. ही पार्टी अगदी कंटाळवाणी होण्याची शक्यता आहे, पण तरीही तुम्ही आलात तर मी तुमची अत्यंत आभारी राहीन. कमीत कमी तुमच्याशी थोड्या गप्पा तरी मारता येतील.”

शेजारधर्म म्हणून तरी हे आमंत्रण स्विकारणं भाग होतं.

जेव्हा मिसेस स्ट्रिकलँडने तिच्या नवऱ्याशी ओळख करून दिली तेव्हा त्याने अगदी कोरडेपणाने हस्तांदोलन केले. त्याच्याकडे वळत थट्टेच्या सुरात ती म्हणाली,

“मला नवरा आहे हे मला यांना दाखवून द्यायचं होतं. त्यांना संशय यायला लागला होता की मी बिनलग्नाची आहे की काय.”

आपल्याला यात काहीच गंमत वाटत नाही हे दाखवून देण्यापुरतं तो जेवढ्याच तेवढं हसला. तेवढ्यात नवे पाहुणे आले आणि आम्हाला सोडून यजमानीणबाई त्यांच्याकडे वळल्या. शेवटी सगळी पाहूणे मंडळी जमली आणि जेवायला कधी सुरवात होत आहे त्याची वाट बघू लागली. मला स्पष्ट आठवतंय. न बोलता शहाणा अशा आविर्भावात तो आपला एक कोपरा पकडून उभा होता. या पार्टीच्या यजमानांनी एवढा आग्रह करून या सगळ्या पाहुण्यांना का बोलावलंय आणि ही सगळी मंडळी एवढी यातायात करून येथे का आली आहेत असं कोडं त्यावेळी मला पडलं. पार्टीला आलेल्या पाहुण्यात कसलाही उत्साह जाणवत नव्हता. जाते वेळी सगळ्यांच्या मनात एकदाची सुटका झाल्याची भावना होती. ती पार्टी म्हणजे केवळ एका उपचारासारखी वाटली. कारण स्ट्रिकलँड दांपत्य तेथे जमलेल्या पाहुण्यांपैकी बऱ्याच जणांना एक पार्टी देऊ लागत होते. पण पार्टीला येण्यात कोणालाच रस नव्हता. तरीही बहुतेक जण पार्टीला आले होते. का? तर कोणाला घरी एकट्याने जेवण्याचा कंटाळा आला होता, तर काहींना आपल् नोकरांना एक दिवस सुटी द्यायची होती, तर कोणाकडे नकार द्यायला सबळ कारण नव्हते आणि बऱ्याच जणांना एक फुकट जेवण वसूल करायचे होते.

जेवणाच्या खोलीत खूप गर्दी झाली होती. के.सी. दांपत्य, एक सरकारी उच्च पदस्थ आणि त्याची पत्नी, मिसेस स्ट्रिकलँडची बहीण आणि तिचा नवरा कर्नल मॅक-अँड्रयु आणि एक खासदार पत्नी. ज्याला संसदेच्या कामात अडकल्यामुळे यायला जमले नव्हते आणि ज्याच्या ऐवजी आयत्या वेळेला मला बोलावण्यात आलं होतं ती हीच व्यक्ति असावी. पार्टीला आलेली मंडळी भयंकर घरंदाज वगैरे होती. स्त्रिया आपल्या भपकेबाज कपड्यांचं प्रदर्शन करायला आल्यासारख्या वाटत होत्या. आपल्या वागण्या बोलण्यातून त्या आपला सामाजिक दर्जा ज्या कौशल्याने दाखवून देत होत्या की ते पहाणं मोठं गमतीचं होतं. पुरूष मंडळी आपापला आब सांभाळत वावरत होती.

पार्टीमध्ये आलोय तर काही तरी बोललं पाहिजे म्हणून सगळयांचे आवाज नकळत चढत होते. जेवणाच्या खोलीत एकच गोंगाट चालू होता. एकच एक विषय होता असं काही नव्हतं. प्रत्येक जण आपल्या शेजाऱ्याशी, शेजारी त्याच्या शेजाऱ्याशी बोलत होता. सूप, फिश, आँत्रे – मुख्य पदार्थ, भाजलेले पदार्थ, गोड आणि मसालेदार पदार्थ खाता खाता राजकिय परिस्थिती, गोल्फ, आपली मुलं-बाळं, नुकतंच आलेलं नाटक, रॉयल अकादमीला लागलेला नवा चित्रपट, हवापाणी, उन्हाळयाच्या सुटीतील बेत असा कुठलाही विषय व्यर्ज नव्हता. क्षणाचीही उसंत नव्हती. आवाजाची पातळी हळूहळू वाढू लागली. पार्टी यशस्वी झाल्याबद्दल मिसेस स्ट्रिकलँडनी आपली पाठ थोपटून घेतली असती. तिचा नवराही त्याच्या वाटेला आलेली भूमिका वठवण्याचा प्रयत्नही करण्याच्या फंदात पडला नव्हता. मला वाटतं पार्टी सुरू झाल्यापासून तो कोणाशी एक शब्दही बोलला नसावा. त्याच्या बाजूला असलेली मंडळी पार कंटाळून गेलेली दिसत होती. एक दोन वेळा मिसेस स्ट्रिकलँडनी त्याच्याकडे वळून मोठ्या चिंतेने पाहिले.

शेवटी एकदा मिसेस स्ट्रिकलँड उठली आणि सगळया स्त्रियांना जेवणाच्या खोलीबाहेर घेऊन गेली. ती गेल्यावर स्ट्रिकलँडने दरवाजा लावून घेतला आणि के.सी. आणि सरकारी अधिकाऱ्याच्या मधली जागा पटकावली. त्याने सगळयांच्या

ग्लासात पोर्ट ओतली आणि सिगारचा खोका पुढे केला. के.सी. ने वाईनची तारीफ केली आणि तो ज्या एका प्रकरणात गुंतला होता ते प्रकरण थोडक्यात सांगितलं. कर्नल पोलोविषयी बोलला. माझ्याकडे बोलण्यासारखं काही नव्हतं म्हणून इतरांच्या बोलण्याकडे लक्ष आहे असं दाखवत मी गप्प बसलो. माझ्याशी बोलण्यात दुसऱ्या कोणाला रस नव्हता म्हणून मी स्ट्रिकलँडचं निरीक्षण करायला सुरवात केली. मला वाटलं होतं त्यापेक्षा तो चांगलाच धिप्पाड होता. पहिल्या भेटीत तो मला किरकोळ प्रकृतीचा असावा असं का वाटलं ते सांगता येत नाही. त्याचा बांधा आडवा होता. त्याचे हातपाय दणकट होते. त्याने संध्याकाळी पार्टीला म्हणून घातलेले कपडे कसेतरीच गबाळयासारखे वाटत होते. त्याच्याकडे पाहिल्यावर एखादा घोडागाडीवाला समारंभासाठी सजून तयार झाला आहे असं वाटत होतं. तो चाळीस एक वर्षांचा असावा. देखणा नाही पण त्याला कुरूपही म्हणता आलं नसतं. त्याने दाढी तुळतुळीत केली होती. त्यामुळे त्याचा रुंद चेहेरा उघडा बोडका वाटत होता. त्याने आपले लालसर रंगाचे केस अगदी बारीक कापले होते. त्याचे निळसर करड्या रंगाचे डोळे चेहेऱ्याच्या मानाने लहान वाटत होते. त्याचे एकूण व्यक्तिमत्व सर्वसाधारण म्हणता येईल असे होते. मिसेस स्ट्रिकलँडला त्याची लाज का वाटत होती ते माझ्या लक्षात आले. जिला साहित्यिक विश्वात आपली छाप पाडायची आहे अशा स्त्रीला त्याच्यासारख्या नवऱ्याकडून फारसा फायदा नव्हता. उच्चभ्रू समाजात वावरण्यासाठी उपयोगी पडतील असे कोणतेही गुण त्याच्या अंगी नव्हते. त्यातल्या त्यात जमेची बाजू म्हणजे त्याच्यात  विक्षीप्त म्हणावं असंही काही नव्हतं. अरसिक असला तरी मुदलातच तो एक चांगला, प्रामाणिक आणि सरळमार्गी इसम असावा असं दिसत होतं. असा सीधा-साधा गुणी माणूस कोणालाही आवडण्यासारखे असला तरी त्याच्याशी मुद्दाम मैत्री करावी असं कोणाला वाटणं कठीण होतं. समाजातील एक सन्माननिय घटक, एक सद्गृहस्थ, कुटुंबवत्सल पती आणि पिता म्हणून तो ठीक होता. पण त्याच्यापायी आपला वेळ फुकट घालवावा असं कोणतंही कारण नव्हतं.



Paul Gauguin Wearing a Breton Jacket

Photography, ca. 1891, Isabell Cahn, Source: Wikipedia

Gauguin (exhibition catalogue, 1988, fig.47 p. 49), National Gallery of Washington

## ७

वसंत ऋतुचे अखेरचे दिवस होते. माझ्या माहितीतील सर्वजण कुठे ना कुठे गेलेले तरी होते किंवा जायच्या तयारीत होते. मिसेस स्ट्रिकलँड नॉरफोकला जाण्याच्या तयारीत होती. मुलांना समुद्रकिनारी खेळायला मिळालं असतं आणि नवऱ्याला गोल्फ. मीही बाहेरगावी जाण्याच्या तयारीत होतो. आम्ही नंतर शरद ऋतुत भेटायचं ठरवून एकमेकांचा निरोप घेतला. जाण्याच्या आदल्या दिवशी शेवटची खरेदी करावी म्हणून मी एका दुकानात गेलो होतो. माझ्यासारखी ती सुद्धा त्याच दुकानात बाहेरगावी जाताना शेवटच्या क्षणी आठवलेल्या गोष्टी खरेदी करायला म्हणून आपल्या मुलांना घेऊन आली होती. खूप उकडत होतं आणि खरेदी करून आम्ही दमलो होतो म्हणून मी समोरच्या बागेत जाऊन आईस्क्रीम खाऊया असं सुचवलं.

मिसेस स्ट्रिकलँडला तिच्या मुलांशी माझी ओळख करून द्यायला मनापासून आवडलं असावं कारण तिने माझं आमंत्रण तत्परतेने स्वीकारलं. तिची मुलं फोटोत दिसत होती त्यापेक्षा खूपच छान दिसत होती. मुलांचा तिला अभिमान होता ते अनाठायी नव्हतं. मी तरूण असल्याने मुलं न संकोचता माझ्याशी आनंदाने गप्पा मारू लागली. ती सुस्वभावी आणि सुदृढ प्रकृतीची होती आणि बागेत बागडताना तर फारच छान दिसत होती.

तासाभरानंतर ते कुटुंब टॅक्सीतून घरी जायला निघाले आणि मी माझ्या क्लबच्या दिशेने हळू हळू चालत निघालो. सुखी कुटुंब कसं असतं त्याची एक झलक नुकतीच बघायला मिळाली होती. मला त्यांचा हेवा वाटायला लागला. त्या कुटुंबीयांच एकमेकांवर अपार प्रेम असावं असं वाटत होतं. कुटुंबाबाहेरच्या व्यक्तिला समजणार नाहीत अशा त्यांच्या म्हणून खास गमती-जमती होत्या. त्यात सर्व कुटुंब रमत असे. चमकदार बोलता येणं या एकाच गुणावरून चार्ल्स स्ट्रिकलँडवर अरसिकतेचा शिक्का मारण्यात आपण फार मोठी चूक करतोय असं मला वाटलं. सभोवतालच्या कौटुंबीक वातावरणात समाधानाने जगण्यासाठी जेवढी आवश्यक

तेवढी हुशारी त्याच्याकडे निश्चित होती. जीवनात यशस्वी होण्यासाठी याचा फारसा उपयोग पडणार नाही पण आयुष्यात सुखी होण्यासाठी मात्र हे पुरेसं आहे. मिसेस स्ट्रिकलँटडसारख्या सुंदर सहचारिणीचं त्याच्यावर प्रेम आहे. नकळत मी त्यांच्या सुखी संसाराचं चित्र मनासमोर उभं करू लागलो. साधं नाकासमोर जाणारे सरळमार्गी चाकोरीबद्ध आयुष्य. गृहकृत्यदक्ष सुंदर पत्नी, दोन गोंडस मुलं. मोठी झाली की लग्न करून मार्गी लागतील. आजची सुंदर मुलगी पुढच्या पिढीची प्रेमळ आई होईल. तरूण देखणा मुलगा कर्तबगार सेनाधिकारी होईल. मुलं, नातवंड आपला वारसा पुढे चालवत आहेत. असं सुखी आणि समृद्ध आयुष्य जगून तृप्त झाल्यावर एके दिवशी निवृत्त होऊन कालमानपरत्वे कबरीत कायमची विश्रांती घ्यायला मोकळे. आयुष्याचं सार्थक म्हणतात ते याहून वेगळे काय असतं.

अगणित दांपत्यांची कहाणी याहून वेगळी नसते. अशा शांत जीवनात एक प्रकारची घरगुती अशी शान असते. हिरव्या कुरणातून बागडत, दऱ्याखोऱ्यातून वाट शोधत शेवटी विशाल सागराला मिळणाऱ्या एखाद्या निर्झराची मला येथे आठवण झाली. त्या निर्झराच्या अस्तित्वाची दखलही न घेणारा समुद्र मात्र शांत असतो. त्या शांततेनेच मला अस्वस्थ वाटायला लागतं. आयुष्याच्या अस्तित्वहीनतेने मी अस्वस्थ होतो. सर्वसामान्य लोकांना ज्यामुळे समाधान वाटतं त्याचा माझ्यात मुळातच अभाव आहे. सामान्यजनांचं जीवन सुखी आणि संथ असणं हे समाजस्वस्थ्याच्या दृष्टीने किती महत्वाचं असतं याची मला कल्पना आहे. पण माझं रक्त नव्या वाटा धुंडाळण्यासाठी नेहमी सळसळत असतं. सरळ सोप्या वाटेवरून चालण्यात मला फारसं स्वारस्य वाटत नाही. ज्यामुळे नित्याच्या शिरस्त्यात बदल होणार असेल अशा अपरीचित वाटेवरील खाचखळगे आणि धोके पत्करायला माझी हरकत नसते. बदलामुळे येणाऱ्या अनिश्चिततेने मी हुरळून जातो. अनिश्चिततेचे आव्हान स्विकारणे हे कदाचित माझ्या स्वभावातच असावे.



Paul Gauguin and his wife Mette Copenhagen 1885, Photograph

Source: http://impressionist-art.com/gauguin_photo.html



Paul Gauguin and his children Emil and Alina, Photograph

Source: http://impressionist-art.com/gauguin_photo.html

## ८

मी स्ट्रिकलँड दाम्पत्याविषयी आतापर्यंत जे लिहीलं आहे ते वाचून ते प्रत्यक्षात कसे होते याची नीट कल्पना येणार नाही याची मला जाणीव आहे. कादंबरीतील पात्रं विश्वसनीय वाटण्यासाठी त्यांना सहसा ज्या लकबी चिकटवल्या जातात तसं मी काहीही मी केलेलं नाही. यात जर काही दोष असलाच तर तो माझा आहे. ती पात्रं जिवंत वाटण्यासाठी त्यांची काही स्वभाववैशिष्ट्य दाखवता येतील का हे आठवण्यासाठी मी मेंदूला बराच ताण दिला. मला वाटलं वागण्या-बोलण्यातील एखादा ढंग किंवा खोड, तऱ्हेवाईक स्वभाव त्यांना बहाल केला तर त्यांचं चित्रण वैशिष्ट्यपूर्ण होऊ शकेल. सद्यस्थितीत ते दांपत्य चित्रपटाच्या पडद्यावरील दृष्यासारखं सपाट वाटत होतं. जरा दुरून पाहिलं तर आकार पाठीमागच्या दृष्यात मिसळून गेलेले असतात आणि उरलेली असते फक्त रंगांची

आकारहीन मनोवेधक उधळण. माझ्या मन:पटलावर त्यांचं उमटलेलं चित्रच मुळी असं होतं. कदाचित त्यामुळेच मी शब्दात पकडलेलं त्यांचं चित्रणसुद्धा तसच अंधूक अस्पष्ट उतरलं असावं. ज्यांचं आयुष्य विशाल जनप्रवाहात मिसळून गेललं असतं अशी असंख्य माणसं आपल्या आसपास असतात, शरीरातील मांसपेशी सारखी, जोपर्यंत त्या निरोगी असतात तोपर्यंत आपण त्यांच्या अस्तित्वाची दखल घेत नाही. स्ट्रिकलँड दांपत्याचं आयुष्य हे एका मध्यमवर्गीय सुखी कुटुंबासारखं होतं. एक मध्यमवयीन सुंदर गृहीणी, छोट्या मोठ्या लेखकांना अधून मधून बोलावून मेजवान्या देण्याची निरूपद्रवी हौस असलेली. तिचा पती एक सद्‌गृहस्थ, तिच्या हौसेला प्रतिसाद न देणारा अरसिक, पण नियतीने त्याच्यावर सोपवलेली भूमिका इमानेइतबारे वठवणारा. दोन छानशी गोंडस मुलं. सामान्य माणूस म्हणतात तो यापेक्षा अधिक वेगळा नसतो. लक्ष वेधावं असं काहीही या दांपत्याकडे मला त्यावेळी आढळलं नव्हतं.

आज मागे वळून पहाताना मला असं वाटतं की त्यावेळी मी खूपच मठ्ठ असलो पाहिजे. नाहीतर चार्ल्स स्ट्रिकलँड पुढे जाऊन एक असामान्य कलाकार होणार आहे याची एक तरी खूण मला त्या वेळी आढळली असती. इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर मला मनुष्यस्वभावाची चांगली ओळख झाली आहे. पण स्ट्रिकलँड आजही मला भेटला असता तरीही त्याच्यातील सुप्तावस्थेतील असामान्यत्व ओळखण्यात मी किती यशस्वी झालो असतो याची शंकाच आहे. मानवी जीवन कशी वळणे घेईल याचा थांगपत्ता लागणं कठीण असतं हे आता मला चांगलंच उमगलं आहे. त्यामुले शरद ऋतुच्या सुरूवातीला लंडनमध्ये पाऊल टाकताच माझ्या कानावर जे आलं त्याचं मला फार आश्चर्य वाटलं नाही.

मी लंडनमध्ये आलो त्याच दिवशी जेर्मीन स्ट्रीटवर माझी रोज वॉटरफोर्डशी गाठ पडली.

“तुम्ही एकदम मजेत दिसताय. काय विशेष?”

ती हसली. तिचे डोळे चमकले. तिला कोणाची तरी भानगड समजली असावी आणि ती मला सांगण्यासाठी ती अगदी अधीर झाली असावी हे मी माझ्या अनुभवावरून ओळखलं.

"तुम्हाला चार्ल्स स्ट्रिकलँड भेटला होता ना?"

तिचा उत्साह उतू जात होता हे तिच्या चेहेऱ्यावरूनच नव्हे तर तिच्या देहबोली सांगत होती. मी मान डोलावली. मला वाटलं त्या बिचाऱ्याचं शेअर बाजारात दिवाळं वाजलं असावं किंवा त्याला रस्त्यावरून चालताना ओम्नीबसने उडवलं असावं.

"तो बायकोला टाकून पळाला. किती भयंकर आहे ना."

या विषयाला जर्मेन स्ट्रीटच्या नाक्यावर उभं राहून अधिक न्याय देता येणार नाही म्हणून तिने एखाद्या कसलेल्या नाटककाराप्रमाणे मला थोडीशी माहिती दिली आणि मला यापेक्षा अधिक काही ठाऊक नाही असं जाहीर केलं. ही हसण्यावर नेण्याएवढी क्षुल्लक गोष्ट नसल्यामुळे मी तिच्याकडून अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. पण मला जास्त काही ठाऊक नाही यावर ती ठाम होती.

"मला खरंच काही ठाऊक नाही." मी वैतागून विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ती म्हणाली. "मला वाटतं शहरातल्या एका टी शॉपमध्ये काम करणारी मुलगीसुद्धा बेपत्ता झाली आहे."

तिने माझ्याकडे बघून एक अर्थपूर्ण कटाक्ष टाकला आणि मला डेंटीस्टकडे जायचं असल्याचं कारण सांगून तिने हसत हसत काढता पाय घेतला. मला वाईट वाटलं होतं, पण त्यापेक्षाही माझं कुतुहल जास्त चाळवलं गेलं होतं. त्याकाळी माझ्या गाठीला आयुष्याचा प्रत्यक्ष अनुभव फार कमी होता. एखाद्या कादंबरीत घडावी अशी घटना माझ्या परीचयातील व्यक्तिंबाबत घडली की सुरवातीला माझा उत्साह उतू जाई. नंतर अशा अनेक घटना घडत गेल्या आणि मला त्याची सवय झाली. पण तरीही त्यावेळी मला त्याचा धक्का बसला होता. स्ट्रिकलँड त्याच्या

वयाच्या चाळीशीत होता आणि या वयाच्या माणसाने प्रेमात पडून असं वहावत जाणं घृणास्पद होतं. एखाद्या पुरूषाला प्रेमात पडायचं असेल तर वयाच्या पस्तीस वर्षांपर्यंत हरकत नसते अशी वयोमर्यादा त्याकाळी मी माझ्या तारूण्यातील उथळपणामुळे घालून घेतली होती. या बातमीमुळे मी अस्वस्थ का झालो याला दुसरं एक कारण होतं. मिसेस स्ट्रिकलँडला मी पत्र लिहून लंडनला माझा परत येण्याचा दिवस कळवला होता आणि वर लिहीलं होतं की तुमची हरकत नसेल तर एके दिवशी संध्याकाळच्या चहाला मी तुमच्या घरी येणार आहे. तो दिवस आजच होता. तिच्याकडून अजून काहीच निरोप आला नव्हता. मी तिला यायला हवा होतो की नाही? या अस्वस्थ मनस्थितीत माझ्या पत्राचा तिला विसर पडलेला असण्याचीही शक्यता होती. मी न जावं हेच शहाणपणाचे ठरण्याची शक्यता होती. दुसरीही एक शक्यता होती. तिला हे प्रकरण शक्य तो कोणाला कळू द्यायचं नसावं. मी न गेल्याने ही बातमी माझ्या कानावर आली आहे हे आपोआप जाहीर झालं असतं. तसं असेल तर माझं न जाणं बरोबर दिसलं नसतं. मी पेचात पडलो. तिचं दु:ख हलकं करण्यासाठी मी काहीही करू शकत नसताना उगाच तेथे जाऊन तिच्या दु:खात मला भर घालायची नव्हती. तिच्या दु:खाला ती कसं तोंड देत आहे ते आपण जाऊन बघावं असं तेव्हा मला आतून वाटत होतं याची आता मला लाज वाटते. त्यावेळी मात्र आपण नक्की काय करावं हे मला कळेनासं झालं होतं.

शेवटी मी विचार केला की काहीच घडलं नाही असं भासवून आपण ठरल्याप्रमाणे जावं आणि नोकराणीकडून आपण आल्याचा निरोप पाठवल्यावर काय होतंय याची वाट बघावी. असं केल्याने मी यायला नको असेन तर मला परत पाठवण्याची तिला संधी मिळाली असती. पण प्रत्यक्षात मी मनात योजलेला निरोप नोकराणीला सांगताना मला प्रचंड अवघडल्यासारखं झालं होतं. पॅसेजमधल्या अंधारात उभं राहून वाट पहाताना हा दरवाजा कधीच उघडू नये असं मला राहून राहून वाटत होतं. नोकराणी परत आली. मालकिणीवर कोसळलेल्या कौटुंबीक संकटाची तिला पूर्ण जाणीव असावी असं तिच्या देहबोलीतून जाणवत होतं.

"आत या साहेब."

मी तिच्या पाठोपाठ बैठकीच्या खोलीत गेलो. ब्लाईंड्स खाली ओढून घेतल्याने खोलीत अर्धवट प्रकाश पडला होता. मिसेस स्ट्रिकलँड प्रकाशाकडे पाठ करून बसली होती. तिचा मेहूणा, कर्नल मॅक अँड्रयू फायर प्लेसकडे पाठ करून उभा होता. मला आत जाताना प्रचंड अवघडलो होतो. मला वाटलं होतं की माझ्या येण्याचं त्यांना आश्चर्य वाटेल. किंवा मिसेस स्ट्रिकलँडनी मला चुकून आत घेतलं असावं. कर्नलना तर मी आल्याची चीडच आली असावी.

"मी येईन असं तुम्हाला वाटत होतं की ते कळत नव्हतं." मला काही कळलं आहे हे न दाखवता मी म्हटलं.

"अर्थात तुम्ही याल अशी खात्री होती. ऍन थोड्या वेळात चहा आणेल."

मिसेस स्ट्रिकलँडचे डोळे रडून सुजले असावेत हे त्या अंधारातसुद्धा कळत होतं. तिचे गाल तर लाल झालेले अंधूक प्रकाशातही दिसत होते.

"हे माझे मेव्हणे, तुम्ही ओळखता यांना. सुट्टी लागायच्या आधी एका डिनरला तुम्ही आला होता तेव्हा यांच्याशी ओळख करून दिली होती."

आम्ही हस्तांदोलन केलं. काय बोलावं हे न सुचल्यामुळे मी ओशाळून गेलो होतो. पण त्या परिस्थितीतून मिसेस स्ट्रिकलँडनेच माझी सुटका केली. मी उन्हाळयाच्या सुटीत काय केलं याची तिने चौकशी केली. म्हणून चहा येईपर्यंत मला कशीतरी वेळ मारून नेता आली. कर्नलनी स्वत:साठी व्हिस्की आणि सोडा घेतला.

"ऍमी. तू सुद्धा थोडी व्हिस्की घेऊन बघ."

"नको. मी चहाच घेईन."

काही तरी विपरीत घडलं असावं याची ही पहिली खूण होती.

काहीच दखल न घेता मी मिसेस स्ट्रिकलँडला संभाषणात गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न केला. फायरप्लेसच्या जवळ उभ्या असलेल्या कर्नलच्या तोंडून एकही शब्द

बाहेर पडला नव्हता. तेथून सभ्यपणे शक्य तितक्या लवकर कसे सटकता येईल याचा मी विचार करत होतो. मिसेस स्ट्रिकलँडने मुळात मला घरात येऊ का दिलं तेच मला कळत नव्हतं. नेहमीच्या जागी फुलं ठेवलेली दिसत नव्हती. सुट्टीत बाहेरगावी जाताना आवराआवर करून ठेवलेल्या वस्तू अजून त्यांच्या नेहमीच्या जागेवर ठेवलेल्या दिसत नव्हत्या. जी बैठकीची खोली एरवी अगदी हवेशीर वाटायची ती आज कोंदट वाटत होती. काहीतरी बिघडलं होतं खास. कोणीतरी गेलेलं असावं आणि मृतदेह बाजूच्या खोलीत ठेवला असावा असं वाटत होतं. मी चहा संपवला.

"तुम्हाला सिगरेट हवी आहे का?"

तिने इकडे तिकडे पाहिलं पण सिगरेटचं पाकिट काही मिळालं नाही.

"मला वाटतं संपल्या असाव्यात."

तिला अचानक रडू कोसळलं आणि ती बैठकीच्या खोलीतून निघून गेली.

मी गोंधळून गेलो. सिगरेट संपल्या की आणून ठेवण्याचं काम नेहमी तिचा नवरा करत असावा. मला वाटलं सिगरेट शोधताना त्याची आठवण झाली आणि तिला दु:खाचा उमाळा आला असावा. या पुढे तिला अशा छोट्या छोट्या गैरसोईंच्या सामना एकट्याने करायचा होता. जुना आयुष्यक्रम आता संपला होता. रीती रिवाजांचं ढोंग पुढे चालू ठेवणं आता कठीण होतं.

"मला वाटतं मी आता जावं हे बरं." मी उठून कर्नलना विचारलं.

"तो हलकट हिला सोडून गेला हे तुम्हाला कळलं असेलच." तो जवळपास किंचाळत म्हणाला.

मी जायचा थांबलो.

"लोक कश्या वावड्या उठवतात तुम्हाला कल्पना असेलच. कुठेतरी पाणी मुरत होतं एवढंच माझ्या कानावर आलं होतं."

“त्याने आम्हाला मोठा धक्का दिला. तो एका बाई बरोबर पॅरीसला पळून गेलाय. बरं जाताना त्याने आपल्या कुटुंबासाठी एक पेनीसुद्धा मागे ठेवली नाही.”

“मला खरंच वाईट वाटतंय.” आणखी काय बोलावं ते मला सुचलं नाही.

कर्नलने व्हिस्कीचा एक मोठा घोट घेतला. कर्नल अक्कडबाज मिशी राखलेला, करड्या केसांचा, पन्नाशीचा, उंच आणि सडपातळ बांध्याचा इसम होता. त्याची जिवणी पातळ होती आणि डोळे निळसर होते. मागच्या भेटीतील काही गोष्टी मला आठवत होत्या. चेहेऱ्यावरून तो अगदी बथ्थड असावा असं वाटत होतं. सैन्यातील नोकरी सोडून त्याला दहा वर्षं झाली होती. सैन्यात असताना आठवड्यातून तीन दिवस तो पोलो खेळायचा हे तो मोठ्या प्रौढीने सांगत असे.

“मिसेस स्ट्रिकलँडना या क्षणी त्रास द्यावा असं मला वाटत नाही. मला किती वाईट वाटतंय ते त्यांना कळवा. त्यांना कसली गरज लागली तर मला तसं कळवा. मला मदत करायला आवडेल.”

कर्नलचं माझ्या बोलण्याकडे अजिबात लक्ष नव्हतं.

“तिचं काय होणार आहे मला कळत नाही. त्यात तिला दोन मुलं आहेत. ती काय हवा खाऊन जगणार आहेत. सतरा वर्ष.”

“सतरा वर्षांच काय?”

“त्यांच्या लग्नाला सतरा वर्ष झाली आहेत. मला तो कधीच आवडायचा नाही. अर्थात तो माझा मेव्हणा होता हे खरं आहे. आमचं नातं सांभाळायचा मी माझ्या परीने चांगला प्रयत्न करत होतो. तुम्हाला चार्ल्स सभ्य माणूस वाटायचा का? मला विचाराल तर तिने त्याच्याशी लग्नच केलं नसतं तर फार बरं झालं असतं.”

“त्यांचा निर्णय अगदी पक्का आहे का?”

“यापुढे तिला करता येण्यासारखी एकच गोष्ट आहे. ते म्हणजे त्याला घटस्फोट देणं. तुम्ही जेव्हा आलात तेव्हा मी तिला तेच सांगत होतो. ऍमी घटस्फोटाची

नोटीस पाठव. तुला स्वत:च्या आणि मुलांच्या हितासाठी हे केलंच पाहिजे. तो माझ्या समोर आला तर त्याला जन्माची अद्दल घडेल असा बदडून काढीन."

कर्नल मॅक-अँड्रयूला तसं करणं खूप जड गेलं असतं. कारण स्ट्रिकलँड त्याच्यापेक्षा चांगलाच तगडा होता असा विचार माझ्या मनात आल्यावाचून राहिला नाही. पण मी गप्प राहिलो. शिक्षा करण्याचं सामर्थ्य नसेल तर केवळ नैतिक भूमिकेवरून आलेला क्रोध हास्यास्पद ठरण्याची शक्यता असते. मी तेथून सटकण्याचा आणखी एकदा विचार करत असतानाच मिसेस स्ट्रिकलँड आली. तिने तिचे डोळे पुसले होते आणि चेहेऱ्याला थोडी पावडर लावली होती.

"मला रहावलं नाही. माफ करा. तुम्ही तेवढ्यात गेला नाहीत ते एक बरं केलंत."

ती खाली बसली. काय बोलावं ते मला मुळीच सुचत नव्हतं. संबंध नसलेल्या गोष्टीत माझं मत व्यक्त करायला मला नेहमी संकोच वाटतो. संकटाने घेरलेल्या स्त्रिया त्यांचं ऐकून घेणारा कोणी मिळाला तर कोणाही तिर्हाईताला त्यांच्या खाजगी गोष्टी सांगायला किती उत्सुक असतात हे मला तेव्हा ठाऊक नव्हतं. मिसेस स्ट्रिकलँड तिचं मन मोकळं करण्याची तयारी करत होती.

"लोक या विषयी काय बोलत आहेत का?"

तिचं सर्वस्वी खाजगी असं गुपीत मला ठाऊक असेल हे तिने ज्या सहजतेने गृहित घरलं होतं त्याने मला धक्का बसला.

"मी नुकताच लंडनमध्ये आलोय. मला फक्त एकच व्यक्ति भेटली ती म्हणजे मिसेस वॉटरफोर्ड."

मिसेस स्ट्रिकलँडने हाताच्या मुठी वळल्या.

"ती नक्की काय म्हणाली मला नीट सांगा." मी कांकू करत होतो पण तिने हट्टच धरला.

“लोक कसं बोलतात तुम्हाला चांगलं ठाऊक आहे. तिनं जे सांगितलं त्याच्यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. ती म्हणाली की तुमचे पती तुम्हाला सोडून गेले आहेत.”

“फक्त एवढंच?”

रोज वॉटरफोर्ड काय म्हणाली ते मी काही सगळंच शब्दश: सांगितलं नाही. विशेषत: जाता जाता तिने टी शॉप मधल्या मुलीचा तिने जो उल्लेख केला होता ते मी तिच्यापासून लपवलं.

“माझा नवरा कोणा बरोबर पळून गेला असावा त्याबद्दल ती काहीच म्हणाली नाही?”

“नाही” मी खोटंच दडपून दिलं.

“मला तेवढंच जाणून घ्यायचं होतं.”

मी कोड्यात पडलो. पण सगळा विचार करता आता तेथून काढता पाय घेणं श्रेयस्कर आहे या निष्कर्षाप्रत मी आलो. मिसेस स्ट्रिकलँडशी निरोपाचं हस्तांदोलन करताना मी तिला मदत करायची तयारी दर्शवली आणि तिचा निरोप घेतला. ती क्षीणपणे हसली.

“मी तुमची आभारी आहे. माझ्यासाठी एवढं कोणी केलं नसतं.”

संकोचामुळे सहानुभूतीचे दोन अधिक शब्द बोलायला मला सुचलं नाही. मी निरोप घेण्यासाठी कर्नलकडे वळलो. पण त्याने माझा हात हातात घेतला नाही.

“मी सुद्धा निघतोय. तुम्ही जर चालत जाणार असाल तर व्हिक्टोरिया स्ट्रीटपर्यंत मी तुमची सोबत करीन.”

“ठीक आहे, चला तर मग.”

## ९

“हे मात्र फारच भयंकर झालं.” आम्ही बाहेर पडून रस्त्यावर येताच कर्नल मॅक-अँड्र्यु म्हणाला.

मेव्हणी बरोबर त्याची जी चर्चा चालू होती तीच चर्चा पुढे चालू ठेवण्यासाठी तो माझ्या बरोबर बाहेर आला होता हे माझ्या लक्षात आलं.

“ती बया कोण हे आपल्याला अजूनही ठाऊक नाही. या घटकेला तो हलकट इसम पॅरीसला पळून गेला आहे एवढीच माहिती आपल्या हाताशी आहे.”

“मला वाटत होतं ऍमी आणि चार्ल्सचं चांगलं चाललं असावं.”

“चांगलंच चाललं होतं. तुम्ही येण्यापूर्वी ऍमी म्हणाली की इतक्या वर्षांच्या संसारात त्यांचं नवराबायकोमध्ये होतात तसं एखादं साधं भांडणही कधी झालं नव्हतं. तिला तुम्ही ओळखताच. तिच्या एवढी चांगली बायको कोणाला शोधूनही मिळणार नाही.”

त्याने माझ्यावर टाकलेल्या विश्वासामुळे एखादा दुसरा अधिक प्रश्न विचारायला हरकत नसावी असं मला वाटलं.

“तिला कसलाही संशय आला नव्हता असं तुम्हाला म्हणायचंय का?”

“जरासुद्धा संशय आला नव्हता. गेल्या ऑगस्टमध्येच तो तिला आणि मुलांना नॉरफोकला घेऊन गेला होता. त्यावेळी मी सुद्धा माझ्या पत्नी बरोबर तेथेच होतो. तो अगदी नेहमीसारखा वागत होता. आम्ही गोल्फ खेळायलासुद्धा बरोबर गेलो होतो. त्याच्या ऑफिसमधल्या एका भागीदाराला सुट्टी घ्यायची होती म्हणून तो सप्टेंबरमध्ये थोडा लवकर लंडनला परत गेला. त्यांनी भाड्याने घेतलेल्या घराची मुदत तोपर्यंत संपली नव्हती म्हणून ऍमी तेथेच राहिली. भाड्याची मुदत संपता संपता तिने लंडनमध्ये परत येण्याचा दिवस त्याला पत्र लिहून कळवला. त्या पत्राचं उत्तर पॅरीसवरून आलं. त्यात त्याने लिहीलं होतं की यापुढे त्याला तिच्या बरोबर रहाण्यात रस नाही.”

"त्याचं त्याने काय कारण दिलं होतं."

"महाशय, त्याने काहीही कारण दिलं नव्हतं. मी स्वत: ते पत्र पाहिलं आहे. त्यात फक्त दहा ओळीच आहेत."

"हे मात्र अगदी विलक्षण आहे."

आम्हाला रस्ता ओलांडायचा होता. रहदारीमुळे जास्त बोलता येईना. कर्नल जे सांगत होता ते मला असंभव वाटत होतं. मला वाटलं मिसेस स्ट्रिकलँड त्याच्यापासून काहीतरी लपवत असावी. तिने असं करण्यामागे काही तरी कारण असण्याची शक्यता होती. सतरा वर्षांच्या संसारानंतर कोण पत्नीला सोडून जात असेल तर काही ना काही तरी कारण असलंच पाहिजे आणि इतक्या वर्षात पत्नीला कुठे तरी बिनसतंय याची जाणीवही व्हायला पाहिजे. तेवढ्यात रहदारीत मागे पडलेल्या कर्नलने मला गाठलं.

"आपण एका बाईच्या नादाला लागून तिच्या बरोबर पळून गेलो या शिवाय दुसरा कोणता खुलासा त्याच्याकडे आहे. त्याला वाटलं असेल बाकी सगळे तपशील ऍमी शोधून काढेलच, आपल्या तोंडाने स्पष्टपणे कशाला सांगा. तो माणूस म्हणून काय लायकीचा आहे ते यावरून कळतं."

"मिसेस स्ट्रिकलँडनी काय करायंच ठरवलं आहे."

"पहिल्या प्रथम आम्ही पुरावे गोळा करणार आहोत. त्यासाठी मी स्वत: पॅरीसला जातोय."

"चार्ल्सच्या व्यवसायाचं काय?"

"आपल्या संसाराची नसली तरी स्वत:च्या व्यवसायाची मात्र त्याने अगदी पद्धतशीर काळजी घेतली आहे. गेल्या वर्षापासून त्याने आपल्या धंद्यातील व्यवहार आटोपते घ्यायला सुरवात केली होती."

"आपण व्यवसाय सोडून जात आहोत हे त्याने त्यांच्या भागीदारांना सांगितलं होतं का?"

“एका शब्दानेही नाही.” कर्नल मॅक-अँड्रयुला आर्थिक व्यवसाय कसे चालतात याची फारशी माहिती नव्हती आणि मला तर ती मुळीच नव्हती. त्यामुळे स्ट्रिकलँड आपला चालू व्यवसाय सोडून असा अचानक कसा काय गेला असेल हे माझ्या आकलना पलीकडचं होतं. मला खूप नंतर कळलं की त्याच्या अशा अचानक जाण्याने त्याचा भागिदार खूप संतापला आणि त्याने स्ट्रिकलँडवर खटला भरण्याची धमकी दिली. ते सगळं प्रकरण मिटवायला त्याला कमीत कमी चारशे ते पाचशे पौंड लागणार होते.

“नशीबाने फ्लॅटमधील फर्नीचर ऍमीच्या नावावर आहे. ते तिला कोणत्याही परिस्थितीत मिळेलच.”

“तिच्याकडे एक छदामही नाही हे तुम्ही म्हणाला होता ते खरं आहे का?”

“खरंच आहे. हे फर्नीचर सोडलं तर तिच्याकडे फारतर दोन-तीनशे पौंड निघतील. त्या व्यतिरिक्त अक्षरश: काहीही नाही.”

“यावर किती दिवस निभावतील?”

“देवालाच तिची काळजी.”

या प्रकरणातील गुंतागुंत वाढत चालली होती आणि कर्नल रागाच्या भरात शिव्याशाप देऊन जे बोलत होते त्याने माझ्या ज्ञानात भर पडण्या ऐवजी गोंधळातच भर पडत होती. आर्मी अँड नेव्ही स्टोर्सचे घड्याळ दिसताच क्लबमध्ये पत्ते खेळायला जायची वेळ झाली हे त्याच्या लक्षात आलं. त्याने मला सोडलं आणि तो सेंट जेम्स पार्कच्या रस्त्याने निघून गेला. माझी सुटका झाल्याने माझा जीव भांड्यात पडला.

# १०

एक दोन दिवसांनी मला मिसेस स्ट्रिकलँडची चिठी आली. त्या चिठीत आज संध्याकाळी डिनरनंतर मला भेटायला जमेल का असं विचारलं होतं. मी गेलो तेव्हा ती घरी एकटीच होती. तिने साधे काळया रंगाचे शोकप्रदर्शक कपडे परीधान केले होते. असं करण्यात आपल्याला मनापासून काय वाटत आहे यापेक्षा अशा प्रसंगी कोणते कपडे करणं सयुक्तिक होईल याचा विचार जास्त होता याचं मला आश्चर्य वाटलं.

"काही मदत हवी असेल तर तुम्ही करायला तयार आहात असं तुम्ही मला मागे म्हणाला होता ना."

"होय."

"तुम्ही पॅरीसला जाऊन माझ्या वतीने चार्ल्सना भेटाल?"

"कोण, मी?"

मी उडालोच. यापूर्वी मी त्याला फक्त एकदाच भेटलो होतो. तिला मी पॅरीसला जाऊन काय करायला हवं आहे त्याचा मला अंदाज येत नव्हता.

"फ्रेड जायला निघाला आहे." फ्रेड म्हणजे कर्नल मॅक-अँड्र्यु. "पण या कामासाठी तो योग्य आहे असं मला वाटत नाही. तो परिस्थिती आहे त्यापेक्षा बिघडवून टाकील. दुसऱ्या कोणाला विचारावं तेही मला कळत नाहीय."

तिच्या आवाजात थोडा कंप होता. म्हणून तिला नाही म्हणणं मला क्रूरपणाचं वाटलं.

"पण मी त्यांच्याशी आतापर्यंत चार शब्दसुद्धा बोललेलो नसेन. ते मला धड ओळखणारही नाहीत. कदाचित सरळ हाकलूनही देतील."

"माझ्यासाठी म्हणून तुम्ही सहन कराल ना?" तिने हसत विचारलं.

“त्यांना भेटून मी नक्की काय करायला हवंय.”

माझ्या प्रश्नाला तिने दिलेलं उत्तर सरळ नव्हतं.

“मला वाटतं की ते तुम्हाला ओळखत नाहीत हा कदाचित एक फायदाच ठरेल. हे बघा फ्रेड आणि त्यांचं कधी पटलंच नाही. त्यांच्या मते फ्रेडला काही अक्कल नाही. सैन्यातील लोक कसे असतात हे त्यांनी समजून घेण्याचा कधी प्रयत्न केला नाही. फ्रेड भावनेच्या भरात काही तरी बोलेल आणि मला काही मदत होण्याऐवजी तेच दोघं एकमेकांशी भांडत बसतील. तुम्ही माझ्यातर्फे आला आहात असं तुम्ही सांगितलं तर ते तुमचं म्हणणं ऐकायला नकार देणार नाहीत.”

“माझी आणि तुमचीसुद्धा फार ओळख आहे अशातला भाग नाही. ज्याला ह्या प्रकरणाची फारशी माहिती नाही असा माणूस हे प्रकरण कसं काय हाताळू शकेल. माझा ज्याच्याशी संबंध नाही अशा बाबतीत मी उडी मारावी असं मला वाटत नाही. त्यापेक्षा तुम्ही स्वत:च का नाही जात?”

“तुम्ही एक विसरताय. ते एकटे नाहीत.”

मी जीभ चावली. माझ्या कल्पनाचक्षूंसमोर एक दृष्य तरळू लागले. मी चार्ल्स स्ट्रिकलँडला भेटायला गेलो आहे. माझं कार्ड मी आत पाठवलं, तो कार्ड हातात धरून बाहेर आला आणि त्याने मला विचारले:

“या गरीबावर एवढी मेहरबानी कशासाठी?”

“तुमच्या पत्नीच्या वतीने मी तुम्हाला भेटायला आलो आहे.”

“खरंच की काय? तुम्ही वयाने थोडे वाढलात की तुमची अक्कलसुद्धा थोडी वाढण्याची शक्यता आहे आणि मग दुसऱ्याच्या खाजगी बाबतीत नाक खुपसू नये एवढं तरी कळू लागेल. आता या घटकेला तुम्ही तुमचं ते रिकामं डोकं थोडं त्या बाजूला वळवलंत तर तुम्हाला तेथे एक दरवाजा दिसेल. तो उघडा आणि चालू लागा.”

अशा परिस्थितीत आपला मान राखून बाहेर पडणं कठीण होईल हे लक्षात आलं. मिसेस स्ट्रिकलँडचं डोकं शांत होण्याच्या आत आपण लंडनला परतायला नको होतं असं आता वाटायला लागलं. मी हळूच तिच्याकडे एक दृष्टीक्षेप टाकला. ती मोठ्या विचारात पडली असावी. तिने माझ्याकडे नजर वळवली आणि मोठा सुस्कारा टाकून म्हणाली,

“हे सगळं इतकं अचानक झालंय म्हणून सांगू. आमच्या लग्नाला सतरा वर्षं झाली आहेत. चार्लींना कोणा मुलीची भुरळ पडेल असं मला स्वप्नातसुद्धा वाटलं नव्हतं. आमचा संसार अगदी सुरळीत चालला होता. अर्थात संसार सोडला तर मला इतर बऱ्याच गोष्टींत रस आहे त्यांना कशातही नाही एवढी एक बाब सोडली तर.”

“कोण आहे ती,”...कोणत्या शब्दात विचारावं ते कळत नव्हतं...“तिचं नाव काय, ती काय करते, ती दोघं पॅरीसमध्ये कुठे गेले आहेत?”

“त्यांच्या बद्दल कोणाला काहीही पत्ता नाही. केवढं विचित्र वाटतं. जेव्हा स्त्री-पुरूष प्रेमात पडतात तेव्हा ते आसपासच्या माणसांना समजल्याशिवाय रहात नाही. जेवताना किंवा चहा पिताना ते कोणाच्या तरी नजरेस पडतातच. मग त्याच्या बायकोला तिच्या मैत्रीणींकडून कळायचं ते कळतंच.”

एवढं बोलून ती बिचारी रडायलाच लागली. मला तिचं वाईट वाटलं. पण थोड्याच वेळात ती सावरली आणि डोळे पुसत म्हणाली,

“असं वेड्यासारखं रडून मला चालणार नाही. या परिस्थितीतून सगळयात चांगला मार्ग माझा मलाच शोधून काढावा लागणार आहे.”

ती तिच्या आयुष्यातील घटनांबद्दल सांगत होती, काही वर्तमानातल्या तर काही भूतकाळातल्या. त्यांची पहिली भेट कुठे झाली, लग्न कसे झाले वगैरे गोष्टी तिने थोडक्यात सांगितल्या. त्यातून त्यांच्या संसाराचं चित्र बरचस स्पष्ट होऊ

लागलं. माझा जो अंदाज होता तो फारसा चुकीचा नव्हता. मिसेस स्ट्रिकलँड एका इंडियन सिव्हील सर्वंटची मुलगी होती. तिचे वडिल निवृत्तीनंतर अंतर्भागात जाऊन स्थाईक झाले. दर वर्षी हवापालट म्हणून त्यांचे कुटुंब इस्टबोर्नला रहायला जात असत. ती वीस वर्षांची असताना तेथे तिची चार्ल्स स्ट्रिकलँडशी ओळख झाली तेव्हा तो तेवीस वर्षांचा होता. ओळख झाल्यावर ते वारंवार भेटू लागले. फिरायला, खेळायला, चर्च कॉयरला जोडीने एकत्र जाऊ लागले. त्याने तिला रीतसर मागणी घालण्याच्या एक आठवडा आधीच तिने आयुष्याचा जोडीदार म्हणून त्याचा स्वीकार करायचं ठरवलं होतं. लंडनमध्ये सुरवातीला ते हॅम्पस्टीड येथे रहात होते. आर्थिक परिस्थिती सुधारल्यावर ते शहरात रहायला आले. यथावकाश त्यांना दोन मुलं झाली.

“त्यांचा मुलांवर खूप जीव होता. कितीही थकले असले तरी ते मुलांनां मस्ती बंद करा असं कधीच सांगत नसत. माझा विश्वासच बसत नाहीय. अजूनही मला हे खरं आहे असं वाटत नाही.”

शेवटी तिने ते पत्र मला दाखवलं. मला ते वाचायची उत्सुकता होतीच पण मागायचा धीर होत नव्हता.

प्रिय ऍमी,

मला वाटतं आपल्या फ्लॅटमधील सर्व वस्तु तुला जागच्या जागी मिळाव्यात. तुझ्यासाठी सगळया सूचना मी ऍनला दिल्या आहेत. तू आणि मुलं याल तेव्हा जेवण तयार ठेवलेलं असेल. फक्त तुम्हाला भेटायला मी उपस्थित नसेन. मी तुला कायमचं सोडून जायचा निर्णय घेतला आहे. मी सकाळी पॅरीसला जात आहे. हे पत्र मी पॅरीसला पोचल्यावर पोस्टात टाकणार आहे. मी परत येणार नाही. माझा निर्णय पक्का आहे तो बदलणार नाही.

सदैव तुझाच,

चार्ल्स स्ट्रिकलँड.

“एका शब्दाचाही खुलासा नाही की दिलासा देणारा शब्दही नाही. किती भयंकर आहे ना.”

“जे झालं ते त्या परिस्थितीत अगदी विचित्र वाटेल असं आहे खरं.”

“याचा एकच खुलासा पटण्यासारखा वाटतो. त्यांच्यावर कसलं तरी भूत स्वार झालं असलं पाहिजे. पण त्यांना अशी झपाटणारी भवानी कोण असेल ते सांगता येत नाही. पण त्यातून बाहेर यायला बराच वेळ लागेल असं दिसतंय.”

“असं तुम्हाला का वाटतं?”

“फ्रेडने ते शोधून काढलंय. चार्ल्स मला एकदा म्हणाले होते की मी आठवड्यातून तीन चार दिवस एका क्लबमध्ये ब्रिज खेळायला जातो. त्या क्लबचा एक सभासद फ्रेडच्या ओळखीचा आहे. फ्रेडने एकदा चार्ल्सचा त्याच्याकडे उल्लेख केला तर तो बुचकळयात पडला. तो म्हणाला की त्यानं कार्ड रूममध्ये चार्ल्सना आलेलं कधीच पाहिलं नव्हतं. त्याने सगळयाचा उलगडा झाला. जेव्हा मला ते क्लबमध्ये ब्रिज खेळायला गेले आहेत असं वाटायचं तेव्हा ते नक्कीच त्या बयेबरोबर मजा मारत असणार.”

मी गप्प बसलो. माझ्या मनात तिच्या मुलांचा विचार आला.

“हे सगळं रॉबर्टला समजावून सांगणं किती कठीण होणार आहे.”

“मी त्या दोघांना अजून काहीही सांगितलेलं नाही. शाळा सुरू होण्याच्या अगदी आदल्या दिवशीच आम्ही लंडनमध्ये आलो होतो. त्यांना सांगितलं की वडील कामानिमित्त बाहेरगावी गेले आहेत आणि वेळ मारून नेली.”

हे गुपित मनात ठेऊन आनंदी आणि बेफिकीर रहाण्याचं नाटक करणं कठीण होतं. तसंच या परिस्थितीत मुलांची तयारी वगैरे करून घेऊन त्यांना शाळेत पाठवणंही तितकच कठीण काम होतं. तिच्या घशात परत आवंढा अडकला.

“आता मुलांचं कसं होणार? आम्ही जगायचं तरी कसं?”

ती थरथरत होती. तिने स्वत:वर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. तिने हाताची मूठ घट्ट आवळून धरली होती. तिची ती अवस्था बघणं फार क्लेशकारक होतं.

“माझ्या पॅरीसला जाण्याने तुमचा काही फायदा होणार असेल तर मी जाईन. पण तिथे जाऊन मी नक्की काय करायला हवं आहे.”

“मला माझा नवरा परत यायला हवा आहे.”

“कर्नल म्रॅक-अँड्रयु म्हणत होते की तुम्ही घटस्फोट घेण्याचं ठरवलं आहे.”

“मी त्यांना कधीही घटस्फोट देणार नाही,” अचानक तिचा आवाज चढला. “त्यांना माझा निरोप सांगा. त्यांच्या मनात त्या बयेशी लग्न करायचं असेल तर ते मी कधीही होऊ देणार नाही. ते जेवढे जिद्दी आहेत तेवढीच मीही जिद्दी आहे. मला माझ्या मुलांचा विचार करायला हवा.”

तिची भूमिका स्पष्ट करण्यासाठी म्हणून तिने एवढा खुलासा केला असावा. पण मला वाटतं त्यात आईच्या मायेपेक्षा त्या बाईच्या हेव्याचं प्रमाण जास्त असावं.

“अजूनही तुमचं त्यांच्यावर प्रेम आहे का?”

“मला सांगता येणार नाही. पण ते परत आले पाहिजेत एवढंच मी सांगू शकते. जर ते परत आले तर झालं ते झालं असं समजून मी सगळं विसरून जायला तयार आहे. शेवटी मी लग्नाची बायको आहे. आमचा सतरा वर्षांचा संसार झालाय. मी मोठ्या मनाची स्त्री आहे. त्यांनी जे केलं ते एक वेळ माझ्या दृष्टीआड राहिलं

असतं तर मला चाललं असतं. त्यांना हे कळलं पाहिजे. असली प्रेम प्रकरणं फार काळ टिकत नसतात. ते जर परत आले तर सगळं काही व्यवस्थित होईल. काय झालं आणि काय नाही ते कोणाला कळणारही नाही.”

मिसेस स्ट्रिकलँड तिच्या नवऱ्याबद्दल उठलेल्या वावडींची एवढी काळजी करत होती की मी चक्रावून गेलो. आपल्या विषयी इतर काय बोलतात याचा स्त्रिया केवढा विचार करतात हे त्यावेळी मला माहित नव्हतं. एरवी भावनाप्रधान असलेल्या स्त्री-स्वभावाला यामुळे ढोंगीपणाचा दोष लागतो.

स्ट्रिकलँड पॅरीसमध्ये कुठे रहात असावा ते कोणालाच माहित नव्हतं. त्याच्या व्यवसायातल्या भागिदाराने चिडून जाऊन बँकेला लिहीलेल्या पत्रात स्ट्रिकलँड लपून बसला आहे असा टोमणा मारला होता. त्यामुळे स्ट्रिकलँडने उत्तरा दाखल लिहीलेल्या पत्रात त्याचा पॅरीसचा पत्ता दिला होता. तो पत्ता एका हॉटेलचा होता.

“मी अशा हॉटेलचं नाव ऐकलं नव्हतं. पण फ्रेड म्हणाला की ते एक अतिशय महागडे हॉटेल आहे.” ती रागाने लालबुंद झाली होती. तिला वाटत होतं की तिचा नवरा पॅरीसमधल्या एखाद्या महागड्या हॉटेलमध्ये जीवाची चैन करत आहे, उंची रेस्टॉरंटमध्ये मेजवानी झोडतोय, संध्याकाळी एखाद्या नाट्यगृहात, नाहीतर रेसकोर्सवर पैसे उधळतोय.

“या वयात असं वागून चालत नाही. ते चाळीशीला आले आहेत. एखाद्या तरूणाने असं काही केलं तर मी समजू शकते. पण ज्याची मुलं मोठी झाली आहेत, वयाची चाळीशी आली आहे अशा माणसाने असं वागणं केवढं भयंकर आहे. त्यांच्या प्रकृतीला ते झेपेल का.”

तिच्या मनात दाटलेलं दु:ख संतापाच्या रुपाने बाहेर पडत होतं.

“त्यांना सांगा की घरातील सर्व मंडळी त्यांची वाट बघत आहेत. म्हटलं तर सगळ्या गोष्टी होत्या तशाच आहेत पण म्हटलं तर सगळं काही बदललेलंही आहे.

त्यांच्याशिवाय रहाणं मला शक्य नाही. लवकरच मी माझ्या जीवाचं काही तरी बरं वाईट करून घेईन. आम्ही जो काळ त्यांच्या सहवासात घालवला त्याची त्यांना आठवण करून द्या. मुलांनी मला विचारलं तर मी त्यांना काय सांगणार. ते गेले तेव्हा त्यांची खोली जशी होती तशीच ती आजही ठेवलेली आहे. आम्ही सगळे त्यांची वाट बघत आहोत."

मी तिच्या नवऱ्याला काय सांगायला हवं ते तिने मला अगदी शब्दश: पढवलं.

"माझ्यासाठी शक्य असेल ते सर्व तुम्ही कराल ना?" मला तिची दया आली. "माझी काय अवस्था झाली आहे ते त्यांना सांगा."

मला शक्य असतील ते सर्व मार्ग वापरून मी तिच्या नवऱ्याच्या भावनेला हात घालावा, त्याच्या सहानुभूतीला आवाहन करावं अशी तिची अपेक्षा होती. ती ओक्साबोक्शी रडत होती. मला भरून आलं. स्ट्रिकलँडच्या निष्ठुरपणाची चीड आली. त्याला परत आणण्यासाठी जे काही मला करता येणं शक्य असेल ते करून मी त्याला परत आणीन असं आश्वासान मी तिला दिलं. मी दुसऱ्याच दिवशी निघेन आणि माझ्या हाती काहीतरी लागेपर्यंत पॅरीसमध्येच मुक्काम ठोकून राहीन असंही वर कबूल केलं. बोलता बोलता उशीर झाला होता आणि आम्ही दोघंही भावनांच्या उद्रेकाने पार थकून गेलो होतो म्हणून मी तिचा निरोप घेतला.

# ११

पॅरीसच्या प्रवासात मी अंगावर घेतलेल्या कामगिरीविषयी माझ्या मनात नाही नाही त्या दुष्ट शंका येऊ लागल्या. आता दु:खाने पोळलेली मिसेस स्ट्रिकलँड माझ्यासमोर नव्हती. त्यामुळे मी या प्रकरणाचा शांतपणे विचार करू शकत होतो. तिच्या वागण्यातील विरोधाभासाने मी कोड्यात पडलो. ती स्वत: दु:खात चूर होती तरीही माझ्या सहानुभूतीला हात घालण्यासाठी स्वत:च्या दु:खाचे भांडवल करण्याइतपत भान तिला होतं. ती रडण्याची तयारी करूनच बसली होती आणि त्यासाठी लागणारे रुमाल तिने अगोदरच गोळा करून ठेवले होते. तिच्या दूरदृष्टीचं मला कौतुक वाटलं. त्यामुळे तिच्या अश्रूपाताचा माझ्यावर परिणाम फारसा झाला नाही. तिला तिचा नवरा परत यायला का हवा होता ते मला नीटसे पटले नाही. तिचं त्याच्यावर प्रेम होतं की तिला तिच्या मैत्रीणींच्या वळवळणाऱ्या जिभांची जास्त भिती वाटत होती. तिचं प्रेम तिच्या नवऱ्याने एका पळाचाही विचार न करता लाथाडलं होतं. त्यामुळे तिच्या आत्मसन्मानाला धक्का पोचला होता. नवरा सोडून गेल्याच्या दु:खापेक्षा अपमानाचंच दु:ख अधिक असावं. मानवी स्वभाव केवढ्या विरोधाभासाने भरलेला असतो ते तेव्हा मला नीट कळलं नव्हतं. कळकळीतील नाटकीपणाचा भाग, मोठ्या व्यक्तितील क्षुद्रपणा आणि दुष्ट व्यक्तितील चांगुलपणा या सगळयातील संगती मला तेव्हा लागायची होती.

माझ्या पॅरीसच्या भेटीत साहसाचा भाग अधिक होता. पॅरीस आलं आणि माझ्या अंगात उत्साह संचारला. माझ्यावर सोपवलेल्या कामगिरीतील नाट्यमय भाग मला दिसू लागला. एका मैत्रीणीने तिच्या पळून गेलेल्या नवऱ्याला परत आणण्याची जबाबदारी मोठ्या विश्वासाने माझ्यावर टाकली होती. नवरा नांदायला परत आला तर त्याला मोठ्या मनाने माफ करायला ती तयार आहे असं आश्वासन तिने मला दिलं होतं. मी स्ट्रिकलँडला लगेच दुसऱ्या दिवशी संध्याकाळी भेटायला जायचं असं ठरवलं. भेटण्याची वेळ फार काळजीपूर्वक निवडायला हवी याची मला कल्पना होती. कोणाच्या भावनेला आव्हान करायचं असेल तर ते

दुपारच्या जेवणापूर्वी केलं तर त्याचा काही उपयोग होत नाही. मी स्वत: प्रेमाला कितीही प्राधान्य देत असलो तरी चर्चेचा विषय जर वैवाहिक बाबींवरचा असेल तर अशी चर्चा दुपारच्या चहाच्या आधी करण्याची मी कल्पनासुद्धा करू शकत नाही.

माझ्या हॉटेलवर मी चार्ल्स स्ट्रिकलँड रहात होता ते हॉटेल दी बेल्झ कुठे आहे याची चौकशी केली. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे कन्सर्जने त्या हॉटेलचं नावसुद्धा ऐकलं नव्हतं. मिसेस स्ट्रिकलँडने मला ते रू द रिव्होलीवरील एक प्रशस्त हॉटेल आहे असं सांगितलं होतं. आम्ही डिरेक्टरीमध्ये पाहिलं. त्या नावाचं एक हॉटेल रू द मॉईनमध्ये सापडलं. पॅरीसचा तो भाग अगदी दळीद्री आणि भिकार असा होता. मी डोक्याला हात लावला.

“हे हॉटेल नक्कीच नाही.”

कन्सर्जलासुद्धा जास्त माहिती नव्हती. पॅरीसमध्ये त्या नावाचं दुसरं हॉटेल नव्हतं. मला वाटलं की स्ट्रिकलँडने खोटा पत्ता दिला असावा. कदाचित आपल्या भागिदाराला खोटा पत्ता देऊन त्याला त्याची दिशाभूल करायची असेल. त्या पत्त्यावर विसंबून तो चिडलेला ब्रोकर मूर्खासारखा पॅरीसला आला असता तर एका आड गल्लीतील ते फालतू हॉटेल बघून त्याची फजिती झाली असती. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सहा वाजता एक कॅब घेऊन मी रू द मॉईनला गेलो. कॅब गल्लीच्या कोपऱ्यावर सोडून दिली आणि पुढे चालत जायचं ठरवलं. गल्लीत दुतर्फा गरीब लोकांच्या दैनंदीन गरजा पुरवणारी लहान सहान दुकानं होती. गल्लीच्या मध्यावर डाव्या हाताला हॉटेल दी बेल्झ सापडलं. मी रहात होतो ते हॉटेल एक साधारणसंच होतं पण या हॉटेलच्या मानाने त्याला राजमहालच म्हणावं लागलं असतं. हे हॉटेल म्हणजे एक उंच घाणेरडी इमारत होती. सगळ्या खिडक्या बंद होत्या. गेल्या कित्येक वर्षात इमारतीला रंग लागला नसावा. हॉटेलची इमारत इतकी घाणेरडी होती की आसपासची गलीच्छ म्हणता येतील अशी घरंसुद्धा त्या हॉटेलच्या तुलनेत स्वच्छ आणि नीटनेटकी वाटावीत. ज्या कोणा सुंदरीकरता चार्ल्स स्ट्रिकलँडला आपलं घरदार, व्यवसाय, कर्तव्य, इभ्रत या सगळयावर पाणी सोडावं

असं वाटलं तिला घेऊन तो असल्या जागी एका गुन्हेगारासारखा लपून बसेल हे कसं शक्य आहे? त्याने आपल्याला मूर्ख बनवलं असेल या विचाराने माझा मनस्ताप झाला आणि मी अधिक चौकशी न करता तेथून परत फिरणार होतो. पण मिसेस स्ट्रिकलँडला मी प्रयत्नांची किती पराकाष्ठा केली ते दाखवायला माझ्याकडे सांगण्यासारखे काही तरी असावं म्हणून मी पुढे गेलो.

हॉटेलचा दरवाजा एका दुकानाच्या बाजूला होता. दरवाजा उघडा होता. आत गेल्यावर *ब्युरो प्रीमिए* (ऑफिस पहिल्या मजल्यावर) अशी पाटी होती. मी तो अरूंद जिना चढून वर गेलो. एका कोपऱ्यात काचेच्या मागे एक टेबल आणि दोन खुर्च्या मांडलेल्या होत्या. बाहेर एक बाकडं टाकलेलं होतं. मला वाटलं रात्रपाळीचा पोर्टर त्या बाकड्यावर आडवा होऊन कशीबशी रात्र काढत असला पाहिजे. तेथे कोणीही नव्हतं, पण एक घंटा ठेवलेली होती. त्या घंटे खाली लिहीलं होतं *गारकाँ* (बॉय). मी घंटा वाजवली आणि वेटर आला. त्याची नजर चोरटी आणि उदास होती. त्याने साधा शर्ट आणि सपाता घातल्या होत्या.

मी शक्य तितका सहजपणा दाखवत चौकशी केली.

“मस्य स्ट्रिकलँड येथे रहातात का?”

“सहाव्या मजल्यावर बत्तीस नंबर.”

मला इतकं आश्चर्य वाटलं की क्षणभर माझ्या तोंडातून शब्दच फुटला नाही.

“ते आत आहेत का?”

वेटरने ब्युरोच्या भिंतीवर लावलेल्या फळीकडे एक दृष्टीक्षेप टाकला.

“त्यांनी चावी ठेवलेली दिसत नाही. तुम्ही वर जाऊन बघा.”

आणखी एक प्रश्न मला विचारावासा वाटला.

*“मादाम एस्त ला?”* (बाईसाहेबसुद्धा आहेत का?)

*"मस्य एस्त सेल्य."* (साहेब एकटेच आहेत.)

मी वर जात असताना वेटर माझ्याकडे संशयाने बघत होता. वर जाण्याचा जिना काळोखी आणि कोंदट होता. एक प्रकारचा उग्र घाणेरडा वास मारत होता. तिसऱ्या मजल्यावरून वर जाताना माझी चाहूल लागल्याने विस्कटलेल्या केसांच्या, चुरगळलेला ड्रेसिंग गाऊन घातलेल्या एका बाईने तिच्या खोलीचा दरवाजा उघडून मुरका मारत माझ्याकडे एक कटाक्ष टाकला. शेवटी एकदाचा मी सहाव्या मजल्यावर जाऊन पोचलो आणि बत्तीस क्रमांकाची पाटी असलेला दरवाज्यावर ठोठावले. दरवाजा अर्धवट उघडा होता पण आतून आवाज येत नव्हता. चार्ल्स स्ट्रिकलँड माझ्या पुढ्यात येऊन उभा राहिला. मला पाहून तो एक शब्दही बोलला नाही. त्याने बहुधा मला ओळखलं नसावं.

मी माझं नाव सांगितलं. आवाजात शक्य तितका मोकळेपणा आणत मी बोललो.

"तुम्हाला आठवत नाहीसं दिसतंय. गेल्या जुलै महिन्यात आपल्या पंक्तिला भोजन करण्याचा बहुमान मला मिळाला होता."

"आत या," तो आनंदाने म्हणाला. "तुम्ही आलात ते एक बरं झालं."

मी आत गेलो. ती एक अगदी छोटी खोली होती. खोलीत ज्याला फ्रेंच लोक लुई फिलीप म्हणतात त्या काळातलं जुनं पुराणं फर्नीचर एकाला एक खेटून कसतरी ठेवलेलं होतं. एक मोठा लाकडी पलंग, त्यावर पसरलेली बदकाच्या पिसांची जाडसर दुलई, एक वॉर्डरोब, एक गोल टेबल, उसवलेल्या गादीच्या दोन खुर्च्या. फर्नीचर म्हणून जे काही होतं ते अत्यंत जुनाट, मोडकळीला आलेलं आणि घाणेरडं होतं. कर्नल मॅक-अँड्रयुनी ज्या ऐषोआरामी गोष्टींचा उल्लेख केला होता त्यांचा कुठे मागमूसही नव्हता. खुर्चीवर जे कपडे पडले होते ते स्ट्रिकलँडने उचलून एका कोपऱ्यात भिरकावून दिले आणि ती खुर्ची माझ्यापुढे केली.

“बोला, आपली काय सेवा करू.”

त्या छोट्याश्या खोलीत मला पूर्वी वाटलं होतं त्यापेक्षा तो जास्त धिप्पाड वाटला. त्याने एक जुनं नॉरफोकचं जॅकेट घातलं होतं. दाढी कित्येक दिवसात केलेली दिसत नव्हती. मागच्या खेपेला मी त्याला भेटलो होता तेव्हा त्याचा जो पोषाख मला गबाळा वाटला होता तो आजच्या मानाने बरा म्हणायची पाळी होती. तरीही तो त्यावेळेपेक्षा आज जास्त मोकळा आणि मजेत दिसत होता.

“मी तुमच्या पत्नीच्या वतीने तुम्हाला भेटायला आलो आहे.”

“जेवायच्या अगोदर एक ड्रिंक घ्यायला मी बाहेर जाणार होतो. तुम्हीसुद्धा माझ्या बरोबर आलात तर मला आवडेल. तुम्हाला ऍबसिंथ चालेल का?”

“मी पिऊ शकेन असं मला वाटतं.”

“चला तर मग.”

त्याने बाऊलर हॅट घातली. त्या हॅटला बऱ्याच काळात ब्रशचा स्पर्श झालेला दिसत नव्हता.

“आपण बरोबरच जेवायला जाऊ. तुम्ही मला एक जेवण देऊ लागता, आठवतंय ना?”

“आठवतंय ना. तुम्ही एकटेच आहात ना?”

तो महत्वाचा प्रश्न अगदी सहजगत्या विचारता आला म्हणून माझी मीच पाठ थोपटून घेतली.

“एकटाच आहे. गेले तीन दिवस मी कोणाशी एक शब्दही बोललो नाहीय. तसं माझं फ्रेंचही फार चांगलं आहे अशातला भाग नाही.

त्याच्या मागोमाग खाली जाताना मी कोड्यात पडलो होतो. त्या टी शॉपमधल्या सुंदरीचं काय झालं असावं. त्यांचं भांडण झालं की त्यांच्या प्रेमाचा पहिला झटका आता ओसरला. पण ज्याअर्थी पळून जाण्याच्या बेताची वर्षभर तयारी चालली होती त्याअर्थी असं काही होण्याची इतक्या लवकर शक्यता नव्हती. आम्ही ऍव्हेन्यू द क्लिशीपर्यंत चालत गेलो आणि एका कॅफेसमोरील पदपथावर मांडलेल्या टेबलावर जाऊन बसलो.

# १२

त्यावेळी ऍव्हेन्यू द क्लिशीवर खूप गर्दी होती. त्या चौकातून जा ये करणाऱ्या मंडळींवर नजर टाकली असता तेथे शरीरसुख विकण्याचा व्यवसाय जोरात चालू आहे हे कळलं असतं. तेथे कोण नव्हतं? सरकारी कचेरीतील कारकून दुकानातील विक्रेत्या मुलींना बरोबर घेऊन आले होते. बरेच जण तर बाल्झाकच्या कादंबरीतून थेट ऍव्हेन्यू द क्लिशीवर उतरल्यासारखे वाटत होते. लोकांच्या नैतिक दौर्बल्यामुळे ज्यांच्या व्यवसायाला बरकत येते अशी माणसं तेथे जिकडे तिकडे वावरताना दिसत होती. पॅरीसच्या ह्या गरीब वस्तीत नेहमी गजबजाट असतो, काहीतरी अनपेक्षित घटना कोणत्याही क्षणी घडू शकेल असं दडपण नवख्या माणसावर सतत येत रहातं.

"तुम्हाला पॅरीसची कितपत माहीती आहे?" मी विचारलं.

"फारशी नाही. मी लग्नानंतर हनीमूनला आलो होतो, त्यानंतर पहिल्यांदाच येतोय."

"हे हॉटेल तुम्ही कुठून शोधून काढलंत?"

"मला अगदी स्वस्तातलं हॉटेल हवं होतं. चौकशी करत करत येथे येऊन पोचलो."

ऍबसिंथ आली. आम्ही ऍबसिंथ पिण्याचा चमचा घेऊन त्यात खडीसाखरेचा खडा ठेवला आणि मोठ्या गांभिर्याने रीतीनुसार त्या खड्यावरून ऍबसिंथच्या ग्लासात बाटलीतील ऍबसिंथची धार सावकाश ओतली.

"मी येथे का आलो आहे ते तुम्हाला एकदा सांगून टाकलेलं बरं." मी एकदाचं त्याला सांगून टाकलं खरं पण सांगताना मला अगदी अवघडल्यासारखं झालं होतं.

त्याचे डोळे चमकले.

“एक ना एक दिवस कोणीतरी येऊन टपकेल याची मला कल्पना होती. मला ऍमीची बरीच पत्रं आली आहेत.”

“म्हणजे मला काय सांगायचंय ते तुम्हाला सगळं कळलंय तर.”

“मी त्यातलं एकही पत्र अजून उघडलेलंसुद्धा नाही.”

बोलण्यापूर्वी थोडा वेळ घेण्यासाठी मी सिगरेटचा एक मोठा झुरका घेतला. आता पुढे कसं जावं ते मला कळेना. एक म्हणजे नम्र भाषेत विनंती करायची नाहीतर दुसरं म्हणजे चीडीला येऊन धमकी द्यायची या डावपेचांनुसार जी शब्दयोजना मनात केली होती त्यानुसार बोलणं ऍव्हेन्यु द क्लिशीमध्ये अस्थानी ठरलं असतं. तो अचानक गालात हसला.

“तुमचं काम मोठं कठीण दिसतंय.”

“कोणत्या शब्दात सांगावं ते कळत नाहीय.”

“हे बघा. काय सांगायचं ते एकदाचं सांगून टाका. मग आपण आजची संध्याकाळ साजरी करायला मोकळे होऊ.”

मी द्विधा मनस्थितीत सापडलो.

“तुमची पत्नी किती भयंकर दुःखी झाली आहे हे तुम्हाला एकदा तरी जाणवलंय का?”

“ती त्यातून बाहेर येईल.”

त्याने ज्या निष्ठूर थंडपणाने हे उत्तर दिलं त्याचं शब्दात वर्णन करून सांगणं कठीण आहे. मी अस्वस्थ झालो. माझी अस्वस्थतता त्याच्यापासून लपवण्यासाठी मला प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली. माझे पाद्री असलेले एक काका चर्चसाठी वर्गणी मागताना जो सूर लावतात तो सूर लावण्याचा मी प्रयत्न केला.

“मी जर तुमच्याशी मोकळेपणाने बोललो तर तुमची हरकत नाही ना?”

त्याने हसत हसत मान डोलावली.

“तुम्ही तिच्याशी असं वागावं असं तिने काय केलं आहे?”

“काही नाही.”

“तिच्याबद्दल तुमची काही तक्रार आहे का?”

“नाही.”

“असं असेल तर सतरा वर्षांच्या संसारानंतर तिचा काही दोष नसताना तिला असं उघड्यावर टाकून जाणं राक्षसी वाटत नाही का?”

“तुम्ही म्हणता तसं हे राक्षसी आहे खरं.”

मी त्याच्याकडे आश्चर्याने पाहिलं. माझे सगळे मुद्दे त्याने सरळ सरळ मान्य केल्याने माझ्या फुग्यातील हवाच निघाली. माझी परिस्थिती अगदीच हास्यास्पद झाली होती असं काही म्हणता आलं नसतं पण बिकट झाली होती हे मात्र खरं. आग्रह, विनंती, विनवण्या, नाकदुऱ्या, युक्तिवादाने मतपरिवर्तन, भावनांना आव्हान, कळकळीचा उपदेश, कानउघडणी, रागावणे, शिव्या देणे, उपहास आणि अपमान या सगळया युक्त्या-प्रयुक्त्यांचा आवश्यकतेनुसार वापर करण्याचं मी ठरवलं होतं. पण पाप्याने आपल्या पापांचा पहिल्या झटक्यातच सरळ सरळ कबुलीजबाब देऊन टाकला तर पाद्रीबाबांना काम काय राहिलं? अशा परिस्थितीत काय करायचं याचा कसलाच अनुभव माझ्या गाठीला नव्हता. मी त्याच्या जागी असतो तर सगळं नाकबूलच केलं असतं.

“पुढे काय?”

मी तोंडाचा चंबू केला.

“आता तुम्हीच कबूल करताय की सांगण्यासारखं काही राहिलेलं नाही.”

“तुम्ही म्हणता ते खरं आहे.”

मला वाटतं की मी माझं कर्तव्य पार पाडण्यात फारशी हुशारी दाखवू शकलो नव्हतो. आता प्राप्त परिस्थितीला धैर्याने तोंड देण्यावाचून गत्यंतर नव्हते.

“ते सगळं खड्ड्यात जाऊं दे. हे पहा. आपल्या बायकोसाठी एकही छदाम मागे न सोडता तिला असं कोणी टाकू शकत नाही.”

“का नाही?”

“ती काय खाईल?”

“मी तिचा सतरा वर्ष सांभाळ केला. आता बदल म्हणून तिने स्वत:चा सांभाळ करायला काय हरकत आहे?”

“तिला शक्य होणार नाही.”

“तिला प्रयत्न तर करू दे.”

या मुद्यावर मी बराच प्रतिवाद करू शकलो असतो. अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान, लग्न करून पुरूषाने स्विकारलेली जबाबदारी, त्याचे सामाजिक, नैतिक आणि कायदेशीर असे अनेक पैलू होते. पण मला सर्वात महत्वाचा वाटणारा एकच मुद्दा मी मांडला.

“तुम्हाला तिच्याविषयी काहीच वाटत नाही का?”

“काहीही नाही.”

प्रकरण खूप गंभीर होतं. सर्वांच्याच दृष्टीने. पण विचारलेल्या सर्व प्रश्नांची तो उध्दटपणे हसत हसत अशी खिल्ली उडवत होता की माझं हसू आवरायला मला ओठ दाबून ठेवावे लागत होते. त्याचं वागणं अतिशय नींदनीय आहे असं मी

स्वत:ला सारखं बजावत होता. नैतिक संतापाने माझ्या अंगाची लाही लाही झाली होती.

“सगळं गेलं तेल लावत. कमीत कमी तुमच्या मुलांचा तरी विचार करा.”

“आतापर्यंत त्यांना बऱ्याच सुखसोई मिळाल्या आहेत. सर्वसामान्य मुलांना मिळतात त्यापेक्षा कितीतरी जास्तच. त्यांची काळजी घेणारे इतर अनेक नातेवाईक आहेत. तशीच वेळ आली तर कर्नल मॅक-अँड्रयुनी त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलायला हरकत नाही.”

“तुमचं मुलांवर प्रेम आहे की नाही. किती चांगली चुणचुणीत मुलं आहेत ती. तुमचा आणि त्यांचा काही संबंध नाही असं तुम्हाला म्हणायचंय का?”

“मुलं लहान होती तेव्हा मला ती आवडत असत. आता ती मोठी झालीयत. त्यांच्याबद्दल विशेष असं काय वाटायचं?”

“हे अमानवी आहे.”

“असेल.”

“तुम्हाला जरासुद्धा लाज वाटत नाही असं दिसतंय.”

“नाही वाटत.”

मी संभाषणाचे रूळ बदलून पाहिले.

“तुम्ही एक डुक्कर आहात असं लोकांना वाटेल.”

“वाटूं दे.”

“लोक आपला तिरस्कार करतात, त्यांना आपली किळस वाटते याचं तुम्हाला काहीच वाटणार नाही?”

“नाही.”

त्याची एकाक्षरी उत्तरं देण्याची पद्धत एवढी संतापजनक होती की त्यापुढे मी विचारलेले प्रश्न अगदीच अर्थहीन वाटू लागले. मी एक दोन मिनीटं विचार केला.

“सगळे आप्तस्वकिय आपला तिरस्कार करत आहेत यामुळे सद्सद्विवेकबुद्धीला जी टोचणी लागेल त्याने तुम्हाला सुखाने झोप लागू शकेल का? उद्या तुमचं मन तुम्हाला खाणार नाही याची तुम्हाला खात्री आहे? थोडी फार सद्सद्विवेकबुद्धी प्रत्येकाकडे असतेच. आज ना उद्या तुम्हाला त्याची जाणीव होईल. समजा तुमच्या पत्नीचं अकाली निधन झालं तर पश्चातापाच्या टोचणीने तुमचा छळ होणार नाही का?”

त्यानं काहीही उत्तर दिलं नाही. तो काही तरी बोलेल म्हणून मी थोडा वेळ थांबलो. शेवटी शांततेचा भंग मलाच करावा लागला.

“मी बोललो त्यावर तुम्हाला काय म्हणायचं आहे?”

“तुम्ही एक मुर्ख इसम आहात, दुसरं काय म्हणणार?”

“तुमच्या कुटुंबाच्या पालनपोषणासाठी तुमच्यावर जबरदस्तीने कारवाई करावी लागेल,” मी वैतागून टोचून म्हणालो. “मला वाटतं कायदा त्यांच्या बाजूचा आहे हे विसरू नका.”

“कायदा झाला तरी कफल्लक माणसाकडून काय वसूल करता येईल असं तुम्हाला वाटतं? मला अगदी झाडून काढलं फार फार तर शंभर एक पौंड निघतील.”

मी अधिकच कोड्यात पडलो. त्याच्या हॉटेलवरून त्याच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज येतच होता.

“ते संपल्यावर काय करायचा विचार आहे तुमचा?”

“जास्त कमवायचे.”

तो अगदी शांत होता. माझ्या बोलण्याची तो जी हसत हसत थट्टा करत होता त्याच्यापुढे मी अगदीच बावळटासारखा वाटू लागलो. पुढचा मुद्दा कसा मांडावा याची जुळवाजुळव करण्यासाठी मी थोडा थांबलो, पण माझ्या आधी तोच म्हणाला.

“ऍमी दुसरं लग्न का करत नाही. तशी ती तरूण आहे, आकर्षक नाही असं म्हणता येणार नाही. लागलंच तर ती एक गृहकृत्यदक्ष अशी गृहीणी आहे अशी शिफारससुद्धा मी द्यायला तयार आहे. तिला घटस्फोट हवा असेल तर तिला हवं ते कारण तिने द्यायला माझी हरकत नाही.”

आता हसण्याची पाळी माझी होती. तो अतिशय धूर्त होता. त्याचा उद्देश हाच असावा. आपण एका बाईबरोबर पळून आलो आहोत हे त्याला काही कारणासाठी लपवायचं असावं. ती बाई कोण आणि ती कुठे आहे हे कोणाला कळू नये याची तो अतिशय काळजी घेत असावा. मी त्याला ठणकावून सांगितलं.

“मला तुमच्या पत्नीने तुम्हाला बजावून सांगायला सांगितलंय की काही झालं तरी ती तुम्हाला घटस्फोट देणार नाही. तिचा निर्णय पक्का आहे. तसा काही विचार तुम्ही करत असाल तर ते डोक्यातून काढून टाका.”

त्याने माझ्याकडे आश्चर्याने पाहिलं. तो नक्कीच अभिनय नसावा. त्याच्या ओठीच हसू लुप्त झालं. तो अतिशय कळकळीने म्हणाला.

“माझ्या मित्रा मी त्याची पर्वा करत नाही. तिने घटस्फोट घेतला की नाही घेतला त्याने मला एका पेनीचाही फरक पड़त नाही.”

मी हसलो.

“सोडा ते. आम्ही एवढे मुर्ख आहोत असं तुम्हाला वाटतंय की काय. तुम्ही एका बाईचा हात धरून इकडे पळून आला आहात ते आम्हाला चांगलंच ठाऊक आहे.”

तो थोडा वेळ गप्प होता आणि नंतर त्याला एकाएकी हसू कोसळलं. तो इतक्या जोरात हसत होता की आमच्या आजूबाजूला बसलेले लोक आमच्याकडे माना वळवून बघायला लागले, आणि उगाचच तेही त्याच्या हसण्यात सामिल झाले.

“यात एवढं हसण्यासारखं काय आहे?”

“बिचारी ऍमी.” तो दात विचकत म्हणाला. त्याचा चेहेरा तिरस्काराने कडवट झाला.

“स्त्रियांचं मन किती क्षुद्र असतं. प्रेम! त्यांना नेहमी प्रेमाशिवाय दुसरं काही दिसतच नाही. त्यांना वाटतं की पुरूष जेव्हा आपल्या बायकोला सोडून जातो तेव्हा त्याच्यामागे दुसऱ्या स्त्रीचे आकर्षण एवढं एकच कारण असतं. एका स्त्रीसाठी मी एवढा मुर्खपणा करीन असं तुम्हाला वाटतं का?”

“तुम्ही तुमच्या पत्नीला सोडून इथे पॅरीसला आला आहात त्यामागे दुसरी स्त्री नाही असं तुम्हाला म्हणायचंय का?”

“अर्थातच नाही.”

“तुमच्या शब्दावर विश्वास ठेवायचा का?”

मी असं का विचारलं असावं ते मला सांगता आलं नसतं. मी स्वत: छक्के पंजे करत नाही आणि इतरांनी केलेले मला आवडत नाहीत.

“अलबत.”

“मग तुम्ही तिला असं वाऱ्यावर सोडून का दिलंत?”

“मला चित्रकार व्हायचंय.”

मी थोडा वेळ त्याच्याकडे बघतच राहिलो. मला कळत नव्हतं. मला वाटलं त्याला वेड लागलं असलं पाहिजे. येथे एक लक्षात घ्या, त्यावेळी मी अगदी तरूण होतो आणि माझ्या लेखी तो एक मध्यमवयीन गृहस्थ होता. मला त्याची गंमतच वाटायला लागली.

“तुमचं वय आता चाळीस एक वर्षांचे तरी असेल.”

“त्यामुळेच मला आता जास्त उशीर करून चालणार नाही. म्हणूनच मी माझा निर्णय पक्का केला.”

“तुम्ही यापूर्वी कधी पेंटींग केलंय का?”

“मी लहान होतो तेव्हा मला चित्रकार व्हायचं होतं. पण माझ्या वडिलांनी मला नोकरी धंद्याला उपयोगी असं शिक्षण घ्यायला भाग पाडलं. कारण चित्रकलेत चार पैसे मिळतील याची खात्री नव्हती. मी गेलं वर्षभर चित्रकला शिकत आहे. मागच्या वर्षापासून मी एका रात्रीच्या वर्गात जात होतो.”

“मिसेस स्ट्रिकलँडना तुम्ही एका क्लबमध्ये ब्रिज खेळायला जाता असं जे सांगितलं होतं तो हा चित्रकलेचा वर्ग होता का?”

“बरोबर.”

“मग तुम्ही त्यांना तसं का सांगितलंत नाही.”

“मला ते माझ्यापुरतंच ठेवायचं होतं.”

“तुम्हाला चित्रकला येते?”

“अजून नाही जमत. पण एक ना एक दिवस जमेल. म्हणूनच मी येथे आलो आहे. लंडनमध्ये मला जे हवं ते करायला शक्य होत नव्हतं. कदाचित इथे मनासारखं करता येईल.”

"तुमच्या वयाच्या माणसाने नव्याने काही करायला सुरवात केली तर त्याला ते करणं जमू शकेल असं तुम्हाला वाटतं का? कारण ज्यांना पेंटींग शिकायचं आहे त्यांनी अगदी उशीरात उशीर म्हटलं तरी आपल्या वयाच्या अठरा वर्षांच्या आत सुरवात केलेली असते."

"अठरा वर्षांचा असताना शिकलो असतो त्यापेक्षा आता जास्त लवकर शिकायला पाहिजे. कारण त्या वयात मला जो वेळ मिळाला असता त्याच्या तुलनेत आता खूपच कमी वेळ माझ्याकडे आहे."

"तुमच्यामध्ये काही कलागुण आहेत असं तुम्हाला कशावरून वाटतं?"

पूरी पाच मिनीटं तो गप्प होता. त्याची नजर रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या माणसांकडे होती. मला नाही वाटत की त्याचं लक्ष तिकडे होतं. काहीही उत्तर द्यायचं नाही हेच त्याचं उत्तर होतं.

"मला चित्रकारच व्हायचं आहे."

"तुम्ही एक मोठा जुगार खेळत आहात असं नाही तुम्हाला वाटत?"

त्यानं माझ्याकडे नजर रोखून पाहिलं. त्याच्या डोळयात एक विचित्र चमक होती.

"तुमचं वय काय? तेवीस."

त्याने विचारलेला प्रश्न अप्रस्तुत होता. एखादा धोका पत्करणं माझ्यासाठी अगदी नैसर्गिक अशी गोष्ट होती. त्याचं तारूण्य केव्हाच ओसरलेलं होतं. तो एक शेअर दलाल होता. त्याचं लग्न झालेलं होतं आणि त्याला दोन मुलं होती. एक सन्माननीय नागरीक म्हणून त्याचं आयुष्य सुरळीत चाललेलं होतं. माझ्या वयात धोका पत्करणं ही एक सहज नैसर्गीक प्रवृत्ती असते पण अर्ध आयुष्य उलटून गेल्यावर असा धोका कोणी पत्करला तर ते कोणालाही विचित्र वाटणं सहाजिकच होतं.

“कदाचित एखादा चमत्कार होईलही आणि तुम्ही एक मोठे चित्रकार म्हणून प्रसिद्ध व्हाल. पण असं होण्याची शक्यता किती आहे? फार तर लाखात एक. या वयात एवढी जोखीम पत्करून, एवढी यातायात करूनही तुम्हाला ते जमलं नाही तर ते स्विकारायला किती जड जाईल याचा तुम्ही विचार केला आहे का?””

“चित्रकला हेच माझं विधीलिखीत आहे.”

“समजा, तुम्ही मुळातच एक फालतू, सामान्य आणि तिसऱ्या दर्जाचे चित्रकार असाल तर त्यासाठी हातात आहे ते सगळं सोडून ही जोखीम घेणं कितपत योग्य होईल. सर्वोत्तम नसल्याने जीवनाच्या इतर कोणत्याही क्षेत्रात फारसा फरत पडत नाही. पोटापुरते पैसे मिळतात, वेळ निभावून जाते. पण कलेच्या क्षेत्रात फार फरक पडतो. तुम्हाला उत्कृष्टच असावंच लागतं नाहीतर कुत्रा हाल खात नाही. येथे दुय्यम दर्जाच्या कलाकारांची किमत शून्य असते.”

“मूर्ख माणसा, गप्प बसायला काय घेशील?”

“जे सत्य आहे ते सांगणं हा मुर्खपणा कसा होऊ शकतो?”

“मी पुन्हा एकदा बजावून सांगतो, मला आयुष्यात चित्रकारच व्हायचं आहे. जेव्हा माणूस पाण्यात पडतो तेव्हा तो चांगला पोहतो की वाईट पोहतो हे महत्वाचं नसतं. त्याने पलीकडचा काठ कसंही करून गाठला पाहिजे नाहीतर तो बुडून मरेल.”

तो उत्कटतेने बोलत होता. मला त्याचा अत्यंत तिरस्कार वाटत होता, तरीही त्याच्या बोलण्याचा माझ्यावर प्रभाव पडल्याशिवाय राहिला नाही. त्याच्या वागण्या-बोलण्यात एक प्रकारचा हिंस्रपणा जाणवत होता. कोणत्यातरी प्रभावी शक्तिने त्याच्यातील अभिव्यक्तिला दाबून ठेवलं असावं. मला नक्की काय ते कळत नव्हतं. तो झपाटल्यासारखा दिसत होता. त्याला झपाटणाऱ्या पाशवी शक्तिने कोणत्याही क्षणी त्याला उध्वस्त केलं असतं. मी त्याच्याकडे टक लावून पहात होतो

तरीही त्याची किंचीतही चलबिचल झाली नाही. जुनं पुराणं जॅकेट, धुळीने माखलेली बाउलर हॅट, ढगळ पँट, अस्वच्छ हात, अर्धवट वाढलेल्या दाढीचे खुंट अशा अवतारात त्याला त्या भिकारड्या कॅफेमध्ये बसलेलं कोणी पाहिलं असतं तर त्याला काय वाटलं असतं ते मला सांगता आलं नसतं. छोटे डोळे, लांब नाकावर स्वार झालेला उद्धटपणा, रुंद जिवणी, जाड ओठ. त्यावेळी तरी मला कलाकाराचं एकही लक्षण त्याच्या व्यक्तिमत्वात दिसलं नाही.

“तुमच्या पत्नीकडे परत जाण्याचा तुमचा विचार आहे की नाही?” मी शेवटचं विचारलं.

“कधीही नाही.”

“झालं गेलं सगळं विसरून पुन:श्च नव्याने सुरवात करायला ती तयार आहे. ती तुम्हाला एका शब्दानेही विचारणार नाही.”

“उडत गेली ती.”

“लोक तुमचा उल्लेख एक हलकट माणूस आहे असा करतील याचं तुम्हाला काहीच वाटत नाही का? तुमच्या बायको-मुलांवर दोन वेळच्या जेवणासाठी भीक मागण्याची पाळी आली तरी तुम्हाला त्याचं काहीच वाटणार नाही?”

“काहीही वाटणार नाही.”


माझ्या पुढच्या वाक्याला जोर यावा म्हणून मी थोडा वेळ गप्प बसलो. शक्य तितक्या स्पष्टपणे एक एक शब्दावर जोर देत मी म्हणालो.

“तुम्ही एक जातीवंत दुष्ट, नीच आणि हलकट आहात.”

“तुमच्या मनात जे होतं ते एकदाचं बाहेर पडलं ना. चला आता जेवायला जाऊ या.”




Pouring Absinth on Absinth spoon, Photograph, Source: Wikipedia



GAUGUIN: "Avenue de Clichy, 1887, Paris, Source: Wiki image

https://in.pinterest.com/pin/563231497125846752/?lp=true

# १३

जेवणाचं आमंत्रण मी नाकारायला हवं होतं. कमीत कमी माझी चीड, माझा राग त्याला दाखवून द्यायला हवा होता. असल्या नीच आणि हलकट इसमाच्या बरोबर एकाच टेबलावर बसून जेवण घ्यायला मी नकार दिला एवढं जरी मी कर्नल मॅक-अँड्र्युना सांगू शकलो असतो तरी त्यांना माझा अभिमान वाटला असता. हातात घेतलेलं काम मी तडीला नेऊ शकणार नाही या भितीमुळे माझी नैतिक भूमिका नेहमीच डळमळीत होते. आणि या प्रकरणात तर भावनात्मक दबावाचा स्ट्रिकलँडवर काहीच परिणाम होणार नव्हता म्हणून मी जास्त काही बोलण्याच्या फंदात पडलो नाही. कातळावर लावलेल्या फुलझाडांना पाणी घालत राहिलं तर कधी ना कधी तरी त्यांना फुलं येतील अशी अपेक्षा फक्त संत महात्मे किंवा कवी लोकच करू शकतील.

मी घेतलेल्या दारूचे पैसे दिले आणि नंतर आम्ही एका स्वस्त पण मस्त रेस्तोराँमध्ये जेवण घेतले. तेथे खूप गर्दी आणि गोंगाट होता, पण मजा आली. मी तरूण असल्याने आणि त्याने सद्सद्विवेकबुद्धीवर पाणी सोडलेलं असल्याने आम्हा दोघांना चांगलीच भूक लागली होती. नंतर आम्ही कॉफी आणि लिक्युअर्सचा आस्वाद घेण्यासाठी एका तावेर्नामध्ये गेलो.

मी ज्या कामासाठी म्हणून पॅरीसला गेलो होतो त्या प्रकरणात सांगण्यासारखं जे होतं ते सगळं सांगून झालं आहे. माझी ज्या माणसाशी गाठ पडली होती तो इतका बेपर्वा होता की त्यामुळे या प्रकरणात आणखी पाठपुरावा करण्यात काही अर्थ नाही असं मी ठरवलं. मिसेस स्ट्रिकलँडशी थोडी प्रतारणा केल्यासारखं होईल खरं पण माझा नाईलाज होता. तीच गोष्ट तीन तीन वेळा त्याच उत्साहाने करण्यासाठी स्त्रियांची चिकाटी अंगी असावी लागते. या सगळ्या खटाटोपातून स्ट्रिकलँडच्या मनात काय खळबळ चालू आहे ते शोधून काढता आलं तर लेखक म्हणून माझा थोडा फार फायदा होईल अशी मी स्वत:ची समजूत काढली. किंबहूना माझ्यावर सोपवलेल्या कामगिरीपेक्षा त्यातच मला जास्त रस वाटू लागला. पण हे

सोपं नव्हतं. कारण स्ट्रिकलँड फारसा बोलत नसे. शब्दांच्या माध्यमातून स्वत:ला व्यक्त करणं त्याला आवडत नसावं किंवा जमत नसावं. त्याचं मन जाणून घेण्यासाठी त्याच्या शिव्या, दोन शब्दांमधील स्तब्धता, त्याचे हावभाव, हातवारे याचा अर्थ लावावा लागला असता. त्याने आतापर्यंत फार महत्वाचं म्हणता येईल असं काहीही सांगितलं नव्हतं. तो फारसं बोलायचाही नाही. तरीही त्याच्यात काहीतरी असं होतं की त्यामुळे त्याला पुन्हा भेटावंसं वाटायचं. कदाचित त्याच्या मनातील तळमळ, त्याला चित्रकेलबद्दल त्याच्यात असलेली आंच हे कारण असू शकेल. तो आयुष्यात पॅरीसमध्ये पहिल्यांदाच येत होता तरीही त्याला त्या जगप्रसिद्ध शहराचं काहीच अप्रूप नव्हतं. यात तो हनीमूनला पॅरीसला आला होता ते मी धरलेलं नाही. पॅरीसमधील सुप्रसिद्ध स्थळं पहातानाही त्याला काही वाटत नसे. मी पॅरीसमध्ये शेकडो वेळा आलो असेन तरीही प्रत्येक वेळी मी थरारून जातो. साधं रस्त्यावरून चालतानासुद्धा काही तरी नवीन अनुभव घेत असल्यासारखा मी हुरळून जातो. स्ट्रिकलँड मात्र अगदी शांत असायचा. आता मागे वळून बघताना असं वाटतं की अंतर्मनातील स्वप्नांच्या जगात मश्गूल असल्यामुळे इतरांसारखं चर्मचक्षूंनी दिसणारं जग त्याला दिसतच नसावं.

दरम्यान एक विचित्र घटना घडली. आम्ही एका तावेर्नात बसलो होतो. तेथे बरेच स्त्री-पुरूष येत असत, त्यात काही वेश्याही असत. काही टेबलांवर स्त्री-पुरूषांच्या जोड्या बसल्या होत्या तर काही जण एकटेच होते. एक एकटीच बसलेली बाई आमच्याकडे टक लावून बघत होती. स्ट्रिकलँडकडे लक्ष गेल्यावर ती त्याच्याकडे बघून हसली. त्याचं तिच्याकडे लक्ष आहे असं वाटत नव्हते. थोड्या वेळाने ती बाहेर गेली. परत येताना ती सरळ आमच्या टेबलाकडे आली आणि तिच्यासाठी एखादं ड्रिंक मागवण्याची तिने विनंती केली. मी ड्रिंक मागवलं. ती आमच्या टेबलवर बसली आणि मी तिच्याशी गप्पा मारायला सुरवात केली. पण तिला स्ट्रिकलँडमध्ये रस होता हे थोड्याच वेळात स्पष्टपणे दिसून आलं. मी तिला सांगितलं की त्याला फ्रेंच येत नाही अगदी दोन शब्द बोलण्या इतपतही. तिने खाणाखुणांच्या भाषेत त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. तिला जे दहा पंधरा

इंग्लीश शब्द येत होते ते वापरून तिने त्याच्याशी मोडक्या-तोडक्या फ्रेंचमध्ये बोलायला सुरवात केली. असं मधे मधे एखाद दुसरा इंग्लीश शब्द पेरलेलं मोडकं-तोडकं फ्रेंच बोललं तर त्याला कळेल असा तिचा समज का झाला होता ते मला कळलं नाही. शेवटी तिला जे बोलायचं होतं त्याचं तिने मला इंग्लीशमध्ये भाषांतर करायला सांगितलं. त्याने उत्तर देताच मोठ्या उत्सुकतेने ती त्याचा अर्थ मला विचारत होती. त्याला त्या सगळयाची गंमत वाटत होती. पण त्याला तिच्यात रस नसावा हेही त्याच्या बोलण्यातून कळत होतं.

"मला वाटतं तिला तुम्ही आवडता आहात."

"मला त्याच्यात काही मोठेपणा वाटत नाही."

त्याच्या जागी मी असतो तर मी अवघडून गेलो असतो आणि त्याच्या एवढा शांतपणे बसूही शकलो नसतो. तिचे डोळे हसरे होते, जिवणी सुरेख होती. ती तरूण होती. स्ट्रिकलँडमध्ये तिला एवढं काय दिसलं कोण जाणे. तिची इच्छा ती लपवत नव्हती. भाषांतर करून सांगणं माझं कर्तव्य होतं.

"ती म्हणतेय की मला तुमच्या घरी यायला आवडेल."

"मी तिला कुठेही घेऊन जाणार नाही."

त्याने दिलेल्या उत्तराचे शक्य तितक्या सरळ शब्दात भाषांतर करून मी तिला सांगितलं. अशा प्रकारच्या आमंत्रणाला उडवून लावणं मला प्रशस्त वाटलं नाही. त्याच्या नकारामागचे खिशात पैसे नाहीत हे एक कारण असावं.

"मला ते आवडले आहेत. मी त्यांच्या प्रेमात पडले आहे."

मी याचं भाषांतर केलं तेव्हा स्ट्रिकलँडने घाई घाईने तोंड मुरडलं.

"तिला सांगा उडत जा म्हणून."

त्याचं उत्तर त्याच्या अविर्भावावरुनच कळत होतं, भाषांतराची गरज नव्हती.

*''मस्य, नी पा पोली.''* मिस्टर सभ्यपणा तुम्हाला ठाऊक नाही असं दिसतंय. ती चिडून म्हणाली आणि ती तावेर्नामधून तरातरा चालत बाहेर गेली. मला या घटनेचा थोडा रागच आला.

“ती तुम्हाला एवढा मान देत असताना तिचा असा अपमान करण्याची गरज नव्हती.”

“अशा गोष्टींची मला किळस येते.” तो उद्धटपणे म्हणाला.

मी त्याच्याकडे मोठ्या कुतुहलाने पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावरची नाराजी स्पष्ट दिसत होती. पण त्याच्यात एक कामूक आकर्षण आहे हे लपून रहात नव्हतं. मला वाटतं त्याच्या राकट पुरूषी व्यक्तिमत्वाची तिच्यावर भुरळ पडली असावी.

“मला हवी असलेली कोणतीही स्त्री मला लंडनमध्ये मिळू शकत होती. मी सगळं पाठीमागे सोडून पॅरीसला आलो आहे तो त्यासाठी नाही.”

## १४

इंग्लंडला जाताना परतीच्या प्रवासात माझ्या मनात स्ट्रिकलँडचा विषय घोळत होता. त्याच्या पत्नीला काय सांगावं याचा विचार मी करत होतो. मी जे सांगेन त्याने तिचं समाधान होईल की नाही याची मला खात्री नव्हती. माझंही समाधान कुठे झालं होतं. स्ट्रिकलँडने मला कोड्यात टाकलं होतं. त्याचा उद्देश मला कळत नव्हता. आपण चित्रकार व्हावं असं त्याला का वाटतंय, असं मी त्याला विचारलं तेव्हा तो मला काहीच सांगू शकला नाही किंवा त्याला सांगायचं नसावं. त्याला आपण चित्रकार व्हावं असं वाटायला काय कारण असावं हे मीही शोधू शकलो नव्हतो. त्याच्या मनाच्या अंतर्भागात खोलवर काहीतरी खदखदत शिजत असावं. तरीही आपल्या संथ, एकमार्गी आयुष्याविषयी त्याने कुरकुर केलेली कधी कोणी ऐकली नव्हती. जर कंटाळवाणेपण असह्य होऊन त्याने चित्रकार व्हायचं ठरवलं असेल तर ते समजण्यासारखं होतं. बरेच जण आयुष्यात असं काहीतरी करतात. पण तो त्यातला नव्हता. ही कारणमीमांसा मी ओढून-ताणून शोधली होती. मी देखील स्वत: एक स्वप्नाळू असल्याने मला तरी ती योग्य वाटत होती. त्याच्यामध्ये मुळातच सृजनशील निर्मितीचे एखादे स्फुल्लींग धुमसत असावे. परिस्थितीच्या दडपणामुळे त्याच्यावर जमलेल्या राखेच्या थराखाली ते लपलं होतं तरी त्यातील अग्नी विझला नव्हता. कर्करोगाच्या पेशीप्रमाणे त्याचा कणाकणाने विस्तार होत राहिला. हळूहळू त्याने शरीरातील सर्व मांसपेशींना ग्रासून टाकलं. योग्य वेळ येताच रोगाने त्याच्या सार्या शरीराचा ताबा घेतला आणि त्याला कृती करण्यास भाग पाडलं. कोकिळा दुसऱ्या पक्ष्याच्या घरट्यात अंड घालते. अंड उबून कोकिळेचं पिल्लू बाहेर येताच ते इतर पिल्लांना घरट्यातून बाहेर ढकलून देतं. पूर्ण वाढ झाल्यावर ज्या घरट्याने त्याचं संगोपन केलं ते घरटं मोडून ते खुल्या आकाशात भरारी घेण्यासाठी पंख पसरून उडून जातं.

एका सामान्य, अरसिक शेअर ब्रोकरला निर्मीतीच्या स्फुल्लींगाने झपाटून टाकावं, त्याच्या आणि त्याच्यावर अवलंबून असलेल्यांच्या आयुष्याचा विचका

करून टाकावा हे केवढं विलक्षण म्हटलं पाहिजे. एखादा गर्भश्रीमंत, सर्व सुखात लोळणारा पुरूष जेव्हा दैवी शक्तिने झपाटला जातो आणि आपल्या सर्व आप्तस्वकीयांचा आणि ऐहिक सुखांचा त्याग करून एखाद्या मठात जाऊन व्रतस्थ जीवन जगायचं ठरवतो ते काही यापेक्षा वेगळं नसतं. असा बदल निरनिराळ्या स्वरूपात  वेगवेगळ्या मार्गांनी होत असतो. काही जणांच्या बाबतीत एखाद्या पाणलोटाखाली प्रचंड शिळेचा चक्काचूर होऊन जावा तसा आकस्मित संकटासारखा येऊन कोसळतो, तर काही जणांच्या बाबतीत एखादा खडक वरून थेंब थेंब ठिबकणाऱ्या पाण्याच्या धारेखाली झिजून जावा तसा तो अगदी हळू हळू होतो. स्ट्रिकलँडमध्ये एखाद्या धर्मवेड्याचे क्रौर्य आणि अनुयायाचा कडवेपणा यांचा मिलाफ झाला होता.

त्याच्या आयुष्याचे कितीही धिंडवडे निघोत मला रस होता तो त्याच्या विलक्षण प्रतिभेतून निर्माण होणाऱ्या कलाकृतीत. तो लंडनमध्ये ज्या कलावर्गात शिकायला जात होता तेथील इतर विद्यार्थ्यांचे त्याच्याविषयी काय मत होते हे जेव्हा मी त्याला विचारलं होतं तेव्हा तो हसत हसत म्हणाला होता:

“त्यांना माझी चित्र म्हणजे एक विनोद वाटे.”

“येथे पॅरीसमध्ये आल्यावर तुम्ही स्टुडियोत जायला सुरवात केली आहे का?”

“होय. ब्लायटर आज सकाळी आला होता. तुम्हाला माहिती आहे ना तो. त्याने माझी पेंटींग पाहिली आणि भुवया उंचावून तो निघून गेला.”

स्ट्रिकलँड गालातल्या गालात हसला. तो मुळीच नाऊमेद झाला नव्हता. त्याच्याबद्दल इतरांचे मत काय आहे याची त्याला मुळीच पर्वा नव्हती.

त्याच्याशी वागताना त्याच्या याच स्वभावगुणामुळे मी अस्वस्थ होत असे. जेव्हा लोक म्हणतात की मी इतरांच्या मताची पर्वा करत नाही तेव्हा बऱ्याच वेळा ते स्वत:लाच फसवत असतात. खरं पहायला गेलं तर त्यांना आपल्या मनासारखं

वागायचं असतं. आपल्या मनाचा कल काय आहे ते कोणाला कळू नये अशी त्यांची ईच्छा असते. ते जेव्हा बहुमताला किंमत देत नसतात तेव्हा आपल्याला काही मित्रांचा पाठिंबा आहे हे त्यांना चांगलं ठाऊक असतं. जगाच्या दृष्टीने जेव्हा तुम्ही अपारंपारिक असता तेव्हा अपारंपारिकता हीच तुमची पारंपारिकता होऊन जाते. अशा वेळी एखाद्याला फाजिल आत्मविश्वास असला तरी तो परवडू शकतो. धोका न पत्करताही धाडस केल्याचं समाधान मिळतं. सुसंकृत जगात सर्वांनाच आपल्याला मान्यतेचा शिक्कामोर्तब मिळावा अशी ईच्छा असते. अपारंपारिक वाट चोखाळल्यामुळे बऱ्याच जणांना टीका सहन करावी लागली आहे. पण हेच लोक मानसन्मान मिळण्याची शक्यता दिसताच ज्या तत्परतेने स्वत:ची तत्वे गुंडाळून ठेवतात तेवढी तत्परता दुसरं कोणी दाखवत नसेल. आपण दुसऱ्यांच्या मतांना एका पेनीचीही किंमत देत नाही असं जे म्हणतात त्यांच्यावर माझा विश्वास नाही. ही फुशारकी मूर्खपणाची आहे. जे टीकेला घाबरत नाही असं सांगतात त्यांना आपल्या चुका क्षुल्लक आहेत आणि त्या कोणाला सापडणार नाहीत याची खात्री असते.

पण हा माणूस दुसरे काय म्हणतात याला खरंच घाबरत नव्हता. त्यामुळेच सामान्यांचे नियम त्याला लागू पडत नव्हते. तो अंगाला तेल चोपडलेल्या मल्लासारखा होता. त्याची पकड करणं कठीण होतं. त्यामुळे तो काहीही करायला मोकळा होता, आणि मला चीड येत होती ती याचीच. पॅरीसमध्ये असताना मी त्याला हे बोलल्याचं मला आठवतंय:

“हे बघा, सर्वजण तुमच्यासारखं वागायला लागले तर जगरहाटी बंद पडेल.”

“हे विधान अगदी मुर्खपणाचं आहे. माझ्यासारखा चक्रमपणा करण्याच्या वाटेला दुसरं कोण जाणार आहे? बहुतेकजण आपापल्या वाटेला आलेलं आयुष्य कितीही सामान्य आणि फालतू असलं तरी विनातक्रार जगत असतात.”

पुन्हा एकदा मला उपहासाचा आधार घ्यावासा वाटला.

“माणसाने आपले वर्तन असे चोख ठेवले पाहिजे की जगरहाटीचे नियम त्याच्या आदर्शावरून ठेवले गेले पाहिजेत असं जे म्हटलं जातं ते तुम्हाला पटत असेल असं वाटत नाही.”

“मी हे यापूर्वी कधीच ऐकलं नव्हतं. असो, पण हे अगदीच फालतू वाक्य आहे.”

“हे कांटचं वाक्य आहे.”

“कोणाचं का असेना. फालतू ते फालतूच आहे.”

अशा इसमाच्या माणूसकीला केलेल्या आव्हानातून काहीही निष्पन्न होणार नाही. मानवी समाजाच्या संरक्षणासाठी म्हणून काही नियम उत्क्रांत झाले आहेत. माणसाची सद्सद्विवेकबुद्धी या नियमांचं पालन करत असते. सद्सद्विवेकबुद्धी म्हणजे आपण कोणत्याही नियमाचं उल्लंघन करत नाही हे पहाणारा आपल्या मनातील अदृश्य पोलीस. माणसाच्या अहंभावावर नजर ठेवणारा एक गुप्तहेर. आपण करीत असलेल्या कृतीला आपल्या सहकार्यांची मान्यता असावी यासाठी माणसाची आंच एवढी तीव्र असते, टीकेचं भय एवढं भयंकर असतं की त्याने सद्सद्विवेकबुद्धी नावाच्या काल्पनिक शत्रूची आपल्या मनात स्थापना केली आणि आता तो शत्रू त्याच्यावर बारीक नजर ठेऊन असतो. या शत्रूवर त्याच्या मालकाने एक काम सोपवलेलं असतं. कळपातून बाहेर जाण्याची इच्छा झालीच तर ती चिरडून टाकण्याचं काम. हे काम तो शत्रू डोळ्यात तेल घालून करत असतो. त्यामुळे समाजाच्या हितापुढे स्वत:च्या इच्छा-आकांक्षांच बलिदान करण्याची जबरदस्ती त्याच्यावर होते. या शृंखलेने व्यक्ति समाजाशी बांधली गेलेली असते. समाजाचं हित स्वत:च्या हितापेक्षा मोठं आहे अशी कल्पना करून दिल्याने माणूस समाजाचा गुलाम झाला आणि त्याने समाजाचा उत्कर्ष केला. ज्याप्रमाणे राजदरबारातील मानकर्याला आपल्या खांद्यावर लावलेल्या फितीचा अभिमान वाटतो त्याप्रमाणे माणसाला त्याच्या सद्सद्विवेकाचा अभिमान वाटू लागला.

सद्सद्विवेकाचं वर्चस्व मान्य नसणाऱ्यांवर कठोर टीका होऊ लागली. सद्सद्विवेकापुढे आपलं काही चालत नाही हे त्याला कळून चुकलं. स्ट्रिकलँडच्या वागण्यामुळे त्याला जी टोचणी लागायला पाहिजे होती त्याबद्दल त्याला अजिबात पर्वा वाटत नाही हे जेव्हा माझ्या लक्षात आलं तेव्हा मला तो मानवरूपधारी मायावी राक्षसासारखा वाटू लागला आणि माझ्या अंगावर शहारे आले.

मी पॅरीसमधून निघताना त्याचा निरोप घेतला तेव्हा त्याचे शेवटचे शब्द असे होते:

“ऍमीला सांगा माझ्यापाठी येण्यात काही अर्थ नाही. मी माझं हॉटेल आता बदलणारच आहे तेव्हा तिला ते सापडायची शक्यता नाही.”

“मला वाटतं त्यांनी तुम्हाला केव्हाच बाद करून टाकलं आहे.”

“माझ्या मित्रा, तिनं तसंच करायला पाहिजे याची तुम्ही काळजी घ्याल याची मला आशा वाटते. पण बायकांकडे शहाणपण असतं तर त्या बायका कसल्या.”

## १५

मी लंडनला जाऊन पोचतो न पोचतो तोच एक तातडीची सूचना माझी वाट पहात होती. मिसेस स्ट्रिकलँडने जेवण झाल्यावर ताबडतोब मला त्यांच्या घरी बोलावलं होतं. तिच्याकडे कर्नल मॅक-अँड्र्यु आपल्या पत्नीला घेऊन आला होता. मिसेस स्ट्रिकलँडची बहीण तिच्यापेक्षा वयाने थोडी मोठी होती, दिसायला साधारणत: तिच्यासारखीच पण थोडीशी निस्तेज, चेहेऱ्यावर सगळं ब्रिटीश साम्राज्य आपल्या खिशात आहे असा आविर्भाव. बहुतेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बायकांना आपण आकाशातून पडलो आहोत असं वाटत असते. तिच्या शिष्टाचारांवरून आणि बोलण्यातील ढंगावरून तिचे उच्चकुलीन संस्कार आणि सैनिकी पेशावरचं प्रेम लपून रहात नव्हतं. पण तिने घातलेला गाऊन किंमती असला तरी याप्रसंगी तो गबाळयासारखा वाटत होता.

मिसेस स्ट्रिकलँड अस्वस्थ दिसत होती.

“तुम्ही काय बातमी आणली आहेत ती मला पहिल्यांदा सांगा.”

“मी तुमच्या पतीराजांना भेटलो. मला वाटतं परत यायचं नाही हा त्यांचा निर्धार पक्का आहे.” मी थोडं थांबून पुढे बोललो. “त्यांची चित्रकार होण्याची इच्छा आहे.”

“तुम्हाला काय म्हणायचंय?” मिसेस स्ट्रिकलँड आश्चर्याने किंचाळली. तिचा विश्वास बसत नव्हता.

“त्यांना अशा गोष्टीत रस आहे याची तुम्हाला पूर्वी कल्पना नव्हती का?”

“तो वेडपट असल्याशिवाय असं म्हणणार नाही.” कर्नल ओरडला.

मिसेस स्ट्रिकलँडच्या कपाळावर आठ्या पडल्या. ती काही तरी आठवण्याचा प्रयत्न करत होती.

“आता मला आठवतंय. आमच्या लग्नाच्यापूर्वी ते रंगपेटी घेऊन काहीतरी करायचे. पण ती रिकामपणाची कामगिरी म्हणतात ना तसलं काही तरी होतं. कसेतरी रंग फासलेले असायचे. त्यावरून आम्ही त्यांच्या खूप फिरक्या घ्यायचो. कला वगैरे असल्या गोष्टीत त्यांना मुळीच गती नव्हती.”

“मला चित्रकार व्हायचंय म्हणे. काही तरी सांगायचं म्हणून त्यांनी ठोकून दिलं असेल.”

मिसेस स्ट्रिकलँड बराच वेळ विचार करत होती. मी तिला जे सांगितलं ते तिच्या मनाला पटत नव्हतं. तिच्यावर कोसळलेल्या आपत्तीनंतर मी पहिल्यांदा तिच्या घरी गेलो तेव्हा घरात जो अस्ताव्यस्तपणा दिसत होता तो जाऊन सगळया वस्तू जागच्या जागी लावलेल्या होत्या. तिच्यातील गृहिणीने तिच्या दु:खावर मात केलेली दिसत होती. मी स्ट्रिकलँडला पॅरीसमध्ये नुकताच भेटलो होतो. तिथे तो कोणत्या परिस्थितीत रहात होता त्याची कल्पना येथे लंडनमधल्या त्याच्या घरी बसून येणं शक्य नव्हतं. तसेच त्याच्या व्यक्तिमत्वातील, स्वभावातील परस्परविरोधही येथे बसून लक्षात आले नसते.

“त्यांना जर चित्रकारच व्हायचं होतं तर तसं त्यांनी आम्हाला कधीच का सांगितलं नाही?” मिसेस स्ट्रिकलँडने विचारलं. “तशा प्रकारची महत्वाकांक्षा असती तर मी तरी त्याला विरोध केला नसता.”

मिसेस अँड्रयुने तिचे ओठ घट्ट आवळून धरले होते. मला वाटतं तिला तिच्या बहिणीचा कलाकारांकडे बघण्याचा सहानुभूतीचा दृष्टीकोन आवडत नसावा. तिच्या मते कलाकार असणं हा चेष्टेचा विषय असतो.

मिसेस स्ट्रिकलँड पुढे म्हणाली:

“जर यांना चित्रकलेत थोडी जरी गती असती तर मीच त्यांना उत्तेजन दिलं नसतं का? त्यासाठी काहीही त्याग करायला माझी तयारी होती. शेअर ब्रोकरची

पत्नी म्हणवून घेण्यापेक्षा एका चित्रकाराची पत्नी म्हणवून घ्यायला मला जास्त अभिमान वाटला असता. जर मुलांची जबाबदारी नसती तर कोणत्याही तडजोडी करायला माझी हरकत नसती. या फ्लॅटमध्ये मी जेवढी सुखी आहे तेवढ्याच सुखात मी चेल्सीमधल्या एखाद्या लहानशा स्टुडियोत राहून संसार केला असता.”

“बहिणाबाई, तुझ्या इतका संयम माझ्याकडे नाही,” मिसेस अँड्रयु म्हणाली. “म्हणे मला चित्रकार व्हायचंय. या सगळया थापांवर तुझा विश्वास बसलाय की काय.?”

“मला वाटतं की ते सगळं खरं असावं,” मी पुटपुटलो.

मी एखादा विनोद केला असावा अशा नजरेने तिने माझ्याकडे पाहिलं.

“कोणताही पुरूष एखाद्या स्त्रीच्या प्रेमात पडल्याशिवाय वयाच्या चाळीसाव्या वर्षी नोकरी, धंदा, घरदार, बायको, मुलं यांना सोडून चित्रकार व्हायला जाणार नाही. मला वाटतं तुझ्या एखाद्या कलाकार मैत्रीणीने त्याच्या डोक्यात काहीतरी भरवून दिलं असेल आणि झाले असतील हे घोड्यावर स्वार.”

मिसेस स्ट्रिकलँडचे गाल मत्सराग्नीने लाल झाले होते.

“ती दिसायला कशी आहे?”

मी क्षणभर थांबलो. मला माहित होतं की मी जे सांगणार होतो त्याने बॉम्बगोळा फुटणार होता.

“त्यांच्या बरोबर कोणतीही स्त्री होती असं मला तरी आढळलं नाही.”

मी जे सांगितलं त्याच्यावर मॅक अँड्रयु पति-पत्नीचा मुळीच विश्वास बसला नाही. मिसेस स्ट्रिकलँड उठून उभी राहिली.

“तुम्हाला असं म्हणायचंय का की ती बया तुम्हाला त्यांच्या बरोबर दिसली नाही.”

“तेथे कोणीही नव्हतं. ते एकटेच रहातात.”

“माझा यावर विश्वास बसत नाही.” मिसेस मॅक-अँड्रयु जवळपास ओरडल्याच.

“मला स्वत:लाच जायला हवं होतं. मी पैजेवर सांगतो. मी असतो तर तिला पाताळातूनही शोधून काढलं असतं.” कर्नल म्हणाला.

“तुम्हीच गेला असता तर फार बरं झालं असतं.” मी त्याला झोंबावं म्हणून बोललो. “तुमची सगळी गृहीतकं चुकलेली आहेत. ते कोणत्याही महागड्या हॉटेलात रहात नसून ते दरिद्री वस्तीतीतल एका लहानशा हॉटेलमध्ये अगदी भिकार्ड्यासारखे रहात आहेत. ते पॅरीसला जाऊन मौज मजा करत आहेत असं वाटत नाही. बहुधा त्यांच्या जवळ फारसे पैसेसुद्धा नसावेत.”

“यामागे आपल्याला माहित नाही असं एखादं कारण असेल असं तुम्हाला वाटतं का? उदाहरणार्थ पोलिसांचा ससेमिरा चुकवायला तर ते पॅरीसला जाऊन लपले नसतील?”

या कल्पनेने सगळयांच्या मनात एक आशेचा किरण लुकलुकला. पण मी त्यात नव्हतो.

“पण तसं असतं तर त्यांनी त्यांच्या भागीदाराला आपला पत्ता दिला नसता.” मी कडवटपणे म्हणालो. “ते काहीही असलं तरी मला एका गोष्टीची खात्री आहे ती म्हणजे ते कोणाचाही हात धरून पळून गेलेले नाहीत. तसेच ते कोणाच्याही प्रेमात पडले नसावेत. त्यांच्या बोलण्यावरून तरी तसं जाणवत नव्हतं.”

माझ्या बोलण्यावर प्रतिक्रिया व्यक्त करण्याआधी सर्वजण थोडा वेळ थांबले.

“तुम्ही म्हणता ते खरं असेल तर मला वाटत होतं तेवढं हे प्रकरण सुधारण्याच्या पलीकडे गेलं आहे असं काही म्हणता येणार नाही.” मिसेस अँड्रयु म्हणाली.

मिसेस स्ट्रिकलँडने आपल्या बहिणीकडे पाहिलं पण ती काहीच बोलली नाही. ती पांढरी फटक पडली होती. डोळयांखाली काळी वर्तूळ आली होती. तिच्या चेहऱ्यावरचे भाव मला वाचता आले नाहीत. मिसेस अँड्रयु पुढे म्हणाली:

“काही नाही, त्यांना फक्त एक झटका आला असेल. एक ना एक दिवस येईल डोकं ताळयावर.”

“ऍमी तू स्वत:च का जात नाहीस.” कर्नलने सुचना केली. पॅरीसमध्ये तुला एखादं वर्ष रहायला काय हरकत आहे. मुलांचा सांभाळ आम्ही करू. तो कंटाळेल आणि आज ना उद्या लंडनला यायला तयार होईल. तुझ्या पॅरीसला जाण्याने फारसं काही नुकसान होणार नाही झाला तर फायदाच होईल.”

“तसं करणं बरोबर होणार नाही.” मिसेस अँड्रयु म्हणाली. “त्यांना हवं ते सगळं मनासारखं करू दे. एक दिवस ते स्वत:च कंटाळतील. मग बघा कसे कुत्र्यासारखे कुल्ल्यात शेपटी घालून झक्कत घरी परत येतील ते.” तिने तिच्या बहिणीकडे थंड नजरेने पाहिलं. “संसार करताना तू फारशी हुशारी दाखवली नाहीस. सगळे पुरूष मूर्ख असतात. फक्त त्यांना कसं हाताळायचं ते ठाऊक असलं की झालं.”

मिसेस अँड्रयुने सर्व स्त्री जातीचं लाडकं मत मांडलं. पुरूष आपल्या प्रिय स्त्रीला सोडून जाताना नेहमीच रानटीपणाने वागतात. पण या बाबतीत दोष द्यायचा तर तो स्त्रियांनाच द्यावा लागेल. प्रेमाला काही कारण नसतं हेच कारण प्रेमामागे असतं.

मिसेस स्ट्रिकलँडने एक एक कडून सगळयांकडे पाहिलं.

“ते कधीच परत येणार नाहीत.”

“आता आपण काय ऐकलं ते नीट लक्षात घे. त्यांना इथल्या आरामशीर जीवनाची सवय झाली आहे. सगळ्या गोष्टी वेळच्या वेळी विनासायास मिळत

होत्या, सभोवती काळजी घेणारी माणसं उभी होती. त्या तसल्या दळीद्री हॉटेलमध्ये ते किती दिवस काढतील? शिवाय त्यांच्याकडे पैसेही नाहीत. त्यांना परत यावेच लागेल." मिसेस अँड्रयु.

"ते जर एखाद्या बाईबरोबर गेले असते तर ते परत येण्याची शक्यता होती. दोन नाही तर तीन महिन्यात ते तिला कंटाळतील. पण जर ते प्रेमात पडल्यामुळे गेले नसतील तर काही खरं नाही." मिसेस स्ट्रिकलँड.

"अरे बापरे. हा खूपच गुंतागुंतीचा मामला दिसतोय." कर्नल म्हणाला. ज्या गोष्टी सैनिकीपेशाशी संबंधित नसतील त्या गोष्टींबाबत त्याची नावड त्याच्या बोलण्यातून व्यक्त होत होता. "डोरोथीने सांगितलेलं तुला पटत नाही का? ती म्हणाल्याप्रमाणे तो एक ना एक दिवस परत येईल. तो जे काही करतोय त्याच्या कृत्यांचा घडा भरल्याशिवाय रहाणार नाही."

"पण मला ते परत यायला नको आहेत."

"ऍमी!"

मिसेस स्ट्रिकलँडच्या संतापाचा उद्रेक झाला. तिचा चेहेरा पांढरा फटक पडला. भराभर बोलल्याने तिला श्वास लागला होता.

"ते जर कोणा स्त्रीच्या प्रेमात पडून असते आणि तिचा हात धरून पळून गेले असते तर एक वेळ मी त्यांना माफ केलं असतं. संसाराच्या अर्ध्यावर पुरूषांचं दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमात पडून भरकटणं स्वाभाविक आहे असं मी समजले असते. त्यासाठी मी त्यांना फारसा दोषही लावला नसता. म्हटलं असतं की नवरा थोडा भरकटत गेलाय. पुरूष या बाबतीत अगदी दुबळे असतात. उलट स्त्रिया मात्र पक्क्या बनेल असतात. हा स्त्री आणि पुरूषातील महत्वाचा फरक असतो. पण हे प्रकरण वेगळंच दिसतंय आणि त्याचीच मला प्रचंड चीड येतेय. आता मात्र मी त्यांना कधीही माफ करायचं नाही असं ठरवलंय."

कर्नल आणि त्याची पत्नी तिची समजूत घालत होते. तिच्या बोलण्याने त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. तिची मनस्थिती ठीक नसावी अशी त्यांना शंका आली. काय बोलावं त्यांना काही समजेना.

“मी काय म्हणतेय ते तुम्हाला कळतंय ना?” मिसेस स्ट्रिकलँड स्फुंदत स्फुंदत मला म्हणाली.

“सांगता येणं कठीण आहे. नवरा एखाद्या स्त्रीच्या मागे लागला तर एक वेळ पत्करलं पण तो एखाद्या ध्येयाच्या वगैरे नादी लागला तर बघायला नको. बाईची भानगड परवडते, तिच्या झिंज्या तरी उपटता येतात पण या ध्येय वगैरे भानगडींचं आपण काय वाकडं करू शकतो असंच ना?”

मिसेस स्ट्रिकलँडने ज्या नजरेने माझ्याकडे बघत होती ती मैत्रीची होती असं म्हणता येणार नाही. पण तिने माझ्या प्रश्नाला उत्तर दिलं नाही. कदाचित मी तिच्या वर्मावर बोट ठेवलं असावं. ती खालच्या आवाजात थरथरत बोलत होती.

“त्यांचा मला प्रचंड तिटकारा वाटतोय. आयुष्यात कोणाचाही एवढा तिरस्कार करण्याचा प्रसंग माझ्यावर येईल असं मला कधी वाटलं नव्हतं. तुम्हाला माहित नसेल, हे प्रकरण कितीही लांबत गेलं तरीही शेवटी त्यांच्या हृदयात मीच असेन असं वाटून इतके दिवस मी माझं समाधान करून घेत होते. मला वाटायचं आयुष्याची अखेर जवळ आल्यावर जरी त्यांना माझी आठवण झाली तरी मी त्यांच्याकडे एका पायावर गेले असते. एखाद्या आईने करावा तसा मी त्यांचा सांभाळ केला आहे. काहीही झालं तरी माझं त्यांच्यावरचं प्रेम कायम आहे आणि शेवटपर्यंत ते तसंच राहील हे मी त्यांना पत्रात लिहून कळवलं होतं. मी त्यांना मनाने कधीच माफ केलं होतं.”

आपली प्रिय व्यक्ति मृत्युशैयेवर शेवटचा श्वास घेत असताना स्त्रियांना चांगलं वागण्याचं नेहमीच भरतं येतं. अशा वेळी माझी थोडी फसगत होते. आयुष्याची दोरी थोडी लांबल्यामुळे अशी संधी जर हुकली तर त्यांना चुकल्यासारखं वाटेल.

"पण आता सगळं संपल्यात जमा आहे. माझ्या लेखी ते आता एखाद्या परक्या इसमासारखे आहेत. निष्कांचन अवस्थेत, उपाशी पोटी तडफडून, एकाकी अवस्थेत, एखाद्या महाभयंकर रोगाने सडून त्यांना मरण आलं तर किती बरं होईल असं आता मला वाटायला लागलंय."

यावर स्ट्रिकलँडने जे सुचवलं होतं ते तिला सांगणं योग्य होईल असं मला वाटलं.

"जर तुम्हाला घटस्फोट घ्यायचा असेल तर त्याला त्यांची हरकत नाही. त्यासाठी जे आवश्यक असेल ते सर्व करायला ते तयार आहेत."

"मी त्यांना का म्हणून मोकळं सोडू?"

"त्यांना स्वत: होऊन घटस्फोट हवा आहे असं नाही. उलट घटस्फोट घेणं तुम्हाला सोईस्कर असेल असं त्यांना वाटतंय."

मिसेस स्ट्रिकलँडने मान डोलावली. माझ्या बोलण्याने तिची थोडी निराशाच झाली असावी. त्याकाळी मला माणसं बाहेरून दिसतात तशीच वागतात असं वाटायचं. एरवी सुंदर आणि आनंदी दिसणारी स्त्री सूडभावनेने पेटून उठलेली पाहून माझी निराशा झाली. क्षुद्रता आणि उदात्तता, दुस्वास आणि औदार्य, दुष्टावा आणि प्रेम हे गुण एकाच व्यक्तित एकाच वेळी वास करून असतात हे कळायला मला इतकी वर्ष लागली.

मिसेस स्ट्रिकलँडचा अपमानाने झालेला मनक्षोभ शांत करण्यासाठी काही तरी प्रयत्न करून बघावा असं मला वाटलं.

"हे बघा. तुमच्या पतिराजांना कोणत्यातरी अज्ञात अशा बाह्य शक्तिने झपाटलं आहे. ते त्यांचे राहिलेले नाहीत. ती शक्ति तिचे उद्देश पूर्ण करून घेण्यासाठी त्यांचा वापर करून घेत आहे. ते जे काही करत आहेत त्यासाठी त्यांना जबाबदार धरणं कितपत योग्य ठरेल याची मला शंका आहे. त्या झपाटलेपणाने त्यांची अवस्था

कोळयाच्या जाळयात सापडलेल्या माशीसारखी झाली आहे. कोणीतरी त्यांना भारलेलं आहे. या बाबतीत काही विचित्र गोष्टी माझ्या वाचनात आलेल्या आहेत. त्यात एक व्यक्तिमत्व दुसऱ्या शरीरात प्रवेश करून त्या शरीरातील मुळच्या व्यक्तिमत्वाला हाकलून लावतं. त्या शरीरातील आत्म्याची घुसमट होते. पूर्वीच्या काळी असा प्रकार झाला असता तर चार्ल्स स्ट्रिकलँडना सैतानाने झपाटलं आहे असं म्हटलं गेलं असतं.”

मिसेस अँड्रयुने तिच्या गाऊनच्या चुण्या झटकून सारख्या केल्या. तसं करताना तिच्या हातातील सोन्याच्या बांगड्या घरंगळून तिच्या मनगटावर आल्या.

“हे खूपच ताणल्यासारखं वाटतंय,” ती फणकार्याने म्हणाली. “ऍमी नवऱ्याला फारच गृहीत धरून चालत होती. तिने आपल्यापाठी एवढे उपद्व्याप लावून घेतले नसते तर तिला थोडा तरी संशय आलाच असता. आता ऍलेकच्या मनात वर्षभर काहीतरी खदखदत आहे आणि मला त्याची साधी कुणकुणसुद्धा लागली नाही असं कधी तरी होऊ शकेल का?”

कर्नल शून्यात नजर लावून बसला होता आणि मी तो वरून दिसतो तेवढा खरंच भोळा असेल का याचा विचार करत होतो.

“तुम्ही काहीही म्हणा, त्याने चार्ल्स एक हृदयशून्य पशू आहेत हे सत्य बदलत नाही.” मिसेस अँड्रयु माझ्याकडे रोखून पहात होती. “ते आपल्या बायकोला सोडून का गेले ते मी सांगते तुम्हाला. स्वत:चा शुद्ध स्वार्थ. दुसरं काही नाही.”

“असा खुलासा करणं अगदीच सोपं आहे.” मी म्हणालो खरा, पण मला वाटतं याने कसलाही खुलासा होत नव्हता. नुकताच प्रवासातून आल्याने मी खूप थकलो होतो. मी जाण्यासाठी उठलो. मिसेस स्ट्रिकलँडने मला थांबवण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही.

# १६

त्यानंतर लवकरच मिसेस स्ट्रिकलँडने आपण ताठ कण्याची स्त्री आहोत हे दाखवून दिलं. तिने आपलं दु:ख स्वत:जवळच ठेवलं. तीच ती कर्मकहाणी ऐकून लोकांना कंटाळा येतो हे तिने ओळखलं होतं. ती जेव्हा बाहेर जात असे तेव्हा तिच्या दुर्दैवाची दया येऊन तिच्या मैत्रीणी तिची चांगली विचारपूस करत. पण ती स्वत:चा आब राखून असायची. ती मोठ्या धीराची बाई होती. ती आपल्या दु:खाचा फार दिवस बाऊ करत बसली नाही. तिचं वागणं कोणाच्या नजरेत येत नसे. ती आनंदी असायची पण तिला निर्लज्ज म्हणता आलं नसतं. स्वत:चं दु:ख उगाळत बसण्याऐवजी ती इतरांच्या सुख-दु:खात सहभागी होई. स्वत:च्या नवऱ्याचा उल्लेख करायची कुठे वेळ आली तर ती त्याच्याबद्दल सहानुभूतीने बोलत असे. तिच्या या वर्तनामुळे मी कोड्यात पडलो. एके दिवशी तीच मला आपण होऊन म्हणाली:

“चार्ल्स पॅरीसला एकटेच आहेत असा तुमचा जो ग्रह झालाय तो साफ चुकीचा आहे याची मला खात्री पटलीय, माझ्या ओळखीच्या माणसांकडून ... मी तुम्हाला त्यांची नावं सांगणार नाही ... मला माहिती मिळाली आहे की इंग्लंडमधून जाताना ते एकटे नव्हते.”

“हे फारच थोर आहे. कोणत्याही खाणाखूणा मागे न ठेवता पळून जाण्याएवढी हुशारी होती म्हणायची त्यांच्याकडे.”

तिने रागाने मान फिरवली.

“मला एवढंच म्हणायचं होतं की कोणी म्हटलं की ते पळून गेले आहेत तर त्यांचं म्हणणं खोडून काढण्याच्या फंदात पडू नका.”

“त्याची काही काळजी करू नका.”

तिने विषय बदलला. जणू तिच्या लेखी त्याला काही महत्व नव्हतं. तिच्या मित्रमंडळींकडून एक नवीनच अफवा माझ्या कानी आली. त्यांच्याकडून असं ऐकायला मिळालं की चार्ल्स स्ट्रिकलँड एकदा एम्पायरमध्ये बॅले बघायला गेला असताना एका फ्रेंच नर्तिकेच्या प्रथमदर्शनी प्रेमात पडला आणि सरळ तिचा हात धरून पॅरीसला पळून गेला. या गोष्टीचा उगम कसा आणि कुठे झाला ते काही मला कधी कळलं नाही. पण यामुळे मिसेस स्ट्रिकलँडच्या प्रतिष्ठेला फारसा धक्का न पोचता उलट तिला मिळणाऱ्या सहानुभूतीचा ओघ वाढला. तिने विचारपूर्वक ठरवलेल्या योजनेचा हा एक भाग असावा. कर्नल मॅक-अँड्रयु जे म्हणत होते की तिच्याकडे एक कपर्दिकही नाही त्यात मात्र अतिशोयक्तीचा भाग मुळीच नव्हता. तिला लवकरात लवकर स्वत:च्या पायांवर उभं रहाणं भाग होतं. बरेचसे लेखक तिच्या ओळखीचे होते आणि तिने या गोष्टीचा फायदा घ्यायचं ठरवलं. मुळीच वेळ फुकट न घालवता तिने टायपिंग आणि शॉर्टहँड शिकून घेतलं. ती सुशिक्षित असल्याने तिने त्यात चांगली प्रगती केली. काम मिळवताना तिने लोकांच्या सहानुभूतीचा चांगलाच उपयोग करून घेतला. तिच्या मित्रांनी तिला काम द्यायला आणि इतरांकडे तिच्या नावाची शिफारस करायला सुरवात केली.

मॅक-अँड्रयुना मूल नव्हतं. प्राप्त परिस्थितीत त्यांनी मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी स्वत:च्या अंगावर घेतली. मिसेस स्ट्रिकलँड स्वत:च्या पोटापुरतं कमवू लागली. तिने तिचा मोठा फ्लॅट आणि फर्निचर विकलं आणि ती वेस्टमिन्सटरमध्ये दोन छोट्या खोल्या घेऊन राहू लागली. ती एवढी हुशार होती की लवकरच तिचा जम बसून ती यशस्वी होईल याची मला खात्री होती.

# १७

मध्यंतरी पाच एक वर्ष गेली. त्या दरम्यान मी काही काळासाठी पॅरीसमध्ये स्थाईक होण्याचा निर्णय घेतला होता. लंडनमध्ये राहून माझ्या कारकीर्दीची वाढ खुंटली होती. दररोज उठून त्याच त्या गोष्टी करत रहाण्याचा मला कंटाळा आला होता. माझे मित्रसुद्धा माझ्यासारखेच निष्क्रिय आयुष्य कंठत होते. त्यांच्यापासून नवीन शिकावं असं काही राहिलं नव्हतं. आमची भेट होई तेव्हा ते काय बोलणार आहेत याचा अंदाच मी आधीपासूनच करू शकत असे. त्यांच्या प्रेमप्रकरणातसुद्धा तोच तोचपणा भरलेला असायचा. आमची अवस्था एका टर्मीनसपासून दुसऱ्या टर्मीनसपर्यंत फ़ेऱ्या मारणाऱ्या ट्रॅमकारसारखी झाली होती. एका फेरीत किती प्रवासी चढउतार करतील ते सुद्धा सवयीने अचूक सांगता यायचं. आयुष्य अगदी शिस्तीत आणि आरामात चाललं होतं. मला अचानक झटका आला. मी माझं छोटं अपार्टमेंट सोडून दिलं. किडूक मिडूक जे सामान होतं ते फुंकून टाकलं आणि पॅरीसमध्ये जाऊन आयुष्याला नव्याने सुरवात करण्याचा निश्चय केला.

निघण्यापूर्वी मी मिसेस स्ट्रिकलँडला जाऊन भेटलो. मी गेल्या कित्येक दिवसात तिला भेटलो नव्हतो. तिच्यात बराच बदल झालेला दिसला. तिचं वय तर वाढलेलंच होतं, पण ती बारीकही झाली होती. मला वाटलं तिच्या स्वभावातही बदल झाला असावा. तिचा व्यवसाय उत्तम चालला होता. तिने चॅन्सेलरी लेनमध्ये एक ऑफिस घेतलं होतं. टायपिंगचं काम स्वत: करण्याऐवजी तिने चार मुलींना नेमलं होतं. त्याच्या दुरूस्ती करण्यात तिचा बराच वेळ जात असे. नीटनेटकेपणा तिच्या अंगातच होता. निळया आणि लाल शाईचा वापर करून ती चुका दुरूस्त करून घ्यायची. अंतिम मसुदा ती चांगल्या कागदावर टाईप करून बाईंडिंग करून देत असे. नीटनेटकेपणा आणि अचूकपणासाठी तिचं नाव झालं होतं. तिला पैसासुद्धा बऱ्यापैकी मिळत असावा. जगण्यासाठी काम करून पैसे कमावावे लागणं हे प्रतिष्ठितपणाचं लक्षण नाही असं, का कोण जाणे तिला अजूनही वाटत असे. आपण उच्चकुलीन आहोत हे तिला अप्रत्यक्षरित्या सुचवायचं असावं. आपला

सामाजिक दर्जा अजूनही घसरलेला नाही हे दाखवण्यासाठी ती आपल्या बोलण्यात अधून मधून मोठ्या प्रतिष्ठीत लोकांची नावं मोठ्या खुबीने पेरत असे. स्वत:च्या पायावर उभं रहाण्यातील धडाडी आणि व्यावसायिक कौशल्य या गुणांचा कोणालाही अभिमान वाटला असता पण तिला मात्र या गुणांची लाजच वाटत असावी असं तिच्या बोलण्यातून नकळत ध्वनीत होई. त्यापेक्षा साऊथ केनींग्स्टनमध्ये राहाणाऱ्या के.सी. कडे आज रात्री आपल्याला जेवायला जायचं आहे याचा तिला जास्त आनंद वाटत असे. आपला मुलगा केंब्रिजला शिकत आहे हे सांगताना ती खूष होई. आपल्या मुलीला नृत्याचं आमंत्रण द्यायला मुलांची रांग लागते हे सांगताना ती लाजेने किंचीत चूर होई. मी तिला मूर्खासारखं विचारलं:

“तुमची मुलगी तुमच्या व्यवसायात येणार आहे का?”

“मुळीच नाही. तिला हवं असलं तरी मी तिला ते करू देणार नाही.” मिसेस स्ट्रिकलँडने उत्तर दिलं. “ती एवढी सुंदर आहे की तिला चांगल्या गर्भश्रीमंत घरातला नवरा मिळण्यात मुळीच अडचण येणार नाही.”

“मला वाटलं तुम्ही एकट्याने एवढी दगदग करता. तिची तुम्हाला मदत होईल.”

“ती सुंदर आणि आकर्षक असल्यामुळे तिने नाटकात काम करावं असं बऱ्याच लोकांनी तिला सुचवलं. पण मी मात्र त्याला कधीच मान्यता देणार नाही. बहुतेक मोठे नाटककार माझ्या चांगले परीचयाचे आहेत. तिला एखादी भूमिका करायची असेल तर उद्याही मिळू शकेल. अगदी प्रमुख भूमिकासुद्धा. पण त्या तसल्या लोकांत मी तिला मिसळू देणार नाही.”

तिच्या मोठेपणाच्या कल्पनेने माझ्या अंगावर काटा आला.

“तुमच्या पतीराजांची काही खबरबात?”

“त्यानंतर मला एक शब्दसुद्धा कळलेला नाही. कोणास ठाऊक त्यांचं कसं चाललंय. काही बरंवाईट झालं असलं तरी मला कळायला काही मार्ग आहे का?”

“मी आता पॅरीसला रहायला जातोय. त्यांच्याशी कधी गाठ पडलीच तर मी तुमच्याबद्दल त्यांना काय सांगू.”

तिने मिनीटभर विचार केला.

“त्यांना जर खरंच काही हवं असेल तर मी मदत करायला तयार आहे. मी तुम्हाला पैसे पाठवीन. त्यातले त्यांना लागतील तसे थोडे थोडे द्या.”

“असं केलंत तर तुमची त्यांच्यावर मोठी मेहरबानी होईल.”

नवऱ्याविषयी वाटणाऱ्या अनुकंपेने तिने हे पैसे देऊ केले नव्हते हे मला माहित होतं. आयुष्यात भोगलेल्या दु:खामुळे माणसाच्या स्वभावात उमदेपणा येतो हे काही तितकंसं खरं नसतं. कदाचित सौख्यामुळे एक वेळ उमदेपणा येऊ शकेल, पण दु:खामुळे बहुतेक वेळा माणसातील क्षुद्र वृत्ती आणि खुनशीपणा वाढीला लागतो.

# १८

पॅरीसमध्ये रहायला गेल्यावर पहिल्याच आठवड्यात स्ट्रिकलँड आणि माझी भेट झाली.

रू द डॅम मधील एका इमारतीच्या पाचव्या मजल्यावरचे एक छोटेसे अपार्टमेंट मला मिळाले होते. जुन्या फर्नीचरच्या दुकानातून शंभर एक फ्रँकला आवश्यक ते फर्नीचर घेऊन घर सजवले. कन्सर्जला सांगून मी घराची साफसफाई आणि सकाळच्या कॉफीची व्यवस्था करून घेतली. तेथून मी सरळ डर्क स्ट्रोव्ह या माझ्या जुन्या मित्राला भेटायला गेलो.

डर्क स्ट्रोव्ह डच होता. त्याला पाहून एक तर हसू तरी फुटतं किंवा ही वल्ली इथे कुठे उपटली असं वाटून त्याची अडचण तरी वाटायला लागते. देवाने त्याला विदुषकाचं रूप देऊन पाठवलं होतं. तो चित्रकार होता पण अगदी टुकार. आमची पहिली भेट रोममध्ये झाली होती. त्यावेळी तो काढायचा ती चित्र मला अजूनही आठवतायत. जगातल्या सगळया फालतू गोष्टीत त्याला अमाप उत्साह असायचा. त्याचं कलाप्रेम अशावेळी उतू जायचं. बर्नीनी आणि पिआझ्झा दी स्पाग्ना येथील मूळ चित्रांच्या भव्यतेने, अतुलनीय सौंदर्याने बिलकूल दबून न जाता, त्या चित्रकारांचं सामर्थ्य आपली कुवत काय यांचा कसलाही विचार न करता तो बिनदिक्कत त्यांच्या नकला करायला घ्यायचा. त्याच्या स्टुडियोमध्ये त्याने रंगवलेले कॅनव्हास टांगलेले होते. मोठ्या डोळयांचे, मोठ्या हॅट घातलेले मुच्छड शेतकरी, फाटके कपडे घातलेली केविलवाणी दिसणारी गरीब अनाथ मुलं, चर्चच्या पायर्यांवर बसलेल्या किंवा सायप्रसच्या झाडांमागे लपलेल्या रंगीबेरंगी पेटीकोट घातलेल्या स्त्रिया. रेखाटन अचूक, रंगसंगती हुबेहुब. फोटोग्राफ आणि पेंटींग यातील फरक कळणार नाही, बटबटीत वाटावं इतकं काटेकोर. व्हिला मेडिसी मधील इतर चित्रकारांनी त्याला *‘ल मैत्र द ला बोएत अ शकुला’* मास्टर ऑफ चॉकलेट बॉक्स असं नाव ठेवलं होतं. त्याची चित्रं पाहिल्यावर क्लॉड मॉने, एदुआर मॅने वगैरे इंप्रेशनीस्ट चित्रकार होऊन गेले आहेत की नाही याची शंका यावी.

“मी फार मोठा चित्रकार आहे असा उगाच आव आणत नाही.” तो म्हणायचा. “मी काही मायकेल अँजेलो नाही म्हणून माझ्यात काही नाही असं नाही. माझ्यात काही तरी आहे म्हणून लोक माझी चित्रं विकत घेतात. त्यांना त्याच्यापासून आनंद मिळतो. माझ्या ग्राहकात सगळया प्रकारचे लोक आहेत. फक्त माझ्या देशात हॉलंडमध्येच आहेत असं नाही तर नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क सगळया देशात आहेत. माझ्या गिर्हाइकांत व्यापारी वर्ग जास्त आहे. या देशात हिवाळयात थंडी किती कडक असते आणि दिवसा किती अंधारलेलं असतं ते तुम्हाला सांगायला नको. माझ्या चित्रात मी इथला इटलीतला निसर्ग रंगवतो. हा निसर्ग त्यांना आवडतो कारण त्यांच्या देशात त्यांना तो सहसा बघायला मिळत नाही, तो ते माझ्या पेंटींगमधून बघत असतात.”

डर्क स्ट्रोव्ह आपल्या भूमिकेला शेवटपर्यंत तसाच चिकटून राहिला. आजूबाजूच्या क्रूर वास्तवाकडे त्याने कधीच लक्ष दिलं नाही. त्याच्या लेखी इटली म्हणजे स्वप्नील प्रेमकथा आणि ऐतिहासिक अवशेषांचा देश होता. आपल्या चित्रांतून त्याने आदर्शवत वाटतील असेच विषय हाताळले. तो एक गरीब बिचारा विक्रीसाठी म्हणून चित्र काढणारा, सामान्य कुवतीचा चित्रकार होता. कसंही असलं तरी ते त्याचं प्रामाणिक ध्येय होतं. त्याच्या निष्पाप, प्रेमळ आणि गंमतीदार स्वभावामुळे तो हवा हवासा वाटत असे.

इतरांच्या दृष्टीने डर्क स्ट्रोव्ह हा उपहास आणि टिंगल टवाळीचा विषय होता. पण मला तसं वाटत नसे. त्याचे सहकारी त्याच्या चित्रांची टिंगल करत. पण त्याची चित्रं कशी का असेनात त्यांचे त्याला बऱ्यापेकी पैसे मिळत. त्याची टिंगल करणारे हे मित्र त्याच्या पैशांवर चैन करायला मात्र बिनदिक्कत पुढे येत. तो उदार स्वभावाचा होता. त्याला निर्लज्जपणे हसणारे त्याचे मित्र त्याच्याकडे पैसे मागताना मात्र अतिशय उद्धटपणाने वागत. तो खूप भावनाप्रधान होता. तो कोणतीही गोष्ट चटकन मनाला लाऊन घेई. पण त्याच्या स्वभावात असं काही तरी विचित्र होतं की त्याच्याकडून फायदा झाला तरी त्याची जाणीव ठेवावी असं कोणाला वाटत नसे.

त्याच्याकडून पैसे उकळणं हे एखाद्या लहान मुलाकडून पैसे चोरण्याइतकं सोपं होतं. पण त्याच्या मूर्खपणाचा राग येई. एखादी श्रीमंत बाई आपली दागदागिन्यांनी भरलेली व्हॅनिटी बॅग कॅबमध्ये विसरून गेलेली पाहून जसा आपल्या कलेचा अभिमान असणाऱ्या अट्टल चोराला जसा राग येईल तसं त्याला लुटणाऱ्या मित्रांना त्याच्याकडे पैसे मागताना वाटत असे. देवाने त्याला बुद्धी दिली नव्हती पण त्याला संवेदनाशीलता द्यायला मात्र तो विसरला नव्हता. मित्रांच्या चेष्टा मस्करीमुळे त्याला मानसिक व शारीरिक दृष्ट्या खूप त्रास होई. त्याचे मित्र त्याला छळण्यासाठी नाना युक्त्या-प्रयुक्त्या रचत. आणि हे सारखं चालू असे. यात त्याची नेहमी फजिती उडून त्याचा अपमान होई. तरीही त्याची चेष्टा करणाऱ्यांवर त्याने कधीही डूख धरला नाही. हा त्याचा अति चांगुलपणा. साप चावला तरी त्या अनुभवाने तो कधी शहाणा झाला नाही. उलट बरं वाटल्यावर त्याने त्या सापाला उचलून मांडीवर घेतलं असेल. पोट दुखेपर्यंत हसवणाऱ्या फार्सिकल नाटकासारखं त्याचं आयुष्य म्हणजे एक शोकांतिका होती. मी मात्र त्याला कधी हसायचो नाही. त्याबद्दल तो माझा आभारी असायचा. मी त्याच्या गोष्टी सहानुभूतीने ऐकायचो. त्यामुळे त्याला कोणी कसा त्रास दिला याच्या साद्यंत कथा तो मला ऐकवायचा. त्या एवढ्या विचित्र असायच्या की त्याची कींव यायची. पण जेवढी कींव जास्त तेवढं हसूही जास्त यायचं.

तो चित्रकार म्हणून कितीही सामान्य असला तरी त्याची कलेची अभिरूची मात्र अतिशय उच्च दर्जाची होती. त्याच्या बरोबर आर्ट गॅलेरींना भेट देणं हा एक संपन्न अनुभव असे. प्रदर्शनाला जाताना त्याचा उत्साह उतू जायचा. त्याची चित्रांची पारख अचूक असे. तो धर्माने कॅथॉलिक होता. ओल्ड मास्टर्सचं महत्व तो जाणून होता आणि आधुनिक कलेबद्दल त्याला सहानुभूती होती. तो चांगला गुणग्राहक होता. एखाद्या कलाकृतीत जर काही स्फुल्लिंग असेल तर त्याला ते ताबडतोब ओळखता येई. तो स्तुती करताना हात आखडता घेत नसे. एवढी अचूक पारख असलेला दुसरा कोणी मला आजतागायत भेटलेला नाही. इतर चित्रकारांच्या तुलनेत तो जास्त सुशिक्षित होता. बहुतेक कलाकारांना आपली कलाशाखा सोडली

तर इतर कलाशाखांमधलं काहीही माहित नसतं. त्याचं तसं नव्हतं. साहित्य आणि संगीतातील रूचीमुळे त्याच्या चित्रकलेच्या आकलनात एक वेगळीच खोली होती. माझ्यासारख्या नवशिक्या तरूणाला तर त्याचा सल्ला आणि मार्गदर्शन अतिशय मोलाचं होतं.

मी रोम सोडल्यानंतरही त्याच्या संपर्कात होतो. दोन एक महिन्यातून त्याचं मोडक्या-तोडक्या इंग्लीशमधून लिहीलेलं लांबलचक पत्र मला येई. त्याचं पत्र वाचताना उत्साहाने फसफसत, हातवारे करत बोलणारी त्याची छबी नजरेसमोर यायची. मी पॅरीसमध्ये यायच्या अगोदर त्याचं लग्न झालं होतं. त्याने मोंमार्त्रमध्ये स्टुडियो थाटला होता. मी गेल्या चार वर्षात त्याला भेटलो नव्हतो. त्याच्या बायकोला मी यापूर्वी कधी पाहिले नव्हते.

# १९

मी पॅरीसला आल्याचं स्ट्रोव्हला कळवलं नव्हतं. त्याच्या स्टुडियोच्या दारावरची घंटा वाजवली तेव्हा दार उघडायला स्वत: डर्क स्ट्रोव्ह आला. एक क्षणभर त्याने मला ओळखलंच नाही. नंतर तो आनंदाश्चर्याने ओरडला आणि मला आत घेतलं. एवढ्या उत्साहात स्वागत झाल्याने मी थोडा खूश झालो. त्याची बायको शेगडीजवळ बसून पायमोज्याला रफू करत होती. मला बघून ती झटकन उठून उभी राहिली. त्याने तिची ओळख करून दिली.

“तुला आठवतं ना? मी ज्याच्याबद्दल नेहमी बोलायचो तो हा माझा मित्र.” नंतर माझ्याकडे वळून म्हणाला: “तू येणार आहेस ते मला का नाही कळवलंस.? इथे येऊन किती दिवस झाले? किती दिवस रहाणार आहेस? एक तासभर आधी आला असतास तर बरोबरच जेवलो असतो.”

त्याने माझ्यावर प्रश्नांचा भडिमार केला. त्याने मला खुर्चीवर बसवलं. मी टेकायचा तक्क्या असल्यासारखा माझ्या पाठीवर थपडा मारल्या. माझ्या पुढ्यात केक, सिगार आणि वाईन ठेवली. तो मला काही बोलूच देत नव्हता. त्याच्याकडे व्हिस्की नसल्याचं त्याला वाईट वाटत होतं. त्याला माझ्यासाठी कॉफी बनवायची होती. आणखी काय काय करता येईल या विचाराने त्याने डोकं खाजवलं. आनंदातिशयाने त्याचा चेहेरा खुलला आणि तो हसायला लागला. उत्साहाच्या भरात माझा पाहूणचार करण्यात त्याची एवढी तारांबळ झाली की त्याच्या रंध्रा रंध्रातून घामाच्या धारा वाहू लागल्या.

“तू जरा सुद्धा बदललेला नाहीस.” मी हसत हसत म्हणालो.

त्याचा एकूण अवतार पूर्वीसारखाच दिसत होता. तो जाडा आणि ठेंगू होता. तरूण होता. तिशीच्या आतला. पण अकाली टक्कल पडलेलं होतं. गोल चेहेरा, गोरापान रंग, गोबरे गाल आणि लालचुटूक ओठ. निळे टपोरे डोळे त्यावर सोनेरी काड्यांचा चष्मा. त्याच्या भुवया एवढ्या बारीक होत्या की त्या जवळ जवळ

दिसतच नसत. त्याला बघून रूबेन्सच्या पोर्ट्रेट मधल्या जाड्या, गोलमटोल डच बनियांची आठवण व्हायची.

मी जेव्हा त्याला सांगितलं की माझा पॅरीसमध्ये थोड्या काळासाठी स्थयिक होण्याचा विचार आहे आणि त्यासाठी मी एक अपार्टमेंट भाड्याने घेतलं आहे तेव्हा मी त्याला माझा बेत अगोदरच का सांगितला नाही म्हणून तो माझ्यावर रागावला. त्याने मला याहून चांगलं घर बघून दिलं असतं, त्याचं फर्नीचर मला वापरायला दिलं असतं, मी फर्नीचर विकत घेण्याची गरज नव्हती, त्याने मला घर लावायला मदत केली असती वगैरे वगैरे. मी त्याला मला मदत करण्याची संधी दिली नाही हे काही खऱ्या मित्रत्वाचे लक्षण नव्हे म्हणून तो माझ्यावर लटकेच रागावला. इतका सगळा वेळ मिसेस स्ट्रोव्ह तिचं शिवण-टिपण करत बसली होती. त्याचं बोलणं ऐकताना ती गालातल्या गालात हसत होती.

“माझं लग्न झालंय पाहिलंस का. माझी बायको कशी आहे?”

तो तिच्याकडे पाहून हसला. त्याने चष्मा सावरून नीट नाकावर ठेवला. घामामुळे तो सारखा नाकाखाली घसरत होता.

“मी काय सांगणार तुझी बायको कशी आहे ती?” मी हसत हसत म्हणालो.

“डर्क. काही तरीच काय.” मिसेस स्ट्रोव्ह किंचीत लाजत हसली.

“आहे की नाही माझी बायको छान. माझ्या मित्रा माझं ऐक. वेळ फुकट घालवू नकोस. शक्य तितक्या लवकर लग्न करून घे. मी जगातील सर्वात सुखी मनुष्य असेन. ती तिथे कशी बसलीय बघ. एक छान पैकी चित्र काढता येईल. शेदाँ? मी जगातील सगळया सुंदर स्त्रियांना पाहिलं आहे. पण मादाम डर्क स्ट्रोव्हहून जास्त सुंदर एकही नाही.”

“तुम्ही जर गप्प बसला नाहीत तर मी निघून जाईन हं.”

*“मों पेतीत शॉ.”* माझी छकुली ती ... तो म्हणाला.

ती थोडीशी लाजली. त्याच्या आवाजातील आर्जवाने तिला अवघडल्यासारखं झालं होतं. त्याच्या पत्रातून तो त्याच्या बायकोच्या अतिशय प्रेमात आहे हे मला कळलं होतं. त्याची तिच्यावरची नजर हटत नव्हती. तिचं त्याच्यावर प्रेम होतं की नाही ते तिच्या नजरेत दिसत नव्हतं. या बिचाऱ्या पात्राच्या कोणी प्रेमात पडणं तसं कठीणच होतं. तिच्या हसऱ्या डोळयांवरून तरी ती प्रेमळ असावी असं वाटत होतं. पण ती अबोल असावी असं वाटत होतं. तिच्या अबोलपणाच्या आत खोल कुठेतरी तिच्या खऱ्या भावना लपल्या असण्याची शक्यता होती. तो तिच्या प्रेमात आकंठ बुडाला होता. त्यामुळे त्याला ती अति सुंदर दिसत होती. पण त्याला वाटत होतं तेवढं तिचं सौंदर्य उन्मादक वगैरे काही म्हणता आलं नसतं. ती उंच होती. तिचा करड्या रंगाचा ड्रेस साधा असला तरी अंगासरशी बेतलेला असल्यामुळे तिचं सौष्ठव उठून दिसत होतं. तिची देहयष्टी शिंप्यापेक्षा शिल्पकाराला जास्त आवडली असती. नुकतेच विंचरून मोकळे सोडलेले गडद तपकीरी रंगाचे दाट केस, नितळ कांती, शांत करडे डोळे. ती नाकी डोळी नीटस असली तरी तिच्यात खास असं काही नव्हतं. रूढार्थाने तिला सुंदर खचितच म्हणता आलं नसतं. ती सुरेखही नव्हती. पण स्ट्रोव्हने शेदाँचा जो उल्लेख केला होता तो विनाकारण केला नसावा. तिच्यावरून मला शेदाँने एप्रन आणि हॅट घातलेल्या ज्या साध्या-सुध्या गृहीणींना आपल्या पेंटींगमधून अमर केलं आहे त्याची आठवण झाली. स्वयंपाक, भांडीकुंडी, कपडे धुणं, केर-वारा अशा दिवसभराच्या घरकामात ती ज्या गंभीरपणाने मग्न असायची त्यामुळे त्या घरकामाला एक नैतिक अधिष्ठान प्राप्त झालं होतं. ती बुद्धीमान किंवा बहुश्रुत असावी असं दिसत नव्हतं. ती अबोल आणि गंभीर होती. त्याच्यामागे काही तरी रहस्य दडलेलं असावं असं मला सतत वाटत होतं. तिने डर्क स्ट्रोव्हशी लग्न केलं याचं मला राहून राहून आश्चर्य वाटलं. ती मूळची इंग्लीश होती. पण तिच्याकडे पाहून ती नक्की कोणत्या सामाजिक स्तरातून आली असावी ते सांगता येत नव्हतं. तिची कौटुंबिक पार्श्वभूमी, लग्नाआधी ती काय करत होती वगैरे गोष्टी मी मुद्दाम होऊन चौकशी केल्याशिवाय मला ठाऊक होणं शक्य नव्हतं. ती अगदी कमी बोलत

होती. पण जेव्हा ती बोलत होती तेव्हा ती अगदी मंजूळ आवाजात बोलत होती. तिच्या बोलण्यात एक उपजत निरागसता होती.

मी स्ट्रोव्हला तो काय काम करतो ते विचारलं.

“नोकरी? छ्या. मी फक्त पेंटींग करतो. पूर्वी कधी केली नव्हती एवढ्या पेंटींगचं काम सध्या माझ्या हातात आहे.”

आम्ही त्याच्या स्टुडियोत बसलो होतो. त्याने इझलवर लावलेल्या एका पेंटींगकडे निर्देश करून मला ते बघायला सांगितलं. मी ते बारकाईने पाहू लागलो. त्यात रोमन चर्चच्या पायऱ्यांवर बसलेल्या इटालियन शेतकऱ्यांचं चित्रण केलं होतं. इटलीच्या कम्पाना प्रांतात ऐतिहासिक काळी जशी वेशभूषा प्रचलित होती तसे कपडे त्या शेतकऱ्यांनी घातलेले दाखवले होते.

“तू सध्या याच्यावर काम करत आहेस?”

“रोमसारखी मॉडेल काय इथेही मिळतात. फक्त तशी वेशभूषा केली की झालं.”

“हे पेंटींग फारच छान जमलंय.” मिसेस स्ट्रोव्ह म्हणाली.

“माझ्या या अडाणी बायकोला वाटतं की मी एक मोठा चित्रकार आहे.”

तो ओशाळून हसला. तरीही त्याच्या हसण्यातून त्याला झालेला आनंद लपत नव्हता. त्याची नजर इझलवर लावलेल्या कॅनव्हासवर रेंगाळली. जो स्वत: इतका जाणकार होता, दुसऱ्यांच्या कामाबद्दल त्याचे मत सहसा चुकत नसे, अशा माणसाला स्वत:चं काम किती फालतू आणि टुकार दर्जाचे आहे ते कळू नये हे आश्चर्यकारक होतं.

“तुमची बाकीची पेंटींग दाखवा ना.” ती म्हणाली.

“दाखवू?”

त्याचे मित्र त्याची एवढी टिंगल करत तरीही त्याच्या पेंटींगची कोणी तारीफ केली तर ती ऐकायला तो उत्सुक असे. म्हणून तो आपली पेंटींग पाहुण्यांना दाखवण्याचा कधी आळस करत नसे. त्याने गोट्या खेळणाऱ्या, कुरळया केसांच्या, दोन लहान मुलांचं पेंटींग आणलं.

“किती गोड मुलं आहेत ना?”

नंतर त्याने मला आणखी पेंटींग दाखवली. पॅरीसमध्ये आल्यावरसुद्धा तो रोममध्ये वर्षानुवर्ष काढायचा तशीच जुन्या कालबाह्य शैलीतील, बेगडी, बटबटीत, कलाबूत लावल्यासारखी कलाकुसर असलेली पेंटींग काढायचं त्याने थांबवलं नव्हतं हे माझ्या लक्षात आलं. आजूबाजूच्या वास्तवाकडे डोळेझाक करून विकली जातात म्हणून फक्त रंजनप्रधान, कल्पनारम्य चित्र रंगवत बसणं हा तद्दन खोटेपणा होता. ही सगळी कलाकुसर वरवरची होती. पण तरीही डर्क स्ट्रोव्ह एवढा सज्जन आणि प्रामाणिक माणूस शोधून सापडला नसता. यातील विरोधाभासाचा उलगडा कसा करणार.

हे विचारावं असं मला कसं सुचलं ते सांगता येत नाही.

“चार्ल्स स्ट्रिकलँड नावाच्या चित्रकाराशी तुझी कधी गाठ पडली आहे का?”

“तो तुझ्या ओळखीचा आहे?” स्ट्रोव्ह ओरडला.

“तो एखाद्या हलकट जनावरासारखा आहे.” त्याची बायको म्हणाली.

स्ट्रोव्ह हसला.

*“मा पुव्हं शेरी.”* माय पुअर डार्लिंग. तो तिच्या जवळ गेला आणि त्याने तिच्या हाताचं चुंबन घेतलं. “तिला तो आवडत नाही. तू स्ट्रिकलँडला ओळखतोस. किती विचित्र योगायोग आहे हा.”

“मला असंस्कृत माणसं आवडत नाहीत.” मिसेस स्ट्रोव्ह म्हणाली.

डर्क हसत हसत माझ्याकडे वळला आणि त्याने खुलासा केला.

“त्याचं असं झालं. मी एके दिवशी त्याला माझी पेंटींग बघायला बोलावलं. तो आल्यावर त्याला मी माझ्याकडची सगळी पेंटींग दाखवली.” स्ट्रोव्ह क्षणभर घुटमळला. स्वत:च्या फजितीची गोष्ट त्याने मला सांगायला सुरवातच का केली ते मला कळलं नाही. एकदा सांगायला सुरवात केलेली गोष्ट पुढे सांगताना त्याला अवघडल्यासारखं झालं. “त्याने एक एक करून माझी सगळी पेंटींग पाहिली... त्याने एक शब्दही तोंडातून काढला नाही. मला वाटलं त्याने त्याचं मत सगळी पेंटींग बघून झाल्यावर शेवटी सांगण्यासाठी म्हणून राखून ठेवलं असावं. शेवटी मी म्हणालो ही एवढीच पेंटींग आहेत. त्यावर शांतपणे तो म्हणाला मी तुझ्याकडे वीस फ्रँक उधार मागायला आलो होतो.”

“आणि यांनी खरंच त्याला पैसे काढून दिले.” त्याची बायको संतापाने म्हणाली.

“मी एकदम उडालोच. मला नाही म्हणवेना. त्याने मी दिलेले पैसे खिशात घातले, मान डोलावली आणि आभार मानून सरळ निघून गेला.”

ही गोष्ट सांगणाऱ्या डर्क स्ट्रोव्हचा कोरा करकरीत, अचंबित, मूढ चेहेरा बघून हसू आवरणं कठीण होतं.

“त्याने माझ्या पेंटींगना भिकार आहेत असं म्हटलं असतं तरी मला त्याचं काही वाटलं नसतं. पण तो काहीच म्हणाला नाही. त्याने त्याचं कोणतेच मत व्यक्त केलं नाही. एका शब्दानेही.”

“आणि तरी तुम्ही ही गोष्ट सांगत बसला आहात.” त्याची बायको म्हणाली.

स्ट्रिकलँड स्ट्रोव्हशी ज्या अपमानास्पद रीतीने वागला त्याची चीड येण्याऐवजी स्ट्रोव्हच्या फजितीचं हसू मला अधिक येत होतं हे अधिक शोचनीय होतं.

“त्या माणसाचं तोंडसुद्धा मी पुन्हा बघणार नाही.”

स्ट्रोव्ह मान डोलवत हसला. त्याची विनोदबुद्धी परत आली होती.

“पण तो एक मोठा चित्रकार आहे. फार मोठा आहे हे सत्य काही बदलणार नाही.”

“स्ट्रिकलँड?” मी ओरडलो. “मी जो स्ट्रिकलँड म्हणतोय तो हा असणं शक्यच नाही.”

“तांबूस दाढी. थोडा आडव्या अंगाचा. इंग्लीशमन.”

“मी जेव्हा पाच वर्षांपूर्वी त्याला पाहिलं होतं तेव्हा त्याला दाढी नव्हती. पण त्याने दाढी राखली तर ती तांबूस रंगाची असू शकेल. मी ज्याच्या विषयी तुला विचारत होतो तो पेंटींग करायला लागलेल्याला फार तर पाच एक वर्ष झाली असतील.”

“तोच तो. फार मोठा चित्रकार आहे तो.”

“अशक्य.”

“माझी पारख कधी चुकली आहे का?” डर्कने मला विचारलं. “तो एक विलक्षण प्रतिभेचा चित्रकार आहे. माझी खात्री आहे. आजपासून शंभर वर्षांनी आपल्या दोघांच नाव घेतलं गेलंच तर ते आपण चार्ल्स स्ट्रिकलँडला ओळखत होतो म्हणून घेतलं जाईल.”

मी थक्क झालो. त्याच वेळी मी उत्तेजितही झालो होतो. मला त्याच्याबरोबरचं माझं बोलणं आठवलं.

“त्याचं काम आपल्याला बघायला मिळेल का?” मी विचारलं. “त्याला काही यश मिळालं, त्याचं नाव झालं का? तो कुठे रहातो?”

“यश म्हणशील तर त्याला अजून ते मिळालेलं नाही. त्याचं एकही पेंटींग अजून विकलं गेलं नसावं. त्याच्याबद्दल कोणाशी बोललं तर लोक हसतात. पण तो फार मोठा कलाकार आहे याची मला खात्री आहे. हेच लोक एकेकाळी मॅनेलासुद्धा हसायचे. कोरॉचं तर शेवटपर्यंत एकही पेंटींग विकलं गेलं नव्हतं. तो कुठे रहातो ते मला माहित नाही. पण त्याला भेटायचं असेल तर ते आपल्याला शक्य आहे. संध्याकाळी सातच्या सुमारास तो ऍव्हेन्यु द क्लिशीवरच्या एका कॅफेमध्ये असतो. जर तुला वेळ असेल तर आपण उद्या जाऊ.”

“मला भेटायला त्याला आवडेल की नाही ते सांगता येत नाही. तो एक गोष्ट विसरण्याचा प्रयत्न करत आहे. त्याची आठवण त्याला करून द्यायचा माझा विचार आहे. ते काहीही असो. मी येईन. त्याची पेंटींग बघायला मिळण्याची काही शक्यता आहे का?”

“त्याच्याकडची पेंटींग बघायला मिळण्याची शक्यता विचारशील तर बहुधा नाहीच. पण माझ्या माहितीचा एक छोटा चित्रविक्रेता आहे. त्याच्याकडे त्याची दोन तीन पेंटींग बघायला मिळतील. पण तू माझ्याशिवाय एकटा जाऊ नकोस. तुला कळणार नाहीत. मी स्वत: तुला दाखवीन.”

“डर्क. तुम्ही माझ्या सहनशक्तीचा अंत बघत आहात.” मिसेस स्ट्रोव्ह म्हणाली. “ज्याने तुमचा एवढा अपमान केला त्याच्या पेंटींगची एवढी तोंड फाटेस्तोवर स्तुती तुम्ही करताच कशी?” ती माझ्याकडे वळून म्हणाली. “तुम्हाला माहित आहे? काही डच माणसं आमच्याकडे यांची पेंटींग घ्यायला आली होती. तेव्हा यांनी त्यांना स्ट्रिकलँडची पेंटींग घ्यायचा आग्रह केला. ते त्याची पेंटींग दाखवायला स्वत: होऊन त्यांना घेऊन गेले होते.”

“त्याची पेंटींग तुम्हाला कशी वाटतात?” मी हसत हसत विचारलं.

“भयंकर.”

“लाडके. तुला त्यातलं काही कळत नाही.”

“तरी एक बरं झालं. तुमची ती डच माणसंच भडकली. त्यांना वाटलं तुम्ही त्यांची मस्करी करत आहात.”

डर्क स्ट्रोव्हने त्याचा चष्मा काढून पुसला. त्याच्या चेहेऱ्यावरून उत्साह उतू जात होता.

“सौंदर्य ही जगातील एक अमूल्य गोष्ट आहे. ती वाटेत जाता येता सहज मिळेल अशी रस्त्यावर पडलेली सापडेल असं लोकांना का वाटतं? कलाकार त्याच्या आजूबाजूला पडलेल्या पसाऱ्यातून सौंदर्याची निर्मिती मोठ्या जाणीवपूर्वक करत असतो. त्याच्यासाठी त्याला खूप कष्ट पडतात. त्याच्या हातून जी निर्मिती होते त्याचं आकलन करणं हे येरा गबाळयाचं काम नसतं. कलेची समज येण्यासाठी कलाकार ज्या निर्मिती प्रक्रियेतून गेला असेल त्या प्रक्रियेतून रसिकाला तावूनसुलाखून जावं लागतं. कलाकाराने संगीताची एक सुरावट तुमच्यासमोर सादर केलेली असते. तुमच्यापाशी जर तरल कल्पनाशक्ति आणि संवेदनशीलता नसेल तर ती ऐकू येणं कठीण आहे.”

“तुमची पेंटींग मला कां आवडतात? अगदी पहिल्याप्रथम पाहिली तेव्हापासून मला ती आवडत आहेत.” मिसेस स्ट्रोव्ह म्हणाली.

“लाडके, तू आता झोपायला जा. मी याला जरा सोडून येतो.”



Artist: Jean-Baptiste Chadrin

Title: Maid, Date: circa 1791, Medium: oil on canvas, Source: Wikipadia

## २०

स्ट्रिकलँड ज्या कॅफेत जायचा त्या कॅफेत दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मला घेऊन जायला डर्क स्ट्रोव्ह तयार झाला. मी पॅरीसमध्ये पाच वर्षांपूर्वी स्ट्रिकलँडबरोबर ज्या कॅफेत ऍबसिंथ पित बसलो होतो तेच हे कॅफे आहे का हे जाणून घेण्यात मला रस होता. तो अजून त्याच कॅफेत जात असेल तर याचा अर्थ तो आळशी आहे, त्याला कोणताही बदल नको असतो किंवा त्याचा स्वभावच तसा असेल.

“तो बघ. तिथे बसला आहे.” आम्ही कॅफेत पोचताच स्ट्रोव्ह म्हणाला.

ऑक्टोबर महिना असला तरी हवा अजून गरम होती. फुटपाथवरच्या टेबलांवर गर्दी होती. मी इकडे तिकडे नजर फिरवली. पण स्ट्रिकलँड मला दिसला नाही.

“तो बघ. त्या कोपऱ्यात बुद्धीबळाचा डाव मांडून बसला आहे.”

एक माणूस टेबलावर बुद्धीबळाचा पट मांडून त्यावर झुकून बसला होता. भली मोठी फेल्ट हॅट आणि तांबूस दाढी सोडून मला काही दिसत नव्हतं. टेबलांच्या गर्दीतून वाट काढत आम्ही त्याच्या जवळ गेलो.

“स्ट्रिकलँड.”

त्याने मान वर करून पाहिलं.

“ए जाड्या. काय पाहिजे तुला?”

“मी तुझ्या जुन्या मित्राला घेऊन आलो आहे. तुला भेटायला.”

स्ट्रिकलँडने माझ्याकडे एक दृष्टीक्षेप टाकला. त्याने मला ओळखलं नसावं. त्याने परत बुद्धीबळाच्या पटाकडे नजर वळवली.

“बस इथे. पण आवाज करू नकोस.”

त्याने पटावर एक चाल केली आणि तो खेळात गढून गेला. बिचारा स्ट्रोव्ह कावरा बावरा होऊन माझ्याकडे बघू लागला. माझा तोल ढळू न देता मी बसलो. ड्रिंक मागवलं आणि स्ट्रिकलँडचा डाव संपेपर्यंत शांतपणे बसून राहिलो. त्याचं निरीक्षण करण्याची संधी आयतीच चालून आली होती आणि ती मला दवडायची नव्हती. त्याला एरवी पाहिला असता तर मी ओळखलंच नसतं. एकतर त्याच्या अस्ताव्यस्त वाढलेल्या दाढीने त्याचा अर्धाअधिक चेहेरा झाकलेला होता. त्याचे केसही खूप लांब वाढले होते. पण सगळयात धक्कादायक गोष्ट म्हणजे तो अगदी बारीक झाला होता. त्यामुळे त्याचे ते आढ्यताखोर लांब नाक जास्तच उठून दिसत होतं. त्याची गालफडं वर आली होती. त्याच्या अवघ्या शरीरावर प्रेतवत अवकळा आली होती. मी पाच वर्षांपूर्वी त्याला भेटलो होतो तेव्हा जो सूट तो वापरत होता तोच सूट त्याने आजही घातला होता. इतक्या वर्षांच्या वापराने फाटलेला, डागाळलेला, विरलेला सूट त्याच्या हडकुळया शरीरावर टांगल्यासारखा वाटत होता. अस्वच्छ हात, वाढलेली नखं, लांब-रूंद हाडांची मोळी बांधल्यासारखा देह. एके काळी तो धिप्पाड शरीराचा इसम होता हे त्याच्या या अवस्थेत ओळखू येणं कठीण होतं. पण तो सगळं लक्ष खेळावर केंद्रीत करून ज्या पद्धतीने बसला होता त्यामुळे तो एखाद्या मजबूत माणसासारखा वाटत होता. त्यामुळे तो रोडावला आहे हे पटकन माझ्या लक्षात आलं नाही.

आपली चाल केल्यानंतर तो खुर्चीला पाठ टेकून ताठ बसला आणि त्याने आपल्या समोर बसलेल्या प्रतिस्पर्ध्याकडे टक लावून पाहिलं. तो एक जाडा, दाढी-दिक्षित, फ्रेंच माणूस होता. त्याने समोरच्या पटाचं थोडा वेळ निरीक्षण केलं आणि अस्फुट हसला. पटावरील सगळे मोहरे त्याने गोळा करून खोक्यात ढकलले, स्ट्रिकलँडला शिव्या दिल्या, वेटरला बोलावून ड्रिंकचे पैसे दिले आणि निघून गेला. स्ट्रोव्हने त्याची खुर्ची टेबलाजवळ ओढून घेतली.

“आता आपल्याला बोलायला हरकत नाही.” स्ट्रिकलँड म्हणाला.

स्ट्रिकलँडने आपले डोळे त्याच्यावर रोखले. त्याच्या नजरेत एक मिश्किलपणा होता. मला वाटलं तो काहीतरी खोचक बोलण्याच्या विचारात असावा. पण काही न सुचल्यामुळे तो गप्प बसला.

“मी तुझ्या जुन्या मित्राला तुला भेटायला घेऊन आलो आहे.” स्ट्रोव्हने मोठ्या उत्साहात परत सुरूवात केली.

स्ट्रिकलँड एक मिनीटभर माझ्याकडे टक लावून बघत होता. मी एक अक्षरही तोंडातून काढलं नाही.

“मी याला उभ्या आयुष्यात पाहिलेलं नाही.”

तो असं का म्हणाला असावा ते मला कळलं नाही. पण त्याच्या डोळयात ओळख पटल्याची अंधूक खूण पाहिल्याची मला खात्री होती. इतक्या वर्षात खजील होण्याची ही माझी पहिलीच खेप होती.

“तुमची पत्नी थोड्या दिवसांपूर्वी मला भेटली होती. तिची खुशाली कळावी असं तुम्हाला वाटत नाही का?”

तो किंचीत हसला. त्याने डोळे मिचकावले.

“आपण एकदा इथे गप्पा मारत बसलो होतो नाही का.” तो म्हणाला. “किती दिवस झाले असतील त्याला?”

“पाच वर्ष.”

त्याने आणखी एक ऍबसिंथ मागवली. आम्ही पॅरीसमध्ये कधी भेटलो, आमच्या भेटीत स्ट्रिकलँडचा विषय योगायोगाने कसा निघाला वगैरे तपशील स्ट्रोव्ह घडाघडा सांगत होता. स्ट्रिकलँड ऐकत होता की नाही ते मला सांगता येणार नाही. त्याने माझ्याकडे एक दोन वेळा वळून पाहिलं. पण तो आपल्याच विचारात दंग होता. स्ट्रोव्ह बडबडत नसता तर कठीण होतं. अर्ध्या तासाने डचमॅनने

घड्याळात पाहिलं आणि त्याला एक काम आहे आणि त्यासाठी त्याला निघणं भाग आहे असं जाहीर केलं. जाताना त्याने येतोस का असं मला विचारलं. स्ट्रिकलँडकडून काहीतरी ऐकायला मिळेल असा विचार करून मी आणखी थोडा वेळ थांबेन असं सांगितलं.

तो जाड्या गेल्यावर एकेरीवर येत मी म्हणालो:

“डर्क स्ट्रोव्हला वाटतं की तू एक महान चित्रकार आहेस.”

“त्याला काय वाटतं याची मी पर्वा करत असेन असं तुला का वाटतं?” तेवढ्याच सहजतेने तोही एकेरीवर आला.

“तुझी पेंटींग बघायला मिळतील का?”

“माझी पेंटींग मी तुला का दाखवावीत?”

“कदाचित त्यातलं एखादं पेंटींग मला विकत घ्यावसं वाटेल.”

“पण विकावं असं मला वाटलं नाही तर?”

“तुला पैसे कितपत मिळतात?” मी हसत हसत विचारलं.

तो गालातल्या गालात हसला.

“मी कसा दिसतोय?”

“अर्धपोटी, भुकेला.”

“मला भूक लागलीच आहे.”

“चल तर मग जेवू या.”

“मला एवढं का बोलावतोयस?”

“उपकार म्हणून नाही.” मी थंडपणे उत्तर दिलं. “तू जिवंत आहेस की उपाशीपोटी तडफडतोयस याला माझ्या लेखी काडीचीही किंमत नाही.”

त्याचे डोळे पुन्हा चमकले.

“चल मग. मला चांगलं जेवण हवंच आहे.”

# २१

त्याच्या पसंतीच्या रेस्तोराँमध्ये आम्ही गेलो. वाटेत मी वर्तमानपत्र घेतलं. आम्ही जेवण मागवलं. सँ गामिएची बाटली समोर ठेऊन वर्तमानपत्राचा अंक उघडून मी वाचायला सुरवात केली. आम्ही शांतपणे जेवलो. तो अधे-मधे माझ्याकडे बघत होता ते मला जाणवत होतं पण मी त्याच्याकडे लक्ष दिलं नाही. संभाषणाला सुरवात त्याने करावी असा माझा प्रयत्न होता.

“वर्तमानपत्रात काही खास बातमी?” आमचं जेवण संपता संपता त्याने विचारलं.

त्याच्या आवाजावरून तो किंचीत चिडून बोलत असावा असा मला संशय आला आणि आतून फार बरं वाटलं.

“मला नाटकाची परीक्षणं वाचायला आवडतात.” मी म्हटलं आणि वर्तमानपत्राची घडी करून ते बाजूला ठेवलं.

“जेवण छान होतं.”

“कॉफी इथेच घेतली तर बरं होईल नाही का?”

“चालेल.”

आम्ही सिगार शिलगावल्या. मी शांतपणे धुम्रपान करत होतो. अधून मधून तो माझ्याकडे बघून मिश्किलपणे हसत होता. मला कसलीच घाई नव्हती.

“आपण मागे भेटलो होतो त्यानंतर तू काय करत होतास?” सरते शेवटी त्याने विचारलं.

सांगण्यासारखं माझ्याकडे काही नव्हतं. थोडी मेहनत, थोडं साहस, थोडी गंमत. इकडे तिकडे केलेली मुशाफिरी. साहित्य आणि साहित्यिकांचे आलेले चार अनुभव. स्ट्रिकलंडला त्याच्याबद्दल चुकुनही काही विचारायचं नाही याची मी मुद्दाम काळजी घेत होतो. तो काय करत होता याच्यात मी आतापर्यंत अजिबात रस दाखवला नव्हता. शेवटी माझ्या चिकाटीला फळ आलं. त्याने स्वत:विषयी बोलायला सुरवात केली. स्वत:चं मन नीट व्यक्त करताना त्याला जमत नव्हतं. गेल्या पाच वर्षात त्याने कोणत्या हालअपेष्टा भोगल्या हे नीट कळण्यासाठी मला त्याच्या तुटक बोलण्यातील गाळलेल्या जागा अंदाजाने भराव्या लागल्या. तो कसा आहे हे जाणून घेण्यात एक लेखक म्हणून मला रस होता. त्यासाठी तर मी मुद्दाम थांबलो होतो. पण ते असं तुकड्या तुकड्याने अर्धवट हाती लागत होतं. त्यामुळे माझी निराशा झाली. त्याचं बोलणं ऐकणं आणि त्याचा अर्थ लावणं म्हणजे एखादं फाटलेलं हस्तलिखीत वाचण्यासारखं ते होतं. त्याला पावला पावलावर कडा संघर्ष करावा लागला होता. इतरांना जे भयंकर कष्टप्रद वाटलं असतं त्याचं त्याला काहीच वाटलं नव्हतं. स्ट्रिकलँड कोणत्याही सुखसोईंच्या बाबतीत अगदी उदासीन असे. या दृष्टीने तो इतर इंग्लीश लोकांच्या तुलनेत फार वेगळा होता. घाणेरड्या जागेत रहायचं त्याला काहीच वाटत नसे. आपल्या अवती भोवती छान छान गोष्टी असण्याची गरज त्याला वाटत नसे. तो रहात होता त्या खोलीच्या वॉलपेपरचे पोपडे उडाले आहेत हे त्याच्या लक्षातही आलं नव्हतं. बसण्यासाठी खुर्चीची गरज त्याला पडत नसे. एका बारक्याश्या किचन स्टूलवर त्याचे काम भागत असे. त्याची भूक चांगली होती. पण ताटात काय आहे याची त्याला फिकीर नसे. समोर अन्न आले की ते ग्रहण करणे मग ते काहीही असो, नसले तरी चालेल. सहा महिने त्याने फक्त दूध पाव खाऊन काढले होते. त्याच्या विषयवासना तीव्र होत्या. तरीही तो स्त्रियांच्या बाबतीत उदासीन असायचा. एकांतवासाने त्याचे हाल होत नसत. ज्या फकिरी बाण्याने तो जगत होता त्याचे कौतुकच केले पाहिजे.

लंडनवरून येताना आणलेले थोडेफार पैसे संपल्यावर त्याचे हाल कुत्रा खाईना. त्याचं एकही पेंटींग विकलं गेलं नव्हते. पैसे मिळवण्यासाठी म्हणून त्याने

दुसरे मार्गही चोखाळून पाहिले. पॅरीसच्या रंगेल रात्रींची सफर करायला लंडनमधून येणाऱ्या खेडवळ प्रवाशांचा गाईड म्हणून त्याने थोडे दिवस काम केलं होतं, हे एकदा त्याने मला विषादाने सांगितलं. हे काम त्याच्या कुचेष्टेखोर स्वभावाला साजेसे होते. एव्हाना पॅरीसच्या त्या कुप्रसिद्ध भागाची त्याला चांगलीच माहिती झाली होती. कायद्याने बंदी असलेल्या गोष्टी करण्यात रस असलेला कोणी इंग्लीशमन मिळतो का ते शोधताना एकदा त्याला बुलेवार द ला मॅदलीनवर रात्र काढावी लागली होती. एकदा नशीबाने त्याला लंडनहून जीवाचं पॅरीस करायला आलेल्या पाच सहा मित्रांच टोळकं मिळालं पण त्याच्या अवताराकडे बघून त्या मंडळींनी पळ काढला. त्याच्यावर विश्वास ठेऊन तो नेईल तिकडे त्याच्या मागोमाग जाण्याचं धाडस करण्याची कोणाचीच तयारी नव्हती. त्यानंतर त्याला इंग्लंडला निर्यात करायच्या औषधांच्या लेबलांवरील फ्रेंच मजकुराचं इंग्लीश भाषांतर करण्याचं काम मिळालं. पॅरीसमधील कामगारांच्या संपात त्याने घरांना रंग लावण्यासाठी हातात ब्रश घ्यायला मागे पुढे पाहिलं नाही.

ते काहीही असलं तरी त्याच्या चित्रकलेत खंड पडला नव्हता. स्टुडियोचा कंटाळा आल्याने तो घरीच काम करीत असे. कॅनव्हास आणि रंग घ्यायला लागणाऱ्या पैशात त्याने कधीच काटकसर केली नाही. खरं पाहाता त्याला दुसरं काहीच लागत नसे. त्याला चित्र रंगवताना खूप अडचणी येत. पण दुसऱ्याची मदत घ्यायला तो कधीच तयार नसे. त्यामुळे ज्या तांत्रिक अडचणींवर मागच्या पिढीतील चित्रकारांनी अगोदरच मात केली होती अशा साध्या साध्या गोष्टीतून स्वत:च चुकत माकत शिकायला त्याला खूप वेळ लागत असे. त्याला काही तरी साधायचं होतं. काय ते मला कळलं नाही. त्यालासुद्धा ते कितपत माहित होतं याची शंकाच आहे. तो कशाने तरी झपाटलेला असावा हे जे माझं पहिलं मत होतं ते कायम झालं. तो जे काही करायचा त्याने त्याचं डोकं ठिकाणावर आहे असं कोणाला वाटलं नसतं. स्वत:ची चित्रं दुसऱ्याला दाखवून त्याचं मत विचारण्यात त्याला रस नसायचा. कारण त्याला स्वत:लाच ती फारशी आवडत नसावीत. तो स्वप्नांच्या दुनियेत विहार करत असावा. वास्तवाशी त्याला काही देणं घेणं नव्हतं. मला असं वाटायचं की

पेंटींग करताना त्याच्यातील हिंस्रपणा उफाळून वर येत असावा. अंतर्दृष्टीला जे दिसत आहे ते सर्व कॅनव्हासवर उतरवण्याच्या नादात तो सर्वस्व विसरून स्वत:ला झोकून देत असावा. ते एकदा संपलं की तो ते पेंटींगही विसरून जात असला पाहिजे. मला वाटतं की त्याने क्वचितच त्याचं पेंटींग पूर्णत्वाला नेलं असेल. निर्मितीच्या उर्जेची ज्वाला विझून गेल्यावर त्याचा त्या निर्मितीतील रस संपून जात असावा. त्याने जे केलं त्याने त्याचे कधीही समाधान होत नसले पाहिजे. अंत:चक्षूंना दिसणाऱ्या पेंटींगसमोर कॅनव्हासवर उतरलेलं पेंटींग त्याला कस्पटासमान वाटत असे.

“तू तुझी पेंटींग प्रदर्शानात का पाठवत नाहीस? आपल्या पेंटींगबद्दल दुसऱ्यांना काय वाटतं ते आपल्याला कळावं असं तुला वाटत नाही काय?”

“तुला वाटतं?”

या दोन शब्दातून त्याने जी तुच्छता व्यक्त केली होती त्याला तोड नव्हती.

“तुला प्रसिद्धी नको आहे का? प्रसिद्धी ही एक गोष्ट अशी आहे की कोणताही कलाकार तिच्यापासून फार काळ उदासीन राहू शकत नाही.”

“लहान मुलासारखं बोलू नकोस. एका फालतू माणसाच्या मताला मी जेथे किंमत देत नाही तेथे अनेक फालतू लोकांची गर्दी झाली म्हणून मी त्यांच्या मताला किंमत द्यावी हे कितपत योग्य आहे.”

“तुझं डोकं उलटंच चालतं हे मात्र खरं आहे.”

“प्रसिद्धी कोणाला मिळत नाही? समीक्षक, लेखक, शेअर बाजारातील दलाल, स्त्रिया.”

“जी माणसं तुला ओळखत नाहीत अशांनी तुझी पेंटींग पाहिली आणि त्यांना काही वाटलं, त्यांच्या भावना उचंबळून आल्या तर तुला समाधान वाटणार नाही

का? लोकांच्या मनावर राज्य करायला सगळ्यांनाच हवं असतं. आपला प्रभाव दुसऱ्यावर पडलेला कोणाला आवडणार नाही?”

“हा शुद्ध भावनांचा खेळ, मेलोड्रामा झाला.”

“तुझी चित्रं चांगली आहेत किंवा वाईट आहेत याने तुला काय फरक पडतो?”

“मुळीच फरक पडत नाही. मला फक्त मला जसं दिसतं तसंच रंगवायचं असतं.”

“समज मी एका समुद्रातील एखाद्या निर्जन बेटावर आहे. तिथे जर माझं लिखाण वाचणारा दुसरा कोणी नसेल तर मला लिहीता येईल असं मला वाटत नाही.”

स्ट्रिकलँड बराच वेळ काही बोलला नाही. त्याच्या डोळ्यात विचित्र चमक होती. जणू काही तो एक अद्भूत अनुभूती घेण्यात मग्न असावा.

“कधी कधी अथांग सागरावरील एखाद्या निर्जन बेटावर मी आहे. तेथील डोंगर, दऱ्या, नदी नाले, चित्रविचित्र झाडेझुडपे, पशुपक्षी, नि:शब्द शांतता मला खुणावत आहेत असं मला वाटतं. मला हवं ते कदाचित तेथे मिळू शकेल कोण जाणे?”

तो जे बोलला ते शब्द प्रत्यक्षात वेगळेच होते. तो विशेषणांच्या ऐवजी हातवारे करून सांगायचा. बोलता बोलता तो मध्येच थांबायचा. बऱ्याच ठिकाणी त्याला काय सांगायचं असावं ते मी माझ्या शब्दात व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

“गेल्या पाच वर्षांचा विचार करता जे झालं ते ठीक होतं असं वाटतं का?”

त्याने माझ्याकडे पाहिलं. मी काय म्हणतोय ते त्याच्या ध्यानात आलं नव्हतं असं मला त्याच्या नजरेवरून वाटलं. मी अधिक खुलासा केला.

“तू तुझा सुखी संसार, घर सोडलंस. बऱ्यापैकी पैसे तुझ्या गाठीला होते. इथे पॅरीसमध्ये तू सडत आहेस. जर हा निर्णय घेण्याची परत एक संधी मिळाली तर तू पाच वर्षांपूर्वी जो निर्णय घेतला होतास तोच निर्णय घेशील?”

“बहुधा.”

“तू अजून तुझी बायको, मुलं यांची काहीच चौकशी केली नाहीस. तुला त्यांची आठवण येत नाही का?”

“नाही.”

“तू एका शब्दापेक्षा जास्त शब्द वापरलेस तर बरं होईल. तुझ्यामुळे त्यांच्यावर दु:खाचा जो डोंगर कोसळला आहे त्याचा तुला कधी एक पळभर तरी पश्चाताप वाटला होता का?”

तो किंचीत हसला आणि त्याने मान हलवली.

“मला वाटतं तुला अधून मधून भूतकाळाची आठवण आल्याशिवाय रहात नसावी. मी गेल्या सात आठ वर्षांच्या पूर्वीचा काळाविषयी विचारत नाही. त्याही पूर्वीच्या काळाविषयी, जेव्हा तू तुझ्या बायकोला पहिल्यांदा भेटलास, तुझं तिच्यावर प्रेम बसलं, आणि मग तिच्याशी लग्न केलंस, तिला पहिल्यांदा जेव्हा बाहूपाशात घेतलंस, पहिलं चुंबन घेतलंस.”

“मी भूतकाळाचा विचार करत नाही, फक्त चालू वर्तमानकाळाचा विचार करतो.”

त्याने दिलेल्या उत्तराचा पहिल्यांदा अर्थ लागत नव्हता, पण थोडा विचार केल्यावर त्यात थोडं तथ्य आहे असं वाटू लागलं.

“तू सुखी आहेस का?” मी विचारलं.

“मी सुखी आहे.”

याच्यावर बोलण्यासारखं काही नव्हतं. मी गप्प बसलो आणि त्याच्याकडे रोखून पाहिलं. त्याने माझ्या नजरेला नजर भिडवली. त्याचे डोळे चमकले.

“मला वाटलं तू माझ्यावर टीका करशील.”

“मूर्खपणा आहे,” मी तात्काळ उत्तर दिलं. “एखाद्या अजगरावर टीका करण्याचा काही उपयोग असतो का? मला फक्त तुझ्या डोक्यात काय चालू आहे ते जाणून घेण्यात रस आहे.”

“तू फक्त एक व्यावसायिक साहित्यिक म्हणून माझ्याकडे बघतोयस.”

“होय, एका साहित्यिकाच्या शुद्ध व्यावसायिक दृष्टीकोनातून.”

“तसं असेल तर तू कशाला माझ्यावर टीका करण्यात तुझा वेळ खर्च करशील? तुला फक्त माझी शवचिकित्सा करण्यात रस आहे. तू अगदी भयंकर आहेस.”

“कदाचित म्हणूनच तुझं माझं जमत असावं.” मी टोमणा मारला.

तो कोरडं हसला. त्याच्या हसण्याचं योग्य वर्णन करायला माझ्याकडे शब्द असते तर बरं झालं असतं. त्याचा चेहेरा एक क्षणभर उजळला. त्याचा चेहेरा सहसा गंभीर असायचा किंवा तो कोणाचा तरी उपहास किंवा कुचेष्टा करतोय असं वाटत असायचं. त्याच्या ऐवजी त्याच्या चेहेऱ्यावर हसू फुटायला लागलं होतं. उन्मादाने हसावं तसं. क्रूर नाही आणि प्रेमळही नाही. कामांध, अमानवी वाटेल अश्या त्याच्या त्या भयंकर हास्यामुळे मी त्याला विचारलं:

“तू पॅरीसला आल्यावर कोणाच्या प्रेमात वगैरे पडलास की नाही?”

“तसल्या मुर्खपणाच्या गोष्टींसाठी माझ्याकडे वेळ नाही. प्रेम आणि कला या दोन्ही गोष्टी करण्यासाठी आयुष्य पुरं पडणार नाही.”

“तुझ्याकडे पाहिलं की तू वैरागी वगैरे असशील असं वाटत नाही.”

“प्रेमासारख्या फालतू गोष्टींची मला किळस वाटते.”

“मनुष्य-स्वभाव म्हणजे एक वैतागच असतो नाही.”

“तू माझ्याकडे बघून असा का हसतोयस?”

“कारण तुझ्यावर माझा विश्वास नाही.”

“तू एक महामूर्ख आहेस.”

त्याचा अंदाज घ्यायला मी थांबलो.

“माझ्याशी असली थापेबाजी करण्यात काय अर्थ आहे?”

“तुला काय म्हणायचंय?”

मी हसलो.

“तुला आता स्पष्टच सांगतो. इतके दिवस मला वाटत होतं की तुझ्या टाळक्यात काही शिरत नसावं. हे सगळं कायमचं संपलंय असा समज तू करून घेतला आहेस. तू इकडे पॅरीसला तुझ्या मनाला येईल तसं वागतोयस. तुला वाटतं की तू आता मुक्त झाला आहेस. तुझे हात आकाशाला भिडले आहेत. पण तसं नाही. अचानक तुझ्या लक्षात येतं की तुझे पाय मातीचेच आहेत. चिखलात लोळायचा तुला झटका आलाय. दारू पिताना तुला भान रहात नाही. वासनेने अंध होईपर्यंत तू दारू ढोसतोस. मग तुला एक बाई सापडते. गावंढळ, सामाजिक दृष्ट्या खालच्या दर्जाची, अशिक्षित आणि मूर्ख, दोन पायाच्या जनावरासारखी. मग तू तिच्या देहावर एखाद्या जंगली श्वापदासारखी झडप घालतोस.”

काहीही न करता अगदी निश्चलपणे तो माझ्याकडे अगदी टक लावून पहात होता. मी त्याच्या डोळ्याला डोळे भिडवले आणि मी त्याच्याशी हळू हळू बोलायला सुरवात केली.

“यात चमत्कारिक काय ते मी तुला सांगतो. हे सगळं संपतं तेव्हा तुला देहाच्या पावित्र्याची आठवण होते. तू आत्म्यासारखा मुक्त विहार करतोस. सौंदर्याच्या अनुभूतीला तू एखादी सैंद्रिय गोष्ट असल्यासारखा स्पर्श करायला जातोस. हवेची झुळूक, पानांची सळसळ, निर्झराची खळखळ यांनी तू मोहरून जातोस. आपण स्वत:च परमेश्वर आहोत असं तुला वाटायला लागतं. हे कसं होतं ते तू मला समजावून सांगू शकशील का?”

माझं बोलणं पूर्ण होईपर्यंत त्याची नजर माझ्यावर खिळून होती, ती नंतर बाजूला वळली. त्याचा चेहेरा भकास दिसत होता, पोलीसांच्या कोठडीत अनन्वीत छळाने मृत्यु पावलेल्या कैद्यासारखा. तो गप्प होता. आमचा संवाद संपला हे मला कळलं.

## २२

मी पॅरीसमध्ये स्थिरस्थावर झाल्यावर नाटक लिहायला घेतलं. माझा नियमित दिनक्रम असा होता. सकाळी उठून काम करायचं. दुपारी लक्झेम्बर्ग बागेतून फेरफटका नाहीतर रस्त्यातून भटकणे. मी लूवर म्युझियममध्ये खूप वेळ घालवयाचो. इतर कोणत्याही आर्ट गॅलेरीपेक्षा लुवरमध्ये घरच्यासारखं वाटे. शिवाय कोणत्याही गोष्टीवर विचार करत बसायचं असेल पॅरीसमध्ये त्याच्या एवढी चांगली जागा दुसरी नाही. कधी कधी मी बोटीच्या धक्क्यावर जाऊन रेंगाळत असे, तर कधी जुन्या पुस्तकांच्या दुकानात. पुस्तक विकत घ्यायचं नसलं तरीही पुस्तक चाळत एखाद दुसरं पान वाचायचो. मोठमोठ्या लेखकांशी आपण होऊन ओळख करून घ्यायला मला आवडत असे. ओळख वरवरची असली तरी मला चालायचं. संध्याकाळ मी मित्रांच्या भेटी गाठी घेण्यात घालवत असे. अधून मधून स्ट्रोव्ह दांपत्याकडे फेरी असायची. कधी कधी त्यांच्या पाहुणचाराचा लाभ मिळे. डर्क स्ट्रोव्हला इटालियन पदार्थ करायला खूप आवडायचं आणि ते बनवताना त्याचा उत्साह उतू जात असे. त्याची स्पाघेत्ती त्याच्या पेंटींगपेक्षा खूप चांगली असायची हे मला कबूल केलं पाहिजे. एकदा त्याने मला शाही मेजवानी दिली. टॉमेटो घालून केलेली रसाळ स्पाघेत्ती, घरी भाजलेला पाव आणि रेड वाईनची बाटली. मजा आली. ब्लांश स्ट्रोव्हची आणि माझी चागंली दोस्ती जमली. तिच्यासारखा मीही इंग्लीश होतो. तिच्या परीचयाच्या माणसांमध्ये इंग्लीश माणसं फारशी नव्हती. त्यामुळे मी भेटल्यावर तिला खूप आनंद होत असे. ती दिसायला साधी असली तरी छान दिसायची. पण ती आपण होऊन फारशी बोलत नसे, बहुधा गप्पच राही. त्याचं कारण मला कळलं नव्हतं. त्यामुळे ती काही तरी लपवत असावी अशी मला नेहमी शंका येई. कदाचित तिच्या नवऱ्याच्या बडबड्या आणि नको इतक्या मोकळया स्वभावाच्या तुलनेत ती अबोल वाटत असावी असा विचार मी केला. डर्क अगदी खाजगी वैयक्तिक गोष्टीसुद्धा कसलाही आडपडदा न ठेवता सांगत असे. त्यामुळे ती कधी कधी अडचणीत येई. एकदा त्याने जुलाबाचे औषध घेतलं होतं. ती नको म्हणत असतानासुद्धा ती गोष्ट त्याने मला अगदी तपशीलवार सांगितली तेव्हा

मात्र तिचा चेहेरा शरमेने लाल झाला होता. स्वत:च्या फजितीच्या गोष्टीसुद्धा तो एकदम गंभीरपणे सांगत असे. अशा वेळी कितीही केलं तरी मला हसू आवरत नसे. त्यामुळे ती अधिकच वैतागत असे.

“स्वत:चं हसं करून घ्यायला तुम्हाला आवडतं तरी कसं,” ती म्हणाली.

त्याचे डोळे आणखी मोठे झाले. ती रागावली आहे हे लक्षात आल्यावर त्याने भुवया वर केल्या.

“लाडके, तुला त्रास झाला का? मी पुन्हा घेणार नाही. मला जरा अपानवायुचा त्रास होतो म्हणून मी घेतलं. माझं बैठं काम आहे. त्यातच मी व्यायामसुद्धा करीत नाही. तीन दिवस मी ...”

“कृपा करून जरा गप्प बसता का?” तिने मध्येच थांबवलं. तिच्या डोळयात पाणी आलं होतं.

त्याचा चेहेरा पडला. रागे भरलेल्या मुलासारखे त्याने ओठ मुडपले. मी मध्ये पडावं या उद्देशाने त्याने माझ्याकडे केविलवाण्या नजरेने पाहिलं. पण माझा नाईलाज झाला आणि मी खो खो हसू लागलो.

एके दिवशी आम्ही एका चित्रविक्रेत्याकडे गेलो. त्याच्याकडे स्ट्रिकलँडची दोन तीन पेंटींग असावीत अशी अटकळ होती आणि त्या निमीत्ताने ती बघता आली असती. पण त्याच्याकडे गेल्यावर आम्हाला कळलं की स्ट्रिकलँड ती पेंटींग परत घेऊन गेला होता. परत घेऊन जाण्याचं कारण त्याने विक्रेत्याला सांगितलं नव्हते.

“ती पेंटींग माझ्या दुकानात ठेवल्याने मला काही फायदा होण्याची शक्यता नव्हती. मस्य स्ट्रोव्हनी आग्रह केला म्हणूत ती मी ठेऊन घेतली होती. म्हटलं बघू या प्रयत्न करून. पण खरं सांगायचं तर ...” त्याने डोकं हलवलं. “तरूण कलाकारात मला रस आहे. पण *वोयाँ,* आता तुम्हीच बघा, मस्य स्ट्रोव्ह, या स्ट्रिकलँडमध्ये तुम्हाला काय सापडलं मला कळत नाही.”

“मी लिहून देतो. स्ट्रिकलँडच्या तोडीचा एकही चित्रकार मला आजवर आढळलेला नाही. माझी खात्री आहे. माझ्यावर विश्वास ठेवा. तुमच्या हातातील संधी निसटून जाईल. तुमच्या दुकानात ठेवलेल्या सगळया पेंटींगची एकत्र मिळून जेवढी किंमत येणार नाही तेवढी याच्या एका पेंटींगला येईल. एके काळी मॉनेच्या पेंटींगला शंभर फ्रँकसुद्धा येत नसत. आज त्याच्या पेंटींगची किंमत कुठे गेली आहे ते तुम्ही पहातच आहात.”

“तुम्ही म्हणता ते खरं आहे. मॉनेची पेंटींग विकली जात नव्हती तेव्हा आणखी शेकडो कलाकार होते. आज मॉनेच्या पेंटींगची किंमत आकाशाला भिडली असेल पण मॉने सोडला तर त्याच्या वेळच्या इतर कलाकारांच्य पेंटीगना अजूनही कोणी विचारत नाही. यशस्वी होण्यासाठी फक्त गुणवत्ता हा एकच निकष पुरेसा नसतो. तुम्हाला आता पटणार नाही. तुमच्या मताला मी मान देतो. पण तुमच्या या मित्राची गुणवत्ता अजून सिद्ध व्हायची आहे. स्ट्रिकलँडची तारीफ मस्य स्ट्रोव्ह सोडून दुसऱ्या कोणी केलेली अजून तरी माझ्या कानावर आलेली नाही.”

“गुणवत्ता कशी ओळखता येते असं तुमचं म्हणणं आहे?” डर्कचा चेहेरा रागाने लाल झाला होता.

“यश. हा एकच मार्ग आहे गुणवत्ता ओळखण्याचा.”

“हा अगदीच असंस्कृतपणा आहे..”

“मागे होऊन गेलेल्या महान चित्रकारांचं उदाहरण घेऊ या. राफाएल, मायकेल अँजेलो, इनग्रेस, दलाक्रवा … हे सगळे चित्रकार यशस्वी होते.”

“चला, आपण येथून सटकलेलं बरं,” स्ट्रोव्ह मला म्हणाला. “नाहीतर माझ्या हातून याचं डोकं फुटेल.”



Artist: Paul Gauguin

Title: Le Mur mitoyen, ou Le Verger, Party Wall, Date: 1881

Medium: oil on canvas, Dimensions: 30.5 × 47 cm (12 × 18.5 in)

Current location: Private collection, Source: wikidata:Q37693

## २३

स्ट्रिकलँड आणि माझी यानंतर कित्येक वेळा गाठ पडली. बऱ्याच वेळा आम्ही बुद्धीबळाचा डाव मांडून बसत असू. बऱ्याच वेळा तो शांतपणे शून्यात नजर लावून बसलेला असे. स्वारी खुशीत असली तर तुटक तुटक काही तरी बोलायची. त्याने हुशारीने एखादा मुद्दा मांडलाय असं कधी होत नसे. पण दुसऱ्याची क्रूर चेष्टा करण्यात त्याचा हात कोणी धरला नसता. त्याला जे वाटत असे ते तो अगदी

स्वच्छपणे सांगायचा. दुसऱ्याला वाईट वाटेल, भावना दुखावतील याची तो मुळीच पर्वा करत नसे. त्याचं बोलणं कोणाला लागलं तर त्याला त्याची गंमत वाटे. डर्क स्ट्रोव्हची तर तो जाता येता एवढी टिंगल करायचा की कित्येक वेळा डर्क त्याच्याशी पुन्हा बोलणार नाही अशी शपथ घेऊन तेथून निघून जायचा. पण स्ट्रिकलँडच्या व्यक्तिमत्वात एक विलक्षण आकर्षण होतं. तो जाड्या डचमन त्याचा पिट्ट्या पडणार आहे हे ठाऊक असूनही लोचट कुत्र्यासारखा त्याच्याकडे परत येई, आणि त्याने हाड हाड करून हाकलेपयर्यंत तो त्याच्या पायाशी लाळ घोटत बसून राही.

स्ट्रिकलँड मला का खपवून घेत असे ते मला समजलं नव्हतं. आमचे संबंध तसे मैत्रीपूर्ण होते. एके दिवशी त्याने माझ्याकडे पन्नास फ्रँक उसने मागितले.

“स्वप्नातसुद्धा मी देणार नाही.”

“का नाही?”

“मला त्यात गंमत वाटत नाही.”

“मला फाके पडताहेत, तुला ठाऊक आहे ना.”

“त्याने मला काय फरक पडतो.”

“मी उपाशी मेलो तर तुला काही फरक पडणार नाही?”

“का पडावा?”

त्याची अस्ताव्यस्त वाढलेली दाढी खाजवत तो एक दोन मिनीटं माझ्याकडे बघत राहिला. मी त्याच्याकडे पाहून हसलो.

“तुला कसलं हसू येतंय?”

“तू अगदी साधा आहेस. तू ना कधी कोणावर उपकार केले आहेस, ना कोणी तुझ्यावर कधी उपकार करायला तयार होईल.”

“घराचं भाडं न दिल्यामुळे मला हाकलून दिलं आणि मी गळफास लावून घेतला तर तुला वाईट वाटणार नाही का?”

“जरासुद्धा वाईट वाटणार नाही.”

तो गालातल्या गालात हसला.

“तू बंडल मारत आहेस. मी तसं खरंच केलं तर तुला पश्चाताप होईल.”

“तू करून तर बघ, मग कळेल.”

तो किंचीत हसला आणि त्याने आपल्या पुढ्यातील ऍबसिंथ ढवळली.

“आपण बुद्धीबळाचा एक डाव खेळू या का.” मी विचारलं.

“चालेल.”

आम्ही पटावर मोहरा लावल्या. पट तयार झाल्यावर त्याने बारकाईने पाहिला. आपली मोहरी पुढच्या लढाईला तयार आहेत हे पहाण्यात मोठी मौज असते.

“मी तुला पैसे देईन असं वाटलं तरी कसं?” मी विचारलं.

“न द्यायला काही कारण नव्हतं.”

“तू मला धक्का दिलास.”

“कसा काय?”

“तुला भावना आहेत हे मला कळल्याने माझी निराशा झाली. माझ्या सहानुभूतीला तू आव्हान केलं नसतंस तर ते मला फार आवडलं असतं.”

“आणि तू त्या आव्हानाला बळी पडला असतास तर ते मला आवडलं नसतं.”

“तर मग ठीक आहे.”

आम्ही शांतपणे खेळायला सुरवात केली. आम्ही खेळात गढून गेलो होतो. डाव संपल्यावर मी त्याला म्हणालो:

“”जर तुझी परिस्थिती अगदीच कठीण असेल तर मला तूझी पेंटींग दाखव. आवडलं तर एखादं विकत घेईन.”

“गो टू हेल.”

तो जायला उठला तेव्हा मी त्याला थांबवलं.

“तू तुझ्या ऍबसिंथचे पैसे दिले नाहीस.” मी हसत हसत म्हणालो.

त्याने मला शिव्या दिल्या, पैसे टेबलावर फेकले आणि तो निघून गेला.

त्यानंतर बरेच दिवसात तो मला दिसला नाही. एक दिवस मी कॅफेत बसून वर्तमानपत्र वाचत होतो तेवढ्यात तो आला आणि माझ्या शेजारी येऊन बसला.

“शेवटी तू गळफास लावून घेतलेला दिसत नाही.”

“तशी वेळ आली नाही. मला एक काम मिळालंय. एका निवृत्त झालेल्या प्लंबरचं पोर्ट्रेट मी दोनशे फ्रँकला करायला घेतलं आहे.”

“हे काम कसं मिळवलंस?”

“मी जेथून पाव आणतो त्या बाईने माझं नाव सुचवलं. त्याला एक चित्रकार हवा होता हे तो प्लंबर तिच्याजवळ बोलला होता. त्यासाठी तिला फ्रँक कमिशन द्यावं लागलं.”

“कसा आहे तुझा तो प्लंबर.”

“उत्कृष्ट. तंगडीच्या मटणासारखा लालबुंद आहे. त्याच्या उजव्या गालावर एक मोठा चामखिळ आहे. त्या चामखिळाच्या भोवती लांब केस उगवले आहेत.”

स्ट्रिकलँड खूश दिसत होता. तेवढ्यात डर्क स्ट्रोव्ह आला आणि आमच्या बाजूला येऊन बसला. तो मोठ्या त्वेषाने त्याच्यावर तुटून पडला. थट्टा करण्यासाठी तो डचमनच्या नाजूक आणि हळव्या जागा अशा कौशल्याने शोधत असे की त्याला मानावंच लागेल. नुसती बोचरी आणि लागट थट्टा करून तो थांबला नाही तर त्याने घणाघाती हल्ला करून त्याचा पार चेंदामेंदा करून टाकला. हल्ला इतका अचानक होता की तो बिचार पार गडबडून गेला. घाबरलेलं मेंढरू कसं इकडे तिकडे उड्या मारत असतं त्याची आठवण झाली. तो पार गांगरून गेला. शेवटी त्याच्या डोळयातून पाणी येऊ लागलं. स्ट्रिकलँडचा तुम्हाला कितीही राग येत असला, तो करत असलेली चेष्टा कितीही भयंकर क्रूर असली तरीही त्या क्षणी हसू आल्याशिवाय रहात नाही. त्यात डर्क स्ट्रोव्ह एवढा भाबडा होता की त्याने कितीही कळकळीने सांगितलं तरी त्याचं हसू होई.

जेव्हा मी पॅरीसमध्ये घालवलेल्या त्या हिवाळयाचा विचार करतो तेव्हा मला डर्क स्ट्रोव्ह बरोबर घालवलेल्या क्षणांची आठवण आल्याशिवाय रहात नाही. त्याच्या घरी खरंच धमाल यायची. आदर्श जोडप्याच्या कल्पनेत ती दोघं अगदी फिट बसत होते. डर्कचं त्याच्या बायकोवरचं प्रेम ही एक खास गोष्ट होती. तो एक बावळट व मूर्ख होता. पण त्याच्या कळकळीमुळे त्याची दया यायची. त्याच्या बायकोला त्याच्याबद्दल काय वाटत असेल त्याची मला कल्पना होती. तरीही ती त्याचं सगळं मायेने करत असे. त्याने तिला देव्हाऱ्यात बसवून तिची पूजा करायला कमी केलं नसतं. तिला विनोदाचं अंग असतं तर तिला त्याच्यातील गंमत कळली असती आणि त्या पूजेचं हसू आलं असतं. तो चिरंतन प्रेमिक होता. वयोमानपरत्वे तिचं शरीर सौष्ठव आणि सौंदर्य उतरणीला लागल्यावरसुद्धा त्याचं तिच्यावरचं प्रेम आटलं नसतं. त्याच्या दृष्टीने ती कायमच जगातील सर्वात सुंदर स्त्री राहिली असती. त्यांच्या साध्या सरळमार्गी आयुष्यातही एक मजा होती. त्यांच्या घरात डर्कचा स्टुडियो, बेडरूम आणि एक छोटंस किचन होतं. सगळं घरकाम मिसेस स्ट्रोव्ह स्वत: करत असे. डर्क जेव्हा आपली टुकार पेंटींग रंगवत बसे तेव्हा ती बाजारहाट, स्वयंपाक, साफसफाई, असल्या घरगुती कामात दंग असे. संध्याकाळी ती जेव्हा

शिवणकाम हातात घेई तेव्हा डर्क संगीताचा आस्वाद घेत असे. त्याला अभिजात संगीताची आवड होती. त्याची उत्कृष्ट जाण त्याच्याकडे होती. पण कोणत्याही कलेचा आस्वाद घेणं तिच्या कुवती बाहेर होतं.

त्यांचा दिनक्रम अगदी संथ होता. पण त्यात साधेपणाचे म्हणून एक सौंदर्य होते. डर्क स्ट्रोव्हशी संबंधीत प्रत्येक गोष्टीतून त्याचा बावळटपणा दिसून येई. त्याच्या आवडी निवडी अभिजात होत्या, अभिरूची उच्च होती पण त्याचा बावळटपणामळे त्याच्यावर पाणी फिरे. गंभीर विषयावरच्या नाटकात टाकलेल्या विनोदी प्रवेशामुळे नाटकात रंगत येते तसेच ते होते.

२४

नाताळच्या थोडे दिवस अगोदर डर्क स्ट्रोव्ह माझ्या घरी आला आणि त्याने नाताळ साजरा करण्यासाठी मला त्याच्या घरी येण्याचं आमंत्रण केलं. नाताळचा दिवस त्याला आपल्या मित्रमंडळींना घरी बोलावून परंपरागत पद्धतीने साजरा करायला आवडे. आमच्यापैकी कोणीही स्ट्रकलँडला गेल्या दोन आठवड्यात तरी पाहिलं नव्हतं. मी पॅरीसमध्ये आलेल्या माझ्या काही मित्रांबरोबर होतो त्यामुळे मला वेळ मिळाला नव्हता तर स्ट्रोव्हला भांडणामुळे. या खेपेला त्यांचं भांडण नेहमीपेक्षा थोडं जास्तच कडाक्याचं झालं होतं. त्यामुळे स्ट्रोव्हने यापुढे त्याच्याबरोबरचे संबंध तोडून टाकण्याचा निश्चय केला होता. स्ट्रिकलँडचं कोणाशीही पटणं कठीण होतं. स्ट्रोव्हने तर त्याच्याशी कधीही न बोलण्याची शपथ घेतली होती. पण सणासुदीचे दिवस जवळ आल्याने त्याचा राग सौम्य झाला होता. सणाच्या दिवशी त्या बिचाऱ्याला एकटंच सोडून कसं चालेल. आपल्याला जसं वाटतं तसंच त्यालाही वाटत असेल असं त्याने गृहीत धरलं. चित्रकाराने आनंदाच्या दिवशी एकट्यानेच कुढत बसायचं ही कल्पना त्याला सहन झाली नाही. स्ट्रोव्हने स्टुडियोत ख्रिसमस ट्री आणून ठेवला. त्याच्या फांद्यांवर त्याने नाताळच्या त्या निरर्थक भेटवस्तू लहान मुलाच्या उत्साहाने टांगून ठेवल्या असाव्यात असा मला दाट संशय होता. पण स्ट्रिकलँडला पुन्हा भेटायला तो किंचीत लाजत होता. त्याने त्याची इतक्या वेळा मानखंडना केली होती की त्याला एवढ्या सहजतेने माफ करणं त्याला अपमानास्पद वाटत होतं. दिलजमाई केलेली तर त्याला हवी होती पण ती होताना मी तिथे हजर असलो पाहिजे अशी त्याची अपेक्षा होती.

आम्ही ऍव्हेन्यु द क्लिशीपर्यंत चालत गेलो पण स्ट्रिकलँड तिथल्या कॅफेमध्ये नव्हता. थंडीमुळे बाहेर बसणं शक्य नव्हतं म्हणून आम्ही आतमध्ये असलेल्या लेदर सोफ्यावर बसलो. आत खूप गरम आणि कोंदट होतं. वातावरण धुराने भरलेलं होतं. स्ट्रिकलँड तेथे नव्हता पण तो ज्या फ्रेंच चित्रकाराबरोबर बुद्धीबळं खेळायचा तो

आम्हाला दिसला. माझी त्याची थोडी ओळख होती. तो आम्ही बसलो होतो त्याच्या जवळ येऊन बसला. स्ट्रोव्हने त्याला स्ट्रिकलँड विषयी विचारलं.

“तो आजारी आहे. तुम्हाला माहित नाही का?”

“खूप आजारी आहे?”

“मला वाटतं परिस्थिती खूप गंभीर असावी.”

स्ट्रोव्ह पांढरा फटक पडला.

“त्याने मला का कळवलं नाही? त्याच्याशी भांडण्यात माझंच चुकलं. आपण त्याला जाऊन बघू या. त्याच्याकडे बघणारं कोणीही नाही. तो कुठे रहातो?”

“मला माहित नाही.” फ्रेंचमन म्हणाला.

त्याला कुठे शोधायचं हे आम्हा दोघांनाही माहित नव्हतं हे त्याच्या लक्षात आलं. स्ट्रोव्ह बेचैन झाला.

“त्याचं काही बरं वाईट झालं तर कोणाला कळणारसुद्धा नाही. हे फारच भयंकर आहे. मला तो विचारच सहन होत नाही. तो कुठे रहातो ते आपल्याला लवकरात लवकर शोधायलाच हवं.”

पॅरीसमध्ये असं सहजपणे कोणाला शोधून काढणं हे मूर्खपणाचं आहे हे मी त्याला समजावून सांगितलं. त्यासाठी आपल्याला काहीतरी योजना आखली पाहिजे.

“त्या बिचाऱ्याची हालत खराब झालेली असेल आणि आपण त्याला शोधण्यात वेळ घालवू तर तोपर्यंत कदाचित उशीर होईल.”

“तरीही त्याला शोधायचं असेल तर आपल्याला बसून नीट विचार केल्याशिवाय ते शक्य होणार नाही.”

मला ठाऊक असलेला पहिला पत्ता हॉटेल बेल्जचा होता. पण स्ट्रिकलँडने ते हॉटेल केव्हाच सोडलं होतं. त्यांना असा कोणता इसम आपल्या हॉटेलमध्ये राहून गेला होता ते आठवतच नव्हतं. आपला थांगपत्ता गुप्त ठेवण्याच्या अट्टाहासामुळे हॉटेल सोडून जाताना आपण दुसरीकडे कुठे जात आहोत त्याचा निरोप त्याने ठेवला असण्याची शक्यता शून्य होती. शिवाय तो रहात होता त्याला आता पाच वर्ष उलटली होती. पण तो फार दुरवर गेला नसावा याची मला खात्री होती. तो पूर्वी ज्या कॅफेमध्ये यायचा त्याच कॅफमध्ये अजूनही तो येतो म्हणजे त्याला ते त्याच्या रहाण्याच्या जागेपासून जवळ पडत असावे. त्याला एका बेकरीवाल्याने पोर्ट्रेट करण्याचं काम मिळवून दिलं होतं ते मला अचानक आठवलं. त्या बेकरीतच तो पाव घ्यायला जायचा तिथे त्याची चौकशी केली तर त्याचा पत्ता मिळण्याची शक्यता होती. मी डिरेक्टरी घेतली आणि बेकरींचे पत्ते शोधायला सुरूवात केली. त्या विभागात पाच बेकऱ्या होत्या. त्या सगळया बेकऱ्यांकडे जाणं भाग होतं. स्ट्रोव्हच्या मनात माझ्याबरोबर येण्याऐवजी ऍव्हेन्यू द क्लिशीवरच्या सगळया घरात जाऊन चौकशी करायची होती. पण माझ्या योजनेला पटकन फळ मिळालं. दुसऱ्याच बेकरीतील काऊंटरवरची बाई त्याला ओळखत होती. पण तिला तो नक्की कोणत्या घरात रहातो ते माहित नव्हतं. नशीबाची आम्हाला साथ होती. पहिल्याच इमारतीच्या कन्सर्जने तो सर्वात वरच्या मजल्यावर रहातो असं आम्हाला सांगीतलं.

“तो आजारी आहे का?” स्ट्रोव्हने विचारलं.

*“आँ नीफेत.”* कन्सर्ज उडत उडत म्हणाला. “असेल. बऱ्याच दिवसांत मी त्यांना पाहिलेलं नाही.”

स्ट्रोव्ह जिन्यावरून धाडधाड धावत पुढे गेला. मी जेव्हा वरच्या मजल्यावर जाऊन पोचलो तेव्हा स्ट्रोव्ह पायजमा घातलेल्या एका इसमाबरोबर बोलत होता. त्याने दुसऱ्या दरवाजाकडे बोट दाखवलं. त्याच्या मते तिथे रहाणारा इसम चित्रकार असावा. त्यानेसुद्धा आठवडाभरात त्याला पाहिलं नव्हतं. स्ट्रोव्ह दरवाजा

ठोठावण्यासाठी पुढे झाला पण इतक्यात त्याने मान वळवून असहाय्यपणे माझ्याकडे एक नजर टाकली. तो अतिशय गोंधळलेला दिसत होता.

“जर तो गेला असेल तर?”

“उगाच घाबरू नकोस. तसं होणार नाही.” मी त्याला धीर दिला.

मी दरवाजा ठोठावला. आतून उत्तर आलं नाही. मी दरवाजा ढकलला. दार आतून लावलेलं नव्हतं. मी आत शिरलो. स्ट्रोव्ह माझ्या पाठोपाठ आला. आत काळोख होता. ती वरच्या मजल्यावरच्या पोटमाळ्याची खोली होती. उतरत्या छपरातून झिरपणारा अंधूक प्रकाश खोलीत पडला होता.

“स्ट्रिकलँड.” मी हळूच हाक मारली.

उत्तर नाही. मला थोडा संशय आला. बाजूला पाहिलं तर स्ट्रोव्हचे पाय लटलट कापत होते. दिवा पेटवावा की नको या विचारात मी उभा होतो. एका कोपऱ्यात पलंग असावा असं मला अंधूकसं दिसलं. दिवा लावला तर आपल्याला प्रेत बघावं लागेल की काय या विचाराने माझ्या काळजात चर्र झालं.

“गाढवा, तुझ्याकडे काडेपेटी आहे की नाही?”

एका कोपऱ्यातून स्ट्रिकलँडचा घोगरा आवाज आला आणि माझा जीव भांड्यात पडला.

स्ट्रोव्ह ओरडला.

“अरे देवा, मला वाटलं तुला काही बरं वाईट तर झालं नाही.”

मी काडी ओढली आणि मेणबत्ती कुठे आहे ते पाहू लागलो. ती खोली अगदी छोटी होती. अर्धा भाग रहाण्यासाठी व उरलेल्या अर्ध्याभागात स्टुडियो. एक पलंग आणि भिंतीकडे पुढा करून ठेवलेले काही कॅनव्हास, इझल, टेबल आणि एक खुर्ची याशिवाय अक्षरश: काहीही नव्हतं. जमिनीवर अंथरायला कार्पेट नव्हतं की

उबेसाठी शेगडी. टेबलावर पॅलेट नाईफ, ब्रश, रंग आणि इतर सटरफटर गोष्टींचा खच पडलेला होता. एका टोकाला मेणबत्ती होती ती मी पेटवली. पलंग स्ट्रिकलँडच्या देहाच्या मानाने छोटा असल्याने त्या पलंगावर तो कसाबसा आखडून पडला होता. अंगात उब येण्यासाठी तो असतील नसतील ते सगळे कपडे अंगावर घालून झोपला होता. त्याच्याकडे बघताच तो तापाने फणफणला आहे ते कळून येत होतं. स्ट्रोव्ह कापऱ्या आवाजात त्याला म्हणाला:

“मित्रा तुला झालंय तरी काय? तू एवढा आजारी आहेस ते मला माहित नव्हतं. मला का नाही सांगितलंस? मी तुझ्यासाठी काहीही करीन हे तुला कळायला पाहिजे होतं. माझं बोलणं तू एवढं मनाला लावून घेतलंस. मला तसं म्हणायचं नव्हतं. मी तुझ्यावर एवढा चिडलो हा माझा मुर्खपणाच झाला.”

“गो टू हेल.” स्ट्रिकलंड क्षीण आवाजात कण्हत म्हणाला.

“थोडा दम धर. मी तुझ्या अंगावरचं पांघरूण नीट करतो. तुझी काळजी घ्यायला कोणी नाही का?”

त्याने त्या घाणेरड्या खोलीतील पसाऱ्याकडे एक दृष्टीक्षेप टाकला. त्याने अंथरूण पांघरूण नीट केलं. स्ट्रिकलँडला श्वास घ्यायला त्रास होत होता. त्याने न बोलता चीड व्यक्त केली. मी त्याच्याकडे बघत गप्प उभा होतो.

“तुला जर माझ्यासाठी खरंच काही करायचं असेल तर थोडं दूध आणून दे. मी दोन दिवस बाहेर पडलेलो नाही.”

पलंगाच्या बाजूला एक दुधाची रिकामी बाटली आणि वर्तमानपत्रात गुंडाळलेला पावाचा एक तुकडा होता.

“तू काही खाल्लं आहेस की नाही?”

“काही नाही.”

“असं किती दिवस चाललं आहे?” स्ट्रोव्ह ओरडला. “म्हणजे गेले दोन दिवस तुझ्या पोटात काहीही गेलेलं नाही. भयंकर आहे.”

“मी पाणी पीत होतो.”

हाताच्या अंतरावर असलेल्या पाण्याच्या मोठ्या भांड्याकडे बघत तो म्हणाला.

“मी ताबडतोब जाऊन घेऊन येतो. तुला आणखी का ही हवं आहे का?” स्ट्रोव्ह म्हणाला.

मी तापमापक, थोडीशी द्राक्ष आणि पाव आणायला सुचवलं. स्ट्रोव्ह आनंदाने जिन्यावरून धाडधाड धावत खाली गेला.

“मूर्ख कुठला.” स्ट्रिकलँड पुटपुटला.

मी त्याची नाडी पाहिली. नाडी लागायला वेळ लागला. ठोके जलद पडत होते. मी त्याला दोन तीन प्रश्न विचारले. त्याने उत्तर दिलं नाही. मी परत विचारलं तेव्हा त्याने भिंतीकडे तोंड फिरवलं. आता स्ट्रोव्ह येईपर्यंत शांतपणे वाट बघण्याशिवाय दुसरा इलाज नव्हता. दहा मिनीटांनी स्ट्रोव्ह धापा टाकत आला. मी सांगितलेल्या गोष्टींखेरीज त्याने मेणबत्त्या, मटणाचं सार आणि स्पिरीटचा दिवा आणला होता. मोठ्या लगबगीने वेळ न दवडता त्याने आणलेलं दुध गरम करायला घेतलं. मी त्याचा ताप बघीतला. एकशे चार होता. तो खूपच आजारी होता.

## २५

आम्ही तेथून निघालो. डर्क जेवायला घरी जाणार होतो आणि मी स्ट्रिकलँडला तपासायला एका डॉक्टरला घेऊन येणार होतो. आम्ही माळयावरच्या त्या कोंदट जागेतून खाली उतरून मोकळया हवेत श्वास घेतो न घेता तोच डचमनने मला त्याच्याबरोबर स्टुडियोत येण्याची विनंती केली. त्याच्या मनात काहीतरी करण्याचं घोळत होतं पण त्याच्याकडे माझं काय काम आहे ते तो मला सांगत

नव्हता. त्याच्याकडे मी येण्यासाठी त्याने गळ घातली. या घटकेला डॉक्टरसुद्धा आम्ही जे करत होता त्याच्यापेक्षा फार वेगळं काही करून शकणार नव्हता असा विचार करून मी त्याला मान्यता दिली. ब्लांश स्ट्रोव्ह जेवणाचं टेबल मांडत होती. डर्कने तिचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले.

“लाडके, माझ्यासाठी एक करशील?” त्याने विचारलं.

तिने त्याच्याकडे लाडिक नजरेने पाहिलं. प्रेमळपणा हा तिचा एक गुण होता. त्याच्या लालबुंद चेहेरा घामेजून गेला होता. त्याच्या टपोऱ्या डोळयांमधून उत्साह ओसंडून वाहत होता. त्याची तारांबळ पाहून कोणालाही हसूं फुटलं असतं.

तिने चटकन आपले हात त्याच्या हातातून काढून घेतले. एवढ्या चटकन एखादी प्रतिक्रिया देताना मी तिला पूर्वी कधी पाहिलं नव्हतं. तिची कानशीलं लाल झाली.

“छे:! नाही.”

“माझ्या लाडके. नाही म्हणू नकोस. त्याला आहे त्या अवस्थेत सोडून जाण्याची कल्पना मला सहन होणार नाही. त्याची नीट सोय लागल्याशिवाय माझा डोळा लागणार नाही.”

“तुम्ही त्याची शुश्रूशा खुशाल करा. माझी त्याल हरकत नाही.”

ती थंड आणि कोरड्या आवाजात म्हणाली.

“त्याचा जीव जाईल.”

“त्याला खुशाल मरू दे.”

स्ट्रोव्हने एक आवंढा गिळला, घाम पुसला आणि माझ्याकडे मदतीच्या अपेक्षेने पाहिलं. पण काय बोलावं ते मला कळेना.

“तो एक महान चित्रकार आहे.”

“असेल. त्याला मी काय करू. मला तो मुळीच आवडत नाही.”

“माझ्या लाडके मी तुला पुन्हा एकदा विनंती करतो. त्याला इकडे घेऊन येऊ या. आपल्याकडे त्याला थोडं बरं वाटेल. आपण त्याची शुश्रूशा केली तर त्याचा जीव वाचवू शकतो. तुला काही त्रास होणार नाही. सगळं काम मी करीन. माझ्या स्टुडियोत त्याची खाट टाकता येईल. त्याला एखाद्या कुत्र्यासारखं वाऱ्यावर सोडून कसं द्यायचं? ते माणूसकीला धरून होणार नाही.”

“त्याला एखाद्या हॉस्पिटलमध्ये का ठेवत नाही?”

‘‘हॉस्पिटल! अग त्याला आपुलकीची गरज आहे. त्याची खूप काळजी घ्यायला हवी

आहे.’’

तिच्या मनाला केवढं लागलं होतं ते पाहून मला आश्चर्य वाटलं. तिचं टेबल लावण्याचं काम चालूच होतं, पण आता तिचे हात कापत होते.

‘‘तुम्हाला आता कसं समजवणार ते मला कळत नाही. तुम्ही जर आजारी पडला असता तर त्याने तुमच्या मदतीसाठी करंगळी तरी पुढे केली असती का?’’

‘‘पण त्याचा इथे काय संबंध? माझी काळजी घ्यायला तू आहेस, त्यामुळे माझ्यावर अशी वेळ येणारच नाही. शिवाय माझी बाब वेगळी. मी त्याच्या एवढा महत्वाचा चित्रकार थोडाच आहे.’’

“एखाद्या बेवारशी कुत्र्याएवढासुद्धा अभिमान तुमच्यामध्ये नाही. लोकांनी पेकाटात लाथा मारल्या तरी तुम्हाला त्याचं काही नाही. उलट तुम्ही खाली पडून, या मला तुडवून जा असं वर आमंत्रण देऊन बोलवाल.”

आपली बायको असं का म्हणत आहे ते लक्षात आल्यासारखं स्ट्रोव्ह कसंनुसं हसला. “लाडके, तो माझी पेंटींग बघायला आला होता ते तुला अजून आठवत आहे. त्याला ती आवडली नाहीत तर त्याने काय फरक पडतो? त्याला दाखवायला गेलो हा माझाच मूर्खपणा झाला. ती तशी फारशी चांगली नव्हतीच.”

त्याने स्टुडियोवरून निराशेने नजर फिरवली. इझलवर एक अर्धवट झालेलं इटालियन शेतकऱ्याचं चित्र होतं. शेतकऱ्याने आपल्या हातातील द्राक्षांचा घड एका काळयाभोर डोळयांच्या मुलीच्या डोक्यावर धरला होता.

“त्याला चित्रं आवडली नसतील तर त्याने किमानपक्षी गप्प तरी बसावं. तुमचा अपमान करायची गरज नव्हती. त्यातून तुम्हाला तो किती तुच्छ समजतो हे त्याने दाखवून दिलं आणि तुम्ही त्याचे पाय चाटायला निघालात. तुम्हाला कसं सांगायचं. तो अगदी हलकट माणूस आहे.”

“ए मुली. तो एक खरा प्रतिभावान कलावंत आहे. माझ्यात प्रतिभा आहे असं मला वाटत नाही. असती तर बरं झालं असतं. पण प्रतिभेचं देणं कोणाला मिळालं आहे ते मला बघताक्षणी उमगतं. आणि मी त्या प्रतिभेचा मनापासून मान राखतो. प्रतिभा ही जगातील एक अद्भूत गोष्ट आहे. ज्याला ती लाभते तो तिच्या ओझ्याखाली दबून जातो. अशा माणसांना आपण सांभाळून घेतलं पाहिजे.”

मी एका बाजूला उभा होतो. त्यांच्या वादामुळे मला अवघडल्यासारखं झालं.

स्ट्रोव्हने एवढ्या आग्रहाने मला का बोलावून घेतलं होतं ते मला कळेना. त्याच्या बायकोची तर कोणत्याही क्षणी रडू कोसळेल अशी अवस्था झाली होती.

''तो प्रतिभावान आहे म्हणून काही मी त्याला आपल्याकडे आणू या असं म्हणत नाही. तो अतिशय आजारी आहे, त्याची देखभाल करणारं कोणी नाही, तो गरीब आहे. माणुसकीच्या नात्याने तरी त्याला आपल्याकडे आणू या.''

''आपल्या घरात मी त्याला कधीही पाऊल ठेऊ देणार नाही. कधीही नाही.''

स्ट्रोव्ह माझ्याकडे वळला.

''हा स्ट्रिकलँडच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे हे तिला समजावून सांग. तसल्या भिकार जागी त्याला राहू दिलं तर कसं होईल.''

''इथं त्याची काळजी घेणं त्यामानानं खूप सोपं आहे,'' मी म्हणालो. ''पण त्यात तुमची थोडी गैरसोय होईल. मला वाटतं त्याच्या सोबतीला रात्रंदिवस कोणी तरी राहिलं तर फार बरं होईल.''

''लाडके, थोडासा त्रास घ्यायला तू नाही म्हणणार नाहीस.''

''तो जर इथे आला तर मी निघून जाईन,'' ती चिडून म्हणाली.

''मी तुला ओळखतो. तुझं अंत:करण प्रेमळ आहे.''

''कृपा करून मला माझी राहूं दे. अशानं माझं डोकं फिरून जाईल.''

शेवटी तिच्या डोळयातून अश्रू ओघळू लागले. ती खुर्चीवर बसली आणि तिने आपले तोंड हाताने झाकून घेतले. तिचं अंग गदागदा हलू लागलं. डर्क तिच्या

शेजारी गुडघ्यावर बसला. त्याने तिला गोंजारत तिचं चुंबन घेतलं. तिला लाडक्या नावानं हाक मारली. त्याच्याही गालांवरून अश्रू ओघळू लागले. तिने डोळे पुसले आणि ती सावरून बसली.

“कृपा करून माझ्यावर जबरदस्ती करू नका,” ती शांतपणे म्हणाली, नंतर माझ्याकडे वळून हसण्याचा प्रयत्न करीत म्हणाली, “माझ्याबद्दल तुमचं काय मत आहे?”

स्ट्रोव्ह तिच्याकडे बावरून गेल्यासारखा बघत होता. त्याच्या कपाळावर आठ्यांचं जाळं होतं. त्याने त्याच्या लालचुटुक ओठांचा चंबू केला होता. एखाद्या रुसून बसलेल्या गोंडस मुलासारखा तो दिसत होता.

“म्हणजे तुझा नकार आहे तर?” त्याने तिला शेवटचं विचारलं. ती अगदी गळून गेली होती. तिचा चेहेरा म्लान दिसत होता.

“स्टुडियो तुमच्या मालकीचा आहे. इथली प्रत्येक वस्तू तुमची आहे. त्याला जर तुम्ही इथे आणायचंच ठरवलं असेल तर विरोध करणारी मी कोण?”

त्याचा चेहरा अचानक उजळला.

“म्हणजे तुझी संमती आहे. मला वाटलंच होतं. माझ्या लाडके.”

ती एकदम ताठ बसली. मोठ्या दु:खाने त्याच्याकडे पाहिलं. हातात हात गुंफून आपल्या छातीवर घेतले. जणू काही ती आपल्या हृदयातील असह्य धडधड दाबून ठेवण्याचा प्रयत्न करत होती.

“मी आजवर तुमच्याकडे माझ्यासाठी म्हणून काहीही मागितलेलं नाही.”

“जगात अशी एकही गोष्ट नाही की जी मी तुझ्यासाठी करणार नाही हे तुला माहित आहे.”

“मी भीक मागते पण स्ट्रिकलँडला इकडे आणू नका. दुसऱ्या कोणालाही आणलं तरी चालेल. अगदी चोर, दारूडा, रस्त्यावरचा भिकारी कोणीही चालेल. त्यांच्यासाठी मी काहीही आनंदाने करीन असं पाहिजे तर मी वचन देते. मी तुमच्या पाया पडते पण त्या स्ट्रिकलँडला इथे आणू नका.”

“पण का?”

“मला त्याची भीती वाटते. का ते मला सांगता येत नाही. पण त्याच्यात असं काही तरी आहे त्याची मला भयंकर भीती वाटते. तो आपल्याला काही तरी दगाफटका करेल. काय ते सांगता येत नाही पण मला आतून नक्की जाणवतंय. तुम्ही त्याला इथे घेऊन आलात तर त्याचा शेवट काही तरी भयंकर वाईट होईल.”

“काही तरीच काय बोलतेस!”

“नाही. मी बरोबर सांगतेय. काहीतरी भयंकर वाईट घडणार आहे असं माझं मन मला सांगतय.”

“आपण केलेल्या चांगूलपणाचं फळ असं वाईट कसं मिळेल?”

तिला धाप लागली होती. ती भयंकर घाबरली होती. तिच्या मनात काय चाललं होतं ते मलाही कळत नव्हतं. कसल्यातरी अनामिक भीतीने तिला घेरलं होतं. तिचा स्वत:वरील ताबा सुटला होता. सहसा ती शांत असायची म्हणून तिचं घाबरणं आश्चर्यकारक होतं. स्ट्रोव्ह तिच्याकडे गोंधळून पाहत होता.

"तू माझी पत्नी आहेस. इतर कोणाहीपेक्षा माझं तुझ्यावर जास्त प्रेम आहे. तुझ्या संमतीशिवाय मी कोणालाही इथे आणणार नाही."

तिने आपले डोळे मिटून घेतले. एक क्षणभर मला वाटलं की तिला मूर्च्छा येईल. मी थोडी घाई केली. ती एवढी भावनाप्रधान असेल असं मला वाटलं नव्हतं. स्ट्रोव्हच्या आवाजाने त्या शांततेचा भंग केला.

"तू सुद्धा एकदा एका संकटातून गेली होतीस. तेव्हा तुला अशीच कोणीतरी मदत केली नव्हती का? अशी मदत किती मौल्यवान असते ते तुला ठाऊक असेलच. संधी मिळेल तेव्हा त्याची परतफेड करावी असं तुला वाटत नाही का?"

ते अगदी साधे शब्द होते. पण त्यात कळकळीचा आग्रह होता. मी हसलो. त्या शब्दांचा ब्लांश स्ट्रोव्हवर झालेल्या परिणामाने मला आश्चर्याचा धक्का बसला. त्याला त्यात एवढं अवघडल्यासारखं का वाटावं ते मला कळलं नाही. तिचे गाल क्षणभर आरक्त झाले पण नंतर ती पांढरी फटक पडली. जणू काही एका क्षणात तिच्या शरीरातील सर्व रक्त आटून गेलं असावं. शक्तिपात झाल्यासारखे तिचे हात निर्जीव दिसू लागले. भूतासारखी प्रेतवत दिसू लागली. तिचं शरीर शहारलं. तिचं अस्तित्व सोडता स्टुडियोत भयाण शांतता पसरली. मी भयचकीत झालो.

"तुम्ही स्ट्रिकलँडला आणा. मी माझ्या प्रयत्नांची शिकस्त करीन."

"माझ्या लाडके." तो हसला.

त्याला तिला कवेत घ्यायचं होतं. पण ती त्याच्यापासून दूर झाली.

"परक्यांसमोर प्रेमाचं प्रदर्शन करू नका. मला काही तरीच वाटतं." ती म्हणाली. तिचं वागणं पुन्हा ताळयावर आलं. थोड्या वेळापूर्वी ती एवढी हादरून गेली होती याच्यावर कोणाचा विश्वास बसला नसता.

# २६

दुसऱ्याच दिवशी आम्ही स्ट्रिकलँडला घेऊन आलो. येण्यासाठी त्याला तयार करायला आम्हाला याहून जास्त चिकाटी दाखवावी लागली. स्ट्रोव्हची आर्जवं आणि माझी जबरदस्ती यांचा विरोध करायला त्याच्यात शारिरीक ताकद उरली नव्हती. त्याची कुरबुर चालू असतानाच आम्ही त्याला कपडे घातले, जिन्यावरून खाली नेलं आणि कॅबमध्ये बसवून सरळ स्ट्रोव्हच्या स्टुडियोत नेलं. स्टुडियोत पोचेपर्यंत तो एवढा थकला होता की एक शब्दही न बोलता आम्ही घातलेल्या बिछान्यात तो आडवा झाला. तो सहा आठवडे अंथरूणाला खिळून होता. मध्ये एकदा तो काही तासांचाच सोबती असावा असं वाटत होतं. त्या डचमनच्या अथक प्रयत्नांमुळेच तो त्यातून बाहेर आला याची मला खात्री आहे.

त्याच्या एवढा नाठाळ रुग्ण मी पाहिला नव्हता. याचा अर्थ असा नाही की तो ऐकत नव्हता. उलट त्याने कसलीच तक्रार चुकूनही केली नव्हती. त्याच्या कसल्याही मागण्या नव्हत्या. त्या दृष्टीने तो अगदी शांत असे. पण आम्ही त्याची जी शुश्रुषा करत होतो त्याची त्याला चीड येत असे. त्याला काही विचारलं तर तो ते हसण्यावारी नेई, नाक मुरडे नाहीतर चेष्टा करून उडवून लावी. मला त्याची अगदी किळस आली होती. तो थोडा बरा झाल्यावर मी त्याला सरळ तसं सांगितलंही.

“गो टू हेल.” त्याने त्याची प्रतिक्रिया थोडक्यात व्यक्त केली.

डर्क स्ट्रोव्ह स्वत:चं सगळं काम सोडून स्ट्रिकलँडच्या शुश्रूषेत अहोरात्र गुंतला होता. त्याने मोठ्या सहानुभूतीने सगळी काळजी घेतली. त्याच्या हाताला गुण होता. डॉक्टरने सांगितलेली सगळी औषधं तो मोठ्या युक्ती-प्रयुक्तीने त्याला पाजे. त्याची कोणतीही गोष्ट करण्यात त्याला त्रास वाटला नाही. स्वत:च्या गरजांपुरते त्याच्याकडे पुरेसे पैसे असले तरी वायफळ खर्च त्याला परवडण्यासारखा नव्हता. पण स्ट्रिकलँडसाठी तो वारेमाप पैसे खर्च करीत असे. स्ट्रिकलँड खाण्यापिण्याच्या

बाबतीत अगदी लहरी होता. त्याच्या मनाला आलं तर असावं म्हणून तो महागडी फळफळावळ आणून ठेवी. त्याला चांगला पौष्टिक आहार तो अगदी नेटाने खाऊ घाली. स्ट्रिकलँडचा सगळा उद्धटपणा त्याने खपवून घेतला. तो नुसताच धुसपुसत असेल तर तो लक्ष देत नसे. फारच झालं तर तो हसण्यावारी नेई. जर एखाद्या दिवशी त्याची तब्येत जरा बरी असेल तर त्याला स्ट्रोव्हच्या फिरक्या घ्यायला उत यायचा. स्ट्रोव्हसुद्धा त्याला फिरक्या घ्यायला आपण होऊन निमित्त पुरवायचा आणि पेशंटमध्ये किती सुधारणा झाली आहे ते दाखवायला तो माझ्याकडे बघून डोळे मिचकवायचा. स्ट्रोव्हने त्याच्यासाठी जे केलं त्याला तोड नव्हती.

पण ब्लांशने मात्र कमाल केली होती. तिने आपण एक चांगली नर्स आहोत हे सिद्ध केलं. एवढंच नव्हे तर ती आपलं काम अगदी मन लावून करत होती. स्ट्रिकलँडला घरी आणण्याच्या ती एवढ्या विरोधात होती हे कोणाला सांगून खरं वाटलं नसतं. ती त्याचा बिछाना नीट करायची, त्याला आंघोळ घालायची. आजाऱ्यासाठी जे काही करणं गरजेचं होतं ते सगळं ती आपण होऊन करत असे. ती स्ट्रिकलँडचा एवढा तिरस्कार करत होती हे तिने आपल्या वागण्यातून चुकूनसुद्धा दाखवलं नाही. रात्री ती नवऱ्याबरोबर आळीपाळीने स्ट्रिकलँडच्या उशाशी बसून राही. रात्रीच्या अंधारात तिला काय वाटत असेल. स्ट्रिकलँडची हाडं वर आली होती आणि त्याच्या केसांच्या जटा झाल्या होत्या. त्याचे पांढरेफटक डोळे प्रेतवत दिसत होते.

“तो रात्री कधी तुझ्याशी बोलतो का.”

“कधीही नाही.”

“तुला पूर्वीइतकाच त्याचा राग येतो?”

“जास्तच.”

तिने थंडपणे माझ्याकडे पाहिलं. तिचा चेहेरा एवढा शांत होता की ती पूर्वी एकदा रागाने बेभान झाली होती यावर विश्वास ठेवणं कठीण होतं.

“त्याने तुझे कधी साधे आभार तरी मानले आहेत का?”

“नाही.” ती हसून म्हणाली.

“तो माणूसघाणा आहे.”

“त्याची मला किळस वाटते.”

स्ट्रोव्ह मात्र तिच्यावर खूश होता. त्याने जबरदस्तीने जे ओझे तिच्यावर लादले होते ते ती काम ती मनापासून करत होती. त्याचं उतराई कसं व्हावं ते त्याला कळत नव्हतं.

पण ब्लांश आणि स्ट्रिकलँडच्या वागण्यातील बदलाने तो थोडा बुचकळयात पडला होता.

“तुला महित आहे का, कित्येक तास ती दोघं एकमेकांसमोर बसून असतात, एकही शब्द न बोलता.”

स्ट्रिकलँडची तब्येत चांगलीच सुधारली होती. एकदा मी त्यांच्या स्टुडियोत गेलो होतो. डर्क आणि मी गप्पा मारत होतो. ब्लांश काहीतरी शिवत होती. मला वाटतं तिच्या हातात बहुतेक स्ट्रिकलँडचा शर्ट असावा. तो उताणा पडून होता. अगदी गप्प होता.

त्याची नजर ब्लांशवर खिळली होती. काही तरी विचित्र खेळ चालू असावा असं मला जाणवलं. तो आपल्याकडे बघत आहे हे जाणवल्यावर तिने तिची नजर वर केली आणि एक क्षणभर सरळ त्याच्या नजरेला नजर भिडवली. तिच्या

डोळ्यातील विलक्षण चमकेचा अर्थ मला कळला नाही. धोक्याची जाणीव ...? दुसऱ्या क्षणी स्ट्रिकलँडने त्याची नजर काढून घेतली आणि तो छताकडे पाहू लागला. पण ती त्याच्याकडेच पाहत होती. त्याचा अर्थ लावणं कठीण होतं.

थोड्या दिवसात स्ट्रिकलँड उठून उभा राहू लागला. त्याचा हाडांचा सापळा झाला होता. त्याच्या अंगावरचे कपडे बुजगावण्याला पांघरलेल्या चिंध्यांसारखे लोंबकळताना दिसत होते. वेडीवाकडी वाढलेली दाढी, लांब केस. आडव्या बांध्याच्या देहावरील मांस झडून गेल्यामुळे त्याची अंगकाठी डोळ्यात भरत असे. पण त्या अवस्थेतही तो फारसा कुरूप दिसत नव्हता ही एक आश्चर्याची गोष्ट होती. त्या अवतारातसुद्धा त्याचा मूळचा डौल लपत नव्हता. त्याला बघून माझ्या मनात काय आलं ते शब्दात व्यक्त करणं कठीण आहे. त्याच्या डोळ्यात सरळ सरळ आव्हान होतं. निव्वळ शारिरीक वासनेच्या पलीकडे जाणारं. कोणत्या तरी आदिम शक्तींनी त्याचा ताबा घेतला असावा. निसर्गातील गूढ शक्तींचं दैवतीकरण सटीर आणि फॉनसारख्या अर्ध मानवी आणि अर्ध पाशवी देवतांच्या रुपात ग्रीकांनी आपल्या पुराणकथात केलं होतं. त्या शापित गूढ शक्ती त्याच्या शरीरात वास करून असाव्यात. मला मार्स्या या ग्रीक पुराणातील देवतेची आठवण झाली. बांसरी वादनात अपोलोला आव्हान दिल्यामुळे त्याने मार्स्याला जिवंत सोलून त्याचं कातडं पाईनच्या झाडाला टांगून ठेवलं होतं. ते बांसरीचे व्याकूळ स्वर स्ट्रिकलँडला साद घालत असावेत. ज्या वाटेने गेल्यास शेवटी यातना आणि निराशाच पदरी पडणार होती अशी अनवट वाट त्याला खुणावत होती. सुष्ट काय आणि दुष्ट काय हे ओळखता येत नाही अशा आदिम शक्तीने त्याचा संपूर्ण ताबा घेतला होता.

चित्र काढण्याइतपत त्याच्यात सुधारणा झाली नव्हती. तो स्टुडियोत शांतपणे बसलेला असे. तो कोणती स्वप्नं पाहत असावा, त्याच्या मनात काय विचार येत असावेत ते एक परमेश्वरालाच ठाऊक. तो वाचायचा ती पुस्तकंसुद्धा असंबद्ध विषयांवरची असत. वाचताना तो लहान मुलांसारखा ओठ हलवत पुटपुटत असे.

स्ट्रोव्हच्या स्टुडियोत चांगली आरामखुर्ची असताना तो तिपाईवर किंवा बिनहातांच्या खुर्चीवर बसलेला असे.

शारिरीक सुखसोई बद्दल एवढा उदासीन मनुष्य यापूर्वी माझ्या पाहण्यात आला नव्हता.

## २७

दोन तीन आठवडे गेले. मला काही काम नव्हतं म्हणून एक दिवस मी सुट्टी घेतली आणि लुवरला गेलो. मला जी पेंटींग आवडायची त्या पेंटींगसमोर जाऊन मी उभा राहिलो आणि माझ्या कल्पनाशक्तीचं वारू मोकाट सोडलं. गॅलेरीत रमतगमत भटकत असताना मला अचानक स्ट्रोव्ह दिसला. त्याचा तो गोल गुबगुबीत देह आणि पडलेला दु:खी चेहेरा पाहून मला हसू आलं. पाण्यात बुडता बुडता वाचलेल्या एखाद्या माणसासारखा त्याचा अवतार दिसत होता. कपडे घामाने थबथबलेले, चेहेरा घाबरा-गुबरा आणि दु:खी-कष्टी, तरीही बघता क्षणी हसू फुटेल असा. त्याने वळून माझ्या दिशेने पाहिलं पण त्याला मी दिसत नव्हतो. त्याच्या चष्म्यातून त्याचे टपोरे निळे डोळे केविलवाणे दिसत होते.

“स्ट्रोव्ह,” मी हाक मारली.

तो भानावर येऊन बापूडवाणा हसला.

“तू अशा अवतारात का भटकत आहेस?”

“बरेच दिवस मी लुवरमध्ये आलो नव्हतो. वाटलं बघावं काय नवीन आलं आहे का.”

“पण तू म्हणाला होतास की मला या आठवड्यात एक चित्र पूर्ण करायचं आहे म्हणून.”

“माझ्या स्टुडियोत बसून स्ट्रिकलँड चित्रं काढतोय.”

“असं का?”

“मीच त्याला सुचवलं. स्वत:च्या स्टुडियोत जाण्याएवढा तो अजून बरा झालेला नाही. मला वाटलं आम्हा दोघांना तेथे काम करता येईल. या विभागातले बरेच चित्रकार एकच स्टुडियो दोघे तिघे मिळून वापरतात. मला वाटलं असं करण्यात दोघांना मजा येईल. काम करून दमल्यावर गप्पा मारायला कोणी तरी बरोबर असला तर बरं होईल.”

हे त्याने अगदी सावकाश एक एक वाक्य तोडत सांगितलं. मध्येच तो अवघडल्यासारखा होऊन गप्प बसे. हे सांगताना त्याचे डोळे भरून आले होते.

“काय झालं नीट सांग मला.”

“स्ट्रिकलँडला तो काम करत असताना स्टुडियोत दुसरं कोण असलेलं चालत नाही.”

“तेल लावत गेला तो. अरे स्टुडियो तुझा आहे. तो त्याचं काय ते बघून घेईल.”

तो थोडा वेळ थांबला आणि किंचीत लाजला. भिंतीवरच्या एका चित्राकडे दु:खी नजरेने बघत म्हणाला.

“तो मला चित्र काढायला देत नाही. त्याने मला घालवून दिलं.”

“तूच का नाही त्याची गचांडी धरून त्याला स्टुडियो बाहेर काढलंस?”

“त्याने मला धक्के देऊन बाहेर काढलं. मी त्याच्याशी धक्काबुक्की करू शकलो नाही. त्याने मला ढकलून माझी हॅट बाहेर फेकली आणि धाडकन दार लावून घेतलं.”

स्ट्रिकलँडची एवढी मजल. मी भयंकर भडकलो. मला डर्क स्ट्रोव्हची किंव आली.

मी चिडलो होतो तरीही मला हसल्यावाचून राहवलं नाही.

“तुझी बायको काय म्हणाली?”

“ती बाजारात गेली होती.”

“तो तिला तरी घरात येऊ देईल का?”

“मला सांगता येणार नाही.”

मी स्ट्रोव्हकडे गोंधळून पाहिलं. मास्तरांनी शिक्षा केलेल्या शाळकरी मुलासारखा तो दिसत होता.

“तुझ्यावतीने मी स्ट्रिकलँडची गचांडी धरून त्याला बाहेर काढू का?”

तो थोडा अडखळला. त्याचा घामेजलेला चेहेरा लाल झाला.

“नको. सध्यातरी तू काही करू नकोस.”

तो मान हलवत निघून गेला. त्याला माझ्याशी बोलायचं नव्हतं त्याच्या मागे नक्कीच काहीतरी कारण असलं पाहिजे. खरं काय कारण होतं ते मला तेव्हा कळलं नाही.

# २८

एका आठवड्याने उलगडा झाला. रात्रीचे दहा वाजले होते. जवळच्या रेस्तोराँमध्ये नुकतेच जेवल्यानंतर घरी येऊन काहीतरी वाचत बसलो होतो. तेवढ्यात घंटेच्या किणकिणाटाने मी दचकलो. मी कॉरीडॉरमध्ये जाऊन दरवाजा उघडला. स्ट्रोव्ह समोर उभा होता.

"मी आत येऊ का?"

जिन्यातील अंधूक प्रकाशात मला तो नीट दिसत नव्हता. पण त्याच्या बोलण्यावरून तो दारू प्याला असावा असं वाटत होतं. तो मितपान करणारा आहे हे मला माहित होतं त्यामुळे मला धक्का बसला. मी त्याला घेऊन आत गेलो आणि त्याला बसायला सांगितलं.

"बरं झालं तू घरी सापडलास."

"काय झालं?" त्याच्या घाईने मी चकित झालो होतो.

आत आल्यावर मी त्याला नीट पाहू शकलो. त्याची राहणी तशी नीटनेटकेपणाची होती. पण आज मात्र त्याचे कपडे चुरगळलेले होते. तो दारू पिऊन आला असावा याची माझी खात्री झाली आणि मी हसलो. त्याच्या या अवस्थेवर मी त्याची फिरकी घेणार होतो.

"कुठे जावं ते मला कळत नाही," तो एकदम बोलला. "मी एकदा येऊन गेलो पण तू नव्हतास."

"मी जेवायला उशीरा जातो."

माझं मत बदललं. त्याच्यावर जो परिणाम झाला होता तो दारूमुळे नव्हता. त्याचा चेहेरा सहसा गुलाबी असायचा. आज तो पांढरा फटक पडला होता. त्याचे हात कापत होते.

“काय विशेष झालं?”

“माझी बायको मला सोडून गेली.”

त्याच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. त्याने थोडा दम घेतला. त्याच्या डोळयातून अश्रू वाहू लागले. काय बोलावं ते मला कळेना. त्याच्या स्ट्रिकलँडवरच्या उतू जाणाऱ्या अतिरेकी प्रेमामुळे असं घडण्याची कधीतरी शक्यता होतीच. त्यात त्याच्या माणूसघाण्या, कृतघ्न वृत्तीमुळे तिच्या सहनशक्तिचा एक दिवस कडेलोट झाला असावा आणि रागाच्या भरात तिने स्ट्रिकलँडला बाहेर काढायला सांगितलं असावं. ती वरवर शांत वाटत असली तरी अति झाल्यावर शिंगावर घेण्याची हिंमत तिच्यात होती. स्ट्रोव्हने हट्टाने नकार दिल्यावर परत न येण्याची शपथ घेऊन ती सरळ स्टुडियोतून बाहेर पडली असेल. तो बिचारा जाड्या एवढा बावरून गेला होता की हसणं मला प्रशस्त वाटलं नाही.

“मित्रा एवढा हताश होऊ नकोस. ती परत येईल. बायका चिडल्यावर जे बोलतात ते एवढं मनावर घ्यायचं नसतं.”

“तुझ्या नीट लक्षात आलेलं दिसत नाही. तिचं स्ट्रिकलँडवर प्रेम बसलंय.”

“काय म्हणतोस?” आता मात्र मला धक्का बसला होता. ही कल्पनाच एवढी विचित्र होती की असं काही होईल यावर विश्वास बसणं कठीण होतं. “तुला वेड लागलं आहे का? स्ट्रिकलँडवर तू जळत तर नाहीस ना?” मी हसत हसत विचारलं. “तुला ठाऊक आहे की तिला तो मुळीच आवडत नाही.”

“मी काय म्हणतो ते तुला समजत नाही.”

“तू एक महामूर्ख आहेस,” मी थोडं भडकूनच म्हणालो. “मी तुला थोडी व्हिस्की आणि सोडा देतो तो घे, बरं वाटेल.”

स्वत:ला आत्मपीडा, मनस्ताप करून घेण्यात लोकांना काय आनंद मिळतो देव जाणे. त्यासाठी लोक काय काय शक्कल लढवत असतात. आता या मूर्खाच्या डोक्यात गेलं होतं की त्याच्या बायकोचं स्ट्रिकलँडवर प्रेम आहे. घोडचुका करण्यात त्याचा हात कोणी धरला नसता. त्यानेच तसं तिला तोंडावर सांगितलं असेल तर तिचं डोकं फिरणं साहजिकच होतं. कदाचित त्याच्या मनातील संशयाला तिने जाणूनबुजून खतपाणी घातलं असेल.

“हे बघ, आपण स्टुडियोत जाऊ या. तूझी जर काही चूक झाली असेल तर तू जरा पडतं घे. मला वाटतं तू तुझ्या बायकोची अशी बदनामी करयला गेलास तर तिला ते सहन होणार नाही.”

“मी स्टुडियोत परत कसा जाऊ?” तो चिंतेने म्हणाला. “ती दोघं तिथे आहेत. मी स्टुडियो त्यांना दिला आहे.”

“याचा अर्थ बायको तुला सोडून गेली असा नसून तू तुझ्या बायकोला सोडून दिलं आहेस असा होतो.”

“कृपा करून माझ्याशी असं तोडून बोलू नकोस.”

अजूनही त्याचं म्हणणं मी गांभीर्याने घेत नव्हतो. तो काय म्हणत आहे ते क्षणभर माझ्या लक्षात आलं नव्हतं. तो खरोखरच गंभीर पेचात सापडलेला दिसत होता.

‘‘तू माझ्याशी बोलायला इकडे आला आहेस ना. तर मग मला सगळं सांगून टाक काय झालं ते.’’

‘‘आज दुपारी हे सगळं माझ्या सहनशक्तीच्या पलीकडे गेलं. मी सरळ स्ट्रिकलँडकडे गेलो आणि त्याला सांगितलं. तू आता आपल्या घरी जाण्याइतपत बरा झाला आहेस. मला माझा स्टुडियो हवा आहे.’’

‘‘स्ट्रिकलँड सोडून दुसरा कोण असता तर एवढं स्पष्ट सांगण्याची वेळच आली नसती,’’ मी म्हणालो. ‘‘यावर तो काय म्हणाला?’’

‘‘तो पहिल्यांदा थोडा हसला; तो कसा हसतो ते तुला माहितच आहे. त्याला गंमत वाटते म्हणून नव्हे तर समोरच्याला मूर्ख समजून तो हसत असतो. त्याने त्याचं सामान गोळा करायला सुरवात केली. त्याला ज्या गोष्टींची गरज लागेल असं मला वाटलं त्या गोष्टी मी त्याला आतल्या खोलीतून आपण होऊन आणून दिल्या. तिकडे ढुंकुनही न बघता त्याने ब्लांशला हाक मारून तिच्याकडे एक मोठा कागद आणि दोरा मागितला.’’

स्ट्रोव्ह श्वास घ्यायला थांबला. त्याला चक्कर वगैरे येत असावी असं मला वाटलं. गोष्टी या थराला गेल्या असतील असं मला मुळीच वाटलं नव्हतं.

‘‘ती पांढरी फटक पडली होती. तिने कागद आणि दोरा आणला. त्याने त्याच्या चीज वस्तू कागदात बांधून घेतल्या. तो एक शब्दही बोलला नाही. तो फक्त शीळ घालत होता. त्याने आम्हा दोघांकडे ढुंकुनही पाहिलं नाही. त्याच्या डोळयात मिश्कील हसू होतं. माझ्या पोटात गोळा आला होता. काहीतरी अघटीत होईल अशी मला भीती वाटत होती. मी त्याला बोललो ते बोलायला नको होतं असं मला राहून राहून वाटायला लागलं. त्याने त्याची हॅट कुठे आहे ते पाहिलं. नंतर ब्लांश

बोलली; 'मी स्ट्रिकलँडबरोबर जात आहे, मला तुमच्याबरोबर राहायचं नाही.' मी तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला पण तोंडातून शब्द फुटेना. जे काही होत आहे त्याच्याशी आपला संबंधच नाही अशा रितीने तो शीळ घालत होता.''

स्ट्रोव्हने दम खाल्ला आणि घाम पुसला. मी अजूनही काही बोललो नव्हतो. तो जे काय बोलत होता त्याच्यावर आता माझा विश्वास बसायला लागला. मला जबरदस्त धक्का बसला. पण तो काय सांगतोय त्याचा मला थांग लागत नव्हता.

त्याच्या गालावरून अश्रू ओघळायला लागले. आवाज कापू लागला. तो तिच्याजवळ गेला, त्याने तिचे हात हातात घेतले पण तिने त्याला झिडकारलं. तिने जाऊ नये म्हणून त्याने तिची आर्जवं केली, तिच्या नाकदुऱ्या काढल्या, त्याचे तिच्यावर किती प्रेम आहे ते सांगितलं. तिच्या प्रेमासाठी केलेल्या गोष्टींची, आयुष्यातील सुखद क्षणांची आठवण करून दिली. त्याला ना तिचा राग येत होता ना तिला दोष द्यायचा होता.

''कृपा करून मला शांतपणे जाऊं दे. माझं स्ट्रिकलँडवर प्रेम आहे हे तुम्हाला समजत नाही का? ते जेथे जातील तेथे त्यांच्या पाठोपाठ मी जाणार आहे.''

''त्याच्याबरोबर जाऊन तू कधीच सुखी होऊ शकणार नाहीस याचा तू विचार केला आहेस का? स्वत:च्या भल्यासाठी तरी त्याच्याबरोबर जाऊ नकोस. त्याच्याबरोबर गेलीस तर तुझ्या नशीबात काय वाढून ठेवलं आहे याची तुला कल्पना नाही.''

''हा सगळा तुमचाच दोष आहे. तुम्हीच त्यांना अट्टाहासाने येथे घेऊन आलात.''

नंतर त्याने आपला मोर्चा स्ट्रिकलँडकडे वळवला.

“तिच्यावर दया कर. हा वेडपटणा तिला करू देऊ नकोस.”

“तिला जे वाटेल ते करायला तिची ती मुखत्यार आहे. मी तिच्यावर कोणतीही जबरदस्ती केलेली नाही.” स्ट्रिकलँड म्हणाला.

“माझा निर्णय झालेला आहे.” ती हळू आवाजात म्हणाली.

स्ट्रिकलँडच्या शांतपणामुळे स्ट्रोव्हचा स्वत:वरील उरला सुरला ताबा सुटला. काय होत आहे ते कळण्याच्या आत त्याने स्ट्रिकलँडच्या अंगावर झेप घेतली. स्ट्रिकलँड धडपडला. आजारी होता तरी तो मुळचा मजबूत होता. त्याने एका क्षणात त्याला चिलटासारखं झटकून टाकलं. दुसऱ्या क्षणी स्ट्रोव्ह जमिनीवर आडवा झालेला होता.

“ए येडपट, गंमत वाटली की काय तुला?” स्ट्रिकलँड म्हणाला.

स्ट्रोव्ह सावरून उठला. त्याने पाहिलं. त्याची बायको शांतपणे उभी होती. तिच्या देखत त्याचं हसं झाल्यामुळे त्याच्या अपमानात भर पडली. धडपडीत त्याचा चष्मा उडाला होता. चष्मा डोळयावर नसल्याने तो कुठे पडला आहे ते त्याला दिसेना. ती पुढे झाली आणि तिने शांतपणे चष्मा उचलून त्याच्या हातात दिला. त्याच्यावर कोसळलेल्या दु:खाची त्याला एकदम जाणीव झाली. रडल्याने आपण जास्तच हास्यास्पद दिसू याची त्याला कल्पना होती तरीही त्याला हमसाहमशी रडू फुटलं. त्याने आपलं तोंड दोन्ही हातात लपवलं. ब्लांश आणि स्ट्रिकलँड न बोलता आपापल्या जागी उभे होते.

“ओ माय डियर,” तो स्फुंदत स्फुंदत म्हणाला, “माझ्यावर थोडी तरी दया कर.”

''डर्क, माझा नाईलाज आहे.''

''कोणावर नव्हे इतकं मी तुझ्यावर प्रेम केलं. माझ्या हातून काही चुकलं असेल तर मला तसं का सांगितलं नाहीस? मी सुधारणा केली असती. मला जे शक्य होतं ते सगळं मी तुझ्यासाठी केलं आहे.''

तिने उत्तर दिलं नाही. तिचा चेहरा अविचल होता. त्याच्या रडगाण्याचा तिला कंटाळा आला आहे हे त्याच्या लक्षात आलं. तिने तिचा कोट आणि हॅट घातली. ती दरवाज्याकडे गेली. दुसऱ्या क्षणी ती निघून जाईल हे त्याच्या लक्षात आलं. त्याने पटकन पुढे होऊन तिची वाट अडवली आणि स्वत:चा उरला सुरला आत्मसन्मान गुंडाळून ठेवत तिचे हात हातात घेऊन तिच्या समोर गुडघे टेकून बसला.

''माझ्या लाडके, जाऊ नकोस. तुझ्याशिवाय जगणं मला अशक्य होईल. मी मरून जाईन. माझं जर काही चुकलं असेल तर मला माफ कर. मला आणखी एक संधी दे. तुला सुखी करण्यासाठी माझी काहीही करण्याची तयारी आहे.''

''मिस्टर डर्क स्ट्रोव्ह, कृपा करून उठून उभे राहा. आणखीन शोभा करून घेऊ नका.''

तो लटपटत उभा राहिला, पण तरीही तो तिला जाऊ द्यायला तयार नव्हता.

''तुम्ही कुठे जात आहात?'' तो घाईघाईत म्हणाला. ''स्ट्रिकलँड राहातो ती जागा कशी आहे ते तुला माहित नाही. तू तेथे एक क्षणसुद्धा राहू शकणार नाहीस. त्यापेक्षा नरक परवडला.''

''मला त्याची पर्वा नाही तर तुम्ही का एवढी चिंता करता.''

‘‘एक मिनीट थांब. मला बोलूं दे. मला शेवटची संधी देशील ना.’’

‘‘त्याचा काही फायदा होणार नाही. माझा निर्णय पक्का आहे. तुम्ही काहीही सांगितलंत तरी त्यात बदल होणार नाही.’’

त्याने आवंढा गिळला. हात छातीवर ठेवले.

‘‘मी तुला तुझा निर्णय बदलायला सांगत नाही. पण एक मिनीट मी काय सांगतो ते नीट लक्ष देऊन ऐक. एक शेवटची विनंती आहे, नाही म्हणू नकोस.’’

ती थबकली. तिने त्याच्याकडे एकवार पाहिलं. तिची एरवीची पारदर्शी नजर आज कोरडी होती. ती स्टुडियोत आली आणि टेबलावर हात टेकून उभी राहिली.

‘‘हं. बोला, काय ते.’’

स्ट्रोव्हने मोठ्या मुश्किलीने स्वत:ला सावरलं.

‘‘नुसती हवा खाऊन राहता येत नाही याचा तू थोडा विचार कर. स्ट्रिकलँडकडे एक दमडीसुद्धा नाही.’’

‘‘मला माहित आहे.’’

‘‘तुझी उपासमार होईल. त्याला बरं व्हायला इतके दिवस का लागले माहित आहे? त्याला दोन वेळ खायचेसुद्धा फाके पडत होते. तो अर्धपोटी होता.’’

‘‘मी पैसे कमवीन.’’

‘‘कसे?’’

“मला ठाऊक नाही, काही तरी रस्ता सापडेल.”

त्या डचमनच्या डोक्यात एक भयंकर विचार येऊन गेला आणि त्या कल्पनेने तो शहारला.

“मी आता जाऊ का?”

“आणखी एक सेकंद थांब.”

त्याने स्टुडियोवरून एक नजर फिरवली. त्याचं त्या स्टुडियोवर मनापासून प्रेम होतं. तिच्या अस्तित्वाने त्या स्टुडियोला घरपण आलं होतं. त्याने क्षणभर डोळे मिटून घेतले. नंतर त्याने तिच्याकडे एक दीर्घ दृष्टीक्षेप टाकला. जणू काही तो तिची प्रतिमा आपल्या नजरेत साठवून ठेवत होता. तो उठला आणि त्याने आपली हॅट घेतली.

“त्यापेक्षा मीच जातो.”

“तुम्ही?”

ती गोंधळली. त्याच्या म्हणण्याचा अर्थच तिला कळेना.

“त्या घाणेरड्या, अंधाऱ्या पोटमाळ्यावर तुला राहवं लागेल ही कल्पनाच मला सहन होत नाही. हे घर जेवढं माझं आहे तेवढंच तुझंही आहे. इथे तुला कसलाही त्रास होणार नाही. कमीत कमी तुझी उपासमार तरी होणार नाही.”

तो कपाटाकडे गेला आणि खणातून त्याने पैशाच्या काही नोटा काढल्या.

“माझ्याकडे असलेल्या पैशातील अर्धे तुला घे.”

त्याने पैसे टेबलावर ठेवले. त्याची बायको किंवा स्ट्रिकलँड कोणीच काही बोललं नाही. त्याने आणखी काही गोष्टी गोळा केल्या.

''माझ्या कपड्यांचं गाठोडं बांधून कन्सर्जकडे ठेव. मी उद्या येऊन घेऊन जाईन.''

त्याने हसण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. ''गुड बाय माय डियर. आजपर्यंत जे काही सुखाचे क्षण मला दिलेस त्याबद्दल तुझा आभारी आहे.''

तो दरवाजा लावून बाहेर पडला. बंद दरवाज्याआड स्ट्रिकलँडने हातातील हॅट टेबलावर ठेवून शांतपणे सिगरेट फुंकायला सुरवात केली असेल असं दृष्य माझ्या मन:चक्षूंसमोर तरळू लागलं.



Artist: Paul Gauguin Title: Portrait de Madeleine_Bernard, Date: 1888,

Medium: oil on canvas, Source: Wikipedia

## २९

स्ट्रोव्हने जे काही मला सांगितलं होतं त्यावर विचार करीत मी थोडा वेळ शांत बसलो. त्याचा पुचाटपणा माझ्या पचनी पडत नव्हता. मी त्याला तसं सरळ सांगितलंही.

“स्ट्रिकलँड कसा आहे, कसा रहात होता ते आपल्या दोघांनाही चागलंच माहित आहे.” तो थरथर कापत होता.

“अशा परिस्थितीत मी तिला त्याच्या घरी कसं जाऊ देणार? अशक्यच होतं.”

“तो तुझा प्रश्न आहे.”

“तू माझ्या जागी असतास तर काय केलं असतंस?”

“ती डोळे उघडे ठेऊन गेली. त्यात तिची कोणती गैरसोय होणार असेल तर तिचं तिने बघून घेतलं असतं.”

“तू म्हणतोस ते खरं आहे. पण तुझं तिच्यावर प्रेम नाही म्हणून तू असं म्हणू शकतोस.”

“तुझं अजून तिच्यावर प्रेम आहे?”

“पूर्वीपेक्षा जास्तच. स्ट्रिकलँड हा असा माणूस आहे की कोणत्याही स्त्रीला त्याच्यापासून सुख मिळणार नाही. मिळालं तरी ते जास्त दिवस टिकणार नाही. मी तिला कधीही अंतर देणार नाही हे तिला कळायला हवं.”

‘‘याचा अर्थ तू तिला परत घ्यायला तयार आहेस?’’

‘‘अलबत. तिलासुद्धा मी हवा असणार. उद्या त्याने तिला झिडकारलं, त्यांचं भांडण झालं, त्याने तिचा अपमान करून तिला घालवून दिलं, तिच्या प्रेमाचा अव्हेर केला, तिचं हृदय विदीर्ण झालं, ती एकाकी झाली अशा वेळी तिला जायला कोणतीही जागा नाही असं व्हायला नको.’’

त्याच्यात पश्चातापाचं कसलंही चिन्ह दिसत नव्हतं. त्याच्या पुचाटपणाची मला चीड आली. कदाचित माझ्या मनातलं त्यानं ओळखलं असावं.

‘‘माझं तिच्यावर जसं प्रेम आहे तसं तिने माझ्यावर करावं अशी माझी अपेक्षा नाही. स्त्रियांनी ज्याच्या प्रेमात पडावं असा पुरूष मी नाही याची मला कल्पना आहे. ती स्ट्रिकलँडच्या प्रेमात पडली याचाही मी तिला दोष देत नाही.’’

‘‘तुझ्या इतका स्वाभिमानशून्य पुरूष मला अजून भेटलेला नाही.’’

‘‘मी तिच्यावर स्वत:पेक्षा जास्त प्रेम करतो. प्रेमात स्वाभिमान येतो तेव्हा त्याचं स्वत:वरचं प्रेम जास्त असतं. लग्न झालेला पुरूष नेहमीच दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमात पडत असतो. पण ते जेव्हा संपतं तेव्हा तो आपल्या बायकोकडे परत येतो आणि ती त्याला परत घेते. यात कोणाला काही वावगं वाटत नाही. पण हेच उलटं झालं तर त्यात वावगं काय?’’

‘‘तू जे म्हणतोस ते तर्कशुद्ध आहे हे कबूल केलंच पाहिजे,’’ मी हसत म्हणालो, ‘‘पण पुरूष इतके तर्कशुद्ध नसतात आणि बहुतेकांना हे सहन होणार नाही.’’

मी स्ट्रोव्हशी बोलत असताना हे सगळं इतक्या अचानक कसं घडलं या विचाराने अचंब्यात पडलो होतो. इतक्या दिवसात स्ट्रोव्हला कसलाही संशय आला नसावा हे मला पटलं नाही. ब्लांश स्ट्रोव्हच्या डोळयात तरळणारी ती विचित्र चमक मला आठवली. कदाचित तिला तिच्या हृदयातील चलबिचल जाणवली असावी आणि तिचं तिलाच आश्चर्य वाटलं असेल.

''त्यांच्यात असं काही चालंल आहे याचा तुला पूर्वी कधी संशय आला नव्हता का?''

त्याने काहीच उत्तर दिलं नाही. टेबलावर एक कागद आणि पेन्सिल पडलेली होती. त्या कागदावर त्याने नकळत एका चेहेऱ्याची आकृती काढली.

''माझा प्रश्न तुला आवडला नसेल तर तसं स्पष्ट सांग.''

''बोलल्यानं मला किती बरं वाटतं ते माझ्यावर काय दु:ख कोसळलं आहे याची तुला कल्पना आली तरच तुला कळेल.'' त्याने पेन्सिल खाली ठेवली. ''मला गेले पंधरा दिवस माहित होतं, तिने सांगण्याच्या पूर्वी.''

''तू तेव्हाच स्ट्रिकलँडला का घालवून दिलं नाहीस?''

''माझा विश्वास बसत नव्हता. ते अगदी अशक्यच आहे असं मी धरून चाललो होतो. मला वाटलं की मत्सरामुळे मला तसं वाटत असेल. मी मुळात थोडासा मत्सरी आहेच. पण मत्सर दाखवायचा नाही असा माझा प्रयत्न असतो. माझं तिच्यावर जेवढं प्रेम आहे तेवढं तिचं माझ्यावर नाही हे मला ठाऊक होतं. ते साहजिकच होतं, नाही का. तिने मला तिच्यावर प्रेम करू दिलं तेवढ्यावरच मी खूश होतो. त्यांना वेळ मिळावा म्हणून मी तासंतास बाहेर जायचो. माझी लायकी नसताना ती मला तिच्यावर प्रेम करू देत होती आणि मी संशय घेत होतो म्हणून

मी माझी मलाच शिक्षा करून घेत होतो. मी त्यांना नको आहे हे माझ्या लक्षात आलं होतं. स्ट्रिकलँडला नव्हे. त्याच्या लेखी मी असलो काय आणि नसलो काय काही फरक पडत नव्हता. ब्लांशलाच मी नको होतो. मी तिचं चुंबन घ्यायचा प्रयत्न केला की तिच्या अंगावर शहारे येत. मला काय करावं ते कळेना. मी जर काही तमाशा करण्याचा प्रयत्न केला असता तर ते मला हसले असते. मी तोंड बंद ठेवलं. जे होतंय त्याच्याकडे डोळे झाक केली तर सर्वकाही पूर्वपदावर येईल असं मला वाटलं. तो काही भांडणतंटा न करता गेला तर बरं यासाठी मी मनाची तयारी केली होती. मला ज्या यातना झाल्या त्या तुला कळल्या असत्या तर!''

त्याने स्ट्रिकलँडला जायला कसं सांगितलं होतं त्याचं त्याने पुन्हा एकदा वर्णन केलं.

त्याला जा म्हणून सांगायची वेळ त्याने खूप काळजीपूर्वक निवडली होती. त्याने सहज वाटेल अशा शब्दात विनंती करण्याचं ठरवलं होतं. पण ऐन वेळी त्याचा आवाज कापायला लागला. त्याला स्वत:वर ताबा ठेवता आला नाही. विनंती करताना त्याने हसत हसत सौहार्दपूर्ण वातावरणात केली होती. पण त्याच्या शब्दात मत्सराचा कडवटपणा कधी आला ते त्याला कळलं नाही. स्ट्रिकलँड तिथल्या तिथे ताबडतोब निघून जायची तयारी करेल असं त्याला वाटलं नव्हतं. त्याहून त्याच्या बायकोने घेतलेला निर्णय त्याला मुळीच अपेक्षित नव्हता. आपण ठरवल्याप्रमाणे गप्प बसलो असतो तर फार बरं झालं असतं असं त्याला वाटायला लागलं. वियोगाच्या दु:खापेक्षा मत्सराग्नीचा जळफळाट परवडला असती.

''माझ्या मनातून त्याचा जीव घ्यायचा होता पण त्याची परिणिती माझ्या फजितीत कशी झाली ते तुला मघाशीच सांगून झालं आहे.''

तो खूप वेळ गप्प होता. नंतर तो त्याच्या मनातलं बोलला.

“मी जर आणखी वाट पाहिली असती तर कदाचित सर्व काही ठीक झालं असतं. मी एवढं उतावीळ व्हायला नको होतं. अरे देवा, त्या गरीब बिचाऱ्या मुलीला मी कोणत्या संकटात ढकलून दिलं आहे.”

मी कपाळावर हात मारला पण काही बोललो नाही. ब्लांशबद्दल मला थोडीसुद्धा सहानुभूती वाटत नव्हती. पण तिच्याविषयी मला काय वाटतं ते त्याला सांगितलं असतं तर त्याला खूप वाईट वाटलं असतं. त्याचं सारासार विवेकाचं भान हरपलं होतं. तो तीच ती गोष्ट परत परत सांगत होता. आलटून पालटून तीच वाक्य, तेच शब्द. त्याला एकदम पूर्वी न सांगितलेली गोष्ट आठवली. त्याने जे सांगितलं होतं त्या ऐवजी त्याने जे सांगायला हवं होतं त्याचं रडगाणं त्याने चालू केलं. त्याने जे केलं नव्हतं त्याचा आता त्याला पश्चाताप व्हायला लागला. तो स्वत:ला दूषणे देऊ लागला. ते रडगाणं संपता संपेना. मला कंटाळा यायला लागला.

“आता तू काय करायचं ठरवलं आहेस?” शेवटी मी त्याला विचारलं.

“मी काय करू? तिचा निरोप येईपर्यंत वाट बघणं याशिवाय माझ्या हातात काय आहे?”

“तू थोडे दिवस बदल म्हणून बाहेरगावी का जात नाहीस?”

“छे! छे! तसं करून चालणार नाही. तिला जर मदतीची गरज लागली तर मला येथेच असलं पाहिजे.”

त्याला काळाचं भान उरलं नव्हतं. काय करायला हवं आहे हेही त्याला कळत नव्हतं. मी त्याला झोपायला जायची सूचना केली तेव्हा तो म्हणाला की त्याला झोप येत नाही. बाहेर जाऊन दिवस उजाडेपर्यंत रस्त्यावर भटकत राहण्याचा

त्याचा विचार होता. त्याला एकटं सोडण्यात अर्थ नव्हता. मी त्याला रात्र माझ्या घरी काढण्याची सूचना केली. त्याला माझ्या स्वत:च्या पलंगावर झोपवलं आणि मी बैठकीच्या खोलीतील दिवाणावर जाऊन झोपलो. तो एवढा थकून गेला होता की तो मला विरोध करू शकला नाही. तो कित्येक तास झोपून राहिल एवढा व्हेरोनॉलचा डोस मी त्याला पाजला. त्या क्षणी त्याच्यासाठी मी एवढंच करू शकत होतो.

## ३०

दिवाणावर झोपणं एवढं त्रासदायक होतं की मला झोप लागणं शक्य नव्हतं. त्या बिचाऱ्या डचमनने मला जे सांगितलं त्यावर मी विचार करत होतो. ब्लांश स्ट्रोव्हच्या वागण्याचं मला आश्चर्य वाटलं नव्हतं. त्यात फक्त शारिरीक आकर्षणाचा भाग होता. तिला तिच्या नवऱ्याबद्दल कधी काही वाटलं असेल की नाही याचा मला संशय होता. माझ्या मते स्त्रियांचं प्रेम म्हणजे कित्येक वेळा त्यांना मिळालेला आधार आणि ऐहिक सुखसोईंना त्यांनी दिलेला प्रतिसाद असतो. बहुतेक स्त्रिया यासाठीच ओळखल्या जातात. कोणत्याही झाडाच्या आधारे वाढणाऱ्या द्राक्षाच्या वेलीला झाडाबद्दल जे वाटतं तशाच त्यांच्या भावना असतात. निष्क्रीय आणि तटस्थ. म्हणून जगातील शहाण्यासुरत्या लोकांची लग्नात मुलींकडून हीच अपेक्षा असते. पुरूष जेव्हा स्त्रीशी लग्न करतो तेव्हा त्याला लग्नानंतर ती त्याच्यावर प्रेम करेल याचं आश्वासन तिच्याकडून हवं असतं. लग्नामुळे मिळणारी सुरक्षा, संपत्ती आणि आपण कोणाला तरी हवे आहोत यातून मिळणारं समाधान यामुळे प्रेमभावनेची निर्मिती होते. स्त्रियांनी प्रेमाला उगाचच अध्यात्मिक उंचीवर नेऊन ठेवलं आहे. मनोविकारांच्या तीव्र उद्रेकापुढे प्रेमभावना दुर्बळ ठरते. ब्लांश स्ट्रोव्ह स्ट्रिकलँडचा जो आत्यंतिक तिरस्कार करत असे त्यात लैंगिक आकर्षणाचा थोडासा भाग असावा असा मला दाट संशय होता. माणसाच्या लैंगिक वर्तनामागील गूढ उकलणारा मी कोण. स्ट्रोव्हचं तिच्यावर कितीही प्रेम असलं तरी तिचं त्या बाबतीत समाधान करायला ते अपूरं होतं. स्ट्रिकलँडकडे ती शक्ती होती याची तिला नकळत जाणीव झाली असली पाहिजे. म्हणूनच ती त्याचा इतका तिरस्कार करत असावी. त्याला स्टुडियोत आणायला असलेला तिचा विरोध हा खरोखर मनापासूनचा होता. मला वाटतं पुढे जे अघटीत घडणार होतं त्याची तिच्या अबोध मनाला जाणीव झाली असावी. तिला त्याची जी भिती वाटत होती ती वास्तवात तिच्या स्वत:च्याच भितीची पडछाया होती. त्याचा अवतार एखाद्या जंगली श्वापदासारखा हिंस्र होता. तो कोणाचीही तमा न बाळगणारा, बेमुर्वतखोर आणि उद्धट होता.

नजरेतील अलिप्तपणा आणि ओठातील कामातूर आव्हान. त्याचा देह आडदांड आणि मजबूत होता. तो एका रासवट कामशक्तीचं प्रतिक होता. कदाचित तिलाही त्या आदिम पापवासनेने स्पर्श केला असावा. अवघ्या चराचर सृष्टीला व्यापून टाकणाऱ्या त्या सृजनशक्तीचा विचार माझ्या मनात आला. त्या शक्तीने जर तिला झपाटलं असेल तर दोन टोकाच्या शक्यता संभवतात. आत्यंतिक तिरस्कार किंवा जीवापाड प्रेम.

आजारपणात त्याची सेवा करता करता तिचं मतपरिवर्तन झालं असावं. तिने त्याला भरवलं असेल, भरवताना त्याची खरखरीत लाल दाढी तिच्या हाताला खुपली असेल, अंग पुसताना त्याच्या शरीरावरच्या दाट केसांनी तिला गुदगुल्या झाल्या असतील. आजारपणात तो अशक्त झाला असला तरी त्याचे हात बळकट होते, बोटे कलाकारासारखी लांबसडक होती. तिच्या मनात काय खळबळ माजली असेल त्याची मला कल्पना आली. तो अगदी हूं का चूं न करता मेल्यासारखा शांतपणे झोपायचा. सावजाचा पाठलाग करून थकून पहुडलेल्या जंगली श्वापदासारखा. त्याला काय स्वप्नं पडत असतील. वनात विहार करणाऱ्या अप्सरेचा (Nymph) पाठलाग करणारा यक्ष (Satyr). अचपळ अप्सरा पळत आहे, तिच्या पाठी लागलेला यक्ष पावला पावलाने तिला गाठत आहे. कधी संपूच नये असं वाटणारा, काळाची गती खंडित करणारा, त्याचा उष्ण श्वास तिच्या पाठीला जाणवेपर्यंत चाललेला जीवघेणा, अथक, अखंड पाठलाग. त्याने तिला कवेत पकडलं तेव्हा ती जीवाच्या आकांताने घाबरली असेल की अत्यानंदाने तिला उचंबळून आलं असेल.

ब्लांश स्ट्रोव्ह एका सापळ्यात सापडली होती. कदाचित ती अजूनही स्ट्रिकलँडचा तिरस्कार करत असावी पण तिचा कामाग्नी शांत करण्यासाठी तो तिला हवा होता. त्यासाठी ती आजपर्यंतच्या आयुष्यात जे कमावलं त्यावर पाणी

सोडायला तयार होती. ती आता एक साधी पण गुंतागुंतीची, प्रेमळ पण एवढ्या तेवढ्या वरून भांडणारी, सहसा विचारी तसेच प्रसंगी अविचारी अशी सर्वसामान्य स्त्री राहिली नव्हती. तिचं रुपांतर पुराणकथेतल्या मीनॅडसारख्या वासना नामक एका राक्षसीणीत झालं होतं.

हा कल्पनाविलास फारच ताणल्यासारखा होईल. कदाचित ती तिच्या बावळट भोळया नवऱ्याला कंटाळली असेल. स्ट्रिकलँडकडे ती निव्वळ कुतुहलापोटी आकर्षित झाली असेल किंवा प्रत्यक्षात तिला त्याच्या विषयी काहीच वाटत नसेल. आजारपणात त्याच्या सतत सान्निध्यात राहिल्यामुळे तिला त्याच्याविषयी आपुलकी वाटायला लागली असेल किंवा ते तिच्या रिकाम्या डोक्यात शिरलेलं खूळ असेल. स्वत:च लावलेल्या सापळयात सापडल्यावर बाहेर कसं पडायचं ते समजलं नसण्याचीही शक्यता होतीच. तिच्या डोक्यात कोणते वादळ घोंघावत होतं किंवा गहिऱ्या डोळयात काय भाव दडले होते ते मला कळायला काही मार्ग नव्हता.

तरीही ब्लांश स्ट्रोव्हच्या वर्तनाचा खुलासा एका प्रकारे करता येणं शक्य आहे. पण स्ट्रिकलँडच्या बाबतीत माझं डोकं चालेना. माझ्या मेंदूचा भुगा झाला पण त्याचं वर्तन माझ्या अंदाजाच्या अगदी विरूद्ध होतं. त्याने अत्यंत निष्ठूरतेने आपल्या मित्राचा विश्वासघात केला. स्वत:च्या लहरीखातर दुसऱ्याला किती दु:ख होईल याची त्याने कधीच पर्वा केली नव्हती. त्याच्यामध्ये कृतज्ञता आणि सहानुभूतीचा लवलेशही नव्हता. सर्वसामान्य लोकांच्यात ज्या भाव-भावना असतात त्या त्याच्याकडे नावालासुद्धा नव्हत्या. त्याला दोष देणं म्हणजे वाघाला त्याच्या क्रौर्याबद्दल दोष देण्यासारखं आहे. क्रौर्य हे त्याच्या स्वभावाचा एक भाग होता असं एक वेळ म्हणता येईल, पण क्रूरातील क्रूर जनावरसुद्धा लहरी नसतं. म्हणूनच स्ट्रिकलँडचा लहरीपणा माझ्या समजण्याच्या पलीकडचा होता.

स्ट्रिकलँड ब्लांश स्ट्रोव्हच्या प्रेमात पडला असेल यावर माझा मुळीच विश्वास नव्हता. एवढंच नव्हे तर तो कधी कोणावर प्रेम करू शकेल असंही मला वाटत नव्हतं. प्रेमासाठी मन हळूवार असावं लागतं. स्ट्रिकलँडच्या मनात हळूवारपणाला मुळीच स्थान नव्हतं. स्वत:साठी तसेच दुसऱ्यासाठीही. प्रेमात दौर्बल्याचा अंश असतो, परस्परांना सांभाळून घ्यावं लागतं. या गोष्टी स्ट्रिकलँडमध्ये नावालासुद्धा सापडल्या नसत्या. प्रेमात माणूस स्वत:ला विसरून जातो. प्रेम शाश्वत आहे हे ठाऊक असूनही तो ते अशाश्वत आहे असं मानत असतो. त्यामुळे त्याला आभास होतात. ते आभास आहेत हे माहित असूनही तो त्याला वास्तव समजत असतो. तो शेफारतो आणि शरणही जातो. तो स्वत:चा राहत नाही. स्वत:च्या अहमपेक्षा भिन्न अशा एका वस्तूत त्याचं रुपांतर होतं. भावनाप्रधानता हा प्रेमाचा अविभाज्य भाग असतो. स्ट्रिकलँडएवढा भावनाशून्य माणूस मी दुसरा पाहिला नव्हता. प्रेमाच्या बंधनात अडकल्यावर होणाऱ्या गोड यातनांचा अनुभव त्याला कधी तरी घेता येईल यावर माझा विश्वास बसत नव्हता. जोखडाच्या ओझ्याखाली राहणं त्याच्या स्वभावातच नव्हतं. आपल्या हृदयातील सल मुळासकट उखडून टाकण्याची ताकद त्याच्यापाशी होती याची मला खात्री होती. स्ट्रिकलँड कसा होता याचं गुंतागुंतीचं चित्रं उभं करण्यात मी यशस्वी झालो आहे का? तसं असेल तर स्ट्रिकलँड प्रेम करायला एकाच वेळी अगदी योग्य आणि क्षुद्र होता असं म्हटलं तर ते फारसं गैर होणार नाही.

प्रत्येकाची आवड-निवड त्याच्या स्वभाववैशिष्ठ्यावर अवलंबून असते आणि त्यामुळे ती व्यक्तिगणिक भिन्न असते. स्ट्रिकलँडची प्रेम करण्याची पद्धत ही त्याच्यासारखीच एकमेकाद्वितीय होती आणि त्याच्या भाव-भावनांचं विश्लेषण करणं निरर्थक होतं.

# ३१

दुसऱ्या दिवशी मी स्ट्रोव्हला माझ्याकडेच राहण्याचा आग्रह केला तरीही तो निघून गेला. त्याच्या स्टुडियोत जाऊन त्याचं सामान आणायची मी तयारी दाखवली पण त्याला स्वत:च जायचं होतं. त्याला वाटलं असावं की त्याच्या बायकोने अजून त्याचं सामान बांधलं नसावं. त्या निमित्ताने त्याला तिला भेटता येईल आणि तिचं मतपरिवर्तन करण्याची एक संधी मिळेल. पण त्याला त्याच्या सामानाचं गाठोडं कन्सर्जकडे ठेवलेलं मिळालं. कन्सर्जने त्याला ब्लांश बाहेर गेल्याचं सांगितलं. विरहाचं दु:ख तिला सांगायचा मोह त्याला आवरता आला नसता पण ती नसल्यानं नाईलाज झाला होता. सहानुभूतीच्या अपेक्षेने तो भेटणाऱ्या प्रत्येकाला आपली कर्मकहाणी सांगत सुटायचा. पण त्याच्या वाटेला सहानुभूतीच्या ऐवजी चेष्टा यायची.

त्याच्या अशा वागण्याने तो जास्तच हास्यास्पद व्हायला लागला. तिचा विरह सहन न झाल्याने एके दिवशी ती खरेदीला जाताना त्याने तिला रस्त्यातच गाठलं. तिने ढुंकूनही पाहिलं नाही. माझं काही चुकलं असेल तर मला माफ कर, माझं तुझ्यावर खरं प्रेम आहे, माझ्यासाठी तरी परत चल वगैरे पालुपद तो पुटपुटत होता. तिच्या तोंडातून एक शब्दही फुटत नव्हता. ती तोंड फिरवून भरभर चालत होती. गिड्ड्या लठ्ठ पायांनी तिच्या बरोबर चालताना त्याची तारांबळ उडत होती. त्याने दयेची भीक मागून पाहिली, परत आलीस तर तुला हवा तसा वागेन असं आश्वासन देऊन पाहिलं. स्ट्रिकलँड लवकरच तुला सोडून जाईल, मग तू कुठे जाशील असा इशारा देऊन पाहिला. त्याने हे सगळं शब्द न शब्द मला सांगितलं तेव्हा मी जाम भडकलो. त्यात ना शान होती ना मान. बायकोला आपली किळस येऊ नये असं काहीही सांगायचं त्याने बाकी ठेवलं नव्हतं. एका पुरूषाचं एका स्त्रीवर मनापासून प्रेम करत आहे पण त्या स्त्रीचं मात्र त्याच्यावर मुळीच प्रेम नाही या सारखा दुसरा क्रूरपणा जगात नसेल. अशा वेळी स्त्रीला तिचा प्रेमळपणा,

समंजसपणा सोडून जातो. उरतो फक्त वैताग. ब्लांश स्ट्रोव्ह चालता चालता अचानक थांबली आणि तिने तिच्या नवऱ्याच्या चक्क एक थोबाडीत ठेऊन दिली. तिचा नवरा स्तंभित झाला. त्याचा फायदा घेऊन ती स्टुडियोच्या दिशेने धावत धावत गेली. तिने तोंडातून चकार शब्दही काढला नव्हता.

त्याने हे सांगितलं तेव्हा त्याचा हात नकळत त्याच्या गालाकडे गेला. जणू काही अजूनही त्याच्या झिणझिण्या गेल्या नव्हत्या. त्याच्याकडे बघून सहानुभूतीही वाटत होती आणि हसूही येत होतं.

एवढं झाल्यावरही ती बाजारात जायच्या वेळेला तो तिची वाट बघत उभा असायचा. आता तो रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला उभा असे. तिच्याशी पुन्हा बोलण्याची त्याची छाती नव्हती. तो शोकाकुल नजरेने तिच्याकडे बघत असे. आपल्या डोळ्यातील दु:ख बघून तिचं हृदय द्रवेल असा त्याने का कोण जाणे आपल्या मनाचा ग्रह करून घेतला होता. तो आपल्याला दिसला आहे असं तिने चुकूनही दाखवलं नाही. तिने आपला जाण्या येण्याचा रस्ता, वेळ सुद्धा बदलली नाही. तिच्या या उदासीनतेत एक प्रकारचा क्रूरपणा होता. कदाचित त्याचा असा छळ करण्यात तिला मजा वाटत असावी. ती त्याचा एवढा तिरस्कार का करत होती ते मला कळलं नाही.

स्ट्रोव्हने थोडं शहाणपणाने वागावं म्हणून मी त्याला सांगून पाहिलं. त्याचं कणाहीन वर्तन संतापजनक होतं.

"तुझ्या अशा वागण्याने काही होणार नाही." मी त्याला सांगितलं. "मला वाटतं त्यापेक्षा तू एकदा तिला काठीने चांगलं झोडपून काढलंस तर ते जास्त शहाणपणाचं होईल. कमीत कमी ती आज तुझा जो तिरस्कार करते तो तरी करणार नाही."

थोड्या दिवसांसाठी मी त्याला त्याच्या मूळ गावी जायचा सल्ला दिला. हॉलंडच्या उत्तर भागात कुठेतरी त्याचं गाव होतं. त्याचे आई-वडिल अजून हयात होते. ते परिस्थितीने गरीब होते. त्याचे वडिल सुतारकाम करत. एका संथ वाहणाऱ्या कालव्याच्या काठी त्यांचं लाल वीटांचं छोटसं घर होतं. गावातील रस्ते मोठे आणि शांत होते. गेल्या दोन एकशे वर्षात गावात काहीही बदल झाला नव्हता. जुनी संस्कृती लयाला जात होती. तरी गावातील वातावरण साधं आणि घरगुती होतं. पूर्वेकडील देशांच्या व्यापारात गडगंज संपत्ती मिळवलेल्या श्रीमंत व्यापाऱ्यांची गावात घरं होती. त्यांचं वैभव आता उतरणीला लागलं असलं तरी त्यांच्या घरांवर जुन्याकाळची शान अजूनही कायम होती. कालव्याच्या काठी फिरता फिरता हिरव्यागार कुरणांचा प्रदेश लागे. दोन चार पवनचक्क्या फिरत आहेत, काळया पांढऱ्या रंगांची गुरं आरामात चरत आहेत. मला वाटलं या वातावरणात लहानपणच्या आठवणीत रममाण झाल्यावर डर्क स्ट्रोव्ह आपलं दु:ख विसरायला लागेल. पण कसंचं काय. त्याने जायला ठाम नकार दिला.

"तिला जर माझी गरज लागली तर मी इथे असलो पाहिजे. काहीतरी भयंकर घडलं आणि मी इथे नाही असं व्हायला नको."

"असं काय भयंकर होईल असं तुला वाटतं?"

"मला सांगता येणार नाही, पण मला भिती वाटत आहे."

मी डोक्याला हात लावला.

डर्क स्ट्रोव्हवर दु:खाचा मोठा डोंगर कोसळलेला असला तरीही इतरांच्या दृष्टीने तो चेष्टेचाच विषय होता. तो जर थोडा रोडावला असता तर त्याला थोडीशी सहानुभूती मिळालीही असती. पण तो होता तसाच गुबगुबीत, सफरचंदासारखा लालबुंद राहिला. त्याची राहणी अतिशय नीटनेटकी होती. काळा कोट आणि

बाऊलर हॅट घालणं त्याने सोडलं नव्हतं. त्याचं पोटही पुढे आलेलं होतं. दु:खाचा त्याच्या तब्येतीवर जरासुद्धा परिणाम झालेला नव्हता. एखाद्या श्रीमंत उडाणटप्पू माणसासारखा तो दिसत असे. माणसाचं बाह्यस्वरूप आणि त्याचा स्वभाव याचा काही ताळमेळ नसल्याचं ते एक अपवादात्मक उदाहरण होतं. डर्क स्ट्रोव्ह म्हणजे एक फोपश्या शरीरातील प्रेमवीर होता. सुस्वभावी, पण नको तिथे चांगुलपणा दाखवणारा. कलेची उत्तम जाणकारी असलेला पण स्वत: मात्र अत्यंत सुमार दर्जाची चित्र काढणारा. इतरांशी वागताना तो हुशारीने वागे पण स्वत:वर वेळ येताच ती हुशारी कुठे जाई ते कळत नसे. दैवाने एवढा विरोधाभास एकाच पारड्यात टाकून काय बरं साधलं होतं?

# ३२

यानंतर स्ट्रिकलँडची आणि माझी कित्येक आठवडे गाठ पडली नाही. मला त्याचा अत्यंत तिटकारा यायचा. संधी मिळाली असती तर त्याला मी तसं तोंडावर सांगायला कमी केलं नसतं. पण त्या एका कारणासाठी त्याला गाठण्यात काही अर्थ नव्हता. नैतिक भूमिकेवरून संतापायला मला आवडत नाही. त्यात एक प्रकारची स्वसंतुष्टता असते. ज्याला विनोदाचं इंद्रिय आहे अशा कोणालाही थोडंस अवघडल्यासारखं होईल. स्वत:चाच उपहास करण्यासाठी स्वभाव जिंदादिल असावा लागतो. स्ट्रिकलँडपाशी एक प्रकारचा उपरोधिक प्रामाणिकपणा होता. त्यामुळे कोणी एखादी भूमिका घेऊन बोलायला लागलं की मी थोडा सावरून बसत असे.

एके दिवशी मी ॲव्हेन्यु द क्लिशीवरून जात होतो. ज्या कॅफेत स्ट्रिकलँड नेहमी बसलेला असायचा तो कॅफे मी हल्ली टाळत असे. त्याच कॅफेत माझी आणि स्ट्रिकलँडची अचानक गाठ पडली. त्याच्या बरोबर ब्लांश स्ट्रोव्ह होती. स्ट्रिकलँड तिला घेऊन त्याच्या नेहमीच्या टेबलाकडे जात होता.

“इतके दिवस कुठे गायब झाला होतास?” मला पाहून त्याने विचारलं. “मला वाटलं तू बाहेरगावी गेला असशील.”

तो ज्या नम्रतेने बोलत होता त्यावरून हे सिद्ध होतं की मला त्याच्याशी बोलायचं नाही हे त्याला कळलं होतं. ज्याच्याशी नम्रतेने बोलावं अशा लायकीचा इसम तो नव्हता.

“नाही, मी कुठेही गेलो नव्हतो.”

“मग इथे का आला नाहीस?”

“वेळ घालवण्यासाठी पॅरीसमध्ये इतर भरपूर कॅफे आहेत.”

ब्लांशने हात पुढे करून मला गुड इव्हीनींग केलं. का कोण जाणे ती थोडी बदलली असावी असं मला वाटलं. ती नेहमी घालत असे तेच करड्या रंगाचे कपडे तिने घातले होते. स्वच्छ आणि नीटनेटके. तिच्या भुवया तशाच रेखीव होत्या. तिचे डोळे शांत होते. स्ट्रोव्हच्या स्टुडियोत घरकामात गर्क असताना ती पूर्वी दिसायची तशीच ती आता दिसत होती.

''चल आपण बुद्धीबळाचा एक डाव खेळू या,'' स्ट्रिकलँड म्हणाला.


त्या क्षणी मला एखादं कारण कसं सुचलं नाही ते मला सांगता येणार नाही. मी रागानेच त्यांच्या पाठोपाठ त्यांच्या टेबलावर गेलो. त्याने पट आणि मोहरी मागवून घेतले.

ती दोघं इतक्या सहजतेने वागत होते की दुसरं काही बोलणं मला अवघड वाटायला लागलं. अगम्य चेहेऱ्याने ती आमचा खेळ बघत होती. ती गप्प होती. पण तशी ती नेहमीच गप्प असायची. तिला काय वाटतं हे कळावं म्हणून मी तिच्या तोंडाकडे बघत होतो. आश्चर्य, कडवटपणा, दु:खाच्या कोणत्याही खाणाखुणा दिसत नव्हत्या. तिचे डोळे अबोल होते. तिचा चेहेरा मख्ख होता. तिने तिचे हात एकातएक एक घट्ट गुंफून मांडीवर ठेवले होते. मी जे ऐकून होतो त्यावरून चिडल्यावर तिला आवरणं कठीण होई. ज्याने तिच्यावर जीवापाड प्रेम केलं त्या तिच्या नवऱ्याच्या एक जबरदस्त थोबाडीत ठेऊन द्यायला तिने मागे पुढे पाहिलं नव्हतं. नवऱ्याचा, त्याच्या उबदार घराचा तिने एका क्षणात त्याग केला होता. तिच्यातील साहसी वृत्ती, धोका पत्करायची, त्यासाठी कष्ट उपसायची तयारी लक्षणीय होती. तिच्या स्वभावातील हा भाग तिच्या वरवरच्या शांत आणि गंभीर स्वभावाशी विसंगत होता.

आमच्या भेटीमुळे माझा उत्साह वाढला. खेळावर लक्ष केंद्रीत करता करता माझ्या कल्पनेचा वारू मी मुक्त सोडला. मी नेहमी स्ट्रिकलँडवर मात करण्याचा

आटोकाट प्रयत्न करत असे. तो त्याच्या प्रतिस्पर्ध्याचा तिरस्कार करत असे. जिंकल्यावर तो ज्या उन्मादाचं प्रदर्शन करी ते सहन करण्याच्या पलिकडचं असे. पण तेच तो जर हरला तर ते तो हसण्यावर नेई. जिंकला की तो वाईट असे पण हरला की तो चांगला असे. खेळताना माणूस उघडा पडतो. त्याच्या वागण्यातील विसंगती दिसून येतात.

जेव्हा खेळ संपला तेव्हा मी वेटरला बोलवून माझ्या बिलाचे पैसे दिले आणि मी निघून गेलो. त्या भेटीत खास काही झालं नाही. एका शब्दानेही माझ्या विचारांना चालना मिळाली नाही. माझी उत्सुकता ताणली होती. त्यांचं कसं चाललं होतं ते मला सांगता आलं नसतं. ते त्यांच्या स्टुडियोच्या भिंतीआड काय करतात ते जाणण्यासाठी मला एखाद्या अदृश्य शक्तीची मदत घ्यावी लागली असती. एकही सुचक दुवा हाताशी नसताना उगाच कल्पनेची भरारी मारण्यात अर्थ नव्हता.



Artist: Paul Gauguin

Title: Night Café at Arles, Date: 1888,

Medium: oil on canvas, Source: Wikipedia

## ३३

दोन तीन दिवसांनी मला डर्क स्ट्रोव्ह भेटला.

“तू ब्लांशला भेटलास असं माझ्या कानावर आलं आहे.”

“अरे तुला कसं कळलं?”

“माझ्या एका मित्राने त्यांना तुझ्या बरोबर कॅफेत पाहिलं. तू मला का सांगितलं नाहीस?”

“मला वाटलं की तुला त्रास झाला असता.”

“त्रास होणार असला तर कसाही तो होणारच आहे. तुला ठाऊक असायला हवं की तिच्याबाबतीतील अगदी बारीकसारीक गोष्टसुद्धा मला कळायला हवी आहे.”

त्याने मला स्पष्ट विचारेपर्यंत मी वाट पाहिली.

“ती कशी दिसते?”

“काहीही फरक पडलेला नाही.”

“ती सुखी दिसत होती का?”

मी खांदे उडवले.

“मला सांगता येणार नाही. आम्ही कॅफेमध्ये होतो, आणि मी बुद्धीबळाचा डाव खेळत होतो. तिच्याशी बोलणं झालं नाही.”

“तिच्या चेहेऱ्यावरून सांगता येणार नाही का?”

मी मान हलवली. तिला काय वाटतं होतं ते शब्दातून तर जाऊं दे तिच्या हावभावातूनसुद्धा कळत नव्हतं. तिची स्वत:वर ताबा ठेवण्याची क्षमता माझ्यापेक्षा त्यालाच जास्त माहित असायला हवी होती. त्याने भावनातिरेकाने हाताच्या मुठी आवळल्या.

“अरे बापरे, काही तरी अघटीत घडणार आहे आणि मी काही करू शकणार नाही अशी मला भिती वाटत आहे.”

“तुला कसली भिती वाटत आहे?”

“सांगता येत नाही,” तो रडक्या आवाजात म्हणाला. त्याने आपले डोके दोन्ही हातात धरले. “भयंकर उत्पात होणार आहे असं मला दिसतंय.”

स्ट्रोव्ह नेहमीच उत्तेजित होऊन बोलत असे. पण आज तो काही वेगळाच वाटत होता. त्याला जे वाटत होतं त्याला काही कारण देता आलं नसतं. ब्लांश स्ट्रोव्ह स्ट्रिकलँडचं वागणं फार काळ सहन करू शकली नसती. स्वत: घातलेल्या बिछान्यावर स्वत:लाच झोपावं लागतं ही म्हण नेहमीच लागू पडते असं काही म्हणता येणार नाही. आयुष्यात बरेचजण चुकतात, संकटात सापडतात, पण त्यातून मार्ग काढून सुटकाही करून घेतात.

जर ब्लांशचं स्ट्रिकलँडशी भांडण झालं असतं तर तिने सरळ त्याला सोडून द्यावं. स्ट्रोव्ह तिची वाट बघत होताच. मला तिच्या विषयी फारशी सहानुभूती वाटत नव्हती.

“तू काही तिच्यावर माझ्यासारखा प्रेम करत नाहीस, म्हणून तुला काही वाटत नाही.”

“ती सुखी नाही हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा आपल्याकडे नाही. आपल्याला फक्त एवढंच माहित आहे की ते चारचौघांसारखे सुखाने संसार करत असावेत.”

स्ट्रोव्हने माझ्याकडे दु:खी कष्टी नजरेने पाहिलं.

“तुला काय फरक पडतो. माझ्यासाठी ती अतिशय महत्वाची गोष्ट आहे.”

“मी काही वावगं बोललो असेन तर मला माफ कर.”

“माझ्यासाठी एक गोष्ट करशील?” स्ट्रोव्हने विचारलं.

“नक्की करेन.”

“माझ्या तर्फे ब्लांशला पत्र लिहिशील?”

“तू स्वत:च का लिहत नाहीस?”

“मी तिला बरीच पत्रं लिहिली. ती मला

उत्तर देईल असं वाटत नाही. माझी पत्रं ती वाचतही असेल की नाही याचीच शंका आहे.”

“स्त्रियांचं कुतुहल विलक्षण असतं हे तू विचारात घेतलेलं दिसत नाहीस. तिला पत्रं वाचण्याचा मोह टाळता येईल?”

“माझ्या बाबतीत ती तसं करू शकेल.”

मी चटकन त्याच्याकडे पाहिलं. त्याने नजर खाली केली. ती त्याच्याकडे एवढं दुर्लक्ष करत होती की त्याच्या हस्ताक्षरातलं पत्र बघूनही तिच्यावर काहीही परिणाम होणं शक्य नव्हतं हे त्याला चांगलच ठाऊक होतं.

“ती परत येईल याच्यावर तुझा खरंच विश्वास आहे?” मी विचारलं.

“वाईटात वाईट काहीही झालं तरी मी तिला आसरा द्यायला तयार आहे हे तिला शेवटचं कळायला पाहिजे. तू तिला हेच सांग.”

मी कागद घेतला.

“मी काय लिहू?”

मी खालील मजकुराचं पत्र लिहलं.

मिसेस स्ट्रोव्ह यांस,

जेव्हा कधी तुम्हाला डर्कची गरज भासेल तेव्हा तुमच्या उपयोगी पडायला तो मोठ्या आनंदाने तयार आहे. डर्कने मला तुम्हाला हे कळवायला सांगितलं आहे. जे होऊन गेलं त्याविषयी तुमच्याबद्दल त्याच्या मनात कोणताही किंतू नाही. त्याचं तुमच्यावरचं प्रेम कायम आहे. तो खाली दिलेल्या पत्त्यावर नेहमी उपलब्ध असेल:

## ३४

स्ट्रिकलँड आणि ब्लांशच्यामध्ये काहीतरी अनर्थ घडेल याची मला स्ट्रोव्ह इतकीच खात्री होती. तरीही त्याचा शेवट अशा शोकांतिकेत होईल असं वाटलं नव्हतं. उन्हाळा सुरू झाला होता. हवा दमट आणि उष्ण झाली होती. रात्रीसुद्धा हवेत थंडावा नसायचा. दिवसभराच्या उन्हाने तापलेले रस्ते रात्री तीच उष्णता बाहेर फेकत. रस्त्यावरून चालणारी थकलेली माणसं पाय ओढत कशीबशी चालत. स्ट्रिकलँड मला बऱ्याच दिवसांत दिसला नव्हता. इतर गोष्टींमध्ये गुंतल्यामुळे त्या प्रकरणाचा मला विसर पडला होता. डर्कचं तेच ते रडगाणं ऐकून मला कंटाळा आला होता. त्याला भेटायचं मी टाळत होतो. त्या प्रकरणात आणखी वेळ फुकट घालवायची माझी इच्छा नव्हती.

एके दिवशी मी सकाळीच काम करीत बसलो होतो. माझ्या विचारांची गाडी भरकटू लागली. मला स्वच्छ सूर्यप्रकाशात न्हाऊन निघालेल्या ब्रिटनीच्या किनाऱ्याची, समुद्रकाठच्या ताज्या हवेची आठवण झाली. माझ्या शेजारी *कॅफे उ ले* तून मागवलेला रिकामा कप होता. नुकत्याच खाऊन संपवलेल्या *क्रोइसाँ* चा सुवास अजून दरवळत होता. दुसऱ्या खोलीत बाथ टबमध्ये पाणी ओतल्याचा आवाज येत होता. तेवढ्यात घंटा घंणघणली आणि मी दरवाजा उघडायला उठलो. तेवढ्यात डर्क स्ट्रोव्हचा आवाज ऐकू आला. मी त्याला आत यायला सांगितलं. तो ताबडतोब आत शिरला आणि मी बसलो होतो त्या टेबलाजवळ आला.

‘‘तिने जीव दिला.’’

‘‘काय म्हणतोस?’’

तो बोलत असल्यासारखे त्याचे ओठ हलत होते पण आवाज बाहेर येत नव्हता. तो वेडपटासारखं ततपप करत होता. का कोण जाणे माझं हृदय धडधडू लागलं. मी संतापलो.

“भल्या माणसा जरा ताळयावर ये आणि तुला काय बोलायचं आहे ते मला नीट समजेल असं सांग.”

त्याने हातवारे करून काहीतरी सांगण्याचा प्रयत्न केला. पण अजूनही त्याच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. त्याची दातखिळी बसलेली असण्याची शक्यता होती. माझ्या अंगात काय संचारलं ते मला कळलं नाही. मी खांदे धरून त्याला गदगदा हलवलं. आदल्या रात्रीच्या जागरणामुळे माझं डोकं चालेनासं झालं होतं. मी ताळ सोडून वागल्यामुळे माझ्यावर चिडलो.

“मला जरा बसूं दे.” तो दम घेत म्हणाला.

मी एक ग्लास सँ गॅमिएच्या मिनरल वॉटरने भरून त्याला दिला. लहान मुलाला पाणी पाजावं तसा ग्लास मी त्याच्या तोंडाजवळ धरला. पाणी पिताना थोडं पाणी त्याच्या शर्टावर सांडलं.

“कोणी जीव दिला?”

मी तसं का विचारलं ते मला कळलं नाही. त्याला काय म्हणायचं आहे ते मला कळलं होतं. त्याने स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न केला.

“काल रात्री त्यांचं जोरदार भांडण झालं. त्यानंतर तो निघून गेला.”

“ती आहे की गेली?”

“ती जिवंत आहे. त्यांनी तिला हॉस्पिटलमध्ये ठेवलंय.”

“मग तू असं का बोलत आहेस,” मी ओरडून विचारलं. “तिने जीव दिला असं तू का म्हणतोस?”

माझा मनस्ताप काबूत ठेवण्यासाठी मी हाताच्या मुठी वळल्या. मी हसण्याचा प्रयत्न केला.

“माझं चुकलं. तू तुझं काम कर. घाईचं कारण नाही. ते तिची चांगली काळजी घेत आहेत.”

त्याचे टपोरे निळे डोळे भकास दिसत होते. त्याने घातलेल्या जाढ भिंगांच्या चष्म्यामुळे ते अधिकच भयंकर वाटत होते.

“कन्सर्ज सकाळी पत्र द्यायला गेला तेव्हा तिने दरवाजा उघडला नाही. त्याला कोणी तरी कण्हत असल्याचा आवाज ऐकू आला. दरवाजाला कडी लावलेली नव्हती. त्यामुळे तो आत गेला. ब्लांश पलंगावर पडली होती. ती अतिशय आजारी असल्यासारखी दिसत होती. ऑक्झॅलीक ॲसिडची बाटली बाजूच्या टेबलावर पडली होती.”

स्ट्रोव्हने त्याचा चेहेरा दोन्ही हातात लपवला. तो मागे पुढे होत कण्हत होता.

“ती शुद्धीवर होती का?”

“होय. तिला किती त्रास होत आहे ते तुला कळणार नाही. तिचं तळमळणं मला सहन होत नाही.”

त्याचा आवाज चिरकायला लागला.

“तू का उगाच तळमळत आहेस,” मी ओरडलो. “तिलाच ते सगळं सहन करावं लागणार आहे.”

“तू एवढा निष्ठूर कसा होऊ शकतोस?”

“तू तिच्यासाठी काय केलंस.”

"त्यांनी डॉक्टरला आणि मला बोलावलं आणि पोलीसांना कळवलं. मी कन्सर्जला वीस फ्रँक दिले आणि काही झालं तर मला कळवायला सांगितलं."

मी त्याच्याकडे पाहिलं. त्याला जे सांगायचं होतं ते वेगळंच होतं आणि त्याला ते सांगायचा धीर होत नव्हता.

"मी तिला भेटलो तेव्हा ती माझ्याशी एक शब्दही बोलली नाही. तिने कन्सर्जकरवी मला बाहेर जायला सांगितलं. मी सगळं विसरायला तयार आहे असं मी शपथ घेऊन सांगत होतो पण ती ऐकायलाच तयार नव्हती. मी जात नाही हे बघून तिने भिंतीवर डोकं आपटायला सुरवात केली. मी तिथे थांबणं योग्य होणार नाही असं डॉक्टरांनी मला सांगितलं. 'त्यांना बाहेर पाठवा' असा धोशा तिने लावला होता. मी बाहेर गेलो आणि स्टुडियोत जाऊन वाट बघत बसलो. जेव्हा अँब्युलन्स आली आणि स्ट्रेचरवरून तिला घेऊन जात होते तेव्हा मी तेथे आहे हे तिला कळू नये म्हणून त्यांनी मला स्वयंपारघरात पाठवलं."

मी कपडे करत होतो. स्ट्रोव्हने मला त्याच्या बरोबर हॉस्पिटलमध्ये येण्याची विनंती केली. सर्वसाधारण वॉर्ड ऐवजी त्याने आपल्या बायकोसाठी स्पेशल रुमची सोय केली होती. वाटेत त्याने हॉस्पिटलमध्ये मी उपस्थित असणं का गरजेचे आहे ते सांगितलं. तिने त्याला भेटायला नकार दिला तर कदाचित ती मला भेटू देईल. त्याचं तिच्यावर अजूनही प्रेम आहे, तो तिला कोणताही दोष देऊ इच्छित नाही, त्याच्या मनात तिला फक्त मदत करायची आहे, त्याचा तिच्यावर कोणताही अधिकार नाही, बरं वाटल्यावर तो तिला आपल्याकडे येण्याचा आग्रह करणार नाही, तिला जे काही करायचं असेल ते करायला ती स्वतंत्र आहे. हे सगळं मी तिला पुन्हा एकदा सांगावं अशी त्याने मला विनंती केली.

आम्ही हॉस्पिटलसमोर येऊन उभे राहिलो. त्या भकास इमारतीच्या दर्शनानेच आजारी पडायला झालं असतं. एकीकडून दुसरीकडे टोलवत, लांबलचक कॉरीडॉर ओलांडून, बरेच जिने वर खाली चढउतार झाल्यावर शेवटी एकदाचा ड्युटीवर असलेला डॉक्टर आम्हाला सापडला. त्याने आम्हाला सांगितलं की रूग्णाची परिस्थिती अतिशय गंभीर असून आजतरी कोणीही तिला भेटू शकणार नाही. डॉक्टरच्या समोर रुग्णाच्या नातेवाईकांनी गर्दी केली होती. तो सगळयांशी ठामपणे बोलत होता. त्याच्या दृष्टीने ही केस एक सर्वसामान्य घटना होती. आपल्या प्रियकराशी भांडण झाल्यानंतर एका बाईने रागाच्या भरात विष घेऊन केलेला आत्महत्येचा प्रयत्न. या पलिकडे त्याला फार महत्व नव्हतं. अशा घटना नेहमी घडत असतात. सुरूवातीला त्याला वाटलं की डर्कमुळेच हे झालं आहे. मी जेव्हा खुलासा केला की हा तिचा नवरा आहे आणि तो झालं गेलं सगळं विसरून जायला तयार आहे तेव्हा त्याचं कुतुहल जागं झालं. त्याला वाटलं की आम्ही त्याची मस्करी करत आहोत. त्याने डर्ककडे एकवार आपादमस्तक पाहिलं आणि खांदे उडवले.

"ताबडतोब धोका नाही, ती ॲसिड किती प्याली असेल ते काही आपल्याला कळणार नाही. भिती गेल्यावर ती बरी होईल. स्त्रिया नेहमी प्रेमाच्या कारणावरून आत्महत्येचा प्रयत्न करतात. पण बहुधा त्यात यशस्वी न होण्याची त्या काळजीही घेतात. त्यांना फक्त दुसऱ्याची सहानुभूती मिळवायची असते किंवा त्याला घाबरवायचं असतं."

त्याच्या आवाजात सूक्ष्म उपहास होता. त्याच्या दृष्टीने ब्लांश स्ट्रोव्ह म्हणजे पॅरीसमधील या वर्षातील आत्महत्येच्या आकडेवारीत भर घालण्याचा एक अंक होता. त्यामुळे त्याने आमच्यावर अधिक वेळ फुकट घालवला नाही. त्याने आम्हाला दुसऱ्या दिवशी यायला सांगितलं. ब्लांशला जर बरं वाटत असेल तर तिच्या नवऱ्याला तिला भेटण्याची परवानगी मिळाली असती.

## ३५

तो दिवस कसा गेला ते मला सांगता आलं नसतं. स्ट्रोव्हला एकटं सोडण्यात अर्थ नव्हता. त्याचं लक्ष दुसरीकडे वळवण्याच्या प्रयत्नात मी थकून गेलो. मी त्याला लुवरला घेऊन गेलो. तिथली चित्रं बघण्याचं नाटक तो करत होता, पण त्याच्या डोक्यातून बायकोचा विचार जात नव्हता. मी त्याला जबरदस्तीने जेऊ घातलं. जेवणानंतर मी त्याला आडवं पडायला लावलं, पण त्याला झोप लागली नाही. मी त्याला थोड्या दिवसांसाठी माझ्याकडे राहयचं आमंत्रण दिलं, ते त्याने तात्काळ स्वीकारलं. मी त्याला पुस्तक वाचायला दिलं पण एक दोन पानं उलटून त्याने पुस्तक मिटून ठेवलं आणि तो शून्यात नजर लावून बसला. संध्याकाळी आम्ही बराच वेळ पत्ते खेळत होतो. मी नाराज होऊ नये म्हणून त्याला त्यात रस आहे असं तो दाखवत होता. शेवटी त्याला झोपेच्या औषधाचा एक घोट दिल्यानंतर तो गाढ झोपी गेला.

आम्ही पुन्हा हॉस्पिटलमध्ये गेलो. नर्सने आम्हाला ब्लांश थोडी बरी आहे असं सांगितलं. आमचा निरोप घेऊन ती आत गेली. तिच्या खोलीतून मोठ्याने आरडाओरडा ऐकू आला. नर्सने बाहेर येऊन आम्हाला सांगितलं की तिला तिच्या नवऱ्याला भेटायचं नाही. मी तिला भेटू शकेन का असं विचारल्यावरही तिचा नकार कायम होता. डर्कचे ओठ कापू लागले.

“आग्रह करणं ठीक होणार नाही. ती अजूनही बरी झालेली नाही. एक दोन दिवसात आणखी बरं वाटल्यावर ती तिचं मन बदलेल.” नर्स म्हणाली.

“तिला आणखी कोणाला भेटण्याची इच्छा आहे का?” डर्कने अगदी हळू आवाजात विचारलं.

“ती म्हणाली की मला कोणी त्रास देऊ नका.”

डर्कचे लोंबकळणारे हात विचित्रपणे हलू लागले.

“तिला सांगा की तिला जर कोणाला भेटायची इच्छा असेल तर मी त्या व्यक्तीला घेऊन येईन. तिला बरं वाटवं एवढीच माझी इच्छा आहे.”

नर्सने जगातील अनेक दु:खद प्रसंग पाहिले होते. तिने सहानुभूतीने त्याच्याकडे पाहिलं आणि म्हणाली:

“थोडं बरं वाटल्यावर मी तिला तुमचा निरोप नक्की देईन.”

डर्कला भरून आलं. त्याने आपला निरोप तिला सांगण्याचं पुन्हा पुन्हा विनवलं.

“तुम्ही माझा निरोप तिला आत्ताच द्याल तर तिला लवकर बरं वाटेल.”

ती किंचीत हसली आणि आत गेली. तिने हळू आवाजात तिला निरोप दिला. त्यानंतर एक अनोळखी किरटा आवाज आला.

“नाही, नाही, नाही.”

नर्स मान हलवत बाहेर आली.

“तो आवाज तिचाच होता का? किती विचित्र होता.” मी विचारलं.

“तिने प्यालेल्या ॲसिडमुळे तिचं स्वरयंत्र जळालं असावं.”

डर्क कळवळला. मला नर्सशी थोडं बोलायचं होतं म्हणून मी त्याला प्रवेशद्वाराजवळ जाऊन माझी वाट बघायला सांगितलं. तो एखाद्या आज्ञाधारक मुलाप्रमाणे निमूटपणे गेला. त्याची विचारशक्तीच नष्ट झाली होती.

“तिने असं का केलं ते तिने तुम्हाला सांगितलं का?”

“नाही. ती काहीच बोलत नाही. ती शांतपणे पडून आहे. ती तासंतास कसलीही हालचाल न करता पडून असते. ती सारखी रडत असते. अश्रूंनी तिची उशी ओली चिंब झाली आहे. ती एवढी अशक्त झाली आहे की रूमालाने डोळे पुसण्याचीही ताकद तिच्यात राहिलेली नाही.”

माझं मन द्रवलं. स्ट्रिकलँड समोर असता तर मी त्याचा जीवच घेतला असता. मी तिचा निरोप घेतला तेव्हा माझा आवाज कापत होता.

डर्क माझी वाट पाहत उभा होता. मी त्याच्याजवळ जाऊन त्याच्या हाताला हळूच स्पर्श करेपर्यंत त्याला मी आलेलो कळलंच नव्हतं. आम्ही न बोलता चालत होतो. त्या बिचारीने एवढं टोकाचं पाऊल का उचललं असेल त्याचा मी विचार करत होतो. काय झालं हे स्ट्रिकलँडला ठाऊक असावं. कारण पोलीसांपैकी कोणी तरी त्याची गाठ घेतली असेलच. त्यांनी त्याचा जबाब नोंदवून घेतला असेल. तो कुठे राहत होता ते मला ठाऊक नव्हतं. तो बहुधा त्याच्या पोटमाळयावरच्या त्या जागेत परत गेला असावा. तिला त्यालाही भेटण्याची इच्छा नव्हती हे विलक्षण होतं. तिने त्याला भेटायला ये असा निरोप दिला असता तर तो आला नसता याची कदाचित तिला कल्पना असावी. तिच्या दैवाने निष्ठूरपणाची परिसिमा गाठली होती. आयुष्याच्या अंतिम क्षणी ह्या शारिरीक आणि मानसिक यातना भोगाव्या लागल्याने तिच्या जीवाचा किती थरकाप उडाला असेल या विचाराने माझ्या अंगावर काटे उभे राहिले.

# ३६

पुढचा आठवडा भयंकर होता. डर्क दिवसातून दोन वेळा बायकोच्या चौकशीला हॉस्पिटलला जाई. तिचा नकार ठरलेला असायचा. प्रकृतीत चढ उतार होत होते. आशा निराशेचा खेळ चालला होता. नर्सला त्याची दया यायची पण तिच्या हातात काही नव्हतं. ब्लांश न बोलता बिछान्यात पडलेली असे. तिची नजर शून्यात लागलेली असे. जणू काही पावलापावलाने जवळ येणारा मृत्यु तिला दिसत असावा. एक दोन दिवसांचाच प्रश्न असेल. एका संध्याकाळी उशीरानेच स्ट्रोव्ह मला भेटायला आला तेव्हा ती गेली आहे हे सांगायला तो आला आहे हे मी ओळखलं. तो अगदी गळून गेला होता. त्याची बोलती बंद झाली होती. माझ्या सोफ्यावर तो बसकन बसला. त्याचं सांत्वन करायला मला शब्द सुचेनात. त्याला बोलण्याचा धीर येईपर्यंत मी वाचत बसलो तर ते बरं दिसणार नाही म्हणून मी खिडकी जवळ जाऊन पाईप ओढायला लागलो.

“तू मला शेवटपर्यंत मदत केलीस,” शेवटी त्याचं तोंड उघडलं. “तुझे आभार मानावे तेवढे थोडेच होतील.”

“काही तरीच काय बोलतोस,” मला थोडं अवघडल्यासारखं झालं.

“हॉस्पिटलमध्ये मी गेलो तेव्हा त्यांनी मला थोडं थांबायला सांगितलं. त्यांनी मला खुर्ची दिली. मी दरवाज्याबाहेर बसलो. तिची शुद्ध हरपल्यावर त्यांनी मला आत जायला दिलं. तिचं तोंड ॲसिडने काळठिक्कर पडलं होतं. तिच्या नाजूक, सुंदर शरीराची भयंकर अवस्था बघवत नव्हती. तिला अगदी शांतपणे मृत्यु आला. नर्सने मला सांगेपर्यंत मला कळलंही नव्हतं.”

रडण्यासाठी सुद्धा त्याच्यात ताकद उरली नव्हती. शक्तिपात झाल्यासारखा तो नुसता पडून राहिला. त्याला गाढ झोप लागली होती. आठवडाभरात

पहिल्यांदाच. निसर्ग जेवढा क्रूर असतो तेवढाच कधी कधी दयाळूही होतो. मी त्याच्या अंगावर पांघरूण घातलं आणि दिवे मालवले. मी सकाळी उठलो तेव्हाही तो झोपलेलाच होता. त्याने कुससुद्धा बदलली नव्हती. त्याचा सोनेरी काड्यांचा चष्मा तसाच त्याच्या नाकावर होता.

## ३७

ब्लांश स्ट्रोव्हचा मृत्यु ज्या परिस्थितीत झाला होता त्यामुळे बऱ्याच सोपस्कारानंतर आम्हाला तिचं दफन करण्याची परवानगी मिळाली. स्मशानात जाताना शवपेटीबरोबर फक्त डर्क आणि मी होतो. जाताना गाडी हळू हळू जात होती. परत येताना गाडीवानाने गाडी चांगलीच पिटाळली. गाडीवान ज्या प्रकारे घोड्यांना चाबकाने फटकारत होता ते भयंकर होतं. मृत व्यक्तिचा विचार मनातून एका फटक्यासरशी उडवून लावण्यासारखं ते वाटत होतं. मलासुद्धा त्या प्रकरणातून मनाने बाहेर यायचं होतं. त्या प्रकरणाचा आणि माझा तसा अर्था अर्थी काही संबंध नव्हता. तो विषय बदलायचं खरं तर माझ्याच मनात होतं. पण स्ट्रोव्हचं मन दुसरीकडे वळवलं पाहिजे असं समाधान करून मी दुसरा विषय काढला.

‘‘थोडे दिवस बाहेरगावी गेलं तर बरं होईल असं तुला वाटत नाही का? पॅरीसमध्ये राहयचं आता काही कारण उरलेलं नाही.’’

तो काही बोलत नव्हता तरीही मी माझं म्हणणं निर्दयपणे पुढे रेटत होतो.

‘‘तू पुढे काय करायचं ठरवलं आहेस?’’

‘‘काही नाही.’’

‘‘तुला पुन्हा एकदा नव्याने सुरूवात केली पाहिजे. तू इटलीला जाऊन का बघत नाहीस?’’

त्याने काही उत्तर दिलं नाही. आमचा गाडीवान माझ्या मदतीला आला. वेग थोडा कमी करत मागे वळून त्याने आम्हाला कुठे जायचं आहे ते विचारलं. मी त्याला थोडं थांबायला सांगितलं.

“तू माझ्या बरोबर जेवायला ये.” मी डर्कला म्हणालो. “मी त्याला आपल्याला प्लेस पिगालला सोडायला सांगतो.”

“नको. त्यापेक्षा मी स्टुडियोत जातो.”

मी थोडा वेळ थांबून विचारलं.

“मी तुझ्याबरोबर यायला हवं आहे का?”

“नको. मला एकट्याला राहूं दे.”

“ठीक आहे.”

मी गाडीवानाला कुठे जायचं ते सांगितलं आणि आमचा प्रवास पुनश्च न बोलता चालू राहिला. ब्लांशला हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यापासून डर्क स्टुडियोत गेला नव्हता. मला त्याच्या बरोबर जायला लागलं नाही ते एका परीने बरंच होतं. मी पॅरीसच्या रस्त्यांकडे नव्याने नजर फिरवली. रस्त्यावरच्या रहदारीकडे मी हसतमुखाने पाहिलं. हवा सुंदर पडली होती. स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता. माझ्या अंगात उत्साह संचारला. मी स्ट्रोव्हच्या दु:खद प्रकरणाचे विचार माझ्या मनातून झटकून टाकले. मला थोडी मौज करायची होती.

## ३८

एक आठवडाभर तरी त्याची आणि माझी गाठ पडली नाही. एके दिवशी संध्याकाळी सात वाजता तो मला जेवायला घेऊन गेला. त्याने शोकप्रदर्शक कपडे केले होते. बाऊलर हॅटवर मोठी काळी फित लावली होती. त्याचा रुमालसुद्धा काळया किनारीचा होता. त्याच्या त्या शोक प्रदर्शक वेषावरून असं वाटत होतं की जगातील त्याचे यच्चयावत नातेवाईक अगदी बायकोकडचे धरून एखाद्या अस्मानी आपत्तीला एका फटक्यात बळी पडले असावेत. पण त्याचं गुबगुबीत शरीर आणि गुलाबी गोबरे गाल त्याच्या काळया वेषाशी विसंगत दिसत होते. त्याने अगदी काटेकोरपणे केलेल्या शोकप्रदर्शक वेषामुळे तो या गंभीर प्रसंगात एखाद्या विदूषकासारखा दिसत होता. हा आचरटपणा म्हणावा की दैवाने केलेली क्रूर चेष्टा ते मला कळत नव्हतं.

मी सुचवल्याप्रमाणे इटलीला जाण्याऐवजी त्याने हॉलंडला जायचं ठरवलं आहे असं त्याने मला सांगितलं.

“मी उद्याच निघणार आहे. आपली बहुधा पुन्हा भेट होणार नाही.”

मी उत्तरादाखल काहीतरी बोलायचं म्हणून बोललो आणि म्लान चेहेऱ्याने बळेच हसलो.

“मी गेल्या पाचएक वर्षात घरी गेलेलो नाही. सगळं विसरलो आहे असं वाटतं. इतकी वर्ष वाड-वडिलांच्या घरापासून एवढ्या लांब राहिल्यामुळे मला परत जायला थोडं कसं तरी वाटत होतं. पण ते केवळ एक निमित्त होतं.”

तो खूपच हळवा झाला होता. त्याला त्याच्या आईच्या आठवणी आल्या. इतकी वर्ष आपला उपहास तो आनंदाने सहन करायचा. पण ब्लांशने त्याच्याशी प्रतारणा केल्यापासून त्याला ते सहन होईना. टिंगल टवाळी हसण्यावर नेणं यापुढे

त्याला शक्य झालं नसतं. त्याने मला त्याचं वडिलोपार्जित लहानसं सुंदर घर, प्रेमळ, लाड पुरवणारी आई, तिची टापटीपीची आवड या बद्दल बऱ्याच गोष्टी तपशीलवार सांगितल्या. त्याचे वडिल आता खूप म्हातारे झाले होते. आयुष्यभर केलेल्या मेहनतीने त्यांच्या हाताला घट्टे पडले होते. संध्याकाळी ते त्याच्या आईला आणि बहिणीला मोठ्याने वर्तमानत्र वाचून दाखवत. बातम्या ऐकता ऐकता त्या दोघींचं शिलाईयंत्रावर बसून काहीतरी शिवणकाम चालू असे त्यात त्यांना खंड पाडायचा नसे. त्या छोट्याशा गावात काहीच घडत नसे. झपाट्याने पुढे जाणाऱ्या संस्कृतींच्या शर्यतीतून ते गाव केव्हाच पार मागे पडले होते. आयुष्यभर इमाने इतबारे काबाडकष्ट करणाऱ्यांना मित्रासमान वाटणाऱ्या मृत्युने गाठेपर्यंत वर्षामागून वर्ष निघून जायची.

"माझ्या वडिलांची मी त्यांच्यासारखं सुतारकाम शिकावं अशी इच्छा होती. आमच्या घराण्यात पाच पिढ्या सुतारकाम आहे. बापाने आपली कला मुलाला शिकवावी, मुलाने इकडे तिकडे न बघता बापाच्या पावलावर पाऊल टाकावं. जीवनाची इतिकर्तव्यता झाली असं म्हणतात ती कदाचित यातच असावी. मी जेव्हा लहान होतो तेव्हा मला आमच्या शेजारी राहणाऱ्या गाडीकाम करणाऱ्याच्या मुलीशी लग्न करायचं होतं. ती निळया डोळयांची दोन शेपट्यांची वेणी घालणारी लहान मुलगी होती. एव्हाना आम्हाला एखादा मुलगाही असता आणि आज तो हाताशी आला असता."

स्ट्रोव्हने सुस्कारा सोडला आणि तो गप्प झाला. असं असतं तर काय झालं असतं याचं चित्र तो मनात रंगवत होता. त्या ग्रामिण जीवनातील सुरक्षितता नाकारून शहरात आल्याला बराच काळ लोटला होता. त्याच ग्रामीण जीवनाची आता त्याला ओढ वाटू लागली होती.

"हे जग मोठं निष्ठुर असतं. आपण येथे कोठून आलो आहोत, का आलो आहोत, कुठे जाणार आहोत हे कोणालाही माहित नसतं. त्यामुळे आपण नेहमी नम्र असलं पाहिजे. शांततेतील सौंदर्य पाहता आलं पाहिजे. आयुष्याला आपण इतकं सरळ साधेपणे सोमोरं गेलं की दैवाच्याही ते लक्षात येणार नाही. सर्वसामान्यांचं प्रेम आपल्याला मिळेलं असं आपलं वर्तन असलं पाहिजे. त्यांचं अज्ञान कित्येक वेळा आपल्या ज्ञानापेक्षा श्रेष्ठ असतं. आपण सगळयांनी आपापल्या वाटेला आलेलं आयुष्य तसंच शांत, हळुवारपणे, कोणाला न दुखवता व्यतित केलं पाहिजे. त्यातच जीवनाचं शहाणपण असतं."

मला मात्र हे दुबळेपणाचं लक्षण वाटलं. संसाराचा परित्याग वगैरे गाष्टींच्या मी ठाम विरोधात आहे. पण माझं मत मी माझ्यापाशीच ठेवलं.

"आपण चित्रकार आहोत याच्याबद्दल तुला काय वाटतं?"

त्याने खांदे उडवले.

"माझी चित्रकला बरी होती. मला शाळेत बक्षीसं मिळायची. माझ्या आईला माझं फार कौतूक होतं. तिने मला जलरंगाची एक पेटी आणून दिली होती. तिने माझी रेखाचित्रं आमच्या गावातील चर्चचा पॅस्टर, डॉक्टर आणि जजला दाखवली. त्यांनी मला शिष्यवृत्तीसाठी ॲमस्टरडॅमला पाठवलं. आणि मला ती शिष्यवृत्ती मिळालीही. तिला बिचारीला माझा प्रचंड अभिमान वाटला. मला ॲमस्टरडॅमला पाठवताना तिला अतिशय वाईट वाटत होतं. पण तिने हसून तिचं दु:ख लपवलं. तिचा मुलगा एक कलाकार होणार म्हणून ती आनंदित झाली होती. त्यांनी पोटाला चिमटा काढून माझं शिक्षण पुरं केलं. माझं चित्र जेव्हा पहिल्यांदाच प्रदर्शनात लागलं तेव्हा माझे वडिल, आई आणि बहीण ॲमस्टरडॅमला आले होते. माझं चित्र बघून तिच्या डोळयात पाणी उभं राहिलं." त्याचे डोळे पाणावले.

"आमच्या घराच्या प्रत्येक भिंतीवर माझी चित्रं सोनेरी फ्रेम करून लावलेली आहेत."

त्याची छाती अभिमानाने भरून आली होती. मला त्याने इटलीमधील सायप्रस आणि ऑलीव्हच्या झाडांच्या पार्श्वभूमीवर काढलेली शेतकऱ्यांची छान छान चित्रं आठवली. सोनेरी रंगाच्या जाड-जूड लाकडी फ्रेममधील ती चित्रं एका शेतकऱ्याच्या घरात कशी दिसत असतील असा विचार माझ्या मनात आला.

"आईच्या मनाप्रमाणे मी चित्रकार झाल्यावर तिला बिचारीला अगदी कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं असेल. पण कदाचित माझ्या वडिलांच्या इच्छेप्रमाणे मी जर साधा सुतार झालो असतो तर आज मी जास्त सुखी असतो."

"कलेमुळे आयुष्यात काय मिळतं काय गमवावं लागतं हे आता तुला चांगलं ठाऊक झालं आहे. आता आहे हेच पुढे चालू ठेवणार आहेस की दुसरं काही करण्याचा विचार आहे. दुसरं काही केलंस तर कलेमुळे तुला जे काही मिळालं आहे ते गमावल्यासारखं वाटेल का?"

"कलेतून जे समाधान मिळतं तसं समाधान जगात दुसऱ्या कशातूनही मिळणं शक्य नाही." तो थोडा वेळ विचार करून बोलला.

त्याने माझ्या प्रतिक्रियेची वाट पाहिली. बोलावं की नाही असा विचार करून तो म्हणाला:

"मी स्ट्रिकलँडला भेटलो ते तुला माहित आहे का?"

"एवढं झाल्यावर तू त्याला भेटायला गेलास?"

मला आश्चर्याचा धक्काच बसला होता. मला वाटलं होतं की तो आयुष्यात त्याचं तोंडही बघणार नाही. स्ट्रोव्ह कसंनुसं हसला.

“माझं स्वाभिमानाचं भान इतरांपेक्षा थोडंसं कमी आहे हे तुला ठाऊक आहेच.”

“तुला म्हणायचंय तरी काय?”

त्याने मला एक गोष्ट सांगितली.

## ३९

ब्लांशचे अंत्यविधी आटोपल्यानंतर मी त्याला त्याच्या घराजवळ सोडलं होतं. तो जड अंत:करणाने घरात शिरला. आत्मपीडेच्या अंत:प्रेरणेने त्याच्या नकळत त्याला स्टुडियोत ओढून आणलं होतं. पुढे होणाऱ्या यातना त्याला दिसत होत्या. जिन्याच्या पायऱ्या कशाबशा चढत तो वर आला. त्याचे पाय लटपटत होते. दरवाजा उघडून आत पाऊल टाकण्याचा धीर यावा म्हणून त्याने बराच वेळ वाट पाहिली. त्याच्या पोटात ढवळून आलं. जिन्याच्या पायऱ्या उतरून माझ्या घरी जावं असं त्याला प्रकर्षाने वाटू लागलं. स्टुडियोत कोणीतरी आहे असा त्याला भास झाला. कित्येक वेळा जिना चढून झाल्यानंतर दम खाण्यासठी त्याला मिनीट दोन मिनीट थांबावं असं वाटायचं, पण ब्लांशला भेटायला अधीर झाल्यामुळे लगेच दरवाजा उघडून आत शिरायचा, याची त्याला आठवण झाली. तासभर जरी तो बाहेर असला तरी त्याला ते युगानुयुगासारखे वाटत. ती गेली आहे हे सत्य तो क्षणभर विसरला. जे झालं ते एक दु:स्वप्न असावं, भयंकर दु:स्वप्न. जेव्हा तो दरवाजा उघडत असे तेव्हा त्याला ब्लांश किचनमध्ये काही तरी काम करत असलेली दिसायची, शेदाँच्या *बेनेडिसिते* या चित्रातल्या बाईसारखी. त्याने खिशातून किल्ली काढली आणि दरवाजा उघडून आत गेला.

अपार्टमेंट रिकामं असल्यासारखं वाटत नव्हतं. त्याच्या बायकोचा टापटीपीचा गुण त्याला अतिशय आवडायचा. तो टापटीपीच्या वातावरणात वाढला होता. त्याला व्यवस्थितपणाची आवड होती, त्यामुळे सगळया गोष्टी जागच्या जागी पाहून त्याला बरं वाटलं. झोपण्याची खोली बघून ती नुकतीच बाहेर गेली आहे असं वाटत होतं. प्रसाधनाच्या टेबलावर ब्रश, कंगवे वगैरे गोष्टी लावून ठेवलेल्या होत्या. तिला स्टुडियोतून हॉस्पिटलमध्ये नेल्यावर कोणी तरी पलंगावरच्या चादरीच्या चुण्या नीट केल्या होत्या. तिचा नाईटड्रेस घडी करून

ठेवलेला होता. हे सगळं बघून तिला स्टुडियोत परत यायला मिळणार नाही यावर कोणाचा विश्वास बसला असता.

तहान लागली म्हणून तो पाणी प्यायला स्वयंपाकघरात गेला. इथे सुद्धा सगळं जागच्या जागी होतं. स्ट्रिकलँडशी भांडण झालं त्या रात्रीची जेवणाची भांडी धुवून रॅकवर व्यवस्थित लावून ठेवलेली होती. काटे, चमचे, सुऱ्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले होते. उरलेलं चीज झाकून ठेवलं होतं. पत्र्याच्या डब्यात पाव होता. ती रोजच्या रोज बाजारात जाऊन जे आवश्यक असेल फक्त तेच घेऊन यायची. त्यामुळे दुसऱ्या दिवसासाठी फारसं उरलेलं नसायचं. स्ट्रिकलँड भांडण झाल्यानंतर ताबडतोब निघून गेला होता हे पोलीसांच्या चौकशीत समजलेलं होतं. भांडण झाल्यावर ब्लांशने सगळं धुवून आवराआवर केली असली पाहिजे हे लक्षात आल्यावर त्याच्या अंगावर काटा आला. आत्महत्या करतानासुद्धा तिला तिच्या व्यवस्थितपणाचा विसर पडला नव्हता. आत्मनाश करण्याचा निर्णय घेतल्यावरसुद्धा तिला असलेलं आत्मभान भयंकर विलक्षण होतं. अचानक आलेल्या दु:खाच्या उमाळयाने त्याला भोवळ आली. शयनगृहात जाऊन त्याने बिछान्यावर अंग झोकून दिलं.

“ब्लांश, ब्लांश, ब्लांश.” तो कण्हत कण्हत तिला हाका मारत होता.

तिला ज्या यातना भोगाव्या लागल्या त्याच्या विचाराने झोप लागणं शक्य नव्हतं. त्याच्या नजरेसमोर दृश्य तरळलं. ती स्वयंपाकघरात प्लेट, ग्लास, काटे-चमचे धुत आहे, सिंक घासत आहे, पोतेरं वाळत घालत आहे ... अजूनही ते चिंध्या झालेलं फडकं तिथेच वाळत घातलेलं दिसत होतं ... नंतर तिने एकवार चौफेर नजर फिरवून सगळी साफसफाई झाली आहे याची खात्री करून घेतली. तिने एप्रन काढून दरवाज्याच्या मागच्या खुंटीला लावला, ऑक्झॅलीक ॲसिडची बाटली घेतली आणि ती शयनगृहात गेली.

दु:खातिरेकाने तो उठला आणि स्टुडियोत गेला. उजेड येण्यासाठी त्याने खिडकीचे पडदे खर्कन बाजूला केले आणि चौफेर नजर फिरवली. काहीही बदललेलं नव्हतं. स्ट्रिकलँडला आपल्या भोवती काय आहे आणि काय नाही याची कसलीच फिकीर नव्हती. स्टुडियो सजावटीत स्ट्रोव्हची कलात्मक दृष्टी दिसून येत होती. भिंतीवर ब्रोकेडचे तुकडे लावलेले होते, रेशमी चादरीने झाकलेला पॉलीश उडालेला पण सुबक पियानो एका कोपऱ्यात होता, दुसऱ्या कोपऱ्यात व्हिनस डी मिलो आणि त्याच्या समोर व्हिनस डी मेडिसीच्या शिल्पाच्या नक्कल केलेल्या फ्रेंच प्लास्टरमधल्या प्रति होत्या. कोरीव काम केलेली इटालियन कॅबिनेट आणि दोन तीन उठाव-शिल्प ठेवलेली होती. व्हेलाक्काच्या इनोसन्ट एक्सची या पेंटींगची रोममध्ये असताना स्वत: स्ट्रोव्हने केलेली एक नक्कल जाड-जूड सोनेरी फ्रेम करून भिंतीवर लावलेली होती. स्ट्रोव्ह स्वत:च्या सगळया चित्रांसाठी अशा कोरीव नक्षीकाम केलेल्या लाकडी फ्रेम वापरत असे. स्ट्रोव्हला स्वत:च्या रूचीचा अभिमान होता. स्टुडियोतील वातावरण रुमानी असलं पाहिजे असा त्याचा कटाक्ष असायचा. ते दृष्य बघून आता त्याला काळजात कट्यार खुपसल्यासारखं वाटत होतं. अचानक त्याला भिंतीकडे पाठ करून ठेवलेला एक कॅनव्हास दिसला. तो नेहमी जे कॅनव्हास करायचा त्यापेक्षा हा खूपच मोठा दिसत होता. त्याने जवळ जाऊन पाहिलं. ते एक न्युड होतं. त्याचं हृदय धडधडू लागलं. ते स्ट्रिकलँडचं चित्र होतं. त्याने लाथ मारून ते भिंतीकडे ढकललं. त्यामुळे ते उताणं पडलं. कुतुहलाने त्याने ते इझलवर लावलं आणि मागे जाऊन पाहू लागला.

त्याने एक आवंढा गिळला. ते सोफ्यावर पहुडलेल्या एका नग्न स्त्रीचं चित्र होतं. एक हात डोक्या खाली ठेवला आहे, दुसऱ्याने हाताने योनी झाकली आहे, एका पायाचा गुडघा किंचीतवर उचलेला आहे. न्युड पेंटींगची ती एक अभिजात पोज होती. स्ट्रोव्ह चक्रावला. ती ब्लांश होती. दु:ख, मत्सर आणि संतापाने त्याचं डोकं फिरलं. तो गुरगुरला. त्याने मुठी आवळल्या आणि अदृश्य शत्रूवर हवेत गुद्दे

मारले. त्याला मोठ्या आवेशाने आरोळी ठोकायची होती पण तसं करताना त्याचा आवाज चिरकला. त्याचा स्वत:वरचा ताबा सुटला. हे सहन करण्याच्या पलीकडचं होतं. ही हद्द झाली. त्या चित्राच्या फाडून चिंध्या करण्यासाठी काही मिळतं का म्हणून त्याने इकडे तिकडे पाहिलं. एका मिनिटांत ते नष्ट करायला हवं. त्याच्या हाताला काही लागेना. शेवटी त्याला एक मोठा पेंट स्क्रॅपर सापडला. तो पेंट स्क्रॅपर एखाद्या खंजिरासारखा हातात घेऊन युध्दोन्मादात मारतात तशी मोठी आरोळी मारत त्याने कॅनव्हासवर उडी घेतली.

ही गोष्ट सांगताना स्ट्रोव्हच्या अंगात संचारलं होतं. त्याने टेबलावरचा डिनर नाईफ हातात घेऊन परजला. वार करण्यासाठी हात उचलला आणि मुठीतून सुरी सोडून दिली. सुरी जमिनीवर पडून खण्कन आवाज झाला. माझ्याकडे बघून त्याने विकटहास्य केलं. पण त्याच्या तोंडातून शब्द फुटेना.

“बोल. काय सांगणार आहेस ते एकदाचं सांगून मोकळा हो.”

“मला काय झालं ते कळेना. मी त्या कॅनव्हासवर एक वार करून तो फाडणार होतो. वार करण्यासाठी मी हात उचलला होता. पण अचानक मला ते दिसलं.”

“काय दिसलं?”

“ते चित्र. ती एक दिव्य कलाकृती होती. मला त्याला स्पर्श करवेना. मला भिती वाटली.”

स्ट्रोव्ह पुन्हा गप्प झाला. तो आ वासून त्याच्या टपोऱ्या निळया डोळयांनी माझ्याकडे बघायला लागला.

“ती एक महान कलाकृती होती. माझ्या छातीत धस्स झालं. एक भयंकर गुन्हा माझ्या हातून जवळ जवळ होणार होता. मी जवळ जाऊन पाहिलं. माझा पाय खाली पडलेल्या स्क्रॅपरला लागला. माझ्या अंगावर शहारे आले.”

त्याला काय वाटलं असावं त्याची मला थोडी कल्पना आली. मी दुसऱ्या दुनियेत गेलो. तेथील मूल्यव्यवस्था अगदी वेगळीच होती. मला तेथे एखाद्या परक्या माणसासारखं वाटायला लागलं. स्ट्रोव्ह मला त्या चित्राविषयी सांगत होता पण तो जे बोलत होता ते अगदी असंबद्ध होतं आणि त्याचा अर्थ कळण्यासाठी मला विचार करावा लागत होता. स्ट्रिकलँडला ज्या बंधनांनी आजपर्यंत जखडून ठेवलं होतं त्या बंधनातून तो मुक्त झाला होता. त्याच्या प्रतिभेचे दिव्य चक्षू उघडले होते. त्याची रेषा साधी, जोरकस आणि नेमकी होती. त्या रेषेवर त्याचा स्व:तचा संपूर्ण ताबा आणि ठसा होता. पहुडलेल्या नग्न देहाचं वजन रेषेत आलं होतं. त्याचं रंगकाम मनस्वी होतं. नग्न देहाच्या सौंदर्यातील अलैकिकत्वाला बाधा न आणता वासनेची अनुभूती येत होती. चित्राची गूढ रचना दर्शकाच्या कल्पनाशक्तीला खाद्य पुरवणारी होती. चित्राच्या अवकाशातील प्रकाशाने उजळलेल्या मोकळया जागा नव्या रहस्यांचा शोध घेत होत्या.

माझं बोलणं अलंकारीक वाटायला कारण स्ट्रोव्ह आहे. कारण त्याने त्याच भाषेत मला वर्णन करून सांगितलं. काव्याची निर्मिती भावनेच्या भरात होते हे आपल्याला माहित आहे. स्ट्रोव्हला असं पूर्वी कधीही वाटलं नव्हतं. ते शब्दात कसं पकडावं ते त्याला नीट कळत नव्हतं. अवर्णनीय गोष्ट शब्दात व्यक्त करण्याचा प्रयत्न केला तर कसं होईल. पण एक गोष्ट त्याने मला स्पष्ट सांगितली. लोक सौंदर्याकडे फारशा गांभीर्याने पाहत नाहीत, शब्दांची त्यांना जाण नसते, शब्दांचा वापर ते फार निष्काळजीपणे करतात, त्यामुळे त्या शब्दांचा अर्थ हरवून बसतो, एकच शब्द बऱ्याच गोष्टींसाठी वापरला जातो त्यामुळे त्या शब्दातून जे महत्वाचं तत्व व्यक्त करायचं असतं ते बाजूलाच राहतं आणि इतर असंबद्ध किरकोळ गोष्टी समोर येतात.

उदाहरणार्थ कपडे सुंदर असतात, कुत्रा सुंदर असतो, चर्चमधील प्रवचनही सुंदर असतं. पण साक्षात सौंदर्य सामोरं आलं तर त्यांना ते ओळखताच येत नाही. त्यांच्यामध्ये जी काही थोडी फार संवेदनाशीलता असते तिची धार पोकळ वटवटीने बोथट झालेली असते. भोंदू साधू अध्यात्मिक शक्तीचा दावा करून लोकांना फसवतो तसं हे असतं. स्ट्रोव्ह जरी बावळट असला तरी तो सौंदर्याचा भोक्ता होता, त्याची तळमळ सच्ची होची, तो प्रामाणिक होता. त्याच्या लेखी सौंदर्यानुभूती म्हणजे दैवी अनुभव होता. सश्रद्ध माणसाच्या मनात जे स्थान देवाला असतं ते स्थान त्याच्या मनात सौंदर्याला होतं. म्हणूनच जेव्हा त्याला सौंदर्याचं साक्षात दर्शन झालं तेव्हा तो घाबरून गेला.

‘‘तू जेव्हा स्ट्रिकलँडला भेटलास तेव्हा तुमचं काय बोलणं झालं?’’

‘‘मी त्याला तू हॉलंडला येशील का असं विचारलं.’’

माझी वाचाच बसली. मी त्याच्याकडे वेड्यासारखा पाहू लागलो.

‘‘ब्लांश आम्हाला दोघांनाही आवडायची. माझ्या आईच्या घरात त्याच्यासाठी जागा करता आली असती. गावातल्या गरीब, सिधा-साध्या खेडूतांच्या संगतीत त्याचा जीव रमला असता. त्यांच्या सरळमार्गी जीवनक्रमातून त्याला काही तरी घेता येण्यासारखं होतं.’’

‘‘तो काय म्हणाला?’’

‘‘तो फक्त हसला. माझा प्रश्न त्याला मूर्खपणाचा वाटला असावा. तो म्हणाला त्याचा दुसरं काही तरी करण्याचा विचार आहे.’’

मला वाटलं की त्याने आणखी वेगळे शब्द वापरले असावेत.

"ब्लांशचं चित्र त्याने मला दिलं."

स्ट्रिकलँडने असं का केलं याचं मला आश्चर्य वाटलं. पण मी काही बोललो नाही. थोडा वेळ आम्ही दोघंही गप्प होतो.


"तू तुझ्या बाकीच्या सामानाचं काय केलंस?" मी शेवटी विचारलं.

"मी एका ज्यू सावकाराला गाठलं. त्याने मला सगळ्या सामानाचे एक रकमी पैसे दिले. माझी चित्रं मी बरोबर घेऊन जाणार आहे. त्याशिवाय या जगात माझ्याकडे दुसरं काही नाही, फक्त एक कपड्यांची पेटी आणि थोडी फार पुस्तकं सोडली तर."

"बरं आहे तू तुझ्या घरी परत चालला आहेस ते," मी म्हणालो.

त्याला त्याचा सर्व भूतकाळ विसरायचा होता असं मला वाटलं. काळ जसा जाईल तसं त्याला वाटणारं दु:ख हलकं होत जाईल. मानवाला मिळालेल्या विस्मृतीच्या वरदानाने आयुष्याचा गाडा पुनश्च हाकण्याची शक्ती त्याला लवकरच मिळेल. तो तरूण होता. थोडी वर्ष गेली की आयुष्याच्या या दुर्दैवी कालखंडाकडे तो जेव्हा मागे वळून पाहिल तेव्हा त्याला फारसं वाईट वाटणार नाही. आज ना उद्या हॉलंडमधील एखाद्या प्रामाणिक मुलीशी त्याचं लग्न होईल. माझी खात्री होती की त्याचा संसार सुखी होईल. तिय्यम दर्जाची असंख्य फालतू चित्र रंगवत तो आपलं उर्वरित आयुष्य कंठेल या विचाराने मला मात्र मनातल्या मनात हसू आलं.

दुसऱ्या दिवशी मी त्याला ॲमस्टरडॅमला जाण्यासाठी निरोप दिला.



Artist: Jean-Baptiste Chadrin

Title: Benedecite, Date: circa 1791

Medium: oil on canvas, Source: Wikipedia



Artist: Diego Velázquez (1599–1660), Title: Portrait of Innocent X, Date: circa 1650

Medium: oil on canvas, Dimensions: H: 141 cm (55.5 in). W: 119 cm (46.9 in),

Current location: Doria Pamphilj Gallery, Source: wikidata:Q1240092

## ४०

पुढचा महिनाभर मी माझ्या उद्योगात मग्न होतो. त्याकाळात त्या दु:खद प्रकरणाशी संबंधीत कोणीही मला भेटलं नाही आणि त्यामुळे मला त्यात डोकं घालावं लागलं नाही. पण एके दिवशी भटकत असताना अचानक मला चार्लस् स्ट्रिकलँड दिसला. त्याला बघितल्यावर जी भयंकर घटना मी विसरू पाहत होतो त्याची मला आठवण झाली आणि त्या घटनेला तो कारणीभूत असल्याने एक तिडीक माझ्या मस्तकात गेली. त्याला टाळून पुढे जाणं पोरकट वाटलं असतं म्हणून ओळखीचं स्मित करून मी पुढे सटकलो. पण पाठीमागून कोणीतरी माझ्या खांद्यावर हात ठेवला.

“फार घाईत दिसतोस.” त्याने नम्रपणे विचारलं.

त्याला भेटायला जो तयार नसे त्याच्याशी तो अत्यंत अदबीने वागे हे त्याचं एक वैशिष्ट होतं. मी ज्या थंडपणे त्याला प्रतिसाद दिला त्यावरून मी त्याला भेटू इच्छित नाही हे त्याला कळलं असावं.

“मी खरंच घाईत आहे.” मी थोडक्यात कटवण्याचा प्रयत्न केला.

“मी तुझ्या बरोबर चालत येतो.”

“कां?” मी विचारलं?

“तुझ्या सहवासात मला बरं वाटतं म्हणून.”

मी उत्तर दिलं नाही. तो माझ्या बाजूने शांतपणे चालत होता. आम्ही दोन फर्लांग तरी तसे चालत असू. मला तो सगळा प्रकार हास्यास्पद वाटू लागला. वाटेत एक स्टेशनरीचं दुकान लागलं आणि मी वर्तमानपत्र विकत घ्यायचा विचार केला. त्या निमित्ताने त्याला फुटवण्यासाठी एक कारणही मिळालं असतं.

“मला इकडे एक काम आहे. गुड बाय.”

“मी तुझी वाट पाहिन.”

मी खांदे उडवले आणि दुकानात गेलो. त्या दुकानात मिळणारं फ्रेंच वृत्तपत्र काही चांगलं नव्हतं. मला नको असलेल्या गोष्टीसाठी उगाच खर्च करायला मला आवडलं नाही त्यामुळे माझा उद्देश सफल झाला नाही. तिथे जी गोष्ट मिळणार नाही याची मला खात्री होती ते मी मागितलं आणि एका मिनिटात मी बाहेर आलो.

“तुला हवं होतं ते मिळालं का?”

“नाही.”

आम्ही बराच वेळ न बोलता चालत होतो. शेवटी आम्ही जेथून अनेक रस्ते फुटत होते अशा एका नाक्यावर आलो.

“तुला कुठे जायचं आहे?”

“तू जाशील तिथे.”

“मी घरी चाललो आहे.”

“मी तुझ्या घरी येईन आणि पाईप ओढत बसेन.”

“त्यासाठी मी बोलवेपर्यंत तुला वाट बघावी लागेल.” मी थंडपणे उत्तर दिलं.

“आमंत्रण मिळण्याची शक्यता असती तर मी थांबलोही असतो.”

“तुला तुझ्या समोरची ती भिंत दिसत आहे का?” मी बोट दाखवत म्हणालो.

‘‘दिसत आहे.’’

‘‘तसं असेल तर मला वाटतं की तुला बोलवायची मला इच्छा नाही हे ही तुला समजायला हरकत नसावी.’’

‘‘मला तशी शंका आली होती.’’

मला हसल्यावाचून राहवलं नाही. जो मला हसवतो त्याचा मी दुस्वास करू शकत नाही हा माझा एक दुबळेपणा आहे. तरीही मी ओढून धरलं.

‘‘तू अगदी हलकट आणि नीच आहेस. तुझ्यासारख्या जंगली जनावराशी माझी गाठ पडली हे माझं मोठं दुर्दैव. जो तुझा एवढा तिरस्कार करतो त्याला तुला का भेटायचं आहे?’’

‘‘माझ्या मित्रा, तुला माझ्याबद्दल काय वाटतंय याची मी पर्वा करतोय असं तू का गृहीत धरून चालला आहेस.?’’

‘‘ते सगळं गेलं उडत,’’ मी जोरात म्हणालो, कारण माझा हेतू तडीस जाणार नाही याची मला भिती वाटायला लागली, ‘‘मला ते सांगायचं नाही.’’

‘‘मी तुला बिघडवेन अशी तुला भिती तर वाटत नाही ना?’’

त्याच्या आवाजातील मिश्कीलीमुळे मी हास्यास्पद ठरलो. तो माझ्याकडे बघून उपरोधाने मनातल्या मनात हळूच हसत असावा याची मला खात्री होती.

‘‘तुला पैशाची कडकी लागली असेल.’’ मी अगदी उद्धटपणाने विचारलं.

“मागच्या अनुभवावरून तुझ्यासारख्याकडून पैसे उधार मिळतील अशी अपेक्षा ठेवायला मी काही मूर्ख नाही.”

“स्तुतीचे चार शब्द ऐकण्यासाठी तू हपापलेला असशील.”

तो दात विचकत हसला.

“चांगूलपणा विसरायची संधी मी तुला जोपर्यंत देत आहे तोपर्यंत तरी तू माझ्ा मनापासून तिरस्कार करणार नाहीस याची मला खात्री आहे.”

मी मोठ्या मुश्कीलीने हसू दाबून ठेवलं.

तो जे म्हणाला त्यात एक तथ्य होतं. माझ्या स्वभावातला तो एक दोष आहे. माणूस कितीही दुष्ट आणि नीच असला तरी जो मला जशास तसं उत्तर देतो तो मला आवडतो.

स्ट्रिकलँडचा मला जो तिरस्कार वाटायचा तो कितीही ताणून धरलं तरी फार काळ टिकणं कठीण होतं. हा माझा नैतिक दुबळेपणा आहे. मी त्याला जी दुषणं देत होतो ते वरवरचं होतं आणि हे त्याला कळलं होतं. तो मनातून नक्कीच मला हसत असणार. गप्प बसण्यापलीकडे करता येण्यासारखं माझ्याकडे काही नव्हतं. मी खाली मान घालून चालत राहिलो.

## ४१

आम्ही चालत चालत माझ्या घरापर्यंत आलो. त्याला आत ये असं मी म्हणणार नव्हतो. म्हणूत न बोलता मी पायऱ्या चढायला सुरवात केली. तो पावलावर पाऊल ठेऊन माझ्या मागोमाग घरात आला. तो पूर्वी कधीच माझ्या घरी आला नव्हता. माझी जागा मी एवढ्या मेहनतीने सजवली होती पण त्याने एक साधा दृष्टीक्षेपही टाकला नाही. टेबलावर तंबाखूचा डबा होता. त्याने आपला पाईप काढून त्यात तंबाखू भरला. एकच खुर्ची बिनहातांची होती. तो त्या खुर्चीवर पाठचे दोन पाय मागे झुकवून बसला.

"तू त्या आरामखुर्चीत का बसत नाहीस? तुला घरच्यासारखं वाटेल." मी किंचित चिडून विचारलं.

"माझ्या आरामाची तू एवढी काळजी का करतोयस?"

"मी मुळीच करत नाही, मी स्वत:ची काळजी करतोय. कोणाला असं अवघडलेल्या अवस्थेत बसलेलं पाहिलं की मलाच अस्वस्थ वाटायला लागतं."

तो गालातल्या गालात हसला. पण तो जागेवरून हलला नाही. माझ्याकडे लक्ष न देता तो शांतपणे धुम्रपान करत होता. तो कोणत्यातरी विचारात गढून गेला होता. तो माझ्याकडे का आला आहे याचं मला आश्चर्य वाटायला लागलं.

माणसाचा स्वभाव विचित्र असतो. त्यातील वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना लेखकाला त्याची नैतिक भूमिका बाजूला ठेवावी लागते. सुरूवाती सुरूवातीला लेखक अस्वस्थ होतो. पण कालांतराने मन घट्ट होतं आणि त्याची सवय होऊन जाते. असं करणं वाईट आहे अशी त्याला टोचणी असते. पण विश्लेषणाने मिळणाऱ्या कलात्मक समाधानाच्या पुढे त्याला ती जाचक वाटत नाही. सद्सद्विवेकबुद्धीवर कुतूहलबुद्धी मात करते. बदमाश इसम समाजाचे कायदे कानून

मानत नसला तरी त्याला गुन्हेगारांच्या का होईना पण नितीनियमांच्या चौकटीतच राहवे लागते. शेक्सपीअरला इयागोचं पात्र रंगवताना जी मजा आली असेल ती कदाचित डेस्डिमोनाच्या वेळेला आली नसेल. लेखकाच्या स्वत:च्या व्यक्तिमत्वातील दु:प्रवृत्ती सामाजिक बंधनांमुळे त्याच्या अंतर्मनात खोल दबलेल्या असतात. आपल्या पात्रांना जिवंत करताना लेखक कदाचित त्याच दु:प्रवृत्ती त्यांना बहाल करीत असेल. त्याला मिळणारं कलात्मक समाधान म्हणजे कदाचित त्याने टाकलेला सुटकेचा निश्वास असू शकेल.

लेखकाला न्याय करायचा नसतो. त्याला फक्त समजून घ्यायचं असतं.

एक माणूस म्हणून स्ट्रिकलँड भयंकर होता. मला तो मुळीच आवडत नसे. पण त्याच वेळी त्याच्या वर्तनामागचा उद्देश शोधून काढण्याचं जबरदस्त कुतूहलही होतं. त्याने मला गोंधळात टाकलं होतं. ज्या स्ट्रोव्ह दांपत्याने त्याला एवढ्या मायाळूपणे वागवलं, त्याच्या गंभीर आजारात त्याची सेवा करून त्याला जीवदान दिलं, त्यांचं आयुष्य उध्वस्त करायला तो पूर्णपणे जबाबदार होता. त्या बद्दल त्याला काय वाटतं हे जाणून घ्यायला मी उत्सुक होतो. मी सरळ विचारलं.

‘‘स्ट्रोव्ह मला म्हणाला की तू त्याच्या बायकोचं एक पेंटींग केलं आहेस आणि ते अगदी उत्कृष्ट झालंय.’’

स्ट्रिकलँडने तोंडातला पाईप काढला आणि त्याच्या डोळयात हसू फुललं.

‘‘ते करताना मजा आली.’’

‘‘ते तू त्याला का देऊन टाकलंस?’’

‘‘एकदा काढून झाल्यावर मला त्याचा काही उपयोग नव्हता.’’

“स्ट्रोव्ह ते जवळ जवळ फाडून टाकणार होता तुला माहित आहे?”

“नाही तरी ते एवढं कुठे चांगलं झालं होतं.”

तो एक दोन क्षण काही बोलला नाही. नंतर त्याने पाईप परत तोंडात ठेवला आणि माझ्याकडे बघून गालातल्या गालात हसला.

“तो जाड्या मला भेटायला आला होता हे तुला ठाऊक आहे का?”

“त्याने तुला जे सांगितलं त्याने तुला काहीच वाटलं नाही?”

“मुळीच नाही. असं भावनेच्या आहारी जाणं म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे.”

“मला वाटतं तू त्यांचं आयुष्य उध्वस्त केलं आहेस हे तू विसरतो आहेस.”

त्याने त्याची दाढी खाजवली.

“तो अगदी फालतू चित्रकार आहे.”

“पण तो माणूस म्हणून किती चांगला आहे.”

“तो आचारी म्हणून त्याहून चांगला असेल.” स्ट्रिकलँड उपहासाने म्हणाला.

त्याचा निगरगट्टपणा कमालीचा होता. मी एवढा संतापलो की मी त्याची चांगलीच खरडपट्टी काढायचं ठरवलं.

“मी निव्वळ कुतूहलापोटी तुला विचारत आहे. ब्लांश स्ट्रोव्हच्या दुर्दैवी मृत्युमुळे तुला एक क्षणभर तरी पश्चाताप झाला का?”

मी त्याच्या चेहे्ऱ्यावरचे भाव बदलत आहेत का ते बघत होतो. पण तो दगडासारखा अविचल होता.

“मला का व्हावा?”

“सत्य परिस्थिती तुला एकदा समजावून सांगितली पाहिजे. तू मरायला टेकला होतास. डर्क स्ट्रोव्हने तुला घरी आणलं. आईने घेतली नसती एवढी तुझी काळजी घेतली. स्वत:ची गैरसोय करून, स्वत:चा वेळ, पैसा तुझ्यासाठी खर्च केला. मृत्युच्या जबड्यातून तुला बाहेर काढलं.”

स्ट्रिकलँडने खांदे उडवले.

“त्या जाड्याला हे सगळे उपद्व्याप करण्यात मजा वाटत होती त्याला मी काय करणार? तो त्याचा प्रश्न होता.”

“आपण मान्य करूया की तुला कृतज्ञता व्यक्त करण्याची गरज नव्हती, पण याचा अर्थ असा नव्हे की तू त्याच्या बायकोला त्याच्यापासून हिरावून घ्यावंस. तू त्यांच्या आयुष्यात येईपर्यंत त्या दोघांचा संसार सुखाने चालू होता. तू त्यांना ते होते तसंच का राहू दिलं नाहीस?”

“ते दोघं सुखी होते असं तू कशावरून म्हणत आहेस?”

“ते सरळ दिसत होतं.”

“तुझ्या नजरेतून काही सुटत नाही असं तू म्हणतोस ना. त्याने तिला जे काही केलं होतं त्यानंतर तिने त्याला माफ केलं असतं असं तुला वाटतं का?”

"तुला काय म्हणायचं आहे?"

"त्याने तिच्याशी का लग्न केलं असेल असं तुला वाटतं?"

मी मान हलवली.

"ती एका कोणातरी रोमन प्रिन्सच्या श्रीमंत कुटुंबात गव्हर्नेस म्हणून नोकरी करत होती. त्यांच्या मुलाने तिला आपल्या जाळ्यात फसवलं. तिला वाटलं की तो तिच्याशी लग्न करेल. पण सगळी श्रीमंत माणसं करतात तसं त्याने तिला हाकलून दिलं. ती रस्त्यावर आली. तिच्या पोटात मुल होतं. तिने आत्महत्येचा प्रयत्न केला. स्ट्रोव्हने तिला वाचवलं आणि तिच्याशी लग्न केलं."

"त्याचा स्वभावच तसा आहे. त्याच्या एवढ्या मोठ्या मनाचा माणूस मी तरी दुसरा पाहिला नाही."

एकमेकांना मुळीच अनुरूप नसणाऱ्या त्या दोघांनी लग्न का केलं असा मला नेहमी प्रश्न पडायचा पण त्याचं उत्तर मला मिळालं नव्हतं. त्यांच्या लग्नामध्ये केवळ प्रेमाचा भाग नसावा असं मला राहून राहून वाटायचं. तिच्या अबोलपणाचं काय कारण असावं हे मला कळत नसे, पण आता मात्र तिला काहीतरी लज्जास्पद असं लपवायचं असावं असा मला संशय यायला लागला. एखाद्या बेटावर तुफानाने झोडपून काढल्यावर जी शांतता पसरते तसं मला तिच्या बाबतीत वाटायला लागलं. तिचा उल्हास नैराश्यातून आलेला असावा. माझी तंद्री स्ट्रिकलँडने भंग केली. त्याच्या बोलण्यातील उपरोधाने मी उडालो.

"स्त्री तिला फसवणाऱ्या पुरूषाला एक वेळ माफ करेल, पण मात्र तिच्यावर उपकारकर्त्याला ती कधीही माफ करत नाही."

“म्हणजे तुझ्या संपर्कात येणाऱ्या कोणत्याही स्त्रीकडून तुला धोका नाही, हे तू स्वत:च्या उदाहरणावरून म्हणत आहेस.”

त्याचे ओठ किंचीत विलग झाले.

“मार्मिक उत्तर देण्यासाठी तू स्वत:च्या तत्वांशी तडजोड करायला नेहमीच तयार असतोस.”

“त्या मुलाचं काय झालं.”

“ते जन्मत:च मृतावस्थेत होतं. त्यांनी लग्न केल्यानंतर तीन चार महिन्यांनी असेल.”

त्यानंतर मला सर्वात जास्त कोड्यात पाडणारा प्रश्न मी विचारला.

“मला एक सांग ब्लांश स्ट्रोव्हला तुझ्यात एवढं काय वाटलं?”

त्याने बराच वेळ उत्तर दिलं नाही. तो प्रश्न मला परत विचारावा लागला.

“मला कसं सांगता येईल?” शेवटी एकदाचं त्याने सांगितलं. “तिला तर मी डोळ्यासमोरसुद्धा नको असायचो. मला त्याची खूप गंमत वाटायची.”

“असं काय.”

अचानक तो चिडला.

“ते सगळं गेलं तेल लावत. मला ती हवी होती.”

पण त्याने स्वत:चा राग चटकन काबूत आणला. माझ्याकडे बघत तो हसला.

“सुरूवातीला ती घाबरली होती.”

“तू तिला सांगितलं होतंस?”

“तशी काही गरज नव्हती. तिला ठाऊक होतं. मी एका शब्दानेही कधी बोललो नव्हतो. ती प्रचंड घाबरली होती. शेवटी मी तिला बिछान्यात घेतली.”

कामवासनेमुळे तो किती हिंस्र आणि हीन पातळीला जाऊ शकत होता हे यातून दिसत होतं. पण त्याने मला ते ज्या पद्धतीने सांगितलं ते भयंकर अस्वस्थ करणारं होतं. त्याला भौतिक सुखांची आस नव्हती. पण त्याचं शरीर कधी कधी त्याच्या आत्म्यावर सूड उगवत होतं. त्याच्यामध्ये दडलेला दैत्य त्याचा ताबा घेत असावा. त्या आदिम शक्तिपुढे तो अगदी हतबल होत असावा. त्याच्या नितीमत्तेच्या चौकटीत सारासार विवेक किंवा कृतज्ञता असल्या मूल्यांना स्थान नव्हतं.

“पण तिला तू तुझ्या बरोबर का घेऊन गेलास?” मी विचारलं.

“मी तिला बोलावलं नव्हतं,” त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या. “ती जेव्हा म्हणाली की मी येत आहे तेव्हा स्ट्रोव्ह एवढंच मला सुद्धा आश्चर्य वाटलं. मी तिला स्पष्ट सांगितलं होतं की मला तिचा कंटाळा आला तर तिला जावं लागेल. तिला त्याची तयारी होती.” तो थोडा थांबला. “तिचं शरीर अतिशय कमनीय होतं आणि मला एक नग्न चित्र काढायचं होतं. माझं चित्र काढून झालं आणि माझा तिच्यातील रस संपला.”

“तिचं मात्र तुझ्यावर मनापासून प्रेम होतं.”

तो अचानक उठून उभा राहिला आणि त्या छोट्या खोलीतून येराझाऱ्या घालू लागला.

“प्रेम मला नको होतं. माझ्याकडे त्याच्यासाठी वेळ नाही. तो एक मनाचा दुबळेपणा असतो. मी पुरूष आहे आणि अधून मधून मला स्त्रीची गरज लागते. माझी वासना पूर्ण झाली की मी दुसऱ्या गोष्टी करायला मोकळा होतो. माझ्या वासनेवर मला काबू मिळवता येत नाही. याचा मला तिरस्कार वाटतो. त्याने माझ्या निर्मिती क्षमतेवर मर्यादा पडतात. ज्यावेळी मला या सगळया मोहातून मुक्त होता येईल त्या क्षणाची मी वाट बघत आहे. मग मला माझ्या कामाकडे विनाअडथळा लक्ष देता येईल. स्त्रियांना प्रेम करण्यापलीकडे काही करता येत नाही. त्यामुळे त्यांनी प्रेमाला उगाचच महत्व दिलं आहे. प्रेम म्हणजेच सारं आयुष्य आहे असं त्यांना वाटतं. प्रेम हा आयुष्याचा एक भाग आहे हे खरं असलं तरी तो आयुष्यातील अगदी क्षुल्लक भाग असतो. वासना मी एक वेळ समजू शकतो. ती नैसर्गिक असते. शिवाय शरीरस्वस्थ्यासाठी आवश्यकही असते. प्रेम म्हणजे एक रोग असतो. स्त्री म्हणजे माझ्या दृष्टीने शरीरसुखाचं एक खेळणं आहे. प्रेम, जीवनसाथी, लग्न असल्या फालतू गप्पा मारायला माझ्याकडे वेळ नाही.”

स्ट्रिकलँडला एवढं एका दमात बोलताना मी कधीच ऐकलेलं नव्हतं. तो चिडीला येऊन बोलत होता. तो जे बोलला ते मला शब्दश: सांगणं शक्य नाही. त्याची शब्दकळा तुटपुंजी होती, त्याचं बोलणं तुटक होतं. त्याचा अर्थ लावण्यासाठी मला बरीच कसरत करावी लागली. गाळलेले शब्द भरायचे, पुनरावृत्तीत शब्द गाळायचे, जेथे अर्थ लागणार नाही तेथे त्याच्या तोंडावरील हावभाव बघायचे आणि त्याच्या हातवाऱ्यांचा अर्थ लावायचा.

“जेव्हा स्त्रिया ह्या जंगम मालमत्तेचा भाग होत्या आणि पुरूषांच्या मालकीचे गुलामांचे तांडे असत त्या काळात तू जन्मायला हवं होतस.” मी म्हणालो.

"असं होतं कधी कधी, मी अगदी शंभर टक्के डोकं ताळ्यावर असलेला माणूस आहे. घाबरू नकोस."

मला हसू आवरलं नाही. तो अगदी गंभीरपणे बोलत होता. तो पिंजऱ्यात सापडलेल्या श्वापदासारखा फेऱ्या मारत होता. त्याला जे जाणवलं होतं ते त्याला सांगायचं होतं पण त्यासाठी त्याला योग्य शब्द सापडत नव्हते.

"जेव्हा स्त्री प्रेमात पडते तेव्हा त्या पुरूषावर पूर्ण ताबा मिळवेपर्यंत तिचं समाधान होत नाही. स्त्री निसर्गत:च पुरूषापेक्षा दुबळी असते. म्हणून तिला पुरूषावर आपली सत्ता प्रस्थापित करायची असते, त्याशिवाय तिचं समाधान होत नाही. तिची बुद्धी कोती असते. अमूर्त अशी कोणतीही गोष्ट तिला आवडत नाही. कारण ते समजून घेणं तिच्या आवाक्या बाहेर असतं. भौतिक गोष्टींमध्येच तिचा सगळा वेळ जातो. आदर्श, ध्येय वगैरे गोष्टींचा तिला मत्सर वाटतो. पुरूषाच्या संचाराला सारे विश्व अपुरं पडत. स्त्री पुरूषाला आपल्या स्वयंपाकघरात डांबून ठेवण्याचा प्रयत्न करत असते. तुला माझी बायको आठवत असेलच. ब्लांश सुद्धा हळू हळू त्याच मार्गाने चालली होती. ऍमी लढवत असे त्या सगळया क्लृप्त्या ब्लांशही लढवायला लागली होती. मला जाळयात गुंतवून ठेवण्याचा तिचा उद्योग चिकाटीने चालला होता. ती मला तिच्या पातळीवर आणायला बघत होती. तिला माझी पर्वा नव्हती. मी तिला फक्त तिचा व्हायला हवा होतो. माझ्यासाठी ती जगातली कोणतीही गोष्ट करायला तयार होती फक्त एक गोष्ट सोडून. ती म्हणजे मला एकट्याला जगूं देणं."

मी थोडा वेळ गप्प होतो.

"तू तिला सोडून गेल्यावर तिने काय करावं अशी तुझी अपेक्षा होती?"

“ती स्ट्रोव्हकडे परत जाऊ शकली असती. तो तिला परत घ्यायला तयार होता.” तो चिडून म्हणाला.

“तू माणूस म्हणवून घेण्याच्या लायकीचा नाहीस. या गोष्टींवर तुझ्याशी बोलणं म्हणजे एखाद्या जन्मांधळ्या माणसाशी रंग म्हणजे काय त्यावर चर्चा करण्यासारखं आहे.”

तो माझ्या खुर्चीसमोर येऊन थांबला आणि माझ्याकडे आश्चर्याने बघत म्हणाला.

“ती ब्लांश स्ट्रोव्ह जिवंत आहे की मेली याला तू तरी कवडीची किंमत देत आहेस का? कशाला फुकाच्या माणूसकीच्या गमजा मारतोयस?”

त्याने विचारलेला प्रश्न मलाही पडला होता आणि मी त्या प्रश्नाचं कोणत्याही परिस्थितीत अगदी प्रामाणिकपणे उत्तर द्यायचं ठरवलं होतं.

“तिच्या मृत्युने मला जर फारसा फरक पडत नसेल तर त्याचा अर्थ माझ्यामध्ये तेवढी सहानुभूती नाही असा होतो. तिला आयुष्य अजून खूप बघायचं बाकी होतं. तिचा जगण्याचा हक्क अशा क्रूरपणे हिरावून घेणं हे भयंकर आहे. मला त्याचं काही वाटत नाही याची मला शरम वाटत आहे.”

“तुला जे पटलंय ते कबूल करण्याचं धैर्य तुझ्यात नाही. मी सोडून गेलो म्हणून ब्लांश स्ट्रोव्हने आत्महत्या केली असं नाही. तिने आत्महत्या केली कारण ती मूर्ख होती, तिच्या मनाचं संतुलन बिघडलेलं होतं म्हणून. तिच्या बद्दल आपण खूप बोललो आहोत. ती एवढी महत्वाची मुळीच नाही. चल मी तुला माझी चित्रं दाखवतो.”

मी एखादं लहान मुल असल्याप्रमाणे माझ्याशी बोलून तो माझं लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करत होता. मी भयंकर चिडलो होतो. त्याच्यापेक्षा जास्त माझ्या स्वत:वरच. मोंमात्रमधल्या एका छानशा स्टुडियोत त्या दोघांचा जो सुखाचा संसार चालू होता त्याची मला आठवण झाली. त्यांचा प्रेमळपणा, आतिथ्यशीलता या सगळयांच्या एका फटक्यात अशा ठिकऱ्या ठिकऱ्या उडाव्यात हे क्रूरपणाचं होतं. पण सगळ्यात क्रौर्याची गोष्ट म्हणजे ते बंद झाल्याने काही फरक पडत नव्हता. जग रहाटी चालू होती. काडीचाही फरक पडला नव्हता. मला वाटलं डर्कसुद्धा थोड्या दिवसांनी झालं गेलं विसरून जाईल. बिचारी ब्लांश, कोणत्या उमेदीनं, कोणती स्वप्न बघत तिने नुकतीच आयुष्याला सुरवात केली होती. तिच्या वाटेला आलेलं जीवन जगून नसल्यासारखंच होतं. असा शोक करण्यात आता काही उपयोगही नव्हता, अर्थही नव्हता.

स्ट्रिकलँडने त्याची हॅट घेतली आणि माझ्याकडे पाहिलं.

“माझ्याबरोबर येतोस?”

“मला कशाला बोलावतोस? तू मला आवडत नाहीस, मी तुझा तिरस्कार करतो हे तुला माहित आहे.”

तो गालातल्या गालात हसला.

“तुझं माझ्याशी फक्त एकाच गोष्टीवरून भांडण आहे, ते म्हणजे तुला माझ्याबद्दल काय वाटतं, तुझं काय मत आहे याला मी पेनीचीही किंमत देत नाही.”

मी रागाने लाल झालो. त्याच्या निबर स्वार्थीपणामुळे दुसऱ्याला राग येऊ शकतो हे त्याला समजावणं अशक्य होतं. त्याने उदासीनतेच हे जे कातडं पांघरलं होतं ते मला फाडायचं होतं. तो जे बोलत होता त्यात तथ्यांश आहे हे ही मला माहित होतं. आपल्या मताला लोक जी किंमत देतात त्यामुळेच आपण त्यांच्यावर सत्ता गाजवू शकतो. या सत्तेची आपल्याला नकळत चटक लागते. ज्यांच्यावर आपण ही सत्ता गाजवू शकत नाही त्यांच्याशी आपलं जमत नाही, त्यांच्या सहवासात स्वाभिमान दुखावला जातो. पण मी त्याला असा सोडणार नव्हतो.

''दुसऱ्याच्या मताची मुळीच दखल न घेणं शक्य आहे का?'' हे त्याच्यापेक्षा मी स्वत:लाच विचारलं. ''आपण या ना त्या प्रत्येक गोष्टीसाठी कोणा ना कोणा वर तरी अवलंबून असतो. फक्त स्वत:पुरतं स्वत:साठीच जगणं हे किती हास्यास्पद होईल. तू आजारी पडलास, थकलास, म्हातारा झालास की मग झक्कत तुला आपल्या माणसांत रांगत यावं लागेल. थोड्या आरामाची, सहानुभूतीची गरज भासली की मग पश्चाताप होईल. तू एका अशक्यप्राय गोष्टीच्या मागे लागला आहेस. तुझ्यातील माणसाला कधी ना कधी तरी माणूसकीची गरज लागेल.''


''चल माझी चित्रं तर बघ.''

''तू कधी मरणाचा विचार केला आहेस?''

''मी कशाला विचार करू. त्याने काय फरक पडणार आहे?''

मी त्याच्याकडे टक लावून पाहिलं. तो माझ्या समोर निस्तब्ध उभा होता. त्याच्या डोळयात वरवर मिश्किल हसू होतं. पण आत खोलवर कुठेतरी थंडगार अग्नी धुमसत असला पाहिजे. आत अशरीर वेदनेने पिळवटणारं दु:ख होतं. एक निस्तब्ध वादळ आकारत होतं. माझ्या समोर बसलेल्या त्या घाणेरड्या कपड्यातल्या इसमाकडे मी बघितलं. त्याचं मोठं नाक, लाल दाढी, विस्कटलेले केस आणि डोळयातील चमक. त्या देहातील अशरीर चैतन्य मला खुणावत होतं.

''चला, तुझी चित्रं बघूया.'' मी म्हणालो.



Artist: Paul Gauguin

Title: Nude Study, Meddium: Water colour

Source: Wikipedia

# ४२

स्ट्रिकलँडने मला त्याची चित्रं बघायला अचानक का बोलावलं ते मला कळलं नाही. मी ती संधी साधली. माणसाची खरी ओळख त्याच्या कामातून होत असते. सामाजिक संबंधातून जी ओळख होते ती वरवरची असते. त्याला जे हवं असतं तेच तो तुम्हाला दाखवतो. खरी ओळख त्याच्या छोट्या छोट्या कृतीतून काढलेल्या निष्कर्षामुळे होत असते. माणसाच्या चेहऱ्यावरचे त्याच्या नकळत, क्षणभर येऊन

जाणारे भाव बरंच काही सांगून जातात. काही जण मुखवटा घेऊन वावरत असतात. पण कालांतराने ते मुखवटाच होऊन जातात. पण लेखकाने लिहीलेलं पुस्तक किंवा चित्रकाराने रंगवलेलं पेंटींग त्याची खरी ओळख लपवू शकत नाही. त्यातून तो अंतर्बाह्य उघडा पडतो. ढोंगी माणसाची अक्कल दिसते. कितीही सोंग आणलं तरी खरी कुवत लपत नसते.

मी स्ट्रिकलँडच्या घराचा लांबलचक उंच जिना चढून वर गेलो. जिना चढताना मी थोडा उत्तेजित झालो होतो हे मला कबूल केलंच पाहिजे. आपण काही तरी साहस करतोय असं वाटत होतं. मी सभोवताली एक दृष्टीक्षेप टाकला. त्यात अगदी कमीत कमी सामान होतं. इंग्लंडमधील माझ्या ज्या मित्रांना सगळया सुखसोईंनी युक्त असा भला मोठा स्टुडियो असल्या शिवाय चित्र काढायला जमत नसत त्यांना हा स्टुडियो दाखवायला आणलं पाहिजे.

''तू इथेच उभा रहा.'' ज्या विशिष्ट जागेवरून मी चित्र पहावीत असं त्याला वाटत होतं त्या जागेकडे बोट दाखवत तो म्हणाला.

''मी काही बोललो तर तुला चालेल ना.''

''बोललास तर मी तुला धोपटून काढीन. तोंड बंद ठेऊन गुपचूप बघ.''

त्याने एक कॅनव्हास इझलवर ठेवला. मला बघणयासाठी दोन तीन मिनीटं दिली आणि दुसरा कॅनव्हास लावला. मला वाटतं त्याने एकूण तीस एक कॅनव्हास मला त्या दिवशी दाखवले असावेत. ती त्याची सहा वर्षांची मेहनत होती. त्यातील एकही पेंटींग विकलं गेलं नव्हतं. कॅनव्हास वेगवेगळया आकारात होते. वस्तूचित्रणाचे छोटे तर निसर्गचित्रांचे मोठे. अर्धा डझन पोर्ट्रेट्स होती.

''सगळी मिळून ही एवढी आहेत.''

मला त्यातल्या सौंदर्याचं त्यावेळी आकलन झालं असतं, त्यातील अस्सलपणा जाणवला असता तर किती बरं झालं असतं. त्यातील बरीच पेंटींग मला नंतर पुन्हा बघायला मिळाली आणि काहींच्या प्रतिकृती. पण प्रथमदर्शनी मात्र माझी निराशा झाली होती याचं आता मला राहून राहून आश्चर्य वाटतं. उत्तम कलाकृती बघताना जी एक शिरशिरी अनुभवायला मिळते तसं मला त्यावेळी वाटलं नाही. त्याची पेंटींग बघून मला अस्वस्थ वाटलं, पण एखादं पेंटींग विकत घेण्याची बुद्धी मला त्यावेळी झाली नाही हे सत्य होतं. मला त्याचा आता खूप पश्चात्ताप होतोय. पण अशा पश्चातबुद्धीचा काही उपयोग नसतो. माझ्या हातातील एक सुवर्णसंधी गेली होती. त्या चित्रांपैकी बरीचशी पेंटींग आता प्रख्यात म्युझियमच्या संग्रहात आहेत. उरलेली श्रीमंत शौकीनांचे खाजगी संग्रह भूषवत आहेत. मला त्यांचं मूल्य त्यावेळी का जाणवलं नाही याची काहीतरी सबब शोधण्याचा मी प्रयत्न केला. मला वाटयचं की माझी आवड चांगली आहे, कलाकृतीची जाण आहे, पण माझी नजर अस्सल चीज ओळखण्या इतकी तयार नाही याची मला जाणीव आहे. चित्रकलेच्या प्रांतात इतरांनी तयार केलेले मापदंड मी वापरत असे. त्याकाळी इंप्रेशनीस्टांबद्दल मला प्रचंड आकर्षण होतं. सिस्ले किंवा दगाचं एखादं चित्र माझ्याकडे असावं अशी माझी आकांक्षा होती, मॅनेची तर मी पूजा करीत असे. त्याचं ऑलिम्पिया हे पेंटींग तर माझ्या मते आधुनिक काळातील सर्वोत्कृष्ट कलाकृती होती. *ल देजान्यू सुर ल'हर्ब* (लन्शन ऑन द ग्रास)ने मी प्रचंड भारावून गेलो होतो.

स्ट्रिकलँडने मला जी चित्रं दाखवली त्या बद्दल मी फारसं बोलणार नाही. चित्रांचं वर्णन कंटाळवाणं असतं. ज्यांना या विषयात रस आहे त्यांना ती माहित आहेतच. आधुनिक चित्रकलेवर स्ट्रिकलँडचा प्रचंड प्रभाव आहे. आता ज्या प्रांतात जाण्यासाठी लोकांची रीघ लागते त्या प्रांतात पाऊल ठेवणारा तो पहिलाच होता. आता त्याची चित्रं पहिल्यांदा पाहाणाऱ्याचं मन तयार असतं. पण त्यावेळी मला तसं काही वाटलं नव्हतं हे मात्र खरं.

त्याच्या चित्रात तांत्रिक सफाई नव्हती त्याचा मला मोठा धक्का बसला. ओल्ड मास्टर्सची गाजलेली चित्रं मला माहित होती. ज्या इन्ग्रेसला आधुनिक काळातील महान रेखाचित्रकार समजलं जातं त्याच्या तुलनेत स्ट्रिकलँडला तर रेखाटनसुद्धा धड करता येत नाही असंच म्हणावं लागेल. तो चित्रविषयाचं जे सुलभीकरण करू पाहात होता तो काय प्रकार आहे हे मला माहित नव्हतं. मला संत्र्यांचं एक वस्तू-चित्र आठवतंय. त्यात संत्री ठेवलेल्या प्लेटचा आकार गोल नव्हता, संत्री वेडीवाकडी होती. पोर्ट्रेटमधील चेहेऱ्यांचा आकार प्रत्यक्षापेक्षा मोठा होता. त्यामुळे ती उगाचच बेडौल वाटत होती. त्यातील चेहेरे मला एखाद्या व्यंगचित्रासारखे वाटले. त्याची रंगकामाची पद्धत मला नवीन होती. त्याच्या निसर्गचित्रांनी तर मला जास्तच कोड्यात टाकलं. फाँटेनब्लुच्या जंगलाची दोन तीन आणि पॅरीसच्या रस्त्यांची कित्येक चित्र होती. मला पहिल्यांदा वाटलं की ती एखाद्या दारूड्या गाडीवानाने काढली असावीत. मी पार गोंधळून गेलो. रंग अगदीच ओबडधोबड होते. मला वाटलं की हा सगळा प्रकार एखाद्या भव्य पण डोक्यावरून जाणाऱ्या नाटकासारखा आहे. मागे वळून बघताना स्ट्रोव्हची पारख किती अचूक होती ते जाणवतं. कलाजगतात क्रांतीकारी असं काही तरी घडतंय हे त्याला पहिल्याप्रथम जाणवलं. त्याने स्ट्रिकलँडमधला असामान्य प्रतिभावंत त्याच्या जडण-घडणीच्या काळातच ओळखला होता, जगाने त्याच्यावर शिक्कामोर्तब करण्याच्या कितीतरी आधी.

मी त्याच्याकडे वळलो.

“तुझी माध्यमाची निवड चुकली आहे असं तुला वाटत नाही का?”

“तुला काय म्हणायचं आहे?”

“काही तरी सांगायचं तुझ्या मनात आहे. पण त्यासाठी चित्रकलेचा तुला कितपत उपयोग होईल हे मला सांगता येणार नाही.”

त्याची चित्र बघून त्याच्या स्वभावाचा मला काहीतरी थांग लागेल असं जे मला वाटलं होतं ती माझी चूक होती. त्याने माझ्या मनात आधीच असलेला गोंधळ वाढला.

एकच गोष्ट मला कळली की तो कोणत्या तरी शक्तिने झपाटला होता आणि त्यातून मुक्त होण्यासाठी जीवाच्या आकांताने त्याची धडपड चालू होती. ती शक्ति काय होती आणि

त्याच्या धडपडीचा शेवट काय होणार होता हे मात्र माझ्या आकलना बाहेर होतं. आपण सर्व या जगात तसं बघायला गेलं तर एकटेच असतो. पण त्याने स्वत:ला एका हस्तीदंती मनोऱ्यात बंद करून ठेवलं होतं. त्याला तेथून बाह्य जगाशी संपर्क साधायचा झाल्यास फक्त खाणाखुणांच्या भाषेतून साधणं शक्य होतं. खाणाखुणा सुद्धा अशा की त्यांच्या अर्थाचीच निश्चिती नाही. आपलं हृदगत तर सांगायचं आहे पण शब्दच जिथे नाहित तिथे संवाद कसा साधणार. आपण सहप्रवासी असलो तरी संवादाविना प्रत्येकाचा प्रवास एकट्यानेच चालू राहतो. परक्या देशाची भाषा येत नसेल तर संवादाचं पुस्तक हातात घेऊन किती आणि काय बोलणार.

स्ट्रिकलँडचे आकार आणि रंगांची निवड ही खास त्याची स्वत:ची होती. त्याला आतून जे वाटत होतं तेच तो त्याच्या चित्रातून दाखवण्याचा प्रयत्न करत होता. त्याला जे सांगायचं आहे ते अधिक चांगल्याप्रकारे सांगता येत असेल तर त्यासाठी सुलभीकरण आणि विरूपीकरण अशी दोन्ही तंत्र त्याने न डगमगला वापरली होती. जणू काही त्याला सर्वव्यापी वैश्विक तत्व सापडलं होतं. मला त्याची चित्र गोंधळात टाकणारी वाटली तरीही त्यातील भावनिक आशय मनाला भिडत होता. स्ट्रिकलँडविषयी माझ्या मनात करूणा उत्पन्न होईल असं मला कधीही वाटलं नव्हतं, पण त्या करूणेने माझं हृदय द्रवलं.

''ब्लांश स्ट्रोव्हबद्दल तुला जे वाटत होतं त्याला तू का शरण गेलास ते मला आता कळलंय.''

''कां?''

''तुझी हिंमत झाली नाही. तुझ्या शारिरीक दौर्बल्यावर तुला मात करता आली नाही. तुझा कोंडमारा होत आहे. त्यातून मुक्त होण्याची तुझी तडफड चालू आहे. तुझा ध्यास, अंतिम ध्येय काय आहे ते मला अजून कळलेलं नाही. पण तुझा प्रवास चालू झाला आहे. एका अस्तित्वात नसलेल्या तीर्थक्षेत्राचा तू यात्रेकरू आहेस. कोणत्या अगम्य निर्वाणाकडे तुला जायचं आहे मला माहित नाही. तुला स्वत:ला तरी ठाऊक आहे का? तुला सत्याचा आणि स्वातंत्र्याचा हव्यास आहे. एक क्षणभर तुला वाटलं की प्रेमामध्ये तुला सत्य सापडेल. तू थकला होतास आणि स्त्रीच्या बाहूपाशात तुला विश्रांती मिळाली. थोड्या वेळाने तुला जाणवलं की ती विश्रांती खरी नाही अणि त्यामुळे तू तिचा तिरस्कार करायला लागलास. तुला ना तिच्याबद्दल सहानभूती होती ना स्वत:बद्दल. तू तिला घाबरलास. ती भिती अजून गेली नाही. त्या भितीपोटी तू तिला ठार मारलंस. त्या भितीने तू आजही थरथर कापतोयस.''

तो दाढी खाजवत कोरडं हसला.

''माझ्या मित्रा तू भावनेच्या भरात फारच वाहवत जात आहेस.''

एका आठवड्याने मला कोणाकडून तरी चुकून कळलं की स्ट्रिकलँड मास्येझला गेला आहे. त्यानंतर तो मला आयुष्यात पुन्हा कधीही भेटला नाही.




Artist: Édouard Manet (1832–1883)

Title: Le Déjeuner sur l'herbe, Luncheon on the Grass

Medium: oil on canvas, Date: 1863, Dimensions: 208 x 264.5 cm (81.9 in × 104.1 in)

Current location: Musée d'Orsay, Source: wikidata:Q152509



Artist: Paul Gauguin

Copy of Olympia, 1888, Oil on canvas

Original by Edourd Manet 1863

## ४३

मागे वळून पाहिल्यावर माझ्या लक्षात आलं की चार्ल्स स्ट्रिकलँडबद्दल आतापर्यंत मी जे काही लिहीलं आहे ते फारसं समाधानकारक नाही. ज्या घटना माझ्या समोर घडल्या त्या विषयी मी लिहीलं आहे. पण त्यांची मला पुरेशी माहिती नव्हती. त्या का घडल्या ते मला सांगता आलं नसतं. चार्ल्स स्ट्रिकलँडने चित्रकार बनण्याचा जो निश्चय केला होता तो एक अचानक आलेला झटका होता. त्याच्या आयुष्यात घडलेल्या काही घटना त्याला कारणीभूत झाल्या असण्याची शक्यता होती. काहीही असलं तरी मुख्य कारण मला माहित नव्हतं. त्याच्या बोलण्यातून कसलाच पत्ता लागत नव्हता. चार्ल्स स्ट्रिकलँड नावाच्या एका विलक्षण चमत्कारीक

व्यक्तिच्या आयुष्याचं, सत्य घटनांच्या आधारे वर्णन करण्याऐवजी मी जर एखादी कादंबरी लिहायला घेतली असती तर मग त्याने चाळीशी उलटल्यावर अचानक चित्रकार व्हायचा निर्णय का घेतला यासाठी मला काहीतरी कल्पनाचित्र उभं करावं लागलं असतं. लहानपणापासून चित्रकार बनण्याचा ध्यास घेतला होता पण केवळ वडिलांच्या इच्छेला मान देण्यासाठी त्याच्यावर पाणी सोडावं लागलं किंवा परिस्थितीने मजबूर झाल्यामुळे पोटापाण्याचा व्यवसाय पत्करावा लागला. आयुष्यातील मर्यादांमुळे झालेला कोंडमारा वगैरे गोष्टी दाखवून मी त्याला मोठा केला असता. वाचकांची सहानुभूती त्याला मिळावी अशी काळजी घेतली असती. कदाचित त्याला चित्रकलेच्या विश्वातील नव्या मनूचा उद्गाता केला असता. मानवाच्या कल्याणासाठी वैयक्तिक सुखांवर पाणी सोडणारा युगपुरूष चित्रकार.

दुसऱ्याही एका पध्दतीने मला त्याच्या वैवाहिक आयुष्याशी संबंध जोडून दाखवता आला असता. असं दाखवण्याचे अनेक मार्ग आहेत. बायकोचे एखाद्या लेखकाशी असणारे संबंध, काहीतरी घरगुती प्रश्न, त्यांच्या संसारात दुसऱ्या स्त्रीचे आगमन, मत्सराग्नीतून पेटलेला विद्वेषाचा वडवानल. त्या परिस्थितीत मिसेस स्ट्रिकलँड मी अगदी वेगळी दाखवली असती. सदैव कटकट करणारी, हटवादी, कजाग बायको किंवा आपल्या नवऱ्याचं कलाकार म्हणून कसलंही कौतूक, सहानुभूती नसणारी, एक तर अरसिक, किंवा सतत हेटाळणी करणारी. स्ट्रिकलँडचं वैवाहिक जीवन अयशस्वी, दु:खी दाखवता आलं असतं. बायको त्याच्या तोडीची नाही आणि तरीही त्याने भरपूर वाट पाहिली. तिच्या विषयी वाटणाऱ्या करूणेमुळे त्याने संसाराचं जोखड फेकून दिलं नव्हतं. असं दाखवायचं तर त्यांना विनापत्य दाखवावं लागलं असतं.

या कथेत आणखी रंग भरण्यासाठी एका बुजूर्ग चित्रकाराचं पात्र निर्माण केलं असतं. त्या चित्रकाराने व्यावसायीक दृष्ट्या यश मिळवण्यासाठी आपल्यातील कलेला दाबून ठेवलेलं असतं. त्याच्या उतारवयात त्याला स्ट्रिकलँड भेटतो.

त्याच्यामध्ये त्याला मोठ्या चित्रकाराची बीजे दिसतात. आपल्याला जे जमलं नाही ते याला जमेल या विचाराने तो स्ट्रिकलँडला चित्रकलेसाठी सर्वस्व पणाला लावायला सुचवतो. असं दाखवण्यात मोठी गंमत आली असती. स्वत: यश आणि संपत्तीत लोळत असताना दुसऱ्याला मात्र कलेसाठी भिकेला लावण्यातील विसंगती मोठी मनोरंजक ठरली असती.

पण प्रत्यक्षात असं काहीच नव्हतं. एक मुलगा शिक्षण संपवून सरळ शेअर ब्रोकरच्या ऑफिसमध्ये नोकरीला लागतो. त्यात मनाविरूद्ध असं फारसं काही नसतं. लग्न होईपर्यंत तो अगदी इतरांसारखा सामान्य आयुष्य जगत असतो. शेअर बाजारात थोडाफार सट्टा, कधीतरी डर्बी, ऑक्सफर्ड नाहीतर केंब्रिज रेसवर लावलेला एखाद दुसरा सॉव्हरीन. मला वाटतं कधीतरी फावल्या वेळात त्याने मुष्टीयुद्धसुद्धा खेळून पाहिलं असावं. तो पंच आणि स्पोर्टींग टाईम्स वाचत असे. नृत्यासाठी तो हॅम्पस्टीडला जाई.

त्याचा पॅरीसमध्ये चित्रकलेत प्राविण्य मिळवण्यासाठी झगडण्यात गेलेला काळ एकसुरी आणि कंटाळवाणा होता. तो पैसे मिळवण्यासाठी जे करत होता त्यात सांगण्यासारखं काही खास होतं असं मला वाटत नाही. पण पोटापाण्यापुरती कमाई निश्चित करत असावा. तो काय उद्योग करत होता त्याचा हिशेब ठेवला तर त्यात पॅरीसच्या गुन्हेगारी विश्वाचा इतिहास लिहीता आला असता. पण त्याचा त्या लोकांशी जरी संबंध आला असला तरी त्यांचा परिणाम त्याच्यावर झाला नसावा. त्याला आलेल्या अनुभवांच्या शिदोरीवर पॅरीसमधल्या बदमाशांच्या जीवनावर एखादी आधुनिक कादंबरी लिहीता आली असती. पण तो कशातही भाग घेत नसे. त्याच्यावर प्रभाव पडण्यासारखं त्याकाळात काही घडलं नव्हतं असं त्याच्याशी झालेल्या गप्पांमधून कळलं होतं. कदाचित तो पॅरीसला गेला तेव्हा पॅरीसच्या रंगढंगांना भुलून बळी पडण्याइतका तो तरूण नव्हता. विचित्र वाटेल, पण वागण्यात तो अगदी पक्का व्यवहारी होता. मला वाटतं त्याकाळातलं त्याचं आयुष्य तसं रोमांचकारी असावं पण त्याला काही ते रोमांचकारक वाटत नसे. आयुष्यतील

रोमान्स समजण्यासाठी एखाद्या अभिनेत्यासारखं असावं लागतं. माणूस एक भूमिका घेऊन जगत असतो. त्या भूमिकेतून बाहेर येऊन स्वत:कडे बघता येण्याची कला अवगत असावी लागते. स्ट्रिकलँडचं मनएक मार्गी होतं. त्याचं आत्मभान पराकोटीचं होतं. चित्रकलेच्या तांत्रिक अंगांत त्याने जे प्राविण्य मिळवलं त्यासाठी त्याने किती परीश्रम घेतले असतील ते मला माहित नाही. पण कोणाचंही सहाय्य न घेता स्वत:च्या चुका सुधारत सुधारत तो एक एक गोष्ट शिकत गेला. मी स्ट्रिकलँडला चित्र काढताना कधी पाहिलेलं नव्हतं. तो स्टुडियोत एकटाच असायचा. त्याच्या प्राक्तनाबरोबर त्याचा जो लढा चालू होता त्यात त्याने कोणाचीही मदत घेतली नव्हती.

त्याचा आणि ब्लांश स्ट्रोव्हच्या संबंधांचा मी जेव्हा विचार केला तेव्हा माझ्या हाती इकडे तिकडे विखुरलेले काही तुकडे लागले. एका अटळ शोकांतिकेच्या दिशेने चाललेला प्रवास वर्णन करताना माझ्या कथेच्या दृष्टीने त्याची सुसंगत मांडणी करता येईल. पण ते तीन महिने एकत्र राहत होते त्या दरम्यान त्यांच्यात काय झालं ते मला काय दुसऱ्या कोणालाच माहित नाही. ते दिवसाचे चौवीस तास एकत्र राहत होते. शरीरसंबंध दिवसातून होऊन होऊन कितीवेळा करता येऊ शकेल. इतर वेळेला ते काय करत असतील त्याची मी फक्त कल्पनाच करू शकतो. जोपर्यंत दिवसाचा प्रकाश आहे आणि ब्लांश पोज देऊन थकत नाही तोपर्यंत स्ट्रिकलँडचं चित्र काढणं चालत असेल. त्याला चित्रात पूर्णपणे बुडालेला पाहून सहाजिकच ती वैतागून जात असेल. चित्र काढताना तिचं अस्तित्व फक्त एक मॉडेल म्हणून असेल. स्त्री म्हणून तिच्या अस्तित्वाला एरवीही त्याच्या लेखी किंमत शून्य होती. चित्र काढून झाल्यावर सुद्धा काही न बोलता तासंतास शांततेत बसून काढायचे त्याने ती घाबरली असेल. डर्क स्ट्रोव्हवर सूड उगवायला म्हणून ती त्याच्याकडे आपल्या पावलांनी चालत आली असेल असंही त्याने तिला सुचवायला कमी केलं नसेल. असं सुचवताना त्याने अनेक शक्याशक्यतांच्या काळोख्या गुहेचा दरवाजा उघडला होता. असं काही झालं नसेलही. पण असं झालं असेल तर ते महाभयंकर होतं.

मानवी मनाच्या सूक्ष्म व्यवहारांचा थांग कोणाला लागला आहे का? जे फक्त नाजूक साजूक रूमानी भावनांचा विचार करतात त्यांना हे जमणार नाही. स्ट्रिकलँडचा अलिप्तपणा हा न संपणारा आहे हे जेव्हा ब्लांशच्या लक्षात आलं तेव्हा ती हताश झाली असेल. त्याच्या लेखी ती एक व्यक्ति नसून फक्त शरीरसुख मिळवण्याचं साधन आहे हे तिला कळून चुकलं असेल. तो अजूनही तिला परकाच आहे. तिने त्याला तिच्यामध्ये गुंतवण्याचा प्रयत्न केला असेल. तिने त्याची काळजी घेतली असेल, त्याला चांगलं खाऊ पिऊ घातलं असेल. त्याच्या आवडीनिवडी अशा काही नव्हत्या तरीही त्याच्या बारीकसारीक सुखसोईंकडे तिने लक्ष दिलं असेल. पण त्याचं असल्या कोणत्याही गोष्टींकडे मुळीच लक्ष नव्हतं. त्याला एकट्याला सोडण्याची भिती वाटल्याने ती सतत त्याच्या अवतीभवती राहत असेल, त्याची कामवासना सतत जागृत ठेवण्याचा प्रयत्न करत असेल. त्याला आपल्या मुठीत ठेवण्यासाठी ती त्याला मिठीत घेण्याचा प्रयत्न करत असेल. तिचे सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत हे तिला जाणवलं असेल पण ते नाकारून ती त्याच त्या गोष्टी परत परत करत असेल. प्रेमाने ती आंधळी झाली होती, नाकासमोरचं सत्य तिला दिसत नव्हतं, आपल्या प्रेमाला प्रतिसाद मिळणं शक्य नाही हे तिला समजत नव्हतं.

मला बऱ्याच गोष्टींची माहिती नसल्यामुळे स्ट्रिकलँडच्या स्वभावाचा मी जो अभ्यास केला होता त्यात बऱ्याच त्रुटी राहून गेल्या होत्या. मी त्याच्या आयुष्यातील स्त्रियांविषयी खूप लिहीलं आहे, पण त्याच्या आयुष्यात स्त्रियांना फार महत्व नव्हतं. तरीही त्यातून शोकांतिका व्हावी हे एक दुर्दैव होतं. त्याच्या आयुष्यात खरं स्थान कशाला असेल तर ते फक्त भव्य स्वप्न आणि त्यासाठी उपसलेले प्रचंड कष्ट.

येथे कादंबरीतील कल्पित स्पष्ट होतं. पुरूषासाठी प्रेम म्हणजे दिवसात घडणाऱ्या अनेक घटनांपैकी एक घटना असते. कादंबऱ्यांतून प्रेमावर भर दिला जातो पण प्रत्यक्षात ते काही खरं नसतं. काही पुरूषांना प्रेम हे सर्वात महत्वाचे वाटत असते. पण प्रत्यक्षात ते स्वत: अगदी सामान्य असतात. प्रेमाला अत्युच्च महत्व

देणाऱ्या स्त्रियांनासुद्धा ते आवडत नाहीत. पुरूष प्रेम करतात पण ते करत असतानाच त्यांचं मन दुसऱ्या गोष्टीत गुंतत असतं. उदा. त्यांचा पोटापाण्याचा उद्योग व्यवसाय, फावल्या वेळातील छंद, खेळ, कला, संगीत इत्यादी अनेक गोष्टीत त्यांचं मन गुंतलेलं असतं. या सगळया गोष्टी एकाच वेळी त्यांच्या मनाच्या वेगवेगळया कप्प्यांमध्ये असतात. त्यापैकी जी गोष्ट चालू असेल त्या कोणत्याही एका गोष्टीवर लक्ष केंद्रीत करणं त्यांना सहज जमतं. एका कप्प्यातील गोष्टींच दुसऱ्या कप्प्यातील गोष्टीवर आक्रमण झालेलं त्यांना आवडत नाही. स्त्री आणि पुरूष प्रेमिकांमध्ये हा महत्वाचा फरक असतो. स्त्री दिवसाचे चोवीस तास प्रेम करू शकते पण पुरूष मात्र प्रेमाला फक्त अधूनमधूनच वेळ देऊ शकतो.

स्ट्रिकलँडची लैंगिक भूक खूप कमी होती. त्याच्या लेखी कामभावनेला फार महत्व नव्हतं. ती एक कटकट होती. त्याचा जीव रमायचा तो इतर गोष्टीत. त्याची कामेच्छा तीव्र होती. कधी कधी ती हिंदास्त्रपणे वर उफाळून येई आणि तो वासनेला बळी पडे. आत्मभान विसरायला लावणाऱ्या त्या वासनेचा त्याला तिटकारा होता. मला वाटतं त्यामुळे त्याला त्याच्या जोडीदाराचाही तिटकारा वाटत असावा. एकदा भानावर आल्यानंतर ज्या स्त्रीचा त्याने उपभोग घेतला होता ती स्त्री त्याला नजरेसमोर नको असायची. त्यावेळी त्याची अस्मानात तंद्री लागलेली असायची, गुलाबाच्या बागेत बागडणाऱ्या फुलपाखराला घाणेरीचं फुल बघून जसं वाटेल तसं त्याला त्यावेळी वाटत असावं. मला वाटतं कला ही लैंगिक प्रवृत्तीचा अविष्कार असते. सुंदर स्त्री, चंद्रप्रकाशात न्हाणाऱ्या नेपल्सच्या समुद्र किनाऱ्यासारखं सुंदर दृश्य किंवा टिशिअनच्या एन्टॉम्बमेंटसारखं सुंदर पेंटींग बघून ज्या भावना मनात उचंबळतात त्या सारख्याच असतात. स्ट्रिकलँडला लैंगिक समाधानापेक्षा कलानिर्मितीतून मिळणारे समाधान जास्त श्रेष्ठ वाटत असे. त्यामुळे लैंगिक भूक शमल्यावर त्याला त्याचा तिटकारा येई. एखादा क्रूर, स्वार्थी आणि लिंगपिसाट माणूस हा त्याच वेळी एक महान आदर्शवादीसुद्धा असू शकतो हे खरं आहे.

तो एखाद्या बिगाऱ्यापेक्षा दारिद्र्यात रहायचा. तो खूप मेहनत करायचा. इतर लोक ज्या छोट्या मोठ्या सुखसोईंनी आपलं जीवन सुखकर करत असत त्यांच्याकडे हा साफ दुर्लक्ष करत असे. त्याला पैशाची, प्रसिद्धीची हाव नव्हती. त्याची स्तुती करावी तर त्याला ते आवडत नसे. आपण ज्या तडजोडी करतो तशा प्रकारच्या कोणत्याही तडजोडी करण्याचा मोह तो टाळत असे. किंबहुना अशी तडजोड करणं शक्य आहे आणि त्यापासून काही तरी लाभ होईल हे त्याच्या डोक्यातच शिरत नसे. पॅरीससाख्या शहरात राहूनही तो एखाद्या तपस्व्यापेक्षा एकाकी होता. मित्रांनी त्याला एकटं सोडावं एवढं सोडलं तर त्यांच्याकडून त्याची कसलीही अपेक्षा नसे. त्याचं उद्दीष्ट स्पष्ट होतं. उद्दीष्ट गाठण्यासाठी बरेचजण स्वत:चं आयुष्य पणाला लावायला तयार असतात पण स्ट्रिकलँडची स्वत:च्या आयुष्याबरोबर दुसऱ्याचं आयुष्यसुद्धा पणाला लावायाची तयारी होती. त्याला खूप लांबचा पल्ला गाठायचा होता.

स्ट्रिकलँड माणूस म्हणून अत्यंत नीच आणि तिरस्करणीय होता पण तरीही मला वाटतं की तो चित्रकार म्हणून फार महान होता.



Artist: Titian (–1576)

Title: The Entombment of Christ, Date: between 1523 and 1526

Medium: oil on canvas, Dimensions: H 148 cm (58.3 in) W 205 cm (80.7 in)

Current location: Louvre Museum, Source: wikidata:Q3705716

## ४४

चित्रकारांचं दुसऱ्यांच्या चित्रांवरचं मत हे खूप महत्वाचं असतं. या ठिकाणी स्ट्रिकलँड दुसऱ्या बुजूर्ग चित्रकारांनी काढलेल्या चित्रां बद्दल काय म्हणतो ते पाहू. माझ्याकडे सांगण्यासारखं फारसं नाही. कारण स्ट्रिकलँड फारसं बोलत नसे. आपलं म्हणणं चपखल शब्दात तो मांडू शकत नसे, त्यामुळे ते लक्षात रहात नसे. त्याला विनोदाचं वावडं होतं. त्याचा विनोद म्हणजे उपहास कुचेष्टा. त्याचा

हजरजबाबीपणा उद्धटपणात मोडला असता. एखादा विनोद त्याने केला तर तो खरं सांगितल्यामुळे झालेला असे.

स्ट्रिकलँड हा फार बुद्धीमान होता असं म्हणता येणार नाही. चित्रकलेवरचे त्याचे विचार हे सर्वसामान्य मतांपेक्षा फार वेगळे नव्हते. त्याच्या स्वत:च्या शैलीशी साधर्म्य असणाऱ्या चित्रकारांबद्दल त्याला बोलताना मी कधी ऐकलं नव्हतं. उदा. पॉल सेझाँ किंवा व्हॅन गॉग. त्याने त्यांची चित्रं कधी पाहिली असतील की नाही याचीही मला शंका आहे. इंप्रेशनीझम मध्ये त्याला फारसा रस नव्हता. त्यांच्या तंत्राचा त्याच्यावर प्रभाव होता पण त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत काही खास नव्हतं. जेव्हा स्ट्रोव्ह, क्लॉद मॉने कसा महान चित्रकार आहे ते जीव तोडून सांगत होता तेव्हा तो म्हणाला होता: "मला त्यापेक्षा विंटरहॉल्टरच जास्त आवडतो." पण हे तो त्याला चिडवण्यासाठी म्हणाला असावा असं मला वाटतं. आणि तसं असेल तर त्याचा प्रयत्न नक्कीच यशस्वी झाला होता.

त्याची मत सनसनाटी होती असं काही नव्हतं. त्याच्या स्वभाव इतका स्फोटक होता की त्याची मतंसुद्धा तेवढीच स्फोटक असती तर ते त्याच्या स्वभावाला साजेसं दिसलं असतं. त्याच्या पूर्वासूरींना तो शिव्या देईल असं मला वाटलं होतं पण त्याचं मत इतरांसारखच होतं. एल ग्रेकोचं नाव त्याने ऐकलं होतं असं मला वाटतं नाही. वेलास्क्वेज विषयी त्याला आदर होता, शेदाँ त्याला आवडायचा आणि रेम्ब्रांदने त्याचं हृदय उचंबळून येत असे. रेम्ब्रांदचा त्याच्यावरील प्रभाव त्याने मला वर्णन करून सांगितला होता. पण त्याला मनापासून आवडणारा चित्रकार म्हणजे ब्रुघेल द एल्डर. त्यावेळी मला त्याच्याबद्दल फार माहिती नव्हती आणि स्ट्रिकलँडला समजावून सांगता येत नव्हतं. त्याचे शब्द मला नीट आठवत आहेत कारण त्याचा अर्थ लावण्याचा मी अजून प्रयत्न करत आहे.

“तो ठीक आहे,” स्ट्रिकलँड म्हणाला होता. “मी पैजेवर सांगतो यात खूपच आव्हान आहे.”

नंतर व्हिएन्नामध्ये मला पीटर ब्रुघेलची चित्रं बघायला मिळाली तेव्हा स्ट्रिकलँडला तो का आवडला असावा ते कळलं. ब्रुघेलच्या चित्रातील जग हे त्याचं स्वत:चं होतं. त्याच्या विषयी काही तरी लिहीता यावं म्हणून मी खूप टिपणं काढून ठेवली होती पण ती माझ्याकडून हरवली. आता फक्त काही गोष्टीच आठवतात. त्याच्या चित्रातील प्राणीमात्रांचे आकार भयंकर बेडौल असत, आयुष्य म्हणजे एक सावळा-गोंधळ, चित्रविचित्र घटनांची गोळा-बेरीज. माझ्या दृष्टीने ब्रुघेलला जे सांगायचं होतं त्यासाठी त्याने निवडलेलं माध्यम चुकीचं होतं. कदाचित त्यामुळेच स्ट्रिकलँडला त्याच्याविषयी सहानभूती वाटली असावी.

कदाचित ते दोघंही जो विषय साहित्यातून हाताळायला पाहिजे होता तो विषय ते चित्रकलेतून हाताळायचा प्रयत्न करत असावेत.

या वेळी स्ट्रिकलँडचं वय साधारणपणे सत्तेचाळीसच्या जवळपास असावं.



Artist:Franz Xaver Winterhalter (1805 - 1873)

Title: Portrait of Elizabeth of Bavaria, Oil on canvas

Location: Wien, Kunsthistorisches Museum, Source: Wikipedia



Artist: Claude Monet (1840–1926)

Title: Woman with a Parasol - Madame Monet and Her Son

Medium: oil on canvas, Date: 1875

Dimensions: H 100 mm (3.94 in). W 81 mm (3.19 in).

Current location :National Gallery of Art, Source wikidata:Q2395218



Artist: Pieter Brueghel the Elder (1526/1530–1569)

Title: The Peasant and the Birdnester, Date: 1568

Medium oil on oak, Dimensions: 59.3 × 68.3 cm (23.3 × 26.9 in)

Current location: Kunsthistorisches Museum, Vienna, Austria. Source: wikidata Q43270

## ४५

मी जर ताहितीत जाण्याच्या भानगडीत पडलो नसतो तर हे पुस्तक मला लिहता आलं नसतं. इकडे तिकडे खूप भटकंती केल्यावर चार्ल्स स्ट्रिकलँड शेवटी तेथे गेला होता. तेथेच त्याने त्याची महत्वाची चित्रं काढली होती. आज तो त्याच्या

ताहितीतील कामामुळेच जास्त ओळखला जातो. कोणत्याही कलाकाराला आपली सगळी स्वप्नं प्रत्यक्षात आल्याचं बघायला मिळत नाही. स्ट्रिकलँडचा बहुतेक वेळ तांत्रिक बाबींशी झगडण्यात गेला. त्यामुळे त्याच्या प्रतिभेच्या अंत:चक्षूंना जे दिसलं होतं ते कॅनव्हासवर उतरवायला त्याला इतरांपेक्षा खूप कमी वेळ मिळाला. पण ताहितीत परिस्थिती त्याच्या बाजूला होती. त्याच्या प्रतिभेला वाव देणारे बरेच घटक त्याच्या अवती भवती होते. त्याच्या नंतरच्या काळातील चित्रांतून तो कशाच्या शोधात होता ते कळून येतं. ही चित्र रसिकांना नवं खाद्य पुरवतात. ताहितीसारख्या दूरच्या प्रदेशात त्याच्या तरल कल्पनाशक्तिला दृष्य स्वरूप मिळालं. वापरून गुळगुळीत झालेले शब्द वापरायचे तर त्याला स्वत:चा शोध लागला असं म्हणावं लागेल.


प्रशांत महासागरातील त्या दूरच्या बेटांवर उतरल्याबरोबरच मला स्ट्रिकलँडची आठवण यायला हवी होती. पण मी दुसऱ्या एका अगदी वेगळ्याच कामात अडकलो होतो. तेथे गेल्याला काही दिवस झाल्यावर मला स्ट्रिकलँडसुद्धा ताहितीमध्ये होता त्याची आठवण झाली. मी त्याला शेवटचा भेटलो होतो त्याला आता पंधरा वर्ष झाली होती आणि त्याचं निधन झाल्याला नऊ. मी इथे आल्यावर माझ्या कामात एवढा गुंतून पडलो होतो की मला दुसरा विचार करायला फुरसत मिळाली नव्हती. मी एके दिवशी सकाळी लवकर उठलो आणि गच्चीवर येऊन पाहिलं तर कोणीच उठलेलं दिसत नव्हतं. स्वयंपाकघराला कुलूप होतं. बाहेर बाकड्यावर एक स्थानिक मुलगा झोपला होता. नाश्ता मिळायला अजून खूप अवकाश होता म्हणून मी समुद्र किनाऱ्यावर चक्कर मारली. चिनी माणसांची दुकानं उघडली होती. आकाशात पहाटेचा फिकट प्रकाश अजून रेंगाळत होता. भयाण शांततेत बुडालेलं लगून, एखाद्या रहस्यमय गुपितासारखं दिसणारं मुरीआ बेट.

माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसेना. वेलिंग्टन सोडल्यानंतरचे दिवस अगदी विलक्षण होते. वेलिंग्टन टुमदार आहे. त्याच्यावर इंग्लिश संस्कृतीची छाप आहे. तिथे आल्यावर इंग्लंडच्या दक्षिण किनारपट्टीवरच्या बंदराची आठवण येते.

तीन दिवस समुद्र खवळलेला होता. आकाशात काळया ढगांचा पाठशिवणीचा खेळ चालला होता. नंतर वारा पडला. शांत झालेला समुद्र निळाशार दिसू लागला. इतर महासागरांच्या तुलनेत प्रशांत महासागरावर जास्तच एकाकी वाटतं. त्याचा विस्तार महाप्रचंड आहे. अगदी छोट्या सफरीतसुध्दा मोठं साहस केल्यासारखं वाटतं. या द्वीपसमूहावरून वहाणारी हवासुद्धा एवढी शुद्ध आणि ताजीतवानी असते की त्याने कोणीही वारं प्यालेल्या वासरासारखा हुंदडू लागतो. ताहितीला जाणं म्हणजे स्वर्गीय आनंद असतो. अथांग महासागराच्या क्षितीजावर जादूची कांडी फिरल्याप्रमाणे अचानक ताहिती आणि मुरिया बेटं दिसू लागतात. बेटांवरील पर्वत शिखरांमुळे ही बेटं म्हणजे प्रशांत महासागराच्या गळयातील रत्नहाराप्रमाणे भासतात. जसं अंतर कमी होत जातं तसं या बेटांचं सौंदर्य हळू हळू दृगोचर होऊ लागतं. उंच पर्वतांच्या आणि दाट जंगलाच्या आड लपलेली काही गुपितं हातची राखून निसर्ग आपलं सौंदर्य मुक्त हातांनी उधळत असतो.

ताहिती हे एक पाचूसारखं हिरवेगार बेट आहे. किनाऱ्यापासून अंतर्भागापर्यंत हिरव्या रंगाच्या विविध छटा उलगडत जातात. डोंगर दऱ्या, घनदाट झाडी, झुळझुळ वाहणाऱ्या नद्या-नाले, कूजन करणारे पक्षी आणि अनादीकालापासून नांदत असलेली जीव सृष्टी. या वर्षानुवर्ष चाललेल्या सृष्टीचक्रात कुठेतरी काहीतरी खटकत असावं असं उगाचच वाटतं, पण काय ते उमगत नाही. कधी कधी निसर्गातील भव्यतेच्या दर्शनाने मन उगाचच उदास होतं, पण क्षणभरातच आनंदाने उचंबळून येतं. विदूषकाच्या एका डोळयात आसू तर दुसऱ्या डोळयात हसू असतं तसंच. सगळं जग जेव्हा आनंदी असतं तेव्हा तो विदूषक अंतर्यामी एकटाच रडत असतो. आपल्याला हसत हसत नेत्रपल्लवी करणाऱ्या मदनमस्त सुंदरीसारखी ताहिती आपल्या सौंदर्याची चौफेर उधळण करत तुम्हाला आव्हान देत असते. खडतर आणि प्रदीर्घ प्रवास एकदाचा संपला म्हणून आपण अधीर झालेलो असतो. पपीएत बंदरात जहाज नांगर टाकत असताना इतका वेळ खुणावणारे सौंदर्य

एकदाचं आपल्या हाताशी आल्याचं समाधान मिळतं. छोटी छोटी शिडाची जहाजं धक्यावर नीट बांधून ठेवलेली होती. किनाऱ्याच्या पांढऱ्या आणि लाल रंगाच्या इमारती निळया आकाशाच्या पार्श्वभूमीवर खुलून दिसत होत्या. त्यात शहरवासियांचं सुसंस्कृत आणि रंगेल जीवन दिसून येत होतं. धक्यावर जमा झालेले लोक आनंदी आणि देखणे होते. त्यांची चाललेली लगबग, आरडाओरडा आणि हातवारे मजेशीर वाटत होते. गव्हाळ रंगाच्या नगरवासियांचा समुद्रच धक्यावर गोळा झाला आहे असं वाटत होतं. सामान खाली उतरवणं, जकात आकारणी अधिकाऱ्यांची तपासणी वगैरे गोष्टी मोठ्या लगबगीने चालल्या होत्या. प्रत्येक जण तुमच्याकडे बघून हसत आहे असं वाटत होतं. हवेत प्रचंड उकाडा होता. रंगांची चौफेर उधळण डोळयात भरत होती.



Artist: Paul Gauguin

Tahitian Landscape, Date: 1891, Dimensions: H 68cm L 92cm, Medium: Oil on Canvas

Current Location: Minneapolis Institute of Arts, Source: Wikipedia

## ४६

ताहितीत आल्या आल्या माझी कॅप्टन निकोल्सशी गाठ पडली. मी हॉटेलच्या सज्जात बसून सकाळची न्याहारी घेत असताना तो आला आणि त्याने स्वत:ची ओळख करून दिली. मला चार्ल्स स्ट्रिकलँडमध्ये रस आहे हे त्याच्या कानावर आलं होतं. तो त्याच्या विषयी बोलायला आला आहे हे त्याने आल्या आल्याच सांगितलं. इंग्लंड मधल्या एखाद्या लहानश्या खेडेगावातल्या लोकांना जसा गावगप्पांमध्ये रस असतो तेवढाच रस ताहितीकरांनासुद्धा होता. मी स्ट्रिकलँडच्या चित्रांविषयी एक

दोघांकडे जी चौकशी केली ती चार दिवसात गावभर झाली. मी त्या अनोळखी इसमाला न्याहारी केली आहे का ते विचारलं.

‘‘होय. मी कॉफी सकाळी थोडी लवकरच घेतली आहे,’’ त्याने उत्तर दिलं. ‘‘पण आता थोडीशी व्हिस्की घ्यायला हरकत नाही.’’

मी चिनी वेटरला बोलावलं.

‘‘प्यायला खूपच लवकर होतंय असं वाटत नाही का तुम्हाला?’’ कॅप्टननं उलटं मलाच विचारलं.

‘‘ते तुमच्या आणि तुमच्या यकृताच्या ताकदीवर अवलंबून आहे.’’

‘‘मी तसा जवळपास मद्यपान करत नाही,’’ तो कॅनेडियन क्लब या व्हिस्कीचा एक मोठा पेला भरत म्हणाला.

बोलताना त्याचे तुटके आणि डागाळलेले दात दिसत होते. त्याची अंगकाठी अगदी शिडशिडीत होती. मध्यम उंची, बारीक कापलेले पांढरे केस, मिशीचे पांढूरके खुंट, नीट न धुतलेले अस्वच्छ हात. तीन चार दिवसांची वाढलेली दाढी. उन्हात रापलेला चेहेरा, कपाळावर सुरकुत्यांचं जाळं. त्याचे छोटेसे निळसर डोळे सारखे भिरभिरत होते. माझी लहान सहान हालचालसुद्धा त्याच्या नजरेतून सुटत नव्हती. त्याचा एकूण आविर्भाव एखाद्या अट्टल गुंडासारखा होता. पण त्या क्षणी तरी तो अगदी मित्रत्वाने आणि सभ्यपणे वागत होता. त्याने खाकी रंगाचा गणवेश परीधान केला होता.

‘‘मी स्ट्रिकलँडला चांगलाच ओळखत होतो,’’ तो खुर्चीवर मागे रेलून बसला आणि त्याने मी दिलेली सिगार शिलगावली. ‘‘तो ताहितीत माझ्यामुळे आला.’’

" तुम्हाला तो कुठे भेटला?"

"मास्येझ."

"तुम्ही तेथे काय करत होता?"

तो माझ्याकडे बघून अघळपघळ हसला.

"मी समुद्र किनाऱ्यावर भटकत होतो तेव्हा तो मला भेटला."

माझ्या मित्राच्या अवतारावरून तो आजही समुद्रकिनाऱ्यावर भटकायला आला असावा असं वाटत होतं. त्याच्याशी मैत्री करण्यासाठी मी मनाची तयारी केली. अशा भटक्या लोकांशी मैत्री करण्यासाठी घेतलेल्या कष्टांचं नेहमीच चीज होत असतं. त्यांच्याशी सहज मैत्री होते. ते बोलघेवडे असतात, फारसे आढेवेढे घेत नाहीत. त्यांना आपलंसं करायला फारसे श्रम पडत नाहीत. त्यांचा विश्वास सहज संपादन करता येतो. त्यांचं बोलणं थोड्या सहानुभूतीने ऐकलं की ते तुमचे ऋणी राहतात. गप्पागोष्टी करणं हा त्यांच्या आयुष्यातील एक मोठा आनंद असतो. त्यांना त्यात मोठेपणा मिरवायचा असतो. त्यामुळे गोष्टी ऐकून घेणारा श्रोता मिळाला तर त्यांना तो हवाच असतो. त्यांच्या थापा-बाता त्यांच्या कल्पनाशक्तीची मर्यादा ओलांडत नाहीत. असे लोक अगदी भोळे भाबडे असतात असं काही म्हणता येणार नाही. पण शक्यतो कायद्यांचा ते आदर करतात. विशेष करून ज्या कायद्यांच्या पाठीमागे बडगा उभा असतो अशा कायद्यांचा तर जास्तच. अशा लोकांच्याबरोबर पोकर खेळणं खूप धोकादायक होऊ शकतं. पण त्यांच्या खेळातल्या चलाखीने या जगप्रसिद्ध खेळाची रंगत वाढली होती हे मात्र खरं. मी ताहितीतून जाण्याच्या खूप आधीच माझी कॅप्टन निकोल्सशी ओळख झाली हे माझं मोठं भाग्यच म्हणायला पाहिजे. त्याने माझ्या पैशांनी सिगार ओढल्या, व्हिस्की प्याला (तो मद्यपान करीत नसल्याने तो कॉकटेल घेत नसे), अधे मध्ये थोडेसे डॉलर माझ्यावर उपकार करतोय

या नम्र भावनेने उधार घेतले. जे पैसे माझ्या खिशातून एकदा गेले ते कधीच परत आले नाहीत हे जरी खरं असलं तरी त्या पैशांच्या बदल्यात माझ्या ज्ञानात आणि मनोरंजनात जी भर पडली ती मोबदला म्हणून विचार केला तर खूपच अधिक होती. त्या दृष्टीने उलटा मीच त्याचा ऋणी आहे. विषयांतर होत आहे म्हणून मी त्याला दोन वाक्यात उडवून टाकलं तर ते माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला टांचत राहिल.

कॅप्टन निकोल्स इंग्लंड सोडून ताहितीत का आला त्याचं खरं कारण मला कधी कळलं नाही. त्या बाबतीत तो मौन धारण करून असायचा. त्याच्यासारख्या माणसाला सरळ प्रश्न विचारायची सोय नसते. इंग्लंड सोडून परागंदा व्हायचं कारण केवळ दुर्दैव असं मोघमपणे त्याने सांगितलं होतं. त्याच्या मते तो एका घोर अन्यायाचा बळी होता. एखाद्या अफरातफर किंवा खूनासारख्या मोठ्या गुन्ह्यात अडकल्याने त्याच्यावर इंग्लंडमधून पळ काढण्याची पाळी आली असावी असा मला दाट संशय होता. त्याच्या मायदेशातील काही हटवादी सरकारी अधिकाऱ्यांनी कालबाह्य नियमांचा अर्थ लावताना तांत्रिक किस पाडला असं तो एकदा ओझरतं म्हणाला होता. तेव्हा त्याला सहानुभूती दाखवण्यावाचून माझ्याकडे गत्यंतर नव्हतं. मातृभूमीत असताना काही दु:खद प्रसंग त्याच्यावर कोसळले होते तरीही त्याची देशभक्ती तीळमात्रही कमी झाली नव्हती. इंग्लंड हा जगातील एक सर्वोत्तम देश आहे हे तो वेळो वेळी सांगत असे आणि हवाई बेटातील मूळ कनाकाज रहिवासी, अमेरीकन, फ्रेंच, डच या सर्वांपेक्षा इंग्लीश लोक श्रेष्ठ आहेत असं तो हिरीरीने सांगत फिरे.

पण एकूण पाहता तो फारसा सुखी आणि समाधानी असावा असं वाटत नव्हतं. त्याला अपचनाचा त्रास होत असे. तो नेहमी पेपीनची गोळी चघळत असायचा. सकाळी त्याला भूक लागत नसे. पण त्याच्या दु:खाचं कारण निव्वळ शारिरीक पीडा हे नव्हतं. याहून दुसरं एक कारण होतं. आठ वर्षांपूर्वी त्याने घाईघाईने लग्न केलं होतं. दैवगती किती विचित्र असते. काही जणांच्या नशीबातच

अविवाहित राहणं लिहिलेलं असतं. अशांनी स्वेच्छेने किंवा परिस्थितीवशात लग्न केलं तरी त्यांच्या कपाळी लिहीलेला सटवीचा शाप काही पुसला जात नाही. विवाहित माणसाचं ब्रह्मचर्य हे फारच दुर्दैवी म्हटलं पाहिजे. कॅप्टन निकोल्स हा अशा दुर्दैवी लोकांपैकी एक होता. मी त्याच्या बायकोला भेटलो आहे. ती अठ्ठावीस वर्षांची होती. काही जणांचं वय दिसत नाही अशांपैकी ती एक होती. ती वीस वर्षांची होती तेव्हासुद्धा अशीच दिसत असेल आणि ती जेव्हा चाळीशीला येईल तेव्हासुद्धा अशीच दिसेल. तिला पाहातच ती खूपच कडक स्वभावाची असावी असं वाटायचं. तिची चेहेरेपट्टी, अंगकाठी, कपडे या सगळयातून तिचा कडकपणा उठून दिसे. कॅप्टनने तिच्याशी लग्न का केलं असावं आणि एकदा लग्न केल्यावर तिला सोडून का दिले नाही हा दुसरा त्याहून मोठा प्रश्न मला नेहमी पडे. एकामागून एक आलेल्या अपयशाने त्याला पळ काढावा लागला होता. तो जीवाला पुरता वैतागून गेला होता. त्यात या लग्नाची भर. यातून पळ काढणार तरी कोठे. आणि पळ काढला असता तरी मिसेस निकोल्सने त्याला जगाच्यापाठीवरून कुठूनही शोधून काढलं असतंच.

गुंड आणि कलाकार हे एका वेगळयाच वर्गात मोडतात. ते कोणाचीही भीडमुर्वत ठेवत नाहीत. राजाला भेटायला जातानासुद्धा ते न दबता जातात. हल्ली कनीष्ठ मध्यम वर्ग म्हणून ओळखला जाणारा असा एक नवीनच वर्ग उदयाला आला आहे. मिसेस निकोल्स या नव्या वर्गातून आली होती. तिचे वडिल पोलीसांत होते. ते एक यशस्वी अधिकारी असावेत याची मला खात्री आहे. कॅप्टनवर तिने काय मोहिनी घातली होती ते मला ठाऊक नाही. पण ते प्रेम असावं असं मला वाटत नाही. तिच्याशी बोलण्याची वेळ माझ्यावर कधी आली नव्हती. कसेही असो, पण कॅप्टन निकोल्स तिला जाम टरकून असायचा. कधी कधी आम्ही हॉटेलच्या सज्जात बसून गप्पा मारीत असताना ती खाली रस्त्यावरून जात असायची. तिला पाहिल्यावर कॅप्टन चूळबूळ करायला लागायचा. ती काही त्याला हाक मारून

बोलवत नसे तरीही तो अस्वस्थ होऊन त्याच्या घड्याळाकडे बघत एक निश्वास टाकायचा.


“आता मला निघायला पाहिजे.”

गप्पा किंवा पेयपान कितीही रंगात आलेलं असो, एखादा चुटका किंवा व्हिस्कीचा घोट कशासाठीही तो थांबत नसे. त्याने आयुष्यात कितीतरी तुफानी वादळं पाहिली होती.

हातात रिव्हॉल्वर असताना तो दहा बारा धिप्पाड आफ्रिकनांशी सामना करायला डगमगला नसता. कधी कधी मिसेस निकोल्स तिच्या सात वर्षांच्या अशक्त बापूडवाण्या मुलीला हॉटेलवर पाठवी.

“आईने तुम्हाला बोलावलंय,” असा तिच्या रडक्या आवाजातला निरोप मिळाला रे मिळाला की तो ताडकन उठे आणि “मी आलोच हां.” असं सांगून मुलीबरोबर निघून जाई.

आपल्या नशीबात काही केलं तरी अपयशच लिहिलं आहे या भावनेतून तो कुढत राही. इच्छाशक्तिने मोहावर मिळवलेल्या विजयाचं हे एक उदाहरण म्हणता येईल. माझ्या विषयांतरातून किंचित का होईना बोध झाला हे ही नसे थोडके.



Artist: Paul Gauguin

Title: By the Seashore, Martinique, Date: 1887

Medium: oil on canvas, Dimensions: 54 × 90 cm (21.3 × 35.4 in)

Current location: Ny Carlsberg Glyptotek, Source: wikidata:Q37693

## ४७

कॅप्टन निकोल्सने स्ट्रिकलँड बद्दल मला जी थोडी तुटक माहिती दिली त्यावरून एक संगतवार चित्र तयार करण्याचा मी माझ्या परीने प्रयत्न केला. माझी आणि स्ट्रिकलँडची पॅरीसमध्ये जी शेवटची भेट झाली होती त्यानंतरच्या हिवाळयात त्याची निकोल्सशी गाठ पडली. मध्यंतरीच्या काळात त्याने काय केलं असावं ते मला माहित नाही. पण एकूण अंदाज घेता परिस्थिती कठीण असावी असं वाटतं. कॅप्टनने त्याला *अझील द न्युई* (रात्रीचा आसरा) मध्ये पहिल्यांदा पाहिलं. त्यावेळी मास्येझमध्ये बंदर कामगारांचा संप चालू होता. स्ट्रिकलँडकडची सगळी

पुंजी संपली होती आणि शरीरात जीव टिकवून धरण्यासाठी आवश्यक असलेले किमान पैसे मिळवणेही त्याला अशक्य झालं होतं.

*अझील द न्युई* ही मास्येझमधील एक उंच दगडी इमारत आहे. तेथे दरिद्री आणि बेघर लोकांना एका आठवड्यापुरता आसरा मिळायचा. फक्त दोन अटींवर. पहिली - ओळख पटवण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे आणि दुसरी - ती व्यक्ती काम करत आहे याचा पाद्र्याने दिलेला दाखला. इमारतीचा दरवाजा उघडण्याची अनेकजण वाट बघत होते. काही जण येरझाऱ्या घालत होते तर काही नुसतेच इकडे तिकडे रेंगाळत होते. थोडे लोक गटाराच्या कठड्यावर बसले होते. त्या गर्दीमध्ये स्ट्रिकलँड त्याच्या धिप्पाड देहयष्टीमुळे उठून दिसत होता, त्यामुळे तो कॅप्टनच्या लक्षात राहिला. दरवाजा उघडल्यावर सर्व जण आत गेले. पाद्र्याने त्याला इंग्लीशमधून विचारलं पण तेवढ्यात दुसरा पाद्री हातात जाडजूड बायबल घेऊन आत आला त्यामुळे ते अर्धवटच राहिलं. बायबल हातात घेतलेल्या पाद्र्याने प्रवचन द्यायला सुरवात केली. त्या गरीब बिचाऱ्या गांजलेल्यांना ते ऐकणं भाग होतं. फुकट मिळणाऱ्या आसऱ्यासाठी किमान ही किंमत चुकवल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. स्ट्रिकलँड आणि कॅप्टन दोघांना वेगवेगळया खोल्या मिळाल्या. सकाळी त्या ब्रह्मचारी पाद्र्याने सर्वांना अंथरूणाच्या बाहेर काढलं. कॅप्टन तयार होईपर्यंत स्ट्रिकलँड गायब झाला होता. सकाळच्या बोचऱ्या थंडीत कॅप्टन थोडा वेळ रस्त्यात भटकल्यानंतर जेथे कामाच्या शोधात असलेले खलाशी गोळा होत त्या *प्लास व्हिक्तोर जेल्यु* येथे जाऊन पोचला. तेथे एका पुतळयाच्या चौथऱ्याला टेकून स्ट्रिकलँड डुलकी काढत होता. त्याने त्याला ढोसून उठवलं.

“मित्रा, नाश्ता करायला येतोस का?”

“चल हट,” स्ट्रिकलँड खेकसला.

असा उद्धटपणा करणारा इसम म्हणजे स्ट्रिकलँड सोडून दुसरा कोण असणार.

कॅप्टन निकोल्स जे सांगत होता त्यात तथ्यांश असला पाहिजे.

“तुझा खिसा रिकामा दिसतोय.” कॅप्टनने विचारलं.

“तू इथनं सटकतोस की नाही.” स्ट्रिकलँड गुरगुरला.

“माझ्या बरोबर चल. मी तुला नाश्ता खिलावतो.”

थोडी कांकू केल्यानंतर स्ट्रिकलँड त्याच्या पायावर उभा राहिला आणि ते दोघं *बुशी द पाँ* (पावाचा तुकडा) या ठिकाणी गेले. इथे भुकेल्या लोकांना पाव देत असत, पण तो त्यांना तिथल्या तिथेच खावा लागे, बरोबर घेऊन जाण्याची बंदी होती. त्यानंतर ते *क्युलीय द सूप* (सूपचा चमचा) या ठिकाणी गेले. इथे त्यांना एक वाडगा भरून पाणचट आणि कोमट सूप मिळाले. त्या दोन इमारती एकमेकांपासून खूप दूर होत्या. त्यामुळे फक्त ज्यांची भुकेमुळे उपासमार होत आहे असे लोकच तेथे जात. अशा रितीने त्यांची न्याहारी आणि चार्लस् स्ट्रिकलँड आणि कॅप्टन निकोल्स यांच्या विचित्र मैत्रीची सुरूवात झाली.

त्या दोघांनी मास्येझला चार एक महिने काढले असावेत. या कालखंडात म्हणण्यासारखं काही घडलं नाही. पोटाची खळगी भरण्यासाठी काही तरी लटपट करणं आणि रात्रीचा आसरा मिळवणं या उद्योगात त्यांचा दिवस निघून जायचा. या ठिकाणी कॅप्टन निकोल्सने त्याच्या कल्पनाशक्तीने रंगवून सांगितलेल्या काही गोष्टी देण्याचा मला मोह मला आवरला पाहिजे. मास्येझ हे सतत कार्यरत असलेल्या सागरी बंदराचं शहर आहे. मास्येझमधल्या तळागाळातल्या वस्तीने एका पुस्तकाला पुरेसा ऐवज पुरवला असता. त्या दोघांना ज्या व्यक्ति भेटल्या त्यांच्या चित्रणाने एखाद्या विद्यार्थ्याला बदमाषांचा कोष लिहीता आला असता. पण मी फक्त एखाद दोन परीच्छेदावरच समाधान मानाणार आहे. या बंदराच्या शहरात राहणाऱ्या वेगवेगळया रंगांच्या, वंशाच्या लोकांच्या जीवनाची एक झलक मला

बघायला मिळाली होती. क्रूर आणि रानटी, आनंदी आणि उत्साही. त्यातून मास्येझची अशी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती निर्माण झाली होती. हॉटेल आणि इतर करमणूकीच्या जागा श्रीमंत आणि गरीब, धाडसी आणि शामळू, प्रसिद्ध आणि सर्वसामान्य अशा सर्व थरातल्या लोकांनी नेहमी गजबजलेल्या असत. कॅप्टन निकोल्सने ज्या स्थळांचा उल्लेख केला होता ती स्थळं ज्यांनी प्रत्यक्ष पाहिली असतील त्यांचा मला हेवा वाटतो.

जेव्हा एका आठवड्याने *अझील द न्युईचे* दरवाजे त्यांच्यासाठी बंद झाले तेव्हा स्ट्रिकलँड आणि कॅप्टन निकोल्सने टफ बिलचा आसरा घेतला. टफ बिल खलाशांच्या बोर्डिंग हाऊसचा प्रमुख होता. तो एक धिप्पाड आणि आडदांड असा मिश्र वंशीय मुलाटो होता. त्याचा एक गुद्दा बसला तर प्राण कंठाशी येत. तो बेकार खलाशांची जेवणा-खाण्याची आणि राहाण्याची सोय करीत असे. ते साधारण महिनाभर त्याच्याकडे राहत. स्वीडीश, काळे आफ्रिकन, ब्राझिलीयन असे नाना देशातील खलाशी त्याच्या घरातील दोन खोल्यात नुसत्या फरशीवर झोपत. दर दिवशी ते त्याच्या बरोबर *प्लास व्हिक्तोर जेल्यु* येथे जात. तेथे जहाजांचे कप्तान खलाशांच्या शोधात येत. त्याने एका जाड्या, गलिच्छ, गबाळया अमेरीकन बाई बरोबर लग्न केलं होतं. त्याच्या गळयात ती कशी पडली ते एक देवच जाणे. दर दिवशी त्याच्याकडे राहणारे तिला तिच्या घरकामात आळीपाळीने मदत करत. कॅप्टन निकोल्सने ते काम आनंदाने अंगावर घेतलं. स्ट्रिकलँडने त्याच्या पाळीच्या कामाऐवजी टफ बिलचं एक पोर्ट्रेट करून दिलं. टफ बिलने कॅनव्हास, रंग, ब्रश वगैरे गोष्टींचा खर्च तर केलाच वर चोरट्या आयातीचा एक पौंड तंबाखू दिला. माझ्या माहिती प्रमाणे ते पोर्ट्रेट अजूनही *क्व डे ला जोलिएत* च्या जवळपास असलेल्या एका लहानशा घरात आजही लावलेलं सापडेल. माझ्या अंदाजा प्रमाणे आजच्या तारखेला त्याला कमीत कमी पंधराशे पौंड तरी सहज येतील.

स्ट्रिकलँड न्युझीलंड नाहीतर ऑस्ट्रेलियाला जाणारी आगबोट पकडून तेथून नंतर सामोआ किंवा ताहिती बेटांवर जाण्याचा विचार करत होता. दक्षिण समुद्रात जाण्याची कल्पना त्याच्या मनात कशी आली ते मला माहित नाही. पण हिरव्यागार वनराजीने व्यापलेल्या, लख्ख उन्हात नहाणाऱ्या आणि निळाशार समुद्राने वेढलेल्या एखाद्या बेटावर जाण्याचा विचार तो पहिल्यापासून करीत असावा. उत्तरेपेक्षा दक्षिणेचा समुद्र जास्त निळाशार असतो.

तो कॅप्टन निकोल्सला धरून राहिला होता. कारण त्याला त्या भागाची फारशी माहिती नव्हती. कॅप्टननेच त्याला हवं ते सगळं ताहितीत मिळेल असं पटवून दिलं.

"हे बघा, ताहितीत फ्रेंच आहेत आणि फ्रेंच लोक तांत्रिक गोष्टींचा जास्त बाऊ करत नाहीत."

त्याचा मुद्दा मला पटला.

स्ट्रिकलँडकडे कसलेच कागदपत्र नव्हते. पण टफ बिलला जो फायदा होणार होता त्याच्या पुढे हा प्रश्न फार मोठा नव्हता. त्याला स्ट्रिकलँडचा पहिल्या महिन्याचा पगार मिळणार होता. त्याच्याकडे राहणाऱ्या एका इंग्लीश खलाशाच्या नशीबात टफ बिलच्या हातून मृत्युयोग होता. त्या मृत खलाशाचे कागदपत्र टफ बिलने स्ट्रिकलँडला दिले. कॅप्टन निकोल्स आणि स्ट्रिकलँड दोघांनाही पूर्वेला जायचं होतं. त्यांना ज्या जहाजांवर जायची संधी मिळाली ती सर्व जहाजं पश्चिमेला जाणारी होती. स्ट्रिकलँडने दोन वेळा अमेरीकेला आणि एकदा न्युकॅसलला जाणाऱ्या जहाजाबरोबर जायला नकार दिला. असले नकार ऐकायची टफ बिलला सवय नव्हती, विशेषत: त्यात जर त्याचं आर्थिक नुकसान होणार असेल तर मुळीच नाही. त्याच्याकडे तेवढा धीर नव्हता. तिसऱ्या नकाराला त्याने त्या दोघांना हाकलून दिलं. ती दुक्कल पुन्हा रस्त्यावर आली.

टफ बिलच्या घरी मिळणारं जेवण म्हणजे मेजवानी नव्हती. जेवायला बसताना पोटात जेवढी भूक असायची, तेवढीच भूक जेवण झाल्यावरसुद्धा पोटात शिल्लक असायची. पण तरीही थोडे दिवस गेल्यानंतर त्यांना टफ बिलकडून हाकलले गेल्याचा पश्चाताप वाटू लागला. भूक म्हणजे काय ते त्यांना कळलं. *क्युलीय द सूप* आणि *अझील द न्युईचे* दरवाजे आता त्यांना बंद झाले होते. पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांना फक्त *बुशी द पाँचा* आधार होता. जिथे जागा मिळे तिथे ते झोपत. कधी रिकामा ट्रक, कधी स्टेशनचं आवार, तर कधी गुदामाच्या वळचणीला. उघड्यावर मरणाची थंडी असायची. एक दोन तास कशा बशा डुलक्या काढून झाल्यावर उबदार जागेच्या शोधात पुन्हा रस्त्यावरून भटकणे. त्यांना खरी टंचाई कसली जाणवत असे ती तंबाखूची. कॅप्टन निकोल्सला तर त्यावाचून राहवत नसे. रात्रीच्या भटकंतीत लोकांनी टाकून दिलेली शोधून ठेवला होता.

''मी पाईपमध्ये अगदी घाणेरड्यातला घाणेरड्या तंबाखूंचं मिश्रण भरून पाहिलेलं आहे,'' मोठ्या तत्वज्ञाचा आव आणून तो म्हणाला. मी पुढे केलेल्या खोक्यातल्या दोन सिगार त्याने उचलल्या. एक तोंडात ठेवली तर दुसरी खिशात.

अधूनमधून त्यांना थोडे फार पैसे मिळत. कधीतरी टपालाची आगबोट यायची. धक्क्यावरील कारकुनाला मस्का मारून कॅप्टन निकोल्स हमालीचं काम मिळवायचा. जर इंग्लीश आगबोट असली तर ते सरळ डेकवर जाऊन घुसत असत आणि नजर चुकवून भटारखान्यात जात. मग तेथे भरपेट न्याहारी करता येई. एकदा त्यांना जहाजावरच्या अधिकाऱ्याने पाहिलं आणि त्यांना गँगवेमधूनच बाहेर काढलं. त्यांचा जाण्याचा वेग वाढावा म्हणून त्याने आपल्या बुटांचा प्रयोग केला.

''पोट भरलं असेल तर पार्श्वभागावर बसलेली लाथ फारशी लागत नाही,'' कॅप्टन निकोल्स म्हणाला. ''मीही ते व्यक्तिश: फारसं मनाला लावून घेत नाही. शेवटी अधिकारी म्हटला की त्याला शिस्त पाळावीच लागते.''

पांढऱ्या शुभ्र गणवेशातल्या तरणाबांड अधिकाऱ्याने उगारलेली लाथ आणि ढुंगणाला पाय लावून पळणारा कॅप्टन निकोल्स आणि हे दृष्य माझ्या नजरे समोर उभं राहिलं आणि मला हसू आलं.

कधी तरी मासळी बाजारात थोडं फार काम मिळे. एकदा त्यांना एका दिवसात अख्या फ्रँकची कमाई झाली. धक्क्यावर पडलेले संत्र्यांचे खोके ट्रकमध्ये चढवायचे होते. एके दिवशी त्यांच्यावर नशीबाची मेहेरनजर झाली. केप ऑफ गुड होप वरून मादागास्करची एक बोट येणार होती. त्या बोटीला रंग लावण्याचं काम या दोघांना मिळालं. बरेच दिवस ते दोघं बोटीच्या कठड्यावरून टांगलेल्या फळीवरून गंजलेला पत्रा रंगवत होते. या प्रसंगाने स्ट्रिकलँडच्या उपरोधिक विनोदबुद्धीला चांगलेच खाद्य पुरवलं असेल. त्याने या मानमोड्या कामातील कष्ट कसे सहन केले असं मी कॅप्टनला विचारलं.

''तक्रारीचा एक शब्दसुद्धा त्याच्या तोंडातून कधी आला नाही.'' कॅप्टनने उत्तर दिलं. ''कधीतरी तो चिडायचा. पण जर सकाळपासून आमच्या पोटात काहीच गेलं नसेल तर तो शांत होई आणि मग उत्साहाने कामाला सुरवात करी.''

एक एकाक्ष चिनी माणूस रू ब्युटेरी जवळ एक खानावळ चालवायचा. रस्त्यावर भटकणाऱ्या बेघर लोकांनी त्या खानावळीला चिंक्स हेड असं नाव दिलं होतं. तेथे अगदी स्वस्तात रात्रीची झोपायची सोय होत असे. सहा सो दिले की कॉटवर आणि तीन सो दिले की जमिनीवर. तिकडे त्यांच्यासारख्या इतर भणंग लोकांशी त्यांची मैत्री झाली. त्यात परस्परांची सोय होती. दिवसभर काबाडकष्ट करून एखाद्या फ्रँकची कमाई कोणाला तरी झाली असेल तर रात्रीच्या आसऱ्या करता त्याच्या कडून उधार मागता येई. ते लोक भणंग असले तरी कंजूष नव्हते. खिशात पैसे असले तर ते द्यायला खळखळ करत नसत.

जगातील सर्व देशातील लोक तेथे असत. पण मैत्रीसाठी देश, वंश, भाषा, धर्म कसलीच आडकाठी येत नसे. त्या दृष्टीने ते अखिल विश्वाचे नागरिक होते. कोकेनचं सर्वधर्मसमावेशक विशाल विश्व.

"स्ट्रिकलँडला डिवचलं तर तो खतरनाक होता," कॅप्टन निकोल्स हसत म्हणाला. "एके दिवशी टफ बिलची आणि आमची गाठ पडली. त्याने चार्लीला दिलेले कागदपत्र परत मागितले."

"तुला हवे असतील तर माझ्याकडे ये आणि घेऊन जा." चार्लीने सांगितलं.

"टफ बिल अगदी आडदांड माणूस होता. त्याला चार्ली ज्या प्रकारे बोलला ते आवडलं नाही. त्याने त्याला शिव्या द्यायला सुरवात केली. त्याला आठवतील त्या सगळ्या शिव्या त्याने दिल्या. टफ बिल जेव्हा शिव्या देतो ते ऐकण्यासारखं असतं.

चार्लीने थोडा वेळ शांतपणे ऐकून घेतलं. नंतर तो एक पाऊल पुढे झाला आणि म्हणाला:

'कुत्तरड्या, खूप ऐकलं तुझं. आता जातोस की नाही येथून' तो जास्त काही नाही फक्त एक वाक्य बोलला होता. पण तो ज्या पध्दतीने म्हणाला ते त्याला लागलं. तो पांढरा फटक पडला आणि त्याने हळूच काढता पाय घेतला. त्याला धडा शिकवायचा निश्चय करून."

कॅप्टन निकोल्सने जो वृत्तांत मला सांगितला त्यात स्ट्रिकलँडने वापरलेली भाषा मी वर दिली आहे त्यापेक्षा फार वेगळी होती. पण हे पुस्तक मी ज्या सभ्यगृहस्थांसाठी लिहीत आहे त्यांच्या पचनी पडावं म्हणून मी थोडासा सत्यापलाप करून सभ्य कुटुंबांना परिचित असलेली घरगुती भाषा वापरली आहे.

शहराच्या बंदर विभागात यापेक्षा फार वेगळी भाषा वापरली जाते हे सुज्ञांस सांगणे न लगे.

टफ बिल एका सामान्य खलाशाकडून झालेला अपमान खपवून घेणाऱ्यातला नव्हता. त्याच्या प्रतिष्ठेतच त्याची ताकद होती. त्यानंतर त्याच्या घरात राहणाऱ्या एका खलाशाने दुसऱ्या एका खलाशाला टफ बिल स्ट्रिकलँडची धुलाई करण्याचा बेत आखत असल्याची बातमी दिली.

एके रात्री कॅप्टन निकोल्स आणि स्ट्रिकलँड रू ब्युटेरीमधल्या एका गुत्त्यात बसले होते. रू ब्युटेरी ही एक अरुंद गल्ली आहे. तिच्या दोन्ही बाजूला असलेली एका खोलीची छोटी घरं जत्रेत लावलेल्या ठेल्या प्रमाणे किंवा जनावरांच्या पिंजऱ्यासारखी दिसतात.

प्रत्येक घरात एक बाई असते. काही जणी दाराला टेकून उभ्या असतात तर काही जणी आळसावल्यासारख्या नुसत्या बसून असतात. गाणं गुणगुणत नाहीतर येणाऱ्या जाणाऱ्याला खुणावत कर्कश आवाजात हाका मारत. फ्रेंच, इटालीयन, स्पॅनीश, जपानी आणि जगातल्या नाना वंशाच्या. काही जाड्या काही बारीक. चेहेऱ्यावर भडक मेकअपच्या दाट थराखालीही त्यांचं वय दिसायचं लपत नव्हतं. काही जणींनी काळा झगा आणि त्वचेच्या रंगाचे स्टॉकिंग्ज घातले होते. काही बायकांनी लहान मुलीसारखा मलमलचा फ्रॉक घातला होता. उघड्या दरवाजातून आतली लाल फरशी आणि लाकडी पलंग दिसत होता. रस्त्यावरून जपानी, स्वीडीश, अमेरीकन, स्पॅनीश, फ्रेंच असे वेगवेगळया देशांतील खलाशी रेंगाळत फिरत होते. दिवसा ती एक नुसती घाणेरडी गल्ली असायची. रात्री दोन्ही बाजूच्या झोपड्यातील मिणमिणते दिवे एवढाच काय तो प्रकाश असायचा. वातावरण भयंकर कुबट वासाने भरलेलं असायचं. घृणा यायची. त्याच वेळेला एक प्रकारचं गूढ आकर्षणही वाटायचं. प्रखर सत्याला सामोरं गेल्यावर सभ्यता आणि

नैतिकतेच्या कल्पना उघड्या पडतात. वातावरणात एकाच वेळी सुखांत आणि शोकांत यांचं मिश्रण असे.

ज्या बारमध्ये स्ट्रिकलँड आणि निकोल्स बसले होते तेथे एका यांत्रिक पियानोवर नृत्याची धून मोठ्याने वाजत होती. टेबलावर बसलेल्या खलाशांपैकी अर्धे अधिक पिऊन तर्र झाले होते. दुसऱ्या टेबलावर सैनिकांचा एक गट बसला होता. मधल्या भागातील गर्दीत काही जोडपी नाचत होती. दाढीदिक्षीत खलाशांनी आपल्या राकट हातांनी आपल्या साथीदार बाईला घट्ट आवळून धरलं होतं. बायकांनी फक्त झगे घातले होते. मध्येच एखाद दुसरा खलाशी उठे आणि नाचू लागे. तेथे चाललेल्या गोंगाटाने कोणाच्याही कानठळया बसल्या असत्या. लोक गात, हसत, ओरडत होते. जेव्हा एखादा खलाशी त्याच्या मांडीवर बसलेल्या बाईचं चुंबन घेई तेव्हा इंग्लीश खलाशी जोराने शिट्ट्या आणि टाळया वाजवून चालू असलेल्या गोंगाटात भर घालत. लोकांच्या बूटांनी उडालेल्या धुळीने आणि सिगारच्या धुराने वातावरण भरलं होतं. खूप उकडत होतं. बारच्या काऊंटरवर बसलेली एक बाई तिच्या मुलाला दूध पाजत होती. एक लहान चणीचा वेटर बिअरच्या ग्लासांनी भरलेला ट्रे सारखा इकडून तिकडे घेऊन जात होता.

थोड्या वेळाने टफ बिल सोबत दोन काळयाकभिन्न धिप्पाड आफ्रिकनांना घेऊन आला. त्याच्याकडे बघता क्षणी तो तीन चार पेग दारू झोकून आला असावा ते कळत होतं. काही तरी गडबड करण्याचा त्याचा इरादा स्पष्ट दिसत होता. एका टेबलावर तीन सैनिक बसले होते. त्या टेबलाला तो अडखळला आणि एक बिअरचा ग्लास सांडला. तेथे थोडी बाचाबाची झाली. बारचा मालक पुढे आला आणि त्याने टफ बिलला जायला सांगितलं. तो सुद्धा तेवढाच तगडा होता आणि त्याला त्याच्या गिऱ्हाईकांना सांभाळायचं होतं. टफ बिल थोडा मागे हटला. त्याला त्या मालकाशी भांडण उकरून काढण्यात रस नव्हता. शिवाय पोलीसांनी मालकाचीच बाजू घेतली असती. त्याने त्याला धडा शिकवण्याची शपथ घेतली आणि तो बाजूला वळला.

तेवढ्यात त्याला स्ट्रिकलँड दिसला. तो त्याच्याकडे सरसावला. त्याने तोंडातली थुंकी गोळा केली आणि सरळ स्ट्रिकलँडच्या तोंडावर थुंकला.

स्ट्रिकलँडने हातातला ग्लास त्याला फेकून मारला. नाचणारे लोक अचानक नाचायचे थांबले. सर्वत्र शांतता पसरली. पण टफ बिल स्ट्रिकलँडवर तुटून पडता क्षणी लोकांचा आरडा ओरडा चालू झाला. टेबलं उलथी पालथी झाली, ग्लास खाली पडून फुटले. एकच गोंधळ उडाला. बायका बार काऊंटर आणि दरवाजाच्या मागे लपल्या. रस्त्यावरून जाणारे काय चाललं आहे ते बघायला आत आले. जगातल्या सगळया भाषेतल्या शिव्या तेथे ऐकायला मिळाल्या असत्या. मध्यभागी दहा बारा माणसं सर्व शक्तिनीशी एकमेकांवर तुटून पडली होती. अचानक पोलीस आत आले. ज्यांना शक्य झालं ते सगळे दरवाजातून पळून गेले. जेव्हा गर्दी कमी झाली तेव्हा टफ बिल मध्य भागी पडलेला होता. त्याच्या डोक्याला मोठी खोक पडली होती. कॅप्टन निकोल्सने स्ट्रिकलँडला ओढून बाहेर काढलं. त्याच्या हाताला झालेल्या जखमेतून रक्त वाहत होतं. त्याच्या कपड्याच्या चिंध्या झाल्या होत्या. नाकावर बसलेल्या ठोशामुळे कॅप्टनचा चेहरा रक्ताने लाल झाला होता.

''टफ बिल हॉस्पिटल मधून बाहेर येण्याच्या आधी तू मास्येझच्या बाहेर गेलास तर बरं होईल.'' ते दोघं चिंक्स हेड मध्ये जाऊन हातपाय धूत असताना कॅप्टन स्ट्रिकलँडला म्हणाला.

''कोंबड्यांच्या झुंजीपेक्षा हे भयानक आहे,'' स्ट्रिकलँड म्हणाला.

असं म्हणाताना तो तिरकसपणे कसा हसला असेल ते माझ्या डोळयामसोर आलं.

कॅप्टन निकोल्स चिंतेत पडला. टफ बिल केवढा खुनशी आहे ते त्याला माहित होतं. स्ट्रिकलँडने त्या अक्करमाशा मुलॅटोला दोन वेळा खाली पाडलं होतं, एकदा

शब्दश: तर दुसऱ्या खेपेला अक्षरश: मुलॅटो शुद्धीवर असताना त्याला हलकं लेखून चालणार नव्हतं. त्याने त्याला हव्या त्या संधीची सावकाश वाट पाहिली असती. त्याला घाई नव्हती. एखाद्या रात्री स्ट्रिकलँडच्या पाठीत चाकू घुसला असता आणि दोन तीन दिवसानंतर बंदराच्या घाणेरड्या पाण्यात एका अनामिक भणंग माणसाचा सडलेला मुडदा तरंगताना सापडला असता. निकोल्सने दुसऱ्या दिवशी संध्याकाळी टफ बिलच्या घरी जाऊन चौकशी केली. तो अजूनही हॉस्पिटलमध्ये होता. बरं होऊन बाहेर आल्यावर स्ट्रिकलँडला ठार मारण्याची त्याने शपथ घेतली होती.

एक आठवडा गेला.


"मी नेहमीच सांगत असतो. जर एखाद्याला दुखापत करायची वेळ आली तर शक्यतो जेवढी जास्त करता येईल तेवढी करा. म्हणजे पुढे काय करायचं याचा विचार करायला दुखापतीच्या मानाने तेवढाच जास्त वेळ मिळतो."

स्ट्रिकलँडचं नशीब जोरदार होतं. ऑस्ट्रेलियाला जाणाऱ्या एका आगबोटीवरच्या बॉयलरवर काम करण्याऱ्या एका माणसाने त्यांची बोट जिब्राल्टरच्या जवळ असताना वेडाच्या झटक्यात समुद्रात उडी मारली होती. त्याच्या बदली त्यांना तातडीने दुसरा माणूस हवा होता.

"बाबा धावत बंदरावर जा," कॅप्टन स्ट्रिकलँडला म्हणाला. "आणि ताबडतोब सही कर. तुझ्याकडे आवश्यक ती सगळी कागदपत्रं आहेतच."

स्ट्रिकलँड तात्काळ रवाना झाला. कॅप्टन निकोल्सची आणि त्याची पुन्हा भेट झाली नाही. बोट बंदरात फक्त सहा तास होती. संध्याकाळी बोट पूर्वेकडे रवाना झाली. हिंवाळयाच्या थंड हवेत बोटीच्या धुरांड्यातून येणाऱ्या धुराच्या लोटाकडे कॅप्टन उदासवाण्या नजरेने बराच वेळ पहात होता.

स्ट्रिकलँडचं ॲशले गार्डन आणि मास्येझ मधील जीवन यात प्रचंड विरोधाभास होता. त्यामुळे मला जमेल तेवढं वर्णन करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. पण कॅप्टन एक नंबरचा थापाड्या आहे हे मला ठाऊक आहे. कदाचित स्ट्रिकलँडची आणि त्याची भेट प्रत्यक्षात झालेलीही नसली तरी मला त्याचं आश्चर्य वाटणार नाही. मास्येझची माहिती काय पुस्तकं वाचूनही मिळते.



Artist: Paul Gauguin

Title: The Athenaeum - Portrait of a Man Wearing a Lavalliere

Medium: Oil on canvas

## ४८

या ठिकाणी पुस्तकाचा शेवट करायचा माझा पहिला बेत होता. स्ट्रिकलँडचे ताहितीतील दिवस आणि त्याचा भयानक मृत्यु यापासून सुरवात करून नंतर मला ठाऊक असलेल्या त्याच्या पुर्वायुष्यातील घटना सांगायच्या होत्या. आपल्या देशापासून इतक्या दूरवर असलेल्या एका अनोळखी, लहानशा बेटावर जावं असं त्याला का वाटलं, त्या मागे कोणती प्रेरणा होती, नक्की काय करण्याचा बेत होता वगैरे प्रश्नांती उत्तरं माझ्यापाशी नव्हती. जेव्हा सर्वसाधारण माणसं आयुष्यात स्थिर होतात त्यावेळी, वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षी झोंबऱ्या वाऱ्यांना तोंड देत, खवळलेल्या समुद्रातून दूर जाणाऱ्या फ्रान्सच्या किनाऱ्याकडे, बघताना त्याच्या मनात काय विचार आले असतील. तो किनारा परत दृष्टीला पडायचं आपल्या नशीबी नाही याची कल्पना त्याला आली असेल का. तो साहसी आणि दृढनिश्चयी होता. शेवट मला आशादायक करायचा होता. दुर्दम्य इच्छाशक्तिच्या जोरावर माणूस काय करू शकतो, कुठे जाऊ शकतो ते मला दाखवायचं होतं. पण तसं लिहीणं मला जमलं नाही. म्हणून मी कालानुक्रमे लिहायला घेतलं. मला स्ट्रिकलँड विषयी जे काही माहित होतं ते मी जसं घडलं त्या क्रमाने लिहीत गेलो.

माझ्याकडे उपलब्ध असलेली माहिती तुकड्या तुकड्याने असल्यामुळे माझं लिखाणही तसंच झालं. माझी परिस्थिती नामशेष झालेल्या प्राण्याच्या एका हाडाच्या तुकड्यावरून संपूर्ण प्राण्याचं चित्र उभं करणाऱ्या जैववैज्ञानिकासारखी होती. ताहितीमध्ये स्ट्रिकलँडच्या संपर्कात आलेल्यांपैकी कोणावरही त्याचा फारसा प्रभाव पडला नव्हता. त्यांच्या दृष्टीने स्ट्रिकलँड हा सतत पैशाच्या चणचणीत असलेला एक भणंग इसम होता. तो चित्रसुद्धा काढत असे हे त्यांना माहित होतं पण त्यांना ती फारच विचित्र वाटत. त्याच्या मृत्युला काही वर्ष लोटल्यानंतर पॅरीस आणि बर्लिनवरून काही एजंट त्याने काढलेल्या चित्रांच्या शोधात ताहितीत आले,

तेव्हा त्यांना एक दखलपात्र अशी मोठी व्यक्ति ताहितीमध्ये राहून गेली हे कळलं. आता ज्या कॅनव्हासना प्रचंड किंमत येत होती ते कॅनव्हास त्यांना तेव्हा जवळपास फुकटात मिळाले असते हे ही त्यांच्या लक्षात आलं. त्यांच्या हातून जी संधी निसटली होती त्याबद्दल ते स्वत:ला कधीच माफ करू शकले नाहीत. कोहेन नावाचा एक हसतमुख आणि प्रेमळ म्हातारा फ्रेंच ज्यु व्यापारी होता. त्याच्याकडे स्ट्रिकलँडचे एक पेंटींग अगदी योगायोगाने आलं. तो अर्धा व्यापारी आणि अर्धा दर्यावर्दी होता. त्याच्याकडे एक शिडाची होडी होती. त्यातून तो पमोव्यु आणि मार्क्वेझा बेटांवर फेऱ्या मारी. जाताना जीवनोपयोगी वस्तू घेऊन जाई. येताना बदल्यात खोबरं, शिंपले आणि मोती घेऊन येई. मला कोणी तरी सांगितलं की त्याच्याकडे एक मोठा काळा मोती आहे. तो स्वस्तात मिळण्याची शक्यता होती म्हणून मी त्याच्याकडे गेलो. जेव्हा मला कळलं की कितीही घासाघीस केली तरी त्याची किंमत मला परवडण्यासारखी नाही तेव्हा मी तो नाद सोडून दिला आणि सहज म्हणून स्ट्रिकलँडचा विषय काढला. तो त्याला चांगला ओळखत होता.

“मला तो आवडायचा कारण तो एक चित्रकार होता,” तो मला म्हणाला. “चित्रकार या बेटांवर फारसे फिरकत नाहीत. चित्रकार म्हणून तो फारसा चांगला नव्हता याचं मला वाईट वाटायचं. मी त्याला पहिलं काम दिलं. माझ्या मालकीची काही बागाईत जमीन आहे. मला तेथे एक ओव्हरसियर पाहिजे होता. एका गोऱ्या माणसाला डोक्यावर बसवल्याशिवाय स्थानिक लोकांकडून काही काम करून घेणं अशक्य असतं. मी त्याला म्हणालो: ‘चित्र काढायला तुला वेळही भरपूर मिळेल आणि थोडे पैसेही कमावता येतील.’ मला ठाऊक होतं की त्याची उपासमार होत आहे. मी त्याला पगारसुद्धा चांगला देऊ केला होता.”

“ओव्हरसियर म्हणून त्याने फार चांगलं काम केलं असेल असं मला वाटत नाही.”

“मला चित्रकारांबद्दल सहानुभूती आहे. ते आमच्या रक्तातच असतं, तुम्हाला माहित आहेच. कामात मी त्याला भरपूर सूट दिली. पण कॅनव्हास आणि रंग घ्यायला पुरेसे पैसे साठल्यावर तो माझी नोकरी सोडून गेला. त्या गावातले सर्व लोक त्याला ओळखायला लागले होते म्हणून त्याला अंतर्भागात जायचं होतं. मी त्याला अधूनमधून भेटायचो. तो दोन तीन महिन्यांतून एकदा पपीएतला येई आणि थोडे दिवस राही. तो कोणाकडून तरी पैसे घेई आणि नंतर अदृश्य होई. एका खेपेला त्याने माझ्याकडे दोनशे फ्रँक कर्ज म्हणून मागितले. त्याच्याकडे पाहिल्यावर तो आठवडाभर जेवला नसावा असं वाटत होतं. मी त्याला नाही म्हणू शकलो नाही. ते पैसे परत येतील याची मला अपेक्षा नव्हतीच. एका वर्षाने तो एक पेंटींग घेऊन माझ्याकडे परत आला. माझ्याकडून घेतलेल्या पैशांविषयी तो काहीच बोलला नाही. पण तो म्हणाला: ‘हे तुमच्या मळ्याचं चित्र आहे. मी खास तुमच्यासाठी रंगवलंय.’ मी त्या चित्राकडे बघितलं. काय म्हणावं ते मला कळेना. मी आभार मानले. तो निघून गेल्यावर मी ते माझ्या बायकोला दाखवलं.”


“कसं होतं ते चित्र?”

“मला विचारू नका. मला चित्रातलं ओ का ठो कळत नाही. मी असलं चित्र आयुष्यात कधी पाहिलंच नव्हतं. ‘आपण याचं काय करू या? भिंतीवर काही आपण लावणार नाही आहोत.’ मी माझ्या बायकोला म्हणालो. ती म्हणाली की, ‘लोक आपल्याला हसतील,’ तिनं ते उचललं आणि माळ्यावर इतर फालतू वस्तूंच्या ढीगात ठेऊन दिलं. माझ्या बायकोला काही फेकून देणं जमतच नाही. ती तिची एक खोडच आहे. आता एक गंमत बघा. लढाईला तोंड फुटायच्या थोडं अगोदर पॅरीस वरून माझ्या भावाने पत्र लिहून मला ताहितीत राहणाऱ्या एका इंग्लीश चित्रकाराची तुला माहिती आहे का असं विचारलं. तो एक मोठा प्रतिभावान

चित्रकार असावा. त्याच्या चित्रांना हल्ली प्रचंड किंमत यायला लागली आहे. तुला त्याची काही चित्र सापडली तर बघ. ती विकत घे आणि माझ्याकडे पाठवून दे. भरपूर फायदा होईल. म्हणून मग मी माझ्या बायकोला विचारलं. 'स्ट्रिकलँडनं दिलेल्या त्या चित्राचं काय झालं? अजूनही ते माळयावर असण्याची शक्यता आहे का?' 'प्रश्नच नाही. तुम्हाला माहित आहे, मी काहीच फेकून देत नाही. ती माझी खोड आहे.' आम्ही माळयावर गेलो. गेल्या तीस वर्षांच्या संसारात तिथे काय काय साठलं होतं कोण जाणे. पण त्या ढीगात ते चित्र होतं. मी त्या चित्राकडे एकदा पाहिलं आणि म्हणालो, 'माझ्या शेतमळयावर काम करणारा एक अगदी भणंग इंग्लीशमन होता. त्याला मी एकदा दोनशे फ्रँक उसने दिले होते. तोच हा माझा भाऊ म्हणतोय तो प्रतिभावान चित्रकार असेल काय? तुला या चित्रात काय खास आढळलं कां?' 'काही नाही,' ती म्हणाली. 'ते आपल्या बागेसारखं तर मुळीच दिसत नाही. मी तरी कधी निळया रंगाची नारळाची झाडं पाहिली नाहीत. पण तेथे पॅरीसमधले लोक वेडे झाले आहेत. तुमचा भाऊ हे चित्र दोनशें फ्रँकला विकू शकेल का? तुम्ही दिलेले पैसे तरी परत येतील.' आम्ही ते चित्र बांधलं आणि माझ्या भावाकडे पाठवून दिलं. शेवटी मला त्याचं एक पत्र आलं. 'त्याने मला काय लिहीलं असेल असं तुम्हाला वाटतं?' 'त्याने लिहीलं होतं, मला चित्र मिळालं. मला वाटलं तू माझी मस्करी करत आहेस. मी तुला पोस्टाचा खर्च दिला नसता तर बरं झालं असतं. ज्याने मला सांगितलं होतं त्याला ते चित्र दाखवायला मी घाबरत होतो. ती जेव्हा एक उत्कृष्ट कलाकृती आहे असं समजलं तेव्हा मला आश्चर्याचा केवढा धक्का बसला असेल कल्पना कर. त्याने मला तीस हजार फ्रँक देऊ केले. थोडं ताणून धरलं असतं तर जास्त सुद्धा मिळाले असते. पण मला एवढा धक्का बसला होता की माझं डोकंच चाललं नाही. डोकं ताळयावर यायच्या आत मी पैसे स्वीकारून बसलो होतो'."

त्यानंतर मस्य कोहेनने मला जे सांगितलं त्यात त्याच्या दिसून आलेल्या प्रामाणिकपणाचं कौतुक करावं तेवढं थोडंच होतं.

“तो बिचारा स्ट्रिकलँड तेव्हा जिवंत असायला हवा होता. मी एकोणतीस हजार आठशे फ्रँक त्याच्या हातात ठेवल्यावर तो काय म्हणाला असता कोण जाणे?”



Artist: Paul Gauguin

Title French: Rue de Tahiti, Street in Tahiti, Date: 1891

Medium: oil on canvas, Dimensions 115.5 × 88.5 cm (45.5 × 34.8 in)

Current location: Toledo Museum of Art, Source: Wikidata

## ४९

मी हॉटेल डी ला फ्लाऊ येथे राहत होतो. हॉटेलची मालकिण मिसेस जॉन्सन हातातून गेलेल्या संधी विषयी अजूनही हळहळत होती. स्ट्रिकलँडच्या मृत्युनंतर त्याच्या मालकीच्या काही सामानाचा पपीएतच्या बाजारात लिलाव झाला होता. त्या चीजवस्तूंतील एक अमेरीकन स्टोव्ह तिला हवा होता. तिने त्यासाठी सत्तावीस फ्रँक मोजले होते.

"तिथे दहा बारा चित्रं होती," ती मला म्हणाली. "त्यांना फ्रेम केलेली नव्हती त्यामुळे ती कोणालाच नको होती. त्यातली काही बरी होती ती दहा फ्रँकला गेली, पण बहुतेकांना पाच सहा फ्रँकपेक्षा जास्त आले नाहीत. विचार करा त्यातलं एक जरी चित्र घ्यायची मला त्यावेळी बुद्धी झाली असती तर आज मी किती श्रीमंत झाले असते."

पण श्रीमंती तिअर जॉन्सनच्या नशीबात नव्हती. ती फाटक्या हाताची होती. स्थानिक आदिवासी स्त्री आणि ताहितीत स्थाईक झालेल्या इंग्लीश दर्यावर्दी कॅप्टनची ती मुलगी. माझी आणि तिची ओळख झाली तेव्हा ती पन्नाशीची होती. ताडमाड उंच आणि तशीच जाडजूड. तिचा चेहेरा प्रेमळ नसता तर तिला पाहून भितीच वाटली असती. मांसाच्या लगद्यासारखे हातपाय, कोबीच्या मोठ्या गड्ड्यासारखे स्तन, रूंद मांसल चेहेरा, लोंबणाऱ्या एका हनुवटीला चिकटलेली दुसरी हनुवटी. तिच्या या अगडबंब देहाचा बोज सांभाळणारा थुलथुलीत पार्श्वभाग. ती नेहमी गुलाबी रंगाचा पायघोळ झगा घालायची. तिच्या डोक्यावर दिवसभर गवती हॅट असायची. तिने केस मोकळे सोडले की ते काळेभोर आणि कुरळे आहेत ते कळायचं. तिच्या डोळ्यातून आपुलकी आणि उत्साह उतू जायचा. तिचं हसणं लक्षात राहण्यासारखं होतं. अगदी हळूवारपणे आतून सुरू झालेलं हसू बाहेर पडताना स्फोट होऊन तिचं प्रचंड शरीर गदागदा हलायला लागायचं. तिला तीन

गोष्टी आवडायच्या, विनोदी चुटका, वाईन आणि देखणे पुरुष. तिच्याशी ओळख असणं हा ताहितीच्या रहिवाशांना एक बहुमान वाटायचा. तिच्या हातचा स्वैंपाक ताहितीत सर्वोत्कृष्ट समजला जात असे. सकाळ पासून रात्रीपर्यंत ती स्वैयंपाकघरात छोट्या स्टूलावर बसून असायची. तिच्या भोवती एक चिनी मुलगा आणि तीन स्थानिक मुली मदतीला असत. त्यांना सूचना देत, गप्पागोष्टी करत, हसत, गाणं गुणगुणत, मध्येच एखादा पदार्थ चाखून बघ असं करत दिवस निघून जाई. जेव्हा एकादा खास पाहुणा असे तेव्हा ती स्वत:च्या हाताने जेवण बनवी. आदरातिथ्य करणं हे तिच्या स्वभावातच होतं आणि ते ती अगदी मनापासून करी. जेव्हा हॉटेल डी ला फ्लाऊमध्ये खास मेजवानीचा बेत असे तेव्हा बेटीवरील कोणालाही तेथे जेवल्याशिवाय जाण्याची वेळ येत नसे. पैसे दिले नाहीत म्हणून ती कोणाही गिऱ्हाईकाला उपाशी पाठवत नसे. त्यांना जेव्हा जमेल तेव्हा ते पैसे देतील यावर तिचा विश्वास असे. एका माणसावर अगदी वाईट परिस्थिती ओढवली होती. त्याला तिने कित्येक महिने आसरा दिला. जेव्हा लाँड्रीवाल्या चिनी माणसाने त्याचे कपडे पैसे दिल्याशिवाय धुवायला नकार दिला तेव्हा तिने त्याचे कपडे स्वत:च्या कपड्यांबरोबर धुवायला दिले. त्या गरीब बिचाऱ्या गिऱ्हाईकाने मळके कपडे घालावेत हे तिला पसंत पडलं नव्हतं. ती त्याला तंबाखू घेण्यासाठी दिवसाचा एक फ्रँक द्यायची. जी गिऱ्हाईकं तिचं बिल दर आठवड्याला चुकतं करीत त्यांच्या सारखीच वागणूक तिने त्यालाही दिली. वय आणि अतिस्थूलपणामुळे तिला स्वत:ला प्रेमात पडणं शक्य नव्हतं. पण इतर तरूण तरूणींच्या प्रेमप्रकरणात ती रस घेई. स्त्री-पुरूषांचा संभोग ही एक नैसर्गिक गोष्ट आहे असं ती मानत असे. प्रत्येक वेळी ती स्वत:च्या अनुभवावरून काहीतरी उदाहरण देत असे.

“माझे कोणाशी तरी संबंध आहेत याचा माझ्या वडिलांना पत्ता लागला तेव्हा मी पंधरा वर्षांची होते,” ती सांगत होती. “तो ट्रॉपिक बर्डवर थर्ड मेट होता. कसला चिकना होता तो.”

तिने एक निश्वास सोडला. असं म्हणतात की स्त्रिया त्यांचं पहिलं प्रेम कधीच विसरत नाहीत.

“माझे वडिल एक विचारी गृहस्थ होते.”

“त्यांनी काय केलं?”

“त्यांनी मला नखशिखांत फोडून काढलं आणि नंतर माझं कॅप्टन जॉन्सनशी लग्न लावून दिलं. ते वयाने थोडे मोठे होते पण दिसायला चांगले होते. मी विरोध केला नाही.”

तिच्या वडिलांनी तिचं तिअर हे नाव एका पांढऱ्या फुलावरून ठेवलं होतं. असं म्हणतात की त्या फुलाचा एकदा वास घेतलेला माणूस आयुष्यभर कुठेही भटकला तरी पुन्हा ताहितीवर आल्याशिवाय राहत नसे. तिला स्ट्रिकलँड व्यवस्थित आठवत होता.

“तो कधी कधी इकडे यायचा. तो मला पपीएतमध्ये फिरताना दिसायचा. मला त्याचं नेहमी वाईट वाटायचं. तो इतका बारीक झाला होता की विचारू नका. त्याच्या खिशात कधीही पैसे नसायचे. जेव्हा मला कळायचं की तो गावात आला आहे तेव्हा मी मुला बरोबर निरोप पाठवून त्याला जेवायला बोलवून घ्यायची. एक दोन वेळा मी त्याला कामही मिळवून दिलं होतं. पण तो कुठेही फार दिवस टिकून राहत नसे. थोडे दिवस गेले की त्याला जंगलाची ओढ लागायची. सकाळी उठून बघावं तर तो गायब झालेला असे.”

मास्येझ सोडल्यानंतर सहा महिन्यांनी स्ट्रिकलँड ताहितीला जाऊन पोचला होता. ऑकलंडवरून सॅन फ्रान्सस्किोला जाणाऱ्या बोटीवर त्याने जागा मिळवली. बरोबर त्याने एक रंगांचा खोका, ब्रश, इझल आणि एक डझनभर कॅनव्हास घेतले

होते. सिडनीमध्ये त्याला जे काम मिळालं होतं त्याचे काही पौंड त्याच्या खिशात होते. त्याने शहराबाहेरील एका स्थानिक रहिवाश्याच्या घरातील एक खोली भाड्याने घेतली. मला वाटतं ताहितीत आल्याबरोबर त्याला घरी आल्यासारखं वाटलं असेल. तो तिअरला काय म्हणाला होता ते तिने मला सांगितलं:

“मी बोटीवर डेक ब्रशने घासत असताना एक जण मला म्हणाला: ‘तिकडे बघ काय दिसतंय ते.’ मी वर पाहिलं. मला क्षितीजावर बेटाचा किनारा दिसला. दिसताक्षणी मला जाणवलं की आयुष्यभर आपण ज्याचा शोध घेत होतो ते हेच आहे. आम्ही आणखी जवळ आलो. मग मला ओळखता आलं. कधी कधी फिरताना सगळं ओळखीचं वाटू लागतं. जणू काही मी पूर्वी येथे येऊन गेलो असलो पाहिजे.”

“कधी कधी असं होतं,” तिअर म्हणाली. “मला काही पुरूष माहित आहेत. जहाज माल भरायला तास दोन तास बंदरात आलं असताना जे किनाऱ्यावर उतरले, ते जहाजावर कधीच परत गेले नाहीत. काही जण इथे एका वर्षापुरते बदली म्हणून आले होते. त्यांनी एक वर्ष इथल्या जागेला फक्त नावं ठेवण्यात घालवलं. जीव गेला तरी बेहत्तर पण पुन्हा या बेटावर पाऊल टाकायचं नाही अशी शपथ घेऊन ते परत गेले. पण अवघ्या सहा महिन्यातच ते परत आले. ते म्हणत दुसरीकडे कुठेही त्यांचा जीव रमणं शक्य नाही. असेही लोक मला माहित आहेत.”



Artist: Paul Gauguin

Title: When Will You Marry? Date: 1892,

Medium: oil on canvas, Dimensions: 101 × 77 cm (39.8 × 30.3 in)

Current Loaction: Private collection, *Source:* wikidata: Q7993068

## ५०

काही व्यक्ती चुकीच्या जागी जन्म घेतात असं मला सारखं वाटत असतं. जन्माने त्यांना विशिष्ट परिस्थिती अपघाताने मिळालेली असते. पण त्यांना ओढ लागते दुसऱ्याच अनोळखी प्रदेशाची. त्यांच्या जन्मगावी ते परकेच असतात. ज्या प्रदेशात त्यांचं बालपण गेलेलं असतं तो प्रदेश त्यांच्या जीवनप्रवासातील एक तात्पुरता मुक्काम असतो. ते ज्या माणसांत आपलं सर्व आयुष्य घालवतात ते स्वकीय त्यांना परके वाटतात. त्यांच्या अवताभोवती घडणाऱ्या घटनांत ते अलिप्त असतात. कदाचित ही अलिप्तपणाची भावनाच त्यांना जेथे आपलेपणा वाटेल अशा दूरच्या प्रदेशांचा शोध घेण्यास भाग पाडत असावी. मानवाच्या प्रागऐतिहासिक काळातील पूर्वज ज्या प्रदेशातून आले असतील त्या अज्ञात प्रदेशाच्या स्मृती त्यांच्या मनात आदिम जाणीवांच्या रूपात खोलवर दडलेल्या असतील. कधी कधी माणूस एखाद्या जागी योगायोगाने जातो आणि नंतर त्याला ती जागा आपलीच आहे असं अचानक वाटू लागतं. जो प्रदेश, जी माणसं त्याला आजपर्यंत अज्ञात होती त्या प्रदेशात तो आपलं घर वसवणार असतो, त्या त्या माणसांना तो आपलं म्हणाणार असतो. आणि तिथेच तो आपला शेवटचा श्वास घेणार असतो.

तिअरला मी सेंट थॉमस हॉस्पिटलमध्ये मला भेटलेल्या माणसाची गोष्ट सांगितली. तो अब्राहम नावाचा एक ज्यू तरूण होता. सोनेरी केसांचा, किंचीत स्थूल, लाजाळू आणि कमालीचा नम्र. कुशाग्र बुद्धीची त्याला दैवी देणगी होती. तो हॉस्पिटलमध्ये शिष्यवृत्तीवर शिकायला आला होता. शिक्षणाच्या पाच वर्षांच्या काळात त्याला होती नव्हती तेवढी सगळी पारितोषिकं मिळाली होती. तो हाऊस फिजीशिअन आणि सर्जन झाला. त्याच्या हुशारीमुळे सर्वजण त्याला मान देत. शेवटी त्याची हॉस्पिटलचा वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली. त्याचं भवितव्य उज्वल होतं. तो त्याच्या पेशाच्या सर्वोच पदी जाऊन पोचेल याची सर्वांना खात्री होती. मानसन्मान आणि संपत्ती त्याच्या पुढे हात जोडून उभे होते.

पदावर रूजू होण्यापूर्वी त्याने सुटी घेतली. त्यावेळी त्याच्या गाठीला फारसे पैसे नसल्यामुळे तो लेव्हँटला जाणाऱ्या एका बोटीवर डॉक्टर म्हणून गेला. त्या बोटीवर सहसा डॉक्टर म्हणून कोणाला घेत नसत. पण त्या हॉस्पिटलचा एक वरिष्ठ डॉक्टर बोट कंपनीच्या डायरेक्टरला ओळखत होता, म्हणून अब्राहमला बोटीवर घेतलं गेलं.

थोड्या आठवड्यांनी हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांना त्याच्या राजीनाम्याचं पत्र मिळालं. जे पद मिळण्यासाठी लोक जीव टाकतात, ते पद ज्याला पदार्पणातच मिळालं होतं. त्याचा राजीनामा बघून सर्वांना अतिशय आश्चर्य वाटलं. जेव्हा कोणी एखादी अनपेक्षीत गोष्ट करतं तेव्हा त्याच्या मागे काही काळंबेरं असावं अशी अफवा संबंधीत लोक पसरवतात. अब्राहमच्या जागी यायला दुसरा माणूस तयार होता. लवकरच अब्राहमला सगळे विसरले. पुढे त्याच्या संबंधी काहीही कळलं नाही. तो विस्मृतीच्या उदरात गडप झाला.

त्यानंतर जवळपास दहा वर्षांनी मी एका बोटीतून प्रवास करत होतो. बोट अलेक्झांड्रिया बंदरात लागत होती. वैद्यकीय तपासणीसाठी सगळया उतारू बरोबर मी रांगेत उभा होतो. एक गबाळे कपडे केलेला जाडा माणूस डॉक्टर होता. त्याने डोक्यावरची हॅट काढल्यानंतर त्याचं टक्कल दिसलं. त्याला मी कुठेतरी पाहिलं आहे असं मला वाटायला लागलं. आणि अचानक मला आठवलं.

"अब्राहम," मी हाक मारली.

त्याने माझ्याकडे गोंधळून पाहिलं. आम्ही दोघंही चकित झालो. ती रात्र मी अलेक्झांड्रियात काढणार आहे हे कळल्यावर त्याने मला इंग्लीश क्लबवर जेवायचं आमंत्रण दिलं. आम्ही भेटलो तेव्हा त्याला तिथे पाहून मला किती आश्चर्य वाटलं ते सांगितलं. तो ज्या पदावर काम करत होता ते सामान्य होतं. त्याची आर्थिक परिस्थिती चांगली नसावी. त्याने त्याची कहाणी सांगितली. तो जेव्हा भूमध्यसागरावरच्या सफरीवर निघाला तेव्हा लंडनलाच परत येऊन सेंट

थॉमसमधील नोकरीवर रूजू व्हायचा त्याचा बेत होता. एके दिवशी सकाळी बोट अलेक्झांड्रियाला लागली. त्याने डेकवरून पांडऱ्या शुभ्र सूर्यप्रकाशात न्हाऊन गेलेल्या शहराकडे पाहिलं. धक्क्यावरच्या गर्दीत फाटक्या कपड्यातले स्थानिक लोक, काळे सुदानीज, गोंगाट करणारे ग्रीक आणि इटालियन, डोक्यावर गोंडेवाली उंच टोपी घातलेले धिप्पाड तुर्क, सूर्यप्रकाश आणि वर निळे आकाश, त्याला काही तरी झालं. तो म्हणाला डोक्यात वीज चमकली, तसं नाही, मला साक्षात्कार म्हणतात तो झाला. त्याच्या उरात कळ आली आणि अत्यानंदाने त्याचं भान हरपलं. त्याला आपल्या घरी आल्यासारखं वाटलं. त्याने तिथल्या तिथे निर्णय घेतला, फक्त तीन मिनीटांत. आता उरलेलं आयुष्य इथेच काढायचं, अलेक्झांड्रियात. त्याला बोटीवरून सामान उतरवून घ्यायला फार वेळ लागला नाही. पुढच्या चोवीस तासात आपल्या सगळया सामानानिशी तो किनाऱ्यावर होता.

“कॅप्टनला तू ठार वेडा झालास असं वाटल असेल,” मी हसत म्हणालो.

“कोणाला काय वाटेल याची मी पर्वा केली नाही. एखाद्या छोट्या ग्रीक हॉटेलात जावंसं मला वाटलं. मी इकडे तिकडे पाहिलं आणि मला कुठे जायचं ते आपोआप कळलं. तुला सांगून खरं वाटणार नाही, मी सरळ चालत गेलो, एक हॉटेल दिसताच मी ओळखलं की आपल्याला हवं आहे ते ग्रीक हॉटेल हेच.”

“तू अलेक्झांड्रियाला पहिल्यांदा कधी आला होतास?”

“कधीही नाही. इंग्लंडच्या बाहेर मी प्रथमच पाऊल टाकत होतो.”

तेथे तो सरकारी नोकरीत शिरला. अजूनही तो तेथेच आहे.

“तुला कधी पश्चाताप झाला का?”

“कधीही नाही. एक मिनीटसुद्धा नाही. मला माझ्या पोटापुरते पैसे मिळतात. त्यात मी समाधानी आहे. मरेपर्यंत मला याहून जास्त काही नको. फार सुंदर जीवन आहे हे.”

मी दुसऱ्या दिवशी अलेक्झांड्रिया सोडलं. त्यानंतर कित्येक महिन्यांनी मी अलेक कारमायकेल या माझ्या समवयस्क मित्राबरोबर जेवण घेत होतो. तोपर्यंत मी अब्राहमला विसरून गेलो होतो. कारमायकेल थोड्या दिवसांच्या सुटीमध्ये इंग्लंडमध्ये आला होता, मला तो रस्त्यात भेटला. त्याने युद्धकाळात जी बहुमेल सेवा केली होती त्याबद्दल त्याला नाईटहुडचा किताब जाहिर झाला होता. त्याचे मी अभिनंदन केलं. आम्ही जुन्या काळच्या आठवणींवर गप्पा मारण्यासाठी म्हणून एकत्र जेवण घ्यायचं ठरवलं. आम्हाला मनसोक्त गप्पा मारता याव्यात म्हणून त्याने दुसऱ्या कोणालाही बरोबर घ्यायचं नाही असं ठरवलं. क्वीन ॲन स्ट्रीटवरील एका जुन्या सुंदर घरात तो राहत होता. त्याने ते मोठ्या रसिकतेने सजवलं होतं. डायनींग रूमच्या भिंतीवर बेलेटो आणि झोफॅनीची हेवा वाटावा अशी दोन सुरेख पेंटींग लावलेली होती. त्याच्या उंच व सुंदर पत्नीने शुद्ध जरीचं काम केलेला गाऊन घातला होता. ती गेल्यावर आम्ही एकत्र शिकत होतो त्यावेळची परिस्थिती आता किती बदलली आहे असं मी त्याला हसत हसत बोललो. त्याकाळी आमच्या दृष्टीनं वेस्टमिन्स्टर ब्रिज रस्त्यावरच्या एखाद्या घाणेरड्या इटालियन रेस्टॉरंटमध्ये जेवण घेणं ही सुद्धा एक न परवडणारी चैन होती. आता अलेक कारमायकेल अर्धा डझन हॉस्पिटलशी निगडीत होता. मला वाटतं त्याला सालीना दहा एक हजार तरी मिळत असावेत. त्याला मिळालेला नाईटहूडचा सन्मान म्हणजे पुढे मिळणाऱ्या अनेक बहुमानांची सुरूवात होती.

“माझं अगदी उत्तम चाललं आहे,” तो म्हणाला. “पण त्याचं श्रेय मला माझ्या नशीबाला द्यावं लागेल.”

“नशीबाला म्हणजे?”

“तुला अब्राहम आठवतो. भवितव्य त्याला होतं. आम्ही जेव्हा शिकत होतो तेव्हा तो प्रत्येक बाबतीत माझ्या पुढे होता. ज्या ज्या शिष्यवृत्या आणि पारितोषकांसाठी मी प्रयत्न करायचो त्या सगळया त्याला मिळायच्या. त्याच्या तुलनेत मी नेहमीच दुसरा होतो. त्याचा पहिला क्रमांक ठरलेलाच असायचा. स्पर्धा असायची ती फक्त दुसऱ्या क्रमांकासाठी. जर तो येथे राहिला असता तर आज मी जेथे आहे तेथे तो असता. शस्त्रक्रियेत तर तो असामान्यच होता. जेव्हा त्याची रजिस्ट्रार म्हणून नेमणूक झाली तेव्हा मला मुळीच संधी नव्हती. मी फार तर साधा जनरल प्रॅक्टीशनर झालो असतो. आता जी.पी. ला वर यायची संधी किती कमी असते ते तुला सांगायला नको. पण अब्राहमने ती जागा स्विकारली नाही आणि मला संधी मिळाली.”

“तू म्हणतोस ते खरं आहे.”

“फक्त नशीब. अब्राहम थोडा सटक होता. बिचारा, त्याच्या कारकीर्दीची माती झाली. अलेक्झांड्रामध्ये तो सॅनीटरी इन्स्पेक्टर का अशीच कोणती तर दीडदमडीची फालतू नोकरी करतोय. मला कळलं की तो एका म्हाताऱ्या, करूप ग्रीक बयेबरोबर राहतो, अर्धा डझन पोरांच्या लेंढारात. मला सांगायचं काय आहे, यश मिळवण्यासाठी फक्त डोकं असून चालत नाही, यश पचवायची ताकद सुद्धा लागते. अब्राहमकडे ती ताकद नव्हती.”

ताकद? मला वाटतं मानसन्मान आणि पैशांपेक्षा दुसरं काही जास्त महत्वाचं वाटलं म्हणून हाताशी असलेली संधी पाच मिनीटांत ठोकरून द्यायला त्यापेक्षा

जास्त ताकद लागते. पण मी काहीच बोललो नाही. अलेक कारमायकेल पुढे म्हणाला:

“अब्राहमने जे केलं त्याबद्दल मला वाईट वाटतंय असं म्हणणं म्हणजे ढोंगीपणा होईल. शेवटी मी ही ते माझ्या गुणवत्तेच्या जोरावरच मिळवलं आहे.” त्याने त्याच्या करोना सिगारचा एक दीर्घ झुरका घेतला. “याच्यामुळे माझा वैयक्तिक फायदा नसता तर गुणवत्तेच्या ह्या अपव्ययाबद्दल मला वाईट वाटलं असतं. आपल्या हाताने आयुष्याची अशी वाट लावणं हे किती अक्षम्य आहे.”

अब्राहमने खरंच आपल्या आयुष्याचा सत्यनाश करून घेतला होता का. सत्यनाश कशाला म्हणायचं. आपलं जीवन आपल्या स्वत:च्या अटींवर, स्वत:च्या मर्जीने जगणं की लोकार्थाने यशस्वी, प्रसिद्ध होऊन, वर्षाला दहा हजार कमवून, सुंदर बायको मिळवणं. हे ज्याचं त्यानं ठरवायचं आहे. मला वाटतं तुमच्या मते आयुष्याचा अर्थ काय आहे त्यावर हे अवलंबून असतं. समाजाच्या तुमच्या कडून असलेल्या अपेक्षा की तुमच्या स्वत:च्या. पण मी माझी जीभ चावली. नाईटसाहेबांशी वाद घालणारा मी कोण?



Artist: Bernardo Bellotto

Title:  Dresden from the Right Bank of the Elbe, above the Augustusbrücke

Date: 1747, Medium: oil on canvas, Dimensions:  H 132 cm (52 in). W 236 cm (92.9 in).

Current location: Gemäldegalerie Alte Meister, Source: wikidata:Q19681565



Artist: Johann Zoffany

Title: Queen Charlotte with her Two Eldest Sons, Date: 1765

Medium: oil on canvas, Dimensions: 112.2 × 128.3 cm (44.2 × 50.5 in)

Current location: Royal Collection

# ५१

माझी कथा तिअरला सांगून झाल्यावर तिने माझ्या शहाणपणाला दाद दिली. मी तिच्याबरोबर वाटाणे सोलण्यात गुंतल्यामुळे थोडा वेळ आम्ही गप्प होतो. तिचे कान नेहमी स्वयंपाकघराकडे असल्यामुळे तिला तिच्या चिनी स्वयंपाक्याने केलेली काहीतरी चूक केवळ आवाजावरून कळली. तिने बसल्या जागेवरून त्याला शिव्यांची लाखोली वाहिली. स्वत:चा बचाव करण्यात तो चिंक मागे नव्हता. त्यामुळे दोन्ही बाजूंकडून सरबत्ती सुरू झाली. त्यांनी फ्रेंच सोडून स्थानिक भाषेत बोलायला सुरवात केली. त्या भाषेचे मला फार तर अर्धा एक डझन शब्द येत असतील. त्यांचं भांडण ऐकून मला आता जगबुडी होईल की काय असं वाटायला लागलं. पण भांडण संपल्यावर तिअरने त्याला एक सिगारेट दिली. ती दोघं शांतपणे धुम्रपान करू लागले आणि तात्पुरती का होईना शांतता प्रस्थापित झाली.

"त्याला बायको मी बघून दिली हे तुम्हाला माहित आहे का?" तिअर अचानक हसत हसत म्हणाली.

"कोणाला, या स्वयंपाक्याला?"

"स्ट्रिकलँडला."

"त्याला अगोदरच एक बायको होती."

"तो सुद्धा असंच म्हणाला. पण मी त्याला सांगितलं की ती तर इंग्लंडमध्ये आहे. आणि इंग्लंड इथून केवढं लांब आहे, जगाच्या दुसऱ्या टोकालाच म्हणाना."

"खरं आहे तुम्ही म्हणता ते."

तो पपीएतला दर दोन-तीन महिन्यांनी येत असे. पैसे, रंग किंवा तंबाखू वगैरे कशाची गरज पडली की. मग तो एखाद्या कुत्र्यासारखा इकडे तिकडे भटकायचा. मला त्याचं फार वाईट वाटायचं. माझ्याकडे त्यावेळी आटा नावाची मुलगी कामाला होती. माझी लांबची नातेवाईकच म्हणा ना. तिला आई वडिल कोणी नव्हतं. ती माझ्याकडेच राहायची. स्ट्रिकलँड जेवायला अधूनमधून माझ्याकडे यायचा. कधी तरी इथल्या मुलांबरोबर बुद्धीबळाचा डाव मांडून बसायचा. मी तिला विचारलं की तुला तो आवडला का? तर ती हो म्हणाली. तुम्हाला माहित आहे. या मुली गोऱ्या माणसाबरोबर राहायला एका पायावर तयार असतात.

“ती कोण स्थानिक मुलगी होती का?”

“होय. शुद्ध स्थानिक होती. तिच्यात थेंबभर सुद्धा गोरं रक्त नव्हतं. तिच्याशी बोलल्यानंतर मी तिला स्ट्रिकलँडकडे पाठवली. मी त्याला म्हणाले: आता तुमची एका जागी स्थिर होण्याची वेळ आली आहे. तुमच्या वयाच्या माणसानं त्या गल्लीतल्या मुलींकडे जाणं बरोबर नाही. त्या चांगल्या मुली नाहीत. त्यांच्याकडे जाऊन तुमचं भलं होणार नाही. तुमच्या खिशात पैसेही नसतात. कोणत्याच नोकरीवर तुम्ही दोन तीन महिन्यांपेक्षा जास्त टिकत नाही. असं असताना तुम्हाला कोण नोकरी देणार. तुम्हाला जंगलात जाऊन स्थानिक लोकांबरोबर राहयला आवडतं आणि तुम्ही गोरे आहात म्हणून तेसुद्धा तुम्हाला सांभाळून घेतात. पण गोऱ्या माणसांना हे शोभत नाही. आता माझं ऐका.”

तिअर बोलताना इंग्लीश मध्ये फ्रेंचचं मिश्रण करत होती कारण तिला दोन्ही भाषा चांगल्या येत होत्या. ती बोलताना गाणं गुणगुणल्या सारखी बोलायची. ते ऐकायला एवढं काही वाईट लागत नव्हतं. जर पक्ष्याला इंग्लीश बोलता आलं असतं तर ते कानाला असंच वाटलं असतं.

“आटाशी लग्न करण्याविषयी तुमचं काय मत आहे? ती चांगली मुलगी आहे. फक्त सतरा वर्षांची. ती या इतर मुलींसारखी चालू नाही. फक्त कॅप्टन किंवा फार तर फर्स्ट मेट. स्थानिक लोकांबरोबर तर कधीच नाही. *एल से रीस्पेक्त वोई*, तू हे बघ, तीही स्वत:चा आब राखून असते. ओआहु वरचा पर्सर मला गेल्या आठवड्यात भेटला होता. तो म्हणत होता की आटापेक्षा चांगली मुलगी अख्या बेटावर शोधून मिळणार नाही. तिलासुद्धा आता घर संसार बघायला हवा. कॅप्टन आणि फर्स्ट मेटसुद्धा नेहमी मिळत नाहीत. थोड्या दिवसांनी ते कंटाळतात. मी माझ्या मुलींना कायमची ठेऊन घेत नाही. तिच्या मालकीची तारावोमध्ये जमिन आहे. खोबऱ्याच्या उत्पन्नावर तुमच्या दोघांचं चांगलं चालेल. तिचं घर आहे. तिथे तुम्हाला चित्र काढायला भरपूर वेळ मिळेल. तुमचं काय म्हणणं आहे.”

तिअर श्वास घ्यायला थांबली.

“मी असं म्हणाले तेव्हा त्याने मला त्याच्या इंग्लंडमधील बायकोविषयी सांगितलं. मी त्याला म्हणाले, ‘अरे बाबा, सगळयांच्या बायका जगाच्या पाठीवर कुठे नी कुठे असतात. म्हणूनच ते ताहितीला येतात. आटा समजदार मुलगी आहे. तिला कुठे मेयरला बोलवून चर्चमध्ये समारंभ करायचा आहे. ती प्रोटेस्टंट आहे आणि तुम्हाला माहित आहे की ते या गोष्टींकडे कॅथॉलिकांएवढ्या सोवळेपणाने बघत नाहीत.”

“नंतर तो म्हणाला: आटाचं काय म्हणणं आहे. मला वाटतं ती तुमच्यावर *बीग्वाँ* फिदा आहे. तुमचा होकार असेल तर तीही तयार होईल. मी तिला बोलावू का?’ तो त्याच्या स्वभावाप्रमाणे गालातल्या गालात हसला. मी तिला बोलावून घेतलं. मी काय बोलत आहे हे तिला चांगलं माहित होतं, पण ती माझ्या ब्लाऊजला इस्त्री करण्यात गुंग आहे असं दाखवत होती. माझं तिच्यावर बारीक नजरेने लक्ष

होतं. आमचं बोलणं ती कान टवकारून ऐकत होती. माझी हाक ऐकताच ती आली. ती किंचित लाजली. स्ट्रिकलँडने तिच्याकडे न बोलता पाहिलं.''

''ती दिसायला कशी होती? सुंदर?''

''एवढी वाईट नव्हती. तुम्ही तिचं पेंटींग पाहिलंच असेल. त्याने तिची अनेक पेंटींग केली. कधी परेओ घालून तर कधी काहीच कपडे न घालता. तसं तिला सुंदरच म्हटलं पाहिजे. शिवाय तिचा स्वैंपाकही चांगला होता. मी स्वत:च तिला शिकवलं होतं. मी पाहिलं स्ट्रिकलँड विचारात पडला होता. म्हणून मी म्हटलं: मी तिला चांगला पगार द्यायचे. शिवाय तिला कॅप्टन आणि फर्स्ट मेट मंडळींकडूनही अधेमधे थोडेफार पैसे मिळत. तिच्याकडे काही शें फ्रँक साठलेले आहेत.'

''त्याने त्याची लाल दाढी खाजवली आणि हसला.

'' 'आटा, मी तुला नवरा म्हणून चालेल का?'' तो म्हणाला.'

''ती काही बोलली नाही, नुसती खुदकन हसली.

'' 'मी तुम्हाला सांगते, ती तुमच्यावर *बीग्वाँ* फिदा आहे.' मी म्हणाले.

'' ' मी तुला मारेन, चालेल.' तो तिच्याकडे बघत म्हणाला.

'' 'त्याच्याशिवाय तुमचं माझ्यावर प्रेम आहे हे कसं कळणार?' ''

तिअरने तिचं वर्णन थांबवलं आणि माझ्याकडे विचारमग्न चेहेऱ्याने बघू लागली. ''माझा पहिला नवरा कॅप्टन जॉन्सन नेहमी मला मारायचा. तो दिसायला एकदम देखणा पुरूष होता. चांगला सहा फूट तीन इंच उंच होता. कधी कधी एवढा मारायचा की मी काळी निळी पडायची. पण तो गेला तेव्हा मी रडरड रडले. जॉर्ज

रेनी बरोबर लग्न करेपर्यंत मी काय गमावलं आहे ते मला कळलं नव्हतं. माणूस कसा असतो ते जोपर्यंत तुम्ही त्याच्या बरोबर राहत नाही तोपर्यंत तुम्हाला कळत नाही. जॉर्ज रेनीच्या बाबतीत मी जेवढी फसले तेवढी मी दुसऱ्या कोणाबाबत फसले नाही. तो जवळपास कॅप्टन जॉन्सन एवढाच उंच होता आणि तेवढाच दणकट. पण ते वरवरचं होतं. तो कधीच दारू पीत नसे. त्याने माझ्यावर कधीच हात उगारला नाही. तो कदाचित पूर्वी मिशनरी असावा. बंदरात लागणाऱ्या प्रत्येक बोटीवरच्या अधिकाऱ्याबरोबर मी असायची. पण जॉर्जच्या नजरेला काहीच पडायचं नाही. मला त्याचा एवढा कंटाळा आला की शेवटी मी घटस्फोट घेऊन मोकळी झाले. अशा नवऱ्याचा उपयोग काय? अशा पुरूषांबरोबर आयुष्य काढणं किती भयंकर असतं.''

पुरूष नेहमी फसवतातच असं बोलून मी तिला सहानुभूती दाखवली आणि नंतर स्ट्रिकलँडची गोष्ट पुढे चालू ठेवायला सांगितली.

'' 'आपल्याला तशी घाई नाही. तुमचा वेळ घ्या आणि मला सांगा. आटा शेजारच्या खोलीत राहते. तिच्या बरोबर महिनाभर रहा. बघा तुमचं जमत का ते. तुमचं जेवण इथेच घ्या. जर तुम्हाला तिच्या बरोबर लग्न करावसं वाटलं तर तिच्या मालकीच्या शेतात जा आणि तिथेच घर संसार चालू करा.'

''त्याने त्याला मान्यता दिली. आटा माझ्याकडे काम करत होती आणि मी त्याच्या खाण्या पिण्याची काळजी घेत होते. त्याला आवडणारे एक दोन पदार्थ मी तिला करायला शिकवले. त्या काळात त्याने फारशी चित्र काढली नाहीत. तो डोंगरात फिरायला जायचा, झऱ्यामध्ये डुंबायचा, तळयाच्या काठी जाऊन बसायचा. संध्याकाळी किनाऱ्यावर जाऊन मुरिया बेटाकडे बघत बसायचा. कधी कधी तो प्रवाळाच्या खडकांवर मासे पकडायला जायचा. तो अगदी शांत आणि सुस्वभावी होता. रात्री जेवण झाल्यावर तो आटा बरोबर तिच्या खोलीवर जायचा. मी पाहिलं तो जंगलात जाण्यासाठी तळमळत होता. महिना संपायला आल्यावर

त्याने काय ठरवलं आहे ते विचारलं. तो म्हणाला जर आटाची तयारी असेल तर त्याची हरकत नाही. मग मी त्याला लग्नाची मेजवानी दिली. सगळं जेवण मी माझ्या हाताने बनवलं. वाटाण्याचं सूप, *लॉबस्टर अ ल पोर्तुगीज*, करी आणि खोबऱ्याचं सॅलड. तुम्ही कधी खाल्लं आहे का? नसेल तर जाण्यापूर्वी तुम्हाला एकदा खिलवलं पाहिजे. नंतर मी आईसक्रीम दिलं. प्यायला हवी तेवढी शँपेन होती. पाठोपाठ लिक्यूर्स. मी सगळं थाटात करायचं ठरवलं होतं. नंतर ड्रॉईंग रूममध्ये जाऊन आम्ही नृत्य केलं. तेव्हा मी एवढी जाड नव्हते. मला नाचायला खूप आवडतं.''

हॉटेल डी ला फ्लाऊ मधील ड्रॉईंग रूम अगदी छोटाशी होती. रूममध्ये एक गावठी पियानो होता. वेल्वेटने मढवलेले महॉगनी फर्नीचर भिंतीलगत नीट लावलेले होते. एका गोल टेबलावर फोटोंचे आल्बम ठेवलेले होते. भिंतीवर तिअर आणि तिचा पहिला नवरा जॉन्सनचा एक फोटो लावलेला होता. आता तिअरचं वय झालं असलं आणि ती खूप जाड झाली असली तरी कधी कधी ड्रॉईंग रूम मधलं जुनं ब्रुसेल्स कार्पेट अंथरलं जातं, तिअर तिच्या मोजक्या मित्रमैत्रीणींना बोलावते आणि नाचते. संगीतासाठी ग्रामोफोनवर खरखर आवाज करणारी रेकॉर्ड लावली जाते. व्हरांड्यामध्ये तिअरने लावलेल्या सेंटचा सुगंध दरवळत होता. रात्रीच्या निरभ्र आकाशात त्रिशंकूचा तारा (Southern Cross) चमकत होता.

गतकाळच्या जुन्या आठवणींनी हरकून जाऊन तिअर स्वत:शीच हसली.


''त्या रात्री आम्ही तीन वाजेपर्यंत जागे होतो. झोपायला गेलो तेव्हा कोणी शुद्धीवर होतं असं मला वाटत नाही. मी त्यांना जोपर्यंत रस्ता जाईल तोपर्यंत माझी गाडी घेऊन जायला सांगितलं. पुढे त्यांना पायीच जायचं होतं. आटाचं शेत डोंगरांच्या दुबोळक्यात होतं. ते भल्या पहाटेच निघाले. मी त्यांच्या सोबतीला पाठवलेला मुलगा दुसऱ्या दिवसापर्यंत परत आला नाही.''

"अशी ही स्ट्रिकलँडच्या लग्नाची गोष्ट."



Sothern Cross

Stars visible only from southern hemisphere used for navigation like North Star.



Artist: Paul Gauguin

Title:  The Delightful Land, Date  1892

Medium: oil on canvas, Dimensions: 91 × 72 cm (35.8 × 28.3 in)

Current location: Ohara Museum of Art, Source: wikidata:Q28797047

# ५२

पुढची तीन वर्ष स्ट्रिकलँडच्या जीवनातील सर्वात सुखाचा काळ असावा. आटाचं घर बेटावरच्या रस्त्यापासून आठ किलोमीटर आत होतं. तिच्या घरापर्यंत जाणाऱ्या वळणावळणाच्या वाटेच्या सभोवती उष्ण कटीबंधातील हिरवीगार झाडं होती. तिचं घर म्हणजे एक लहानसं लाकडी खोपटं होतं. रंग न लावलेल्या साध्यासुध्या दोन छोट्या खोल्या आणि बाहेर छप्पर घातलेली एक मोकळी जागा. स्वयंपाक करायला त्या जागेचा वापर करता येई. झोपण्यासाठी असलेल्या चटया सोडता दुसरं कसलंही सामान घरात नव्हतं. व्हरांड्यात एक डुलती आरामखुर्ची होती. घरालगत केळीची झाडं होती. त्याची फाटकी पानं भिकेला लागलेल्या सम्राटाच्या वस्त्रासारखी दिसत. पाठीमागच्या बाजूला जंगली नास्पतीचं एक झाड होतं. पहावं तिकडे नारळाची झाडं दिसत होती. आटाच्या वडिलांनी शेताच्या सभोवती लावलेली क्रोटनची झाडं फोफावली होती. त्यामुळे लालभडक ज्वालेचं कुंपण घातल्यासारखं वाटत होतं. दारासमोर आंबा होता. सोन्याचं उत्पन्न देणाऱ्या नारळांचं संरक्षण करणारी लालभडक फुलांची दोन जुळी झाडं कोपऱ्यात उभी होती.

स्ट्रिकलँड तेथे राहत होता. तो क्वचितच पपीएतला जाई. जवळच असलेल्या झऱ्यावर जाऊन तो अंघोळ करी. झऱ्याच्या खालच्या अंगाला कधी कधी माशांच्या झुंडी येत. झुंडी आल्या की स्थानिक लोक भाले बरच्या घेऊन तेथे जमत आणि प्रचंड आरडा ओरडा करत समुद्राकडे जाणारे गोंधळलेले मासे पकडत. कधी कधी स्ट्रिकलँड प्रवाळाच्या खडकांवर जाऊन टोपलीभर रंगीबेरंगी मासे पकडून आणी. आटा ते खोबरेल तेलात तळे नाहीतर लॉबस्टर बरोबर शिजवे. कधी कधी ती खेकड्यांचा एखादा चवदार पदार्थ बनवी. डोंगरात रानटी संत्री मिळत. आटा गावातल्या दोन तीन बायकांना घेऊन जाई आणि टोपलीभर संत्री घेऊन येई. नारळ काढायचे झाले की आटा आपल्या नातेवाईकांना नारळ काढायला बोलावे. त्यांचं टोळकं सरसर झाडावर चढून पटापट नारळ काढून देई. ते फोडून उन्हात वाळवून

त्यांचं खोबरं काढून ते पोत्यात भरत. तळ्याकाठच्या गावात एक व्यापारी महिन्यातून एकदा येई. तो खोबऱ्याच्या बदल्यात तांदूळ, साबण, मटनाचे हवाबंद डबे, वगैरे वस्तू आणि थोडेसे पैसे देई. कधी कधी गावात मेजवानी असे. त्यावेळी डुक्कर कापत. मग ते पोट फुटेस्तोवर खात, गाणी गात आणि नाचत.

त्यांचं घर गावापासून खूप लांब होतं. ताहितीयन लोक आळशी आहेत. त्यांना भटकायला, गप्पा मारायला, चकाट्या पिटायला खूप आवडतं. पण पायी चालायचा कंटाळा येई. कित्येक दिवस आटा व स्ट्रिकलँड एकटेच असत. तो चित्र काढायचा किंवा वाचत बसायचा. रात्री ते व्हरांड्यात बसून धूम्रपान करत आकाशाकडे बघत बसत. आटाला एक मूल झालं. बाळंतपणात तिची काळजी घ्यायला एक म्हातारी बाई आली. ती तिथेच राहिली. नंतर तिची नात तिच्या सोबतीला म्हणून आली. काही दिवसांनी एक मुलगा आला. तो कोणाचा मुलगा, कुठून आला हे कोणालाच माहित नव्हतं. पण तो तिथेच त्या कुटुंबाचा भाग बनून राहिला. अशा रितीने दोघांच्या कुटुंबात चारांची भर पडली आणि ते सगळे तिथे आनंदाने नांदू लागले.



Artist: Paul Gauguin

Title: Mahana no Atua, Day of the God, Date: 1894

Medium: oil on canvas, Dimensions: 66 × 87 cm (26 × 34.3 in)

Current location: Art Institute of Chicago, Source: wikidata:Q37693, Q3765980

## ५३

“*तेने व्हायोला ल कॅपितेन ब्रुनो*, तो बघ कॅप्टन ब्रुनो तेथे बसलाय,” एके दिवशी मी तिअरने सांगितलेल्या गोष्टींचे धागेदोरे जुळवत होतो तेवढ्यात ती म्हणाली, “कॅप्टन ब्रुनो स्ट्रिकलँडला चांगलाच ओळखत होता. तो त्याच्या घरी गेलेला आहे.”

कॅप्टन ब्रुनो एक मध्यमवयीन फ्रेंच इसम होता. काळी दाढी, चमकदार टपोरे डोळे. डकचा व्यवस्थित शिवलेला सूट घालून तो दुपारचं जेवण घेत होता. हॉटेलात काम करणाऱ्या आ लिन या चिनी मुलाने तो आजच पमेट्युवरून बोटीने आल्याचं सांगितलं.

तिअरने माझी ओळख करून दिली. त्याने त्याचं कार्ड मला दिलं. त्या कार्डावर रेन ब्रुनो, *कॅपितेन अ लाँ कोर* ... मास्टर मरिनर असं छापलेलं होतं. आम्ही स्वैंपाकघराच्या बाहेरील व्हरांड्यात बसलो होतो. तिअर तिच्या हॉटेलात काम करणाऱ्या मुलींपैकी एका मुलीचे कपडे शिवत होती. तो आमच्या बरोबर बसला.

"मी स्ट्रिकलँडला ओळखत होतो," तो म्हणाला. "मला बुद्धीबळाच्या खेळाची खूप आवड आहे. मी माझ्या धंद्याच्या निमित्ताने वर्षातून तीन चार वेळा ताहितीत येतो. तो त्यावेळी पपीएतमध्ये असला तर आम्ही खेळायचो. जेव्हा त्याचं लग्न झालं," त्याने हसत डोळे मिचकावले. "*आँ शॉन*, शेवटी तो जेव्हा तिअरने दिलेल्या त्या मुलीबरोबर राहयला गेला तेव्हा त्याने मला त्याच्या घरी बोलावलं होतं. मी त्यांच्या लग्नाच्या मेजवानीला हजर होतो." त्याने तिअरकडे पाहिलं. ते दोघंही हसले. "तो लग्नानंतर पपीएतला फारसा आला नाही. त्यानंतर वर्षभराने बेटाच्या त्याभागात काहीतरी काम होतं. काय काम होतं ते आता नीट आठवत नाही. पण मला स्ट्रिकलँडची आठवण झाली. *व्होयाँ,* हे बघा, आलोच आहे तर बिचाऱ्याला भेटून येऊ. मी एक दोन स्थानिक माणसांना विचारलं. मी होतो तेथून तो पाच एक किलोमीटरवरच राहत होता. मी त्याला भेटायला गेलो. ते दृश्य मी कधीच विसरणार नाही. मी स्वत: एका प्रवाळद्वीपावर राहतो. समुद्र आणि आकाशाचे क्षणोक्षणी बदलणारे मनोहारी रूप मला नवीन नाही. पण तो जेथे राहत होता त्या जागेचं सौंदर्य केवळ अवर्णनीयच आहे. तुलना करायची झालीच तर ईडनच्या बागेच्या स्वर्गीय सौंदर्याशी करावी लागेल. निळ्याशार आकाशाखाली लपलेला

हिरव्यागार वनराईचा एक लहानसा तुकडा. आसमंतात दरवळणारा स्वर्गीय सुगंध. अहाहा! जर मी तुम्हाला ती जागा प्रत्यक्ष दाखवू शकलो तर किती बरं होईल. त्याचं वर्णन शब्दात करणं शक्य नाही.

तेथे तो राहत होता. त्याचा ना कोणाशी संबंध ना इतर कोणाचा त्याच्याशी. असं जीवन युरोपियनांच्या चष्म्यातून पाहिलं तर निश्चितच खटकेल. ते कच्चं घर मोडकळीला आलेलं होतं. थोडंस अस्वच्छही म्हणता आलं असतं. तीन चार स्थानिक माणसं व्हरांड्यात पडलेली होती. स्थानिक लोक कसे घोळक्याने पडलेले असतात तुम्हाला माहित आहेच. एक संपूर्ण उघडाबंब तरूण सिगारेट ओढत होता. त्याच्या अंगावर परेओ सोडल्यास काहीही नव्हतं.''

परेओ म्हणजे एक कंबरेपासून खाली गुडघ्यापर्यंत नेसलेला लाल किंवा निळया रंगाच्या कापडाचा तुकडा. त्यावर पांढऱ्या रंगाचं डिझाईन असे.

''पंधरा वर्षांची एक मुलगी गवताची हॅट विणत होती. एक म्हातारी बाई उकिडवी बसून पाईप ओढत होती. मला आटा दिसली. ती नुकत्याच जन्मलेल्या एका मुलाला स्तनपान देत होती. दुसरं एक नागडं मूल तिच्या पायाशी खेळत होतं. तिने मला पाहून स्ट्रिकलँडला हाक मारली. तो दरवाजात आला. परेओ सोडून त्याच्या अंगावर काहीही नव्हतं. त्याची शरीरयष्टी दांडगी होती. अस्ताव्यस्त वाढलेले केस, लांब दाढी आणि केसाळ छाती, अनवाणी चालून घट्टे पडलेले पाय. नागर जीवनावर अगदी खुन्नस काढल्यासारखा तो आदिवासी झाला होता. मला पाहून तो खुश झाला. त्याने आटाला जेवणासाठी एक कोंबडी मारायला सांगितली. मी आलो तेव्हा तो जे चित्र करत होता ते दाखवायला तो मला घरात घेऊन गेला. एका कोपऱ्यात पलंग होता. मध्यभागी असलेल्या इझलवर कॅनव्हास लावलेला होता. मला त्याची दया आली म्हणून त्याची दोन पेंटींग मी अगदी किरकोळ किंमतीला विकत घेतली. बाकीची मी माझ्या फ्रान्समधील मित्रांना पाठवून दिली. मी जरी ती दयेखातर घेतली असली तरी थोडे दिवस गेल्यानंतर मला ती

आवडायला लागली. खरंच त्यात एक विलक्षण सौंदर्य होतं. लोकांनी मला वेड्यात काढलं होतं पण शेवटी मीच खरा ठरलो. तिअरला जळवण्यासाठी तो तिच्याकडे बघून हसला. सत्तावीस फ्रँकचा अमेरीकन स्टोव्ह घेऊन स्ट्रिकलँडची पेंटींग स्वस्तात घेण्याची तिची संधी कशी हुकली याची कहाणी तिने दु:खीत अंत:करणाने पुन्हा एकदा सांगितली.”

‘‘तुमच्याकडे अजून ती पेंटींग आहेत?’’ मी विचारलं.

‘‘अजून माझ्याकडेच आहेत. माझी मुलगी लग्नाची होईपर्यंत ती मी ठेवणार आहे. चित्रांच्या रुपाने तिच्या लग्नात द्यायच्या रूखवत, हुंडा वगैरेची सोय झाली असं समजा.’’

नंतर त्याने त्याच्या कहाणीला सुरवात केली.

‘‘ती संध्याकाळ मी कधीच विसरणार नाही. मी एका तासापेक्षा जास्त थांबणार नव्हतो. पण त्याने रात्रभर राहण्याचा मला आग्रह केला. मी थोडा साशंक होतो कारण त्याच्याकडच्या झोपण्यासाठी असलेल्या चटया अगदीच फुसफुशीत होत्या. पमेत्त्युमध्ये जेव्हा मी माझं घर बांधत होतो तेव्हा मी कित्येक महिने यापेक्षा कडक बिछान्यावर झोपलो होतो. कृमी कीटकांच्या चावण्याने त्रास होण्याइतकी माझी कातडी नाजूक नव्हती.’’

‘‘आटा जेवण बनवेपर्यंत आम्ही ओढ्यावर जाऊन अंघोळ केली. नंतर आम्ही व्हरांड्यात बसून जेवलो. आम्ही धूम्रपान करत गप्पा मारल्या. त्या तरूण मुलाकडे कॉन्सेर्टीना होतं. त्याच्यावर त्याने दहा बारा वर्षांपूर्वी लोकप्रिय असलेली गाणी वाजवली. नागरी संस्कृती पासून हजारो मैल दूर असलेल्या प्रशांत महासागरातील एका बेटावर ती धून ऐकायला विचित्र वाटत होती. मी त्याला विचारलं. आदिम अवस्थेत जगणाऱ्या या लोकांबरोबर राहण्याचा तुला कंटाळा नाही येत. त्याने

नाही म्हणून सांगितलं. तो म्हणाला चित्र काढताना सगळी मॉडेल हाताशी असलेली बरी. मोठ्याने जांभाया देत स्थानिक लोक एका मागोमाग एक झोपी गेले. फक्त मी आणि स्ट्रिकलँड उरलो. तिथे जी संपूर्ण शांतता होती त्याचं वर्णन मी करू शकणार नाही. मी ज्या पमेट्यु बेटावर राहतो तेथे अशी संपूर्ण शांतता कधीच नसते. किनाऱ्यावर अनेक प्राणी रात्रभर संचार करत असतात त्यांचं कर्णकूट भेसूर ओरडणं, कवचधारी कीटकांची किरकिर, खेकड्यांची किटकिट, खाडीतून उड्या मारणाऱ्या माशांचा डुबुक डुबुक आवाज आणि समुद्राच्या लाटांची अखंड गाज. पण येथे कसलाच आवाज नव्हता. हवेत रातराणीचा सुगंध दरवळत होता. ती रात्र एवढी सुंदर होती की आत्म्याला शरीराच्या बंधनातून मुक्त होऊन अनंताच्या प्रवासाला जाण्याचा मोह व्हावा. अशा ठिकाणी मृत्यु आलाच तर एखादा प्राणप्रिय मित्र बऱ्याच वर्षांनी भेटावा आणि हृदय उचंबळून यावं तसं वाटेल.''

तिअरने एक सुस्कारा सोडला.

''मी जर पंधरा वर्षांची असते तर.''

तिला टेबलावरच्या कोळंबीच्या बशीकडे डोळा लावून बसलेली मांजर दिसली. तिने एक शिवी हासडत बाजूचं पुस्तक त्याच्या शेपटीवर मारलं.

''तुम्ही आटाबरोबर सुखी आहात का असं मी त्याला विचारलं.

''ती माझ्या गोष्टींत नाक खुपसत नाही, असं तो म्हणाला. 'ती माझं जेवण बनवते, मुलांचा सांभाळ करते. मी तिला सांगतो ते ती करते. पुरूषाला स्त्रीपासून जे हवं असतं ते सगळं ती मला देते.''

''तुम्हाला युरोप सोडल्याचा पश्चाताप होत नाही का? तुम्हाला कधी तरी पॅरीस किंवा लंडनच्या रस्त्यांवरील दिव्यांची, तुमच्या मित्रांची, सहकाऱ्यांची,

किंवा कोणाचीतरी आठवण येत नाही? *क्री सेज* मी काय म्हणतोय, वर्तमानपत्रं आणि नाट्यगृह, फरसबंदी रस्त्यांवरील ओम्नीबसचा खडखडाट वगैरे, वगैरे.''

''बराच वेळ तो गप्प होता. नंतर तो म्हणाला:

'' 'मी येथे मरेपर्यंत राहणार आहे.'

'' 'पण तुला कधी कंटाळा येत नाही, एकटेपणा जाणवत नाही?' मी विचारलं.

''तो गालातल्या गालात हसला.

'' 'माँ पुअर ॲमी, बिचारा,' तो म्हणाला. ''कलाकार कसा असतो ते तुम्हाला माहित नाहीसं दिसतंय.' ''

कॅप्टन ब्रुनो माझ्याकडे बघत हसला. त्याचे काळेभोर डोळे चमकले.

''असं म्हणून त्याने माझ्यावर अन्याय केला. स्वप्न बघणं म्हणजे काय ते मलासुद्धा माहित होतं. माझीही स्वप्न होती. मीसुद्धा एका प्रकारे कलाकार आहे.''

आम्ही बराच वेळ निशब्द बसलो. तिअरने तिच्या झग्याच्या मोठ्या खिशातून सिगारेटचं पाकिट काढलं. तिने प्रत्येकाला एक एक सिगारेट दिली. सरते शेवटी तिने शांततेचा भंग केला:

''*से मस्यु* या साहेबांना स्ट्रिकलँडची माहिती हवी आहे तर तुम्ही त्यांना डॉ. कोत्राजकडे का घेऊन जात नाही. ते त्याच्या आजारपणाविषयी काही तरी सांगतील?''

"*व्हॉलंटीर*," कॅप्टन माझ्याकडे बघत म्हणाला, "मी तयार आहे."

मी त्याचे आभार मानले. त्याने घडाळ्यात पाहिलं.

"सहा वाजून गेले आहेत. ते आत्ता घरीच असतील. तुम्हाला वेळ असेल तर चला."

मी फार आढेवेढे न घेता निघालो. आम्ही डॉक्टरांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याने चालत होतो. तो गावाच्या बाहेर राहत होता. हॉटेल डी ला फ्लाऊसुद्धा गावाच्या वेशीवर होतं. त्यामुळे आम्ही पटकन गावा बाहेर आलो. रुंद रस्त्यावर सावलीसाठी दुतर्फा उंच झाडं लावलेली होती. दोन्ही बाजूला नारळी आणि व्हॅनीलाची लागवड होती. ताडाच्या झाडावर बसलेले समुद्रपक्षी कर्वâश आवाजात ओरडत होते. आम्ही एका ओढ्यावरच्या दगडी पुलावर आलो. ओढ्यात आदिवासी मुलं हसत ओरडत मस्ती करत होती. त्यांची तांबूस कांती संध्याकाळच्या उन्हात चमचम करत होती.



Artist: Paul Gauguin

Title: I Raro te oviri, Under the Pandanus I, Date: 1891

Medium: oil on canvas, Dimensions: 68 × 90 cm (26.8 × 35.4 in)

Current location: Dallas Museum of Art, Source: wikidata:Q37693/Q18665175

## ५४

चालता चालता मी स्ट्रिकलँडविषयी सद्ध्या जी माहिती मला मिळाली होती त्या संदर्भात विचार करू लागलो. त्याच्या मायदेशी त्याची जी हेटाळणी व्हायची ती या दूरच्या प्रदेशात होत नव्हती. येथील लोकांनी त्याच्याकडे सहानुभूतीने पाहिले. त्याचा लहरीपणा येथे खपवून घेतला गेला. इथले युरोपियन आणि स्थानिक अगदी आदिवासीसुद्धा त्याला वेडपट समजत. पण त्यात एक फरक होता.

त्यांना असल्या वेडपटपणाची सवय होती. इंग्लंड आणि फ्रान्समध्ये तो गोल भोकातील चौकोनी खुंटीसारखा होता. येथे वेगवेगळया आकाराच्या खुंट्या आणि तशाच आकाराची भोकं होती. इथे त्याचा विक्षिप्तपणा, स्वार्थीपणा, रानटीपणा सौम्य झाला होता अशातला भाग नाही. पण इथली परिस्थिती वेगळी होती. तो इथे पहिल्यापासून राहिला असता तर तो इथल्या सर्वसामान्या माणसांहून फार वेगळा झाला नसता. कारण इथे त्याला जी सहानुभूती मिळाली ती त्याला त्याच्या मायदेशात मिळात नव्हती.

मला जे वाटलं ते मी कॅप्टन ब्रुनोला सांगितलं. तो थोडा वेळ काहीच बोलला नाही.

“मला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटली होती यात काही नवल नाही. आम्ही दोघं एकाच ध्येयाने प्रेरित होतो.”

“तुम्हा दोघांचं जग एवढं भिन्न आहे तरी तुमचं ध्येय एक हे कसं?” मी हसत विचारलं.

“सौंदर्य.”

“या शब्दाचा आवाका खूप मोठा आहे.” मी पुटपुटलो.

“प्रेमात पडलेल्या लोकांना जगातलं इतर काहीच दिसत नसतं. जहाजावर साखळदंडांनी जखडून ठेवलेल्या गुलामांसारखे ते एकाच तालावर वल्हवत असतात. प्रेमाचे गुलाम. विकारवशता मग ती प्रेमामुळे असो की दुसऱ्या कशाने, जो त्यात फसतो त्याला सारखेच क्लेश होतात.”

“हे तुम्ही म्हणताय! किती विचित्र आहे. मला वाटायचं की त्याला सैतानाने पछाडलं असेल.” मी म्हणालो.

“स्ट्रिकलँडला सौंदर्य निर्माण करायचं होतं. त्याच्या ध्यासाने त्याला पछाडलं होतं. अविश्रांत ध्यास. त्यासाठी त्याची अखंड भटकंती चालू होती. काही लोकांना सत्याचा शोध घ्यायचा असतो. त्यांची सत्याची आच एवढी तीव्र असते की त्यात ते स्वत:चं आयुष्य उधळून टाकतात. स्ट्रिकलँड हा असा होता. इथे फक्त सत्याची जागा सौंदर्याने घेतली होती. मला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटते.”

“हे सुद्धा तेवढंच विचित्र आहे. ज्या माणसाला त्याने दुखावलं होतं त्या माणसाला त्याच्या विषयी अतिशय सहानुभूती वाटत असे. शिकारीला शिकाऱ्या विषयी वाटावी किंवा दुखावला गेलेल्याला दुखावणाऱ्या विषयी सहानुभूती वाटते तशी.” मी थोडा वेळ काहीच बोललो नाही. “त्याच्या स्वभावाने मला नेहमीच गोंधळायला होतं. एक चित्रकार म्हणून त्याची जडण-घडण कशी झाली असावी ह्या प्रश्नाचं उत्तर मला अजून सापडलेलं नाही. तुम्हाला कसं काय उत्तर मिळालं?”

तो माझ्याकडे बघून हसला.

“मी सुद्धा एका प्रकारे कलाकार आहे हे मी तुम्हाला सांगितलं होतं. ज्या ध्यासाने त्याला पछाडलं होतं त्याच ध्यासाने मीही पछाडलो होतो. चित्रकला हे त्याचं माध्यम होतं तर माझं माध्यम जीवन आहे.”

कॅप्टन ब्रुनोने मला जी कहाणी सांगितली ती मला तुम्हाला सांगायलाच हवी.

त्यातील विरोधाभासाने स्ट्रिकलँडला जाणून घेण्यात मदत होईल. माझ्या दृष्टीने त्या कहाणीमध्येसुद्धा एक मजा आहे.

कॅप्टन ब्रुनो हा मूळचा फ्रान्समधील ब्रिटनी या भागात राहणारा. तो फ्रेंच नौदलामध्ये होता. लग्न झाल्यावर त्याने नेव्ही सोडली. क्विंपर येथे त्याच्या मालकीचा एक शेतजमिनीचा तुकडा होता. त्याने तेथे स्थायिक होण्याचं ठरवलं. पण त्याच्या वकिलाने त्याला फसवलं. त्यात तो पार निष्कांचन झाला. जिथे त्याने प्रतिष्ठेत दिवस काढले तेथे आता दारिद्र्यात दिवस कंठायला त्याचं मन होईना. नौदलाच्या दर्यावर्दी कारकीर्दी दरम्यान तो प्रशांत महासागराच्या दक्षिणेकडील प्रदेशात गेलेला होता. त्यामुळे नशीब काढण्यासाठी त्याने तिकडे जायचं ठरवलं. पपीएतमध्ये आल्यावर त्याने अनुभव घेण्यासाठी आणि काय करायचं ते नक्की करण्यासाठी थोडे दिवस काढले. नंतर फ्रान्समधील मित्रांकडून थोडे पैसे उधार घेऊन त्याने पमेट्यु मधील एक निर्मनुष्य बेट विकत घेतलं. ते बेट म्हणजे एका समुद्र तलावातील अर्धचंद्राकृती आकाराचा जमीनीचा तुकडा होता. त्यावर फक्त खुरटी झुडपं आणि जंगली पेरुची झाडं होती. त्याची बायको त्याच्यासारखीच अत्यंत धाडसी होती. त्याने बेटावर गेल्यावर काही स्थानिक आदिवासींच्या मदतीने घर बांधणे, जंगलाची साफ सफाई आणि नारळाची लागवड करणे हे दोन कार्यक्रम मोठ्या धडाक्याने हाती घेतले. वीस वर्षांच्या ढोर मेहनतीनंतर त्या ओसाड बेटाचं एका स्वर्गीय बागेत रूपांतर झालं.

“सुरूवातीला ते एक महाप्रचंड कठीण काम वाटायचं. मनात योजलंय ते पूर्ण होईल की नाही याची चिंता वाटायची. मी भल्या पहाटेच उठायचो. दिवसभराच्या श्रमानंतर रात्री बिछान्यावर अंग टाकलं की मेल्यासारखी झोप लागायची. आम्ही दोघांनी प्रचंड मेहनत केली. नंतर आम्हाला मुलं झाली. पहिला मुलगा पाठोपाठची मुलगी. आम्हाला जे माहित होतं ते सगळं आम्ही त्यांना शिकवलं. आमच्याकडे फ्रान्सवरून आणलेला एक पियानो होता. बायकोने त्यांना पियानो वाजवायला आणि इंग्लीश शिकवलं. मी लॅटिन आणि गणित. आम्ही दोघं त्यांना इतिहासाची पुस्तकं वाचून दाखवायचो. त्यांना शिडाची नाव चालवता येते. स्थानिक आदिवासी लोकांइतक्या सफाईने ते पोहतात. आमच्या जमिनी संबंधात त्यांना माहित नाही

असं काहीही नाही. आम्ही लावलेल्या झाडांना फुलंफळं आली. जवळच्या किनाऱ्यावर शिंपले सापडतात. मी पपीएतला दोन शिडांचं जहाज घ्यायला आलो आहे. जहाजाची किंमत वसूल होण्या इतके मासे मला मिळतील का नाही याची शंका आहे. कोणास ठाऊक, नशीब असेल तर मासे पकडता पकडता मोत्यांचे शिंपलेही मिळतील. काही नसताना मी एवढं उभं केलं. मीसुद्धा एक सौंदर्य निर्माण केलं आहे. त्या फळाफुलांनी बहरलेल्या उंच हिरव्यागार झाडांकडे बघून ही झाडं मीच लावली आहेत यावर विश्वास बसत नाही.''

''स्ट्रिकलँडला जो प्रश्न तुम्ही विचारला होता तोच प्रश्न मी तुम्हाला विचारू का? तुम्हाला तुमच्या ब्रिटनीमधल्या जुन्या घराची आणि फ्रान्सची आठवण येऊन पस्तावा वाटत नाही का?''

''ज्या दिवशी माझ्या मुलीचं लग्न होईल, माझा मुलगा माझी जागा घेण्या इतपत तयार होईल त्या दिवशी मी ज्या घरात माझा जन्म झाला त्या घरात परत जाऊन माझं उर्वरित आयुष्य घालवायचं मी ठरवलं आहे.''

''तेव्हा तुमच्या गेल्या दिवसांच्या आठवणीने तुम्हाला गहिवरून येईल.''

''*एव्हिदेमो,* अर्थात आमच्या बेटावर फार काही घडत नसतं. आम्ही जगापासून अगदी वेगळे पडलो आहोत. कल्पना करा, ताहितीला जायलाच मला चार दिवस लागतात. पण इकडे आम्ही फार सुखी आहोत. जे काम करायचं असेल ते आम्ही मनापासून करतो. आमचं जीवन साधं, सुखी आणि समाधानी आहे. इर्षेचा आम्हाला स्पर्शही झालेला नाही. जे काम हातात घेतलं आहे ते पूरं झालं की तेवढ्या पुरताच आम्हाला त्याचा अभिमान वाटतो. नंतर दुसरं काम हाती घेतो. द्वेष,

आकस, मत्सर अशा गोष्टी आमच्या पासून चार हात लांब आहेत. अहाहा *माँ शेर मस्यु,* महाराज, श्रमसाफल्याच्या आनंदाविषयी खूप काही बोललं जातं ते तसं निरर्थक असतं. पण आमच्या दृष्टीने मात्र तो आनंद खूप महत्वाचा आहे. होय मी सुखी आणि समाधानी आहे.''

''तुम्ही जी सृष्टी उभी केली आहेत ती पहाता असं नक्कीच म्हणू शकता. तुम्हाला तसा अधिकारच आहे.''

''माझी तशी योग्यता असली तर मला सुद्धा बरं वाटेल. माझ्या पत्नीने सहचरणी, गृहिणी आणि माता म्हणून मला माझ्या जीवनात साथ दिली हे माझं केवढं भाग्य.''

कॅप्टन ब्रुनोने सांगितलेल्या जीवनक्रमावर मी थोडा वेळ विचार केला.

''परिस्थितीवर मात करून जगणं आणि त्यात यशस्वी होणं याला केवढं धैर्य, इच्छाशक्ति आणि चिकाटीची गरज आहे.''


''कदाचित एक गोष्टी नसती तर आम्ही यशस्वी झालो नसतो.''

''ती गोष्ट कोणती?''

तो थांबला आणि त्याने नाट्यमय रितीने आपला हात वर केला.

''देवावरचा विश्वास. त्या शिवाय आम्ही यशस्वी झालो नसतो.''

डॉ.कोत्राजांचं घर आलं होतं.



Artist: Paul Gauguin

Title: Tahiti - Le paysage au paon - Landscape with peacock

Oil on canvas, Date 1892,  Source: Wikipedia

## ५५

डॉ.कोत्राज अवाढव्य शरीराचे एक वयस्कर फ्रेंच गृहस्थ होते. पुढे आलेलं पोट, लालबुंद चेहेरा, पांढरेशुभ्र केस, समाधानाने ओसंडून जाणारे निळे डोळे. त्यांच्याकडे बघताच त्यांची दया येई. त्यांनी आम्हाला घरात घेतलं. त्यांचा दिवाणखाना जुन्या काळातल्या फ्रेंच पद्धतीचा होता. तेथे ठेवलेल्या दोनतीन पॉलीनेशियन शोभेच्या वस्तू घराच्या एकूण फ्रेंच सजावटीत उपऱ्या वाटत होत्या. त्यांनी माझा हात हातात घेतला आणि माझ्याकडे पाहिलं. त्यांच्या वागण्यातल्या वरवरच्या आपुलकी मागे असलेला धूर्तपणा लपत नव्हता. त्यांनी कॅप्टन ब्रुनोशी हस्तांदोलन केलं. *मादाम ए लेझ आँफाँ,* मॅडम आणि त्यांच्या मुलांची नम्रतेनी विचारपूस केली. स्थानिक बातम्या, खोबरं आणि व्हॅनिलाचं पीक अशा गोष्टींवर गप्पा मारल्या. त्यानंतर आम्ही माझ्या भेटीच्या प्रयोजना विषयी बोलायला सुरूवात केली.

डॉ.कोत्राजांनी जे सांगितलं ते मी त्यांच्या शब्दात न देता माझ्या शब्दात देण्याचा प्रयत्न करणार नाही कारण ते ज्या उत्साहाने सांगत होते ते माझ्या शब्दातून तुमच्यापर्यंत नीट पोचवणं कठीण आहे. त्यांचा धीरगंभीर आणि खर्जातला आवाज त्यांच्या भव्य देहयष्टीला शोभणारा होता. शिवाय त्यांना नाट्यमयतेची देणगी होती. त्यांचं बोलणं ऐकणं म्हणजे एखादं नाटक बघण्यासारखं होतं आणि तेसुद्धा आपण नेहमी पाहतो त्या नाटकांपेक्षा कितीतरी चांगलं. त्याचं असं झालं की एक दिवस डॉ.कोत्राज गावातील एका म्हाताऱ्या मुखियाला तपासण्यासाठी गेले होते. मग त्यांनी ती सगळी कहाणी सांगितली. मुखियाला तपासताना एक जाडी म्हातारी बाई काळया लोकांच्या गर्दीत एका मोठ्या पलंगावर धूम्रपान करत पहुडली होती. तपासून झाल्यानंतर ती डॉक्टरांना जेवणासाठी बाजूच्या खोलीत घेऊन गेली. कच्चे मासे, तळलेली केळी आणि कोंबडी - *क्वी सेज* - आणि जे काही असेल ते. *आँदिजेन* – स्थनिक आदिवासी लोकांचं नेहमीचं जेवण. ते जेवत असताना त्यांना एक रडवेली लहान मुलगी दरवाजाआडून त्यांच्याकडे बघताना दिसली.

तेव्हा त्याला काही वाटलं नाही, पण नंतर ते त्यांच्या घोडागाडीत बसून घरी जायला निघाले तेव्हा त्यांना ती पुन्हा दिसली. ती एका बाजूला उभी राहून त्यांच्याकडे दु:खद नजरेने बघत होती. तिचे गाल अश्रूंनी भिजले होते. त्यांनी कोणाला तरी तिला काय झालं म्हणून विचारलं. तिच्या घरातला एक गोरा मनुष्य आजारी आहे. त्याला तपासायला याल का हे विचारायला ती जंगलाच्या अंतर्भागातून खूप लांबून आली होती. त्यांनी तिला डॉक्टरांना त्रास देऊ नकोस म्हणून सांगितलं होतं म्हणून ती गप्प होती. त्यांनी तिला जवळ बोलावलं आणि तिला काय पाहिजे म्हणून आपण होऊन विचारलं. तिनं सांगितलं की तिला आटाने पाठवलं आहे. आटा हॉटेल डी ला फ्लाऊ मध्ये पूर्वी काम करत होती म्हणून त्यांना माहित होती. तिने डॉक्टरांना तिच्या घरातील रेड वनला तपासायला बोलावलं होतं. तिने त्याच्या हातात वर्तमानपत्राच्या कागदाची एक पुडी दिली. त्यांनी ती पुडी उघडली. त्यात शंभर फ्रँकची एक चुरगळलेली नोट होती.

“हा रेड वन कोण आहे?” त्यांनी शेजारच्या माणसाला विचारलं.

त्याने सांगितलं की तो एक इंग्लीश माणूस आहे. तो चित्रकार असून तो आटाबरोबर त्या जंगलात राहतो. त्याचं घर तेथून सुमारे सात एक किलोमीटरवर आहे. त्याने केलेल्या वर्णनावरून तो स्ट्रिकलँड आहे हे डॉक्टरांना कळून चुकलं. पण तेथे जायचं तर चालतच जाणं भाग होतं. त्यांना स्वत:ला तेथे जाणं कठीण असल्यामुळे त्यांनी त्या मुलीला परत पाठवलं.

“मी खरं सांगतो,” डॉक्टर माझ्याकडे वळून म्हणाले, “खराब रस्त्यावरून चौदा किलोमीटरचा पायी प्रवास करायची मला भिती वाटली, मी त्याच रात्री पपीएतला परत येऊ शकेन याचा खात्री नव्हती. शिवाय स्ट्रिकलँडचं आणि माझं जमत नसे. तो एक आळशी आणि नालायक इसम होता. आमच्या सगळयांप्रमाणे मेहनत करून स्वत:ची रोजीरोटी कमावण्याऐवजी तो त्या स्थानिक आदिवासी

मुलीच्या जीवावर पोट भरत होता. *माँ द्यू* - अरे देवा, एक दिवस असामान्य प्रतिभावान कलाकार म्हणून जगभर त्याची किर्ती पसरणार आहे हे मला कळायला काही मार्ग नव्हता. तो माझ्याकडे येऊ शकेल का? मी त्या मुलीला विचारलं. त्याला काय झालं आहे, काय त्रास होतो वगैरे चौकशीही केली. ती काही बोलेना. मी खोदून खोदून विचारलं तर ती खाली बघून रडायला लागली. मी खांदे उडवले. शेवटी मला माझं कर्तव्य पार पाडणं भाग होतं. मी तिला रागानेच रस्ता दाखवायला सांगितलं.''

ते जाऊन पोचले तेव्हासुद्धा गुश्यातच होते. शिवाय जंगलवाटेने केलेल्या पायपीटीने घामाघूम आणि तहानेने व्याकुळ झाले होते. आटा अर्ध्या रस्त्यात येऊन त्यांची वाट बघत होती.

''मला अगोदर पाणी द्या, तहानेने माझा जीव चाललाय. *पुअर ला'मूर द द्यू* - कृपा करून मला एक शहाळं द्या.''

तिने हाक मारताच एक मुलगा धावत आला. तो सुरकन झाडावर चढला आणि त्याने दोन तीन शहाळी खाली टाकली. आटाने एका शहाळ्याला भोक पाडलं आणि डॉक्टरांना दिलं. शहाळ्याचे पाणी घटाघटा पिऊन एक सिगारेट शिलगावल्यावर त्यांच्या जीवात जीव आला.

''रेड वन कुठे आहे.''

''ते घरात चित्र काढत आहेत. तुम्ही येणार ते मी त्यांना सांगितलं नव्हतं. आत जा आणि त्यांना तपासा.''

“त्यांची तक्रार तरी काय आहे? त्यांना जर चित्र काढण्याइतकी ताकद असेल तर तारावाओला यायला त्यांना काय धाड भरली होती. एवढी पायपीट करण्याचा माझा त्रास तरी वाचला असता. त्यांच्या वेळेपेक्षा माझ्या वेळेला कमी किंमत आहे अशातला भाग नाही.”

आटा एक शब्दही बोलत नव्हती. पण त्या मुलाच्या पाठोपाठ ती घराच्या दिशेने गेली. ज्या मुलीने डॉक्टरांना बोलावून आणलं ती व्हरांड्यात बसली होती. तिथे एक म्हातारी बाई भिंतीला टेकून विड्या वळत बसली होती. आटाने दरवाजाकडे बोट दाखवलं. डॉक्टरांना त्यांच्या विचित्र वागण्याचा अर्थ कळेना. ते आत गेले. स्ट्रिकलँड पॅलेट साफ करत होता. इझलवर एक कॅनव्हास होता. कंबरेला फक्त परेओ गुंडाळलेला होता. तो दरवाजाकडे पाठ करून उभा होता. बुटांचा आवाज ऐकताच तो मागे वळला. त्याच्या नजरेत वैतागल्याचं चिन्ह दिसत होतं. डॉक्टरांना बघून त्याला आश्चर्य वाटलं. त्यांचं असं अचानक येणं त्याला आवडलेलं दिसलं नाही. डॉक्टर त्याच्याकडे निरखून बघत होते. त्यांचे पाय जमिनीला खिळले. त्यांनी एक सुस्कारा सोडला. त्यांना असं काही बघायला मिळेल याची अपेक्षा नव्हती. त्यांचा भयाने थरकाप उडाला.

“तुम्ही कोणत्याही औपचारीकतेशिवाय आलात,” स्ट्रिकलँड म्हणाला. “बोला, काय सेवा करू?”

डॉक्टरांनी स्वत:ला सावरलं. खूप प्रयत्नाने त्यांच्या तोंडातून शब्द फुटला. त्यांचा सगळा राग गेला. *ए बियाँ, ओई, जू ने ले नी पा* - मला त्याची कींव आली हे मी नाकारत नाही.

“मी तारावाओला एका रोग्याला तपासायला आलो होतो. आटाने मला तुम्हाला तपासण्यासाठी बोलवून घेतलं.”

"ती वेडी आहे. माझं थोडं अंग दुखत होतं, थोडा ताप होता, त्यात काय एवढं घाबरायचं. जाईल तो. पुढच्या खेपेला कोणी पपीएतला जाणारा असला तर थोडंसं क्विनाईन मागवून घेणार होतो."

"तुम्ही जरा आरशात स्वत:कडे नीट पाहा."

स्ट्रिकलँड हसला आणि भिंतीवर लावलेल्या लाकडी फ्रेममधील पारा उडालेल्या आरशात स्वत:चं प्रतिबिंब पाहिलं.

"ठीक तर आहे."

"तुमच्या चेहेऱ्यात झालेला विचित्र बदल तुम्हाला दिसत नाही का? तुमचा चेहेरा सुजवट दिसत आहे. तुम्हाला कसं सांगू. वैद्यकीय पुस्तकात याला सिंहाचा चेहेरा असं म्हणतात. *माँ पुअर ॲमी*, माझ्या मित्रा, तुम्हाला एक भयंकर रोग झाला आहे."

"मला?"

"तुम्ही निरखून पाहिलंत तर महारोग्याच्या चेहेऱ्यावर दिसतात तशी चिन्हं तुम्हाला तुमच्या चेहेऱ्यावर दिसतील."

"तुम्ही मस्करी तर करत नाही?"

"देवा ही मस्करी असती तर किती बरं झालं असतं."

"मला महारोग झालाय असं तर तुम्हाला म्हणायचं नाही?"

"दुर्दैवाने त्यात काही संशय नाही."

डॉक्टर कोत्रासनी बऱ्याच जणांच्या मृत्युचं भाकित केलं होतं. ते सांगताना भितीने अंगावर जो काटा उभा रहातो त्याच्यावर मात त्यांना करणं जमलं नव्हतं. तो दुर्दैवी माणूस नकळत त्याच्या तुलनेत निरोगी असलेल्या डॉक्टरांशी स्वत:ची तुलना करतो. मृत्यु त्याच्या समोर उभा ठाकलेला असतो तर डॉक्टर जीवनाचा आनंद लुटत असतात. डॉक्टर नेहमीच अशा लोकांच्या तिरस्काराचे आणि क्षोभाचे धनी होतात. स्ट्रिकलँडने त्यांच्याकडे शांतपणे पाहिलं. त्या भयंकर रोगाने दडदडीत झालेल्या त्याच्या चेहेऱ्यावर भावनांचा लवलेशही दिसत नव्हता.

“त्यांना माहित आहे का?” व्हरांड्यात शांतपणे चूप बसलेल्या लोकांकडे बोट दाखवून त्याने विचारलं.

“या आदिवासी लोकांना याच्या खाणाखुणा चटकन ओळखता येतात.” डॉक्टर म्हणाले. “ते तुम्हाला सांगायला घाबरत होते.”

स्ट्रिकलँड दारात गेला आणि त्याने बाहेर पाहिलं. त्याच्या चेहेऱ्यात काहीतरी भयंकर दिसत असलं पाहिजे. कारण त्या झोपडीत जमलेले ते सगळे जण दचकले आणि दु:खाने रडू लागले. त्यांचा रडण्याचा भेसूर आवाज टीपेला पोचला. स्ट्रिकलँड एक शब्दही बोलला नाही. त्यांच्याकडे एक क्षणभर दृष्टीक्षेप टाकून तो आत गेला.

“मी किती दिवस जगेन असं तुम्हाला वाटतं?”

“सांगता येणार नाही. कधी कधी दहा वीस वर्ष सुद्धा जातात. पण त्यात देहाची विटंबना होते, खूप यातना होतात. त्यामुळे जेवढं लवकर संपेल तेवढं भाग्यच समजलं पाहिजे.”

स्ट्रिकलँड इझल जवळ गेला आणि त्याने नुकत्याच पूर्ण केलेल्या पेंटींगकडे पाहिलं.

"तुम्ही खूप लांबून आला आहात. महत्वाची बातमी आणणाऱ्या माणसाला तसंच बक्षीस मिळायला हवं. हे पेंटींग तुम्ही ठेऊन घ्या. सध्या त्याची तुम्हाला काही किंमत मिळणार नाही. पण कोणी सांगावं एखाद्या दिवशी तुम्हाला हे पेंटींग ठेऊन घेतल्याचं समाधान मिळेल."

डॉक्टर कोत्रासनी कोणतेही पैसे घ्यायला नकार दिला. आटाने दिलेले शंभर फ्रँक त्यांनी आल्या आल्याच परत दिले होते. पण स्ट्रिकलँडने पेंटींग घेण्याचा आग्रह केला. नंतर ते व्हरांड्यात बरोबर गेले. तेथे बसलेले लोक स्पुंदून स्फुंदून रडत होते.

"आटा शांत हो, तुझे डोळे पुस," स्ट्रिकलँड म्हणाला. "फार काही होणार नाही. मी लवकरच येथून निघून जाईन."

"ते तुम्हाला घेऊन जाणार आहेत का?" तिने रडत रडत विचारलं.

त्यावेळी बेटांवर महारोग्यांसाठी अलग वसाहत केलेली नव्हती. महारोग्यांनी ठरवलं तर ते स्वतंत्र राहू शकत.

"मी डोंगरात जाऊन राहीन."

आटा त्याच्या समोर जाऊन उभी राहिली.

"ज्यांना जायचं असेल त्यांना जाऊ दे. पण मी तुम्हाला सोडणार नाही. तुम्ही माझे आहात आणि मी तुमची आहे. तुम्ही मला सोडून गेलात तर मी देवा शप्पथ जीव देईन."

ती जे बोलत होती ते अगदी ठामपणे बोलत होती. आता ती एक लहान आदिवासी मुलगी राहिली नव्हती, ती एका निश्चयी, पोक्त स्त्रीसारखी बोलत होती. तिच्यात विलक्षण बदल झाला होता.

"तुला माझ्या बरोबर राहण्याची गरज नाही. वाटल्यास तू पपीएतला परत जा. तुला दुसरा एखादा गोरा माणूस मिळेल. मुलांची काळजी तुझी म्हातारी घेईल. तिअर तुला परत आनंदाने नोकरीवर ठेवेल."

"तुम्ही जेथे जाल तेथे मी येणार."

स्ट्रिकलँडचा धीरोदात्तपणा क्षणभर कोसळला. त्याच्या डोळ्यात अश्रू दाटले आणि गालांवर ओघळले. नंतर तो नेहमीसारखा तिरकसपणे हसला.

"बायका फार विचित्र असतात," तो डॉक्टरांकडे वळून म्हणाला. "तुम्ही त्यांना कुत्र्यासारखं वागवा, हातदुखेपर्यंत मारा, पण तरीही त्यांचं तुमच्यावरचं प्रेम कमी होत नाही."

"तुम्ही डॉक्टरांना काय सांगत आहात? तुम्ही त्यांच्या बरोबर जाणार तर नाही?" आटाने संशयाने विचारलं.

"तुला हवं असेल तर मी राहीन."

आटा त्याच्या समोर गुडघे टेकून बसली आणि तिने त्याच्या हातांचं चुंबन घेतलं. स्ट्रिकलँडने डॉक्टरांकडे बघून मंद स्मित केलं.

"सरते शेवटी त्यांचा विजय होतो, त्यांच्या पुढ्यात तुमचं काही चालत नाही. गोरे, काळे, सावळे. सगळे शेवटी सारखेच असतात."

या भयंकर प्रसंगी औपचारिकरित्या शोकप्रदर्शन करणं डॉक्टरांना अप्रस्तुत वाटलं म्हणून ते निघून गेले. स्ट्रिकलँडने एका मुलाला त्यांच्या सोबतीला पाठवलं. डॉक्टर थोडावेळ थांबून मला म्हणाले.

"तो मला मुळीच आवडत नसे. त्याचं माझं जमत नसे हेही तुम्हाला सांगून झालं आहे. पण तरीही मानवजातीच्या वाट्याला आलेल्या महाभयंकर रोगाचा त्याने ज्या धैर्याने सामना केला त्याचे कौतुक मला वाटल्याखेरीज राहिलं नाही. तारावाओची वाट चालत असताना तेच विचार माझ्या मनात होते. जेव्हा तो मुलगा गेला तेव्हा मी त्याला सांगितलं की थोडी फार औषधं मी त्याला अधेमधे पाठवून देत जाईन. ती औषधं तो कितपत घेईल याची मला शंका होतीच. त्यांचा त्याला कितपत उपयोग होईल हीसुद्धा शंका जास्त सतावत होती. काही लागलं तर मला बोलावणं पाठव असा निरोप मी आटाला ठेवला. जीवन कठोर असतं आणि कोणाला काय भोगावं लागेल याची कधीच खात्री देता येत नाही. मोठ्या जड अत:करणाने मी पपीएतला पोचलो."

बराच वेळ आमच्यापैकी कोणीही बोललं नाही.

"पण आटाने मला कधीच निरोप पाठवला नाही," डॉक्टरांनी त्यांची गोष्ट पुढे चालू केली. "आणि बेटाच्या त्या भागात जाण्याची माझ्यावरसुद्धा परत वेळ आली नाही.

स्ट्रिकलँड विषयी मला काहीच समजत नव्हतं. आटा पपीएतला रंग आणि इतर साहित्य विकत घ्यायला एक दोनदा वेळा येऊन गेली हे माझ्या कानावर आलं. पण माझी आणि तिची गाठ पडली नाही. मी तारावाओला गेलो होतो त्याला दोन वर्ष होऊन गेली. मी त्या म्हाताऱ्या मुखियाला भेटायला पुन्हा एकदा तारावाओला गेलो. मी त्यांच्याकडे स्ट्रिकलँडची चौकशी केली. त्याला महारोग झाला आहे हे तोपर्यंत सगळयांना कळलं होतं. त्याच्या घरातील सगळी माणसं एक एक करून दुसरीकडे निघून गेली होती. फक्त आटा आणि त्यांची मुलं उरली होती. त्यांच्या मळयाकडे कोणीही फिरकत नसे. महारोगाविषयी स्थानिक आदिवासींच्या मनात प्रचंड भिती होती. पूर्वी अशा रोग्याला ठार मारलं जाई. कधी कधी गावातल्या

मुलांना तो रानात फिरताना दिसे. त्याला पाहिल्या बरोबर ती घाबरून पळून जात. कधी कधी आटा रात्री गावात येई आणि गावातल्या वाण्याला उठवून तिला हव्या त्या गोष्टी घेऊन जाई. तिला माहित होतं की स्थानिक लोक तिच्याकडेसुद्धा त्याच दृष्टीने बघत आणि त्यामुळे तिला टाळत असत. एकदा गावातल्या बायकांनी तिला ओढ्यामध्ये कपडे धुताना पाहिलं तेव्हा त्यांनी तिला दगड मारून पळवून लावलं. गावकऱ्यांनी तिला पुन्हा ओढ्यात कपडे धुऊ नको असं बजावलं. नाहीतर त्यांनी तिचं घर जाळून टाकलं असतं.''

''नीच कुठले.'' मी म्हणालो.

''*मे नॉन, माँ शेर मस्यु.* तसं नसतं महाराज, माणसं कुठूनही सारखीच असतात. भितीमुळे माणुसकी विसरली जाते. मी स्ट्रिकलँडला भेटायचं ठरवलं. म्हातारीला तपासून झाल्यानंतर मी एका मुलाला रस्ता दाखवायला सांगितलं. पण माझ्या बरोबर यायला कोणीच तयार नव्हतं. मला एकट्यालाच रस्ता शोधणं भाग पडलं.''

स्ट्रिकलँडचा शेतमळा जसा जवळ आला तसं डॉक्टरांना अस्वस्थ वाटायला लागलं. चालून चालून त्यांना उकडत होतं, तरीही त्यांच्या अंगात शिरशिरी आली. वातावरणात काही तरी विचित्र होतं. त्यामुळे ते थोडे थबकले. एक अदृश्य शक्ति त्यांना अडवत होती, त्यांचे पाय मागे खेचत होती. खाली पडलेले नारळसुद्धा कोणी उचलले नव्हते. सर्वत्र एक भयाण सन्नाटा पसरला होता. मळयात रान माजत चाललं होतं. अनादी काळातील अरण्यातून जो मळा निर्माण करण्यात कित्येक वर्षांचे अपार कष्ट खर्ची पडले होते तो मळा, ती प्राचीन सृष्टी पुनश्च गिळंकृत करत होती. त्या सर्व परिसरात एक आदिम वेदना व्यापून राहिली आहे असं त्यांना वाटलं. तिथल्या चिडीचूप निशब्द शांततेमुळे त्याला सर्वजण घर सोडून गेले असावेत असं वाटलं. पण त्यांना आटा दिसली. ती उकिडवी बसून काही तरी

शिजवत होती. बाजूला तिचा लहान मुलगा मातीत खेळत होता. तिने डॉक्टकरांना पाहिलं तरीही ती हसली नाही.

“मी स्ट्रिकलँडना बघायला आलो आहे.”

“मी आत जाऊन त्यांना सांगेन.”

ती व्हरांड्याच्या पायऱ्या चढून घरात गेली. डॉ. कोत्रास तिच्या पाठोपाठ गेले पण तिने केलेल्या इशाऱ्यामुळे बाहेरच थांबले. तिने दरवाजा उघडताच महारोग्यांना येणाऱ्या किंचीत गोडूस वासाचा पोट ढवळणारा भपकारा आला. आतून आटाचा आवाज त्यांनी ऐकला. स्ट्रिकलँडने काहीतरी उत्तर दिलं. पण त्याचा आवाज ओळखता येणार नाही इतका घोगरा झाला होता. डॉ. कोत्रासनी भुवया उंचावल्या. रोगाने स्ट्रिकलँडच्या स्वरयंत्रावर विपरीत परिणाम झाला होता. आटा बाहेर आली.

“ते तुम्हाला भेटायला तयार नाहीत. तुम्हाला परत जावे लागेल.”

डॉ. कोत्रासनी पुन्हा पुन्हा सांगून पाहिलं, पण ती त्यांना आत जाऊ द्यायला तयार नव्हती. डॉ. कोत्रासनी खांदे उडवले. एक क्षणभर विचार करून ते मागे फिरले. ती त्यांच्या बरोबर गेली. त्यांना वाटलं की तिच्या मनातसुद्धा त्यांना फुटवायचं असावं.

“मला करता येण्या सारखं काहीच नाही का?”

“जमलं तर रंग पाठवा, त्यांना दुसरं काही नको आहे.”

“त्यांना अजून चित्र रंगवता येतात?”

“त्यांनी आता घराच्या भिंतींवर चित्र रंगवायला घेतली आहेत.”

''मुली तुझ्यावर किती भयंकर परिस्थिती ओढवली आहे.''

शेवटी ती अस्फुट का होईना हसली. तिच्या डोळयातून माया ओसंडून जात होती. डॉ. कोत्रासना आश्चर्य वाटलं. तिच्या निस्सीम प्रेमामुळे ते भारावून गेले. अधिक बोलण्यासारखं त्यांच्याकडे काही नव्हतं.

''ते माझे आहेत.'' ती म्हणाली.

''तुझं दुसरं मूल कुठे दिसत नाही. मागच्या वेळेला आलो तेव्हा मी पाहिलं होतं.''

''ते गेलं. आम्ही त्या आंब्याखाली त्याला पुरलं.''

आटा त्यांच्या बरोबर चार पावलं चालत गेली. तिला परत फिरणं भाग होतं. डॉ. कोत्रासना वाटलं होतं त्याप्रमाणे गावकऱ्यांच्या नजरेला पडण्याच्या भितीमुळे ती जास्त पुढे गेली नाही. तू निरोप पाठवताच मी येईन हे त्यांनी पुन्हा पुन्हा बजावून सांगितलं.

## ५६

आणखी दोन वर्ष गेली. कदाचित तीन असतील. ताहितीत दिवस कसे जातात ते कळतच नाही. मोजदाद ठेवायला कठीण जातं. पण एके दिवशी स्ट्रिकलँड अखेरच्या घटका मोजतोय असा निरोप आला. आटाने पपीएतला टपाल घेऊन येणाऱ्याला सरळ डॉक्टरांकडे निरोप द्यायला बजावून ठेवले होते. पण जेव्हा निरोप आला तेव्हा डॉक्टर बाहेर गेले होते. निरोप कळला तेव्हा खूप रात्र झाली होती, म्हणून डॉक्टर पहाटेच निघाले. तारावाओला पोचायला दुपार झाली होती. त्यांना सात किलोमीटर पुन्हा एकदा पायी तुडवत जायचं होतं पण ती त्यांच्या आयुष्यातील ती शेवटची पायपीट होती. रस्त्यात झाडोरा खूप वाढला होता. आता या पुढे बरीच वर्ष तरी या रस्त्यावरून कोणी जाण्याची शक्यता दिसत नव्हती. रस्ता अधिकच दुस्तर झाला होता. वाटेत वारंवर अडथळे येत होते. कधी ओढ्याच्या पाण्याला खेच, तर कधी वाटेत माजलेलं तण. कधीकधी काटेरी झुडपातून मार्ग काढावा लागत होता. वाट काढताना डोक्यावर लटकणाऱ्या मधमाशांच्या पोळयांचीही काळजी घ्यावी लागत होती. कसं ही असो, पण त्या अंतर्भागातील शांतता मोठी विलक्षण होती.

शेवटी ते मोडकळीला आलेलं घर आलं आणि त्यांनी एक निश्वास टाकला. इथेसुद्धा ती असह्य शांतता होती. एक लहान मुलगा उन्हात खेळत होता. त्यांची चाहूल लागल्यावर तो पळून लांब गेला. डॉ. कोत्राना संशय होता की झाडामागे लपून तो पहात असावा. त्या मुलाच्या लेखी अनोळखी माणूस म्हणजे शत्रू. दरवाजा सताड उघडा होता. त्यांनी हाक मारली पण कोणीच ओ दिली नाही. तो आत गेला आणि त्यांनी दार ठोठावलं. त्यांनी आत पाऊल टाकलं. जी दुर्गंधी येत होती त्याने त्यांच्या पोटात ढवळून आलं. त्यांनी नाकाला रूमाल लावला आणि धीर करून आत पाऊल टाकलं. आत अंधूक प्रकाश होता. बाहेरच्या लख्ख उन्हातून आल्यामुळे सुरूवातीला त्यांना काही दिसत नव्हतं. थोडा वेळाने सरावल्यानंतर त्यांना आपण

कुठे आहोत तेच कळेना. एका अनोख्या विस्मयकारक विश्वात त्यांनी प्रवेश केला होता. प्रचंड वृक्षवेलींचे प्राचीन अरण्य आणि त्यात मुक्त विहार करणारे नग्न आदिवासी स्त्री पुरूष. नंतर त्यांना कळलं की ते भिंतींवर रंगवलेलं चित्र आहे.

"*माँ दयू*, अरे देवा मला वाटलं की उन्हाने डोळे दिपल्यामुळे मला भास होतोय." ते स्वत:शीच पुटपुटले.

त्यांना कोपऱ्यात काहीतरी हालचाल दिसली. आटा उकीडवी बसून मुकपणे रडत होती.

"आटा, आटा." त्यांनी हळूच हाक मारली.

तिचं लक्ष नव्हतं. तो घाणेरडा दर्प पुन्हा त्यांच्या नाकात घुसला. त्यांना भोवळ येईल असं वाटलं. त्यांनी चिरूट शिलगावला. त्यांची नजर अंधाराला सरावली. त्या भिंतींवर रंगवलेली चित्रं पाहून त्यांच्या अंगावर शहारे आले. त्यांना चित्रकलेतील काही कळत नव्हतं. पण त्या चित्रात असं काही विलक्षण होतं की त्याने त्यांना झपाटल्यासारखं झालं. जमिनी पासून छप्परापर्यंत निसर्गातील विवीध घटकांच्या वेगवेगळया रचना केल्या होत्या. त्यातील गूढ सौंदर्य केवळ अवर्णनीय होतं. त्यांच्या भावना उचंबळून आल्या. विश्वाच्या निर्मीतीचं रहस्य कळल्यामुळे एकाच वेळी ते आनंदित आणि भयकंपित झाले. निसर्गाच्या छुप्या रहस्यांचा शोध आपल्या प्राणांची बाजी लावून घेतलेल्या एका माणसाचं ते काम होतं. ज्या गोष्टींचं ज्ञान त्याला व्हायला नको होतं अशा गोष्टी त्याने पापापुण्याची पर्वा न करता जाणून घेतल्या होत्या. हे काही तरी अमानवी असावं अशी अंधूक शंका त्यांना आली.

"*माँ दयू*, अरे देवा हा तर प्रतिभेचा अस्सल आविष्कार!" त्यांच्या तोंडून नकळत शब्द बाहेर पडले.

त्यांची नजर दुसऱ्या कोपऱ्यातल्या गवती बिछान्याकडे गेली. तेथे त्यांना सगळे अवयव झडलेल्या स्ट्रिकलँडच्या शरीराची मुटकुळी दिसली. तो केव्हाच मेला होता. ते धीर करून जवळ गेले आणि त्यांनी त्या सडलेल्या देहाकडे वाकून पाहिलं. कोणतरी मागे उभं आहे असं त्यांना वाटलं आणि त्यांचा थरकाप उडाला. ती आटा होती. ती कधी उठून उभी राहिली ते त्यांना कळलं नव्हतं. ती त्यांच्या मागे उभी राहून ते जे बघत होते ते बघत होती.

“अरे बाप रे, तू मला एवढं घाबरवलंस.”

त्यांनी चार्ल्स स्ट्रिकलँड नावाच्या माणसाच्या त्या निष्प्राण देहाकडे पुन्हा एकदा पाहिलं आणि ते भितीने खचून मागे फिरले.

“तो तर आंधळा होता.”

“एक वर्ष झालं त्यांचे डोळे गेल्याला.”



Artist: Paul Gauguin

Title: D'où venons-nous? Que sommes-nous? Où allons-nous?

Where Do We Come From? What Are We? Where Are We Going?

Date: 1897, Medium: oil on canvas, Dimensions: 139.1 × 374.6 cm (54.8 × 147.5 in)

Current location: Museum of Fine Arts, Boston, Source: wikidata:Q890678

## ५७

तेवढ्यात मादाम कोत्रास आल्याने आमच्या गोष्टीत खंड पडला. वाऱ्याने तट्ट फुगलेल्या शिडाच्या जहाजासारखी ती आमच्या बैठकीत शिरली. तिचं व्यक्तिमत्व भारदस्त होतं. ती उंच आणि स्थूल होती. तिने घातलेल्या घट्ट कॉर्सेट मुळे तिचा लठ्ठपणा अधिक उठून दिसत होता. तिचं नाक बाकदार होतं. एकावर एक आलेल्या तीन हनुवट्यांनी तिची मान झाकली गेली होती. उष्ण कटीबंधातील लोकांत असते तशी मरगळ अजून तिच्या अंगात आलेली दिसत नव्हती. किंबहुना थंड प्रदेशातील लोकांपेक्षा ती जास्तच उत्साही दिसत होती. ती प्रचंड बडबडी असावी. कारण आल्याबरोबर तिने त्या दिवसभरातल्या घटना आणि त्यावरची तिची मतं घडाघडा सांगायला सुरवात केली. आम्ही जे बोलत होतो ते कुठल्या कुठे मागे पडलं.

डॉ. कोत्रास माझ्याकडे वळून म्हणाले.

“स्ट्रिकलँडने दिलेलं पेंटींग अजून माझ्याकडे आहे. तुम्हाला बघायचं आहे का?”

“अलबत.”

आम्ही उठलो. त्यांच्या मागोमाग व्हरांड्यातून जाताना आम्ही त्यांच्या बागेतील रंगीबेरंगी फुलं पाहण्यासाठी थांबलो.

“स्ट्रिकलँडने पाना फुलांच्या ज्या विलक्षण आकारांचं त्याच्या घराच्या भिंतीवर चित्रण केलं होतं ते बरेच दिवस माझ्या मनात घोळत होतं.” डॉक्टर विचार करून म्हणाले.

माझ्याही मनात तोच विचार होता. स्ट्रिकलँडने स्वत:चं संपूर्ण अस्तित्वच त्यात पणाला लावलेलं होतं. ही त्याची शेवटची संधी आहे हे त्याला ठाऊक होतं. त्याला जीवनासंबंधी जे सांगायचं होतं ते सगळं त्याने त्याच्या कलाकृतीत ओतलं होतं. त्याला जे समाधान हवं होतं ते त्याला मिळालं असावं याची मला खात्री होती. त्याला ज्या शक्तिने झपाटलं होतं त्यातून तो मुक्त होऊन त्याचा अतृप्त आत्मा शेवटी शांत झाला असावा.

जीवनाचा उद्देश पूर्ण झाल्यावर आलेल्या मृत्युचा स्वीकार त्याने आनंदाने केला असावा.

“चित्राचा विषय काय आहे?”

“मला सांगता येणार नाही. तो विलक्षण आणि अद्‌भूत आहे. या विश्वाची सुरवात कशी झाली असावी याची कल्पना त्यात केली आहे. एडनची बाग, आदम आणि इव्ह. *क्वी सेज* - किंवा तसंच काही तरी. मानवाकृतीतील ते एक काव्य आहे.

स्त्री पुरूष आणि त्याचं निसर्गप्रेम, कामवासना आणि उदात्तीकरण, सौंदर्य आणि क्रौर्य. नग्नतेतील आदिम सहज-प्रवृत्ती पाहिली की भिती वाटू लागते कारण ते आपलंच प्रतिबिंब असतं."

"अवकाश आणि काळाची अनंतता. त्याची चित्रं पाहिल्यानंतर माझ्या रोजच्या पाहाण्यातल्या ताड-माड, वड, केळी, पळस यासारख्या वृक्षवल्लींचे आकार आणि रंग मला वेगळेच दिसायला लागले. एवढंच नव्हे तर गंधही बदलले. चित्र काढताना कॅनव्हासवर उतरवलेला आकार आणि रंग मला प्रत्येक वेळी वेगळा वाटतो ही किमया अद्भूतच म्हटली पाहिजे. काही तरी दैवी शक्तिचा प्रादुर्भाव झाल्याशिवाय हे शक्य होणार नाही."

डॉ. कोत्रासनी खांदे उडवले आणि ते हसले.

"तुम्ही मला हसाल. मी जडवादी आहे. त्यात माझा हा असा अवतार, जाड्या ढोल. काव्यातील तरलता माझ्या तोंडी शोभत नाही. पण मी एवढा भारावून जाईन असं चित्र, कलाकृती मी या पूर्वी पाहिली नव्हती. *तेने*... एक मिनीट थांबा. मी रोममध्ये सिस्टीन चॅपेल बघायला गेलो होतो तेव्हा माझ्या मनात अशाच भावना आल्या होत्या. तेव्हासुद्धा ज्या कलाकाराने त्या भव्य घुमटावर चित्रं रंगवली त्या कामाच्या भव्यतेतील दिव्यत्त्वाच्या जाणीवेने माझा थरकाप उडाला होता. त्याच्या समोर माझं अस्तित्व क्षुल्लक होतं. पण मायकेल अँजेलोच्या थोरवीची आपल्याला कल्पना असते त्यामुळे आपण एवढे दचकून जात नाही. पण तारावाओच्या जंगलातील, नागरी संस्कृती पासून हजारो मैल दूर, एका आदिवासीच्या झोपडीत तुम्हाला असं काही बघायला मिळतं तेव्हा त्याचा तुम्हाला केवढा धक्का बसतो. मायकेल अँजेलो हाती पायी तरी धड होता, चर्चचा त्याला पाठिंबा होता. पण इथे ज्याच्या हाताची बोटं झडून गेली आहेत, डोळयांच्या खाचा झाल्या आहेत, समोर

मृत्यु उभा ठाकला आहे, सर्वांनी ज्याला बहिष्कृत केलं आहे अशा कलाकाराने तेवढीच भव्य आणि दिव्य कलाकृती निर्माण केली होती या विचाराने तुमचा थरकाप उडतो. तुमचं क्षुल्लक अस्तित्व अर्थहीन होऊन जातं. त्यामुळेच त्या कलाकृती नष्ट झाल्या तेव्हा मला आश्चर्य वाटलं नाही.''

''नष्ट झाल्या?'' मी ओरडलो.

''*मे उई*- होय. तुम्हाला माहित नव्हतं?''

''कसं ठाऊक असणार? या कामाविषयी मी फारसं काही ऐकलं नव्हतं. पण असं काही असलंच तर ते एखाद्या खाजगी संग्राहकाच्या हाती पडलं असेल असं मला वाटत होतं. अजून तरी स्ट्रिकलँडच्या पेंटींगची अधिकृत यादी कोणी बनवलेली नाही.''

''तो जेव्हा आंधळा झाला तेव्हा तो त्या दोन खोल्यात जाऊन त्याने रंगवलेल्या भित्तीचित्रांकडे तासन् तास त्याच्या दृष्टीहीन डोळयांनी बघत बसायचा. कदाचित त्याला आयुष्यात जे दिसलं नसेल ते त्याला आता दिसत असेल. आटा म्हणाली की त्याच्या नशीबी जे आलं होतं त्याबद्दल त्याची कसलीही तक्रार नसायची. त्याचा धीर कधीही सुटला नव्हता. शेवटपर्यंत त्याचं मन शांत होतं. पण त्याने तिच्याकडून एक वचन घेतलं होतं की त्याला पुरून झाल्यानंतर - मी तुम्हाला सांगितलं होतं का की त्याची कबर मी माझ्या हातांनी खोदली. गावातील कोणीही त्या संसर्गीत घराच्या जवळ यायला तयार नव्हतं. आटा आणि मी मिळून दोघांनी त्याला पुरलं. तीन परेओ एकत्र शिवून केलेलं प्रेतवस्त्र पांघरून त्याला आंब्याच्या झाडाखाली पुरलं. त्याने तिच्याकडून वचन घेतलं होतं की त्याला पुरून झाल्यानंतर ती त्यांचं घर संपूर्णपणे जाळून टाकेल, एक काडीही शिल्लक राहिली नाही याची खात्री करून नंतरच तेथून जाईल.''

थोडा विचार करून झाल्यावर मी म्हणालो:

“तो शेवटपर्यंत बदलला नाही.”

“तिला घर जाळण्यापासून परावृत्त करणं हे माझं कर्तव्य आहे असं मला वाटलं.”

“तुम्ही जे सांगितलं त्या नंतरसुद्धा तुम्हाला असं वाटलं.”

“होय. कारण ती झोपडी एका प्रतिभावान कलाकाराची असामान्य कलाकृती आहे याची मला कल्पना होती. जगाला या कलाकृती पासून वंचित ठेवण्याचा कोणताही हक्क आपल्याला पोचत नाही. पण आटा माझं ऐकायला तयार नव्हती. त्या रानटी कृत्याचा साक्षीदार होण्याची माझी इच्छा नव्हती. तिने ते जाळून टाकलं हे मला मागाहून कळलं. तिने लाकडी तक्तपोशी आणि गवती चटयांवर पॅराफिन टाकलं आणि त्याला आग लावली. थोड्याच वेळात आगीच्या ज्वाला भडकल्या आणि त्या आगीत त्या महान कलाकृतींचा मागमूसही शिल्लक राहिला नाही.”

“मला वाटतं स्ट्रिकलँडला आपण महान कलाकृती निर्माण केली आहे याची कल्पना असावी. त्याला जे हवं होतं ते त्याने मिळवलं होतं. त्याचं आयुष्य सफल झालं होतं. त्याने आपल्या प्रतिभेने एक वेगळं जग निर्माण केलं. गर्वाने आपल्या निर्मितीकडे एकदा पाहून झाल्यानंतर त्याने ते तुच्छतेने नष्ट केलं.”

“माझ्याकडचं पेंटींग तर तुम्हाला दाखवतो.” डॉ. कात्रोस म्हणाला.

“आटा आणि त्या मुलाचं काय झालं?”

“ते मार्क्केजला गेले. तेथे तिचे काही नातेवाईक राहतात. मी ऐकलंय की तो मुलगा कॅमेरूनच्या जहाजावर काम करतो. लोक म्हणतात की दिसायला तो अगदी त्याच्या वडिलांसारखा आहे.”

व्हरांड्यातून कन्सल्टींग रूमकडे जाणाऱ्या दरवाजात ते थबकले आणि हसत म्हणाले, “हे एक फळांचं चित्र आहे. डॉक्टरच्या कन्सल्टींग रूममध्ये लावण्यात तसा अर्थ नाही. पण माझी बायको मला ते दिवाणखान्यात लावू देत नाही. तिच्या मते ते अश्लील आहे.”

“फळांचं चित्र आणि अश्लील!” मी आश्चर्याने ओरडलो.

आम्ही आत गेल्यावर ताबडतोब माझं त्या चित्राकडे लक्ष गेलं. मी ते बराच वेळ बघत होतो.

त्या चित्रात आंबे, केळी आणि संत्र्यांचा एक ढीग दाखवला होता. पहिल्या दृष्टीक्षेपात ते एक सामान्य निरागस चित्र वाटतं. पोस्ट-इंप्रेशनीस्टांच्या प्रदर्शनात सर्वसामान्य माणसाला ते चांगलं वाटलं असतं पण पोस्ट-इंप्रेशनीस्टांचं म्हणता येईल असं एखादं वैशिष्ट्य काही त्यात सापडलं नसतं. पण प्रदर्शन बघून झाल्यानंतरही कदाचित ते लक्षातही राहिलं असतं, पण का लक्षात राहिलं ते सांगता आलं नसतं. ते अगदिच विसरणं कठीण होतं.

त्यात वापरलेले रंग अगदी अनोखे होते. विशेषत: लेपिझ लझुली – फिरदोसीच्या रत्नप्रभेची आठवण करून देणारा निळा रंग. त्या रंगाने जागृत होणाऱ्या भावना शब्दाने वर्णन करून सांगणं कठीण होतं. मध्येच सडलेल्या मांसासारख्या दिसणारा जांभळा रंग – रोमन सम्राट हेलिओगॅब्युलसच्या दुष्कृत्यांची आठवण करून देणारा – आणि लाल रंगांच्या असंख्य छटा, चेरीची

आठवण करून देणाऱ्या लालचुटुक रंगाने तर इंग्लंडमधील नाताळ, बर्फवृष्टी आणि मुलांच्या ओसंडून वाहणाऱ्या उत्साहीची आठवण यावी. तर मध्येच बर्फासारखा, कबुतराच्या छातीसारखा वरखाली होणारा, शुभ्र पांढरा. डोंगरातून वाहत येणाऱ्या निर्झराच्या हिरव्या रंगात बुडलेला जर्द पिवळा. अॅडमने इव्हला दिलेल्या सफरचंदाची आठवण करून देणारी ही पॉलिनेशियाच्या मळयात बहरलेली रसाळ फळं. त्यांची चव चाखणाऱ्याला एक मोठा धोका अजाणता पत्करावा लागला असता. फळ खाणारा एक तर देवत्वाला जाऊन पोचला असता नाही तर पशुत्वाला. जाणतअजाणता असा धोका पत्करण्यामधेच मनुष्यपण असतं. ज्ञानवृक्षावरील चांगलं फळ कोणतं आणि वाईट फळ कोणतं हे चाखल्या शिवाय कसं कळणार.

चित्र बघून झाल्यावर मी बाजूला वळलो. स्ट्रिकलँडबरोबर त्याची गुपितंही त्याच्या कबरीत गाडली गेली आहेत असं मला वाटलं.

"*व्होयाँ, रेने, मॉन अॅमी,* रेने मी आले," मादाम कात्रोसची मोठ्याने मारलेली हाक ऐकू आली. "इतका वेळ तिकडे काय करत आहात? *अॅपरीतीफ* तयार आहेत. क्विनक्विना ड्युबोनेटचा एक एक पेला घ्यायला येता का, मस्युना विचारा."

"*व्हॉलंतीर, मादाम.* मी आलोच," मी उत्तर दिलं आणि व्हरांड्यात गेलो.

माझी तंद्री भंग पावली.



Paul Gauguin, Fruits, 1888

Oil on canvas, 58x43 cm

Pushkin Museum, Moscow

## ५८

ताहितीतून जायची माझी वेळ आली. बेटावरच्या प्रथेप्रमाणे ज्या व्यक्तिंशी माझा परिचय झाला होता आणि संबंध आला होता त्या सर्वांनी मला काहीना काही तरी अहेर केला. नारळाच्या झावळयांनी विणलेल्या टोपल्या, गवती चटया, शोभेचे पंखे. तिअरने मला तीन मोती आणि स्वत:च्या गुबगुबीत हातांनी केलेला पेरूचा गोड मुरांबा दिला होता. वेलिंग्टनहून सॅन फ्रॅन्सिस्कोला टपाल घेऊन जाणाऱ्या बोटीचा ताहितील चोवीस तासांचा मुक्काम आटोपल्यावर परत जाताना भोंगा वाजवला. तिअरने मला तिच्या भरदार छातीशी घट्ट मिठी मारली आणि तिचे

लालचुटुक ओठ माझ्या ओठांवर टेकले. तिच्या डोळ्यात पाणी तरळलं. आमची बोट लगून मधून बाहेर पडली. खडकांच्या रांगांमधून मोठ्या कौशल्याने सुकाणू हाकत खुल्या समुद्रात आली आणि मला दाटून आलं. वातावरणात अजूनही जमिनीवरचा सुखद सुगंध दरवळत होता. ताहिती खूप दूर आहे. मला कधीही परत यायला मिळणार नाही याची मला खात्री होती. माझ्या आयुष्यातील एक प्रकरण संपलं आणि मला अटळ मृत्यु जवळ आल्यासारखं वाटलं.

मी एका महिन्यात लंडनला पोचलो. माझी निकडीची कामं आटोपली. मिसेस स्ट्रिकलँडला तिच्या नवऱ्याच्या आयुष्यातील शेवटच्या वर्षांची माहिती जाणून घेण्यात रस असेल असं मला वाटलं. म्हणून मी तिला पत्र लिहीलं. युद्धापूर्वी बऱ्याच वर्षात आमची भेट झाली नव्हती म्हणून टेलीफोनच्या डिरेक्टरीतून मी तिचा पत्ता मिळवला. तिने भेटीची वेळ दिली. मी कॅम्पडेन हिलवरच्या तिच्या छोट्या घराचा पत्ता शोधून काढला. ती आता साठ वर्षांची झाली होती, पण तिचं वय दिसून येत नव्हतं. कोणालाही ती फार तर पन्नास एक वर्षांची वाटली असती. तिचा चेहेरा लहान होता, त्यावर फारशा सुरकुत्या नव्हत्या. अशा चेहेऱ्याच्या माणसांचं वय दिसून येत नाही. त्यामुळे ती तरूण असताना खूप सुंदर असावी असं वाटायचं. तिचे फारसे न पिकलेले केस तिने व्यवस्थित विंचरले होते. तिने घातलेला काळा गाऊन आधुनिक फॅशनचा होता. तिची बहीण मिसेस मॅक-अँड्र्यु तिच्या नवऱ्यापेक्षा दोन वर्ष जास्त जगली होती आणि त्यानंतर तिने तिचा पैसा मिसेस स्ट्रिकलँडच्या नावे केला होता ते ऐकल्याचं मला आठवलं. तिच्या घराची सजावट आणि दरवाजा उघडणाऱ्या शिडशिडीत नोकराणीला बघून तिचं एकंदरीत बरं चालंल असावं असं दिसत होतं.

नोकराणीने मला बैठकीच्या खोलीत नेलं तेव्हा तेथे एक पाहुणा अगोदरच बसला होता. तो कोण आहे हे मला कळलं तेव्हा मला त्याच वेळी बोलावण्यात तिचा काही तरी हेतू असला पाहिजे याचा सुगावा लागला. तेथे आलेल्या अमेरीकन

पाहुण्याचं नाव व्हॅन ब्युश्च टेलर असं होतं. मिसेस स्ट्रिकलँडने हसत हसत त्याची माहिती मला दिली.

“आम्ही इंग्लीश लोक अगदी बावळट असतो. मला माफ करा हं, मला तुमच्याबद्दल यांना थोडं सांगायचं आहे.” असं बोलून ती माझ्याकडे वळली. “मि.व्हॅन ब्युश्च टेलर हे एक मोठे अमेरीकन समीक्षक आहेत. यांनी लिहीलेली पुस्तकं आपण जोपर्यंत वाचत नाही तोपर्यंत आपल्या शिक्षणाला काही अर्थ नाही. यांना चार्लीवर काही तरी लिहायचं आहे. त्यासाठी ते माझी मदत मागायला आले आहेत.”

मिस्टर व्हॅन ब्युश्च टेलर हा एक बारीक चणीचा, हडकुळा आणि टकल्या माणूस होता. त्याच्या निस्तेज चेहेऱ्यावर सुरकुत्या होत्या. त्याच्या मोठ्या डोक्यापुढे त्याचा चेहेरा लहान दिसत होता. तो शांत आणि अतिशय नम्र होता. त्याच्या बोलण्यात न्यु इंग्लंडची झाक होती. त्याच्या आविर्भावावरून तो अगदी शांत प्रवृत्तीचा असावा असं दिसत होतं. हा का बरे स्ट्रिकलँडवर लिहीण्याच्या फंदात पडला असावा असा मला प्रश्न पडला. तिने ज्या हळूवारपणे तिच्या नवऱ्याचा उल्लेख केला होता त्याने माझं कुतुहल चाळवलं. त्या दोघांचं बोलणं चालू असताना आम्ही ज्या बैठकीच्या खोलीत बसलो होतो त्या वरून मी एक नजर फिरवली. काळाप्रमाणे मिसेस स्ट्रिकलँड बदलली होती. ॲशले गार्डनमधल्या तिच्या घराच्या सजावटीत वापरलेला मॉरीस वॉल-पेपर येथे नव्हता, क्रेटनचे फुलाफुलांचे पडदे गायब झाले होते, भिंतीवर फ्रेम करून लावलेले अरुंडेल प्रिंट नव्हते. त्या ऐवजी तिच्या घराच्या भिंतींना छानपैकी रंग लावलेला होता. तिने घराला लावलेल्या रंगाची छटा प्रचलित व्हायला प्रशांत महासागराच्या दक्षिणेला असलेल्या हजारो मैलावरील एका लहानशा बेटावरचा एक चित्रकार कारणीभूत

झाला होता याची तिला कल्पना होती का असा मला प्रश्न पडला. पण त्या प्रश्नाचं उत्तर तिने स्वत:च दिलं.

“काय सुंदर उशा आहेत या,” मि.व्हॅन ब्युश्च टेलर म्हणाला.

“तुम्हाला आवडल्या का?” ती हसत म्हणाली. “बाक्स्ट या रशियन डिझाईनरच्या आहेत.”

आणखी एक गोष्ट होती. बर्लिनच्या एका चित्रविक्रेत्याने छापलेले स्ट्रिकलँडच्या चित्रांचे फ्रेम केलेले प्रिंट भिंतीवर लावलेले होते.

“तुम्ही त्या चित्रांकडे बघत आहात का,” माझ्या नजरेकडे बघत ती म्हणाली. “अर्थात मूळ चित्रं काही मला परवडण्यासारखी नाहीत. कमीत कमी प्रिंट तरी आहेत. प्रकाशकांनी आपण होऊन मला पाठवून दिले. आता त्यावरच मी समाधान मानायचं ठरवलं आहे.”

“घरात असे प्रिंट फ्रेम करून लावल्यावर किती बरं वाटतं.” मि.व्हॅन ब्युश्च टेलर म्हणाला.

“मुळात ते किती सुंदर आहेत.”

“माझ्या मते शोभादायकता हे कलेच्या महानतेचं प्रमुख लक्षण आहे.” मि.व्हॅन ब्युश्च टेलर म्हणाला.

भिंतीवरच्या चित्रात एक नग्न स्त्री मांडीवरच्या मुलाला दुध पाजत होती, त्यांच्या बाजूला गुडघे टेकून असलेल्या मुलगी तिच्या हातालं फुल दुसऱ्या एका मुलाला दाखवत होती. एक सुरकुत्या पडलेली जख्खड म्हातारी त्यांच्याकडे बघत होती. स्ट्रिकलँडने कुटुंबव्यवस्थेचे पावित्र्य त्याच्या दृष्टीतून त्यात दाखवलं होतं. ते

चित्र काढण्यासाठी त्याने तारावाओमधल्या आपल्या घराचा उपयोग केला असावा. ती स्त्री आणि मूल म्हणजे आटा आणि त्याचा मोठा मुलगा. मिसेस स्ट्रिकलँडला हे कितपत माहित असेल असा प्रश्न मला पडला.

संभाषण पुढे चालू राहिलं. मिस्टर व्हॅन ब्युश्च टेलरने अडचणीचे वाटतील असे विषय ज्या खुबीने टाळले त्याला तोड नव्हती. एकही असत्य शब्द न बोलता मिसेस स्ट्रिकलँड आडवळणाने तिचे आणि नवऱ्याचे संबंध कसे चांगले होते हे ज्या कौशल्याने सुचवत होती त्याला दाद दिलीच पाहिजे. सरते शेवटी मिस्टर व्हॅन ब्युश्च टेलर जायला उठला. यजमानीण बाईंशी आदराने वाकून त्याने हस्तांदोलन केलं. औपचारीकतेचं काटेकोर पालन करत त्याने आभार मानले आणि तो निघून गेला.

''तुम्हाला त्याचा कंटाळा तर आला नाही ना,'' दरवाजा बंद झाल्यावर तिनं विचारलं. ''कधी कधी याचा खूप त्रास होतो, पण काय करणार, चार्ली विषयी जेवढी माहिती मला देता येईल ती देणं मला भाग आहे. एका प्रतिभावान कलाकाराची पत्नी म्हणून ते माझं कर्तव्यच आहे.''

तिने माझ्याकडे प्रेमाने पाहिलं. वीस वर्षांपूर्वी तिचे डोळे जेवढे सुंदर आणि प्रेमळ होते तेवढेच आजही होते. ती मला मूर्ख तर बनवत नसावी असा मला संशय आला.

''तुम्ही तुमचा व्यवसाय बंद केला असेलच, नाही का.'' मी विचारलं.

''केव्हाच,'' तिने एका क्षणात उडवून लावलं. ''तो व्यवसाय मी वेळ घालवायचा एक छंद म्हणून करत होते. माझ्या मुलांनी सांगितलं की तू स्वत:ला उगाच खूप त्रास करून घेत आहेस. त्यांनी मला तो व्यवसाय विकून टाकायला सांगितलं.''

संसार चालवण्यासाठी आपण कधीतरी कष्ट उपसले होते ही तिला कमीपणा आणणारी गोष्ट ती पूर्णपणे विसरून गेली होती. उच्चकुलीन स्त्रीने दुसऱ्याच्या कमाईवर जगणं यातच तिची इज्जत असते असं तिला मनापासून वाटत होतं.

"आता मुलं आली आहेत," ती म्हणाली. "त्यांच्या वडिलांच्या आठवणी त्यांना तुमच्या तोंडून ऐकायला फार आवडेल. रॉबर्ट तुम्हाला आठवतो ना? मिलीटरी क्रॉससाठी त्याच्या नावाची शिफारस झाली आहे हे सांगायला मला किती बरं वाटतंय."

ती दरवाजात गेली आणि तिने त्यांना बोलावलं. खाकी वर्दीतील एक उंच, देखणा, रूबाबदार तरूण आत आला. त्याचे कपडे अगदी कडक इस्त्रीचे असले तरी त्याचे डोळे लहानपणी होते तसे निर्मळ होते. त्याच्या मागोमाग त्याची बहिण आली. तिच्या आईची आणि माझी ओळख झाली तेव्हा ती ज्या वयाची होती तेवढ्याच वयाची ती असावी. ती दिसायलाही तिच्या सारखीच होती.

"मला वाटतं तुम्हाला फारसं आठवत नसेल," मिसेस स्ट्रिकलँड अभिमानाने म्हणाली. "माझी मुलगी आता मिसेस रोनाल्डसन आहे. तिचा नवरा गनर्समध्ये मेजर आहे."

"त्यांना शिपाईगिरी एवढी आवडते की ते पक्के शिपाईगडी होण्याच्या मार्गावर आहेत. म्हणूनच ते आतापर्यंत फक्त मेजरच राहिले." मिसेस रोनाल्डसन आनंदाने म्हणाली.

ती सैन्याधिकाऱ्याशीच लग्न करेल अशी मला केव्हापासून अटकळ होती. तसं होणं अटळ होतं. अधिकाऱ्याच्या पत्नीत असावे लागतात ते सर्व गुण तिच्यामध्ये

होते. ती मनमिळाऊ, चारचौघात वावरणारी होती. पण आपण इतरांसारखे नाही हे ती लपवू शकत नसे. रॉबर्ट आनंदी आणि खेळकर होता.

“तुम्ही आलात तेव्हा मी नशीबाने लंडनमध्ये आहे. मला फक्त तीन दिवसांची रजा मिळाली आहे.” तो म्हणाला.

“तो परत रूजू व्हायला तळमळत आहे,” त्याची आई म्हणाली.

“मला कबूल करायला हरकत नाही. आघाडीवर माझा वेळ मजेत जातो. माझे भरपूर दोस्त आहेत. तेथलं जीवन अगदी उत्कृष्ट असतं. अर्थात युद्ध आणि तशा गोष्टी म्हटल्या की त्या केव्हाही भयंकरच असतात. पण त्यात माणूस तावून सुखालून निघतो आणि त्याच्यातील सर्वोच्च गुण बाहेर येतात हे नाकरण्यात अर्थ नाही.”

त्यानंतर चार्ल्स स्ट्रिकलँडची जी माहिती मला ताहितीत कळली होती ती सर्व माहिती मी त्यांना सांगितली. आटा आणि तिच्या मुलांबद्दल त्यांना सांगण्यची आवश्यकता आहे असं मला वाटलं नाही. पण बाकी सगळं जितक्या अचूकपणे मला सांगता आलं तितकं मी सांगितलं. त्याच्या शोचनीय मृत्युबद्दल सांगून झाल्यानंतर मी थांबलो. एक दोन मिनीटं आम्ही शांत होतो. नंतर रॉबर्ट स्ट्रिकलँडने काडी ओढून सिगारेट शिलगावली.

“दैवगती किती विचित्र असते. देवाघरच्या न्यायाला उशीर होतो पण जेव्हा न्याय मिळतो तेव्हा हिशेब पूर्णपणे चुकता होतो.”

हे अवतरण पवित्र बायबल मधलं असावं या समजाने मिसेस स्ट्रिकलँड आणि मिसेस रोनाल्डसन या मायलेकींची नजर जमिनीवर खिळली होती. रॉबर्ट स्ट्रिकलँडचाही तसा समज नसेलच याची मला खात्री नव्हती. मला स्ट्रिकलँडला

आटापासून झालेल्या मुलाची त्यावेळी का आठवण झाली ते सांगता येणार नाही. तो एक सळसळत्या उत्साहाचा आनंदी तरूण आहे असं मला ताहितीत समजलं होत. तो ज्या जहाजावर नोकरी करत होता त्याच्या डेकवर तो फक्त डुंगरी-अर्धी विजार घालून उभा आहे असं चित्र मी मनातल्या मनात रंगवलं. रात्रीच्या वेळी जहाज मंद वाऱ्यावर संथपणे मार्गक्रमण करत असताना खलाशी वरच्या डेकवर गोळा झालेले आहेत. कॅप्टन पाईप ओढत आरामखुर्चीत पहुडला आहे. त्या वेळी कॉन्सर्टिनाच्या खरखर करणाऱ्या संगीताच्या तालावर तो मुलगा स्वत:ला पूर्णपणे झोकून देऊन मुक्तपणे नृत्य करत आहे. डोक्यावरच्या काळयाशार आकाशात तुरळक तारे लुकलुकत आहेत, सभोवती प्रशांत महासागराचा अथांग विस्तार पसरला आहे.

बायबल मधलं एक अवतरण माझ्या ओठांवर आलं पण मी स्वत:ला आवरलं. कारण माझ्यासारख्या पामराने धर्मगुरूंच्या राखीव कुरणात प्रवेश केला असता तर त्यांना ती इश्वरनिंदा झाल्यासारखं वाटलं असतं. माझे हेन्री काका गेले सत्तावीस वर्ष व्हिस्टेबलचे पाद्री आहेत. ते म्हणायचे की सैतान देखील फायदा होणार असेल तर बायबलमधील अवतरण द्यायला कमी करणार नाही. ज्या काळी एतद्देशीय माणसं पैशाला पासरी मिळत असत ते दिवस अजून त्यांच्या लक्षात आहेत.




Paul Gauguin

BIRTH 7 Jun 1848 Paris, City of Paris, Île-de-France, France

DEATH 8 May 1903 Atuona, Marquesas Islands, French Polynesia

BURIAL Atuona Cemetery Atuona, Marquesas Islands, French Polynesia

Sculpture of Oviri, bronze, atop the grave of Paul Gauguin.

Notes: Three plaster casts of the Oviri figure were made, of which one now belongs to the Musée départemental du Prieuré in Saint-Germaine-en-Laye. This was used to make a series of bronze casts, one of which was placed on Gauguin's grave in Atuona. Source: Wikipedia.

## उपसंहार

ह्या कादंबरीत मॉमने सत्य, ऐकीव आणि कल्पित यांचे अद्भूत मिश्रण केले आहे. विकीपिडियावर पॉल गोगँचे संक्षिप्त चरित्र उपलब्ध आहे. या कादंबरीत मॉमने गोगँच्या चरित्रापासून खूपच फारकत घेतली आहे हे खरं असलं तरी विकीपिडिया नियमित अपडेट होतो आणि मॉमला 1919 साली बऱ्याच अंशी ऐकीव माहितीवर अवलंबून रहावे लागले याचे भान वाचकांनी ठेवले पाहिजे.

मॉम जेव्हा एखाद्या चित्रकाराचा किंवा चित्राचा उल्लेख करतो तेव्हा त्याचा उद्देश कादंबरीतील त्याचे प्रतिपादन अधिक स्पष्ट करणे हा असतो. मॉमने उल्लेखल्लेय् चित्रकारांचा आणि चित्रांचा परिचय असल्याशिवाय त्याने उपमा, उत्प्रेक्षा आणि व्यंजना हा प्रकार किती प्रभावीपणे हाताळला आहे हे कळणे कठीण जाईल. मूळ कादंबरीत फोटो दिलेले नव्हते. पण आता इंटरनेटमुळे जिज्ञासू वाचकांना ते संदर्भ बघणे शक्य आहे. त्यात माझीही थोडीशी भर घालून विकीपीडिया पब्लिक डोमेनवरून मी ब्लॉगवर उद्धृत केले आहेत. माझी भर कोणती आणि मॉमने मूळ उल्लेख केलेले कोणते हे कादंबरी वाचताना सहज कळून येईल. पेंटीग देताना मी त्याचा कोणताही खुलासा किंवा टीप न दिलेली नाही, ती आता कादंबरीच्या शेवटी देत आहे.

1. कादंबरीतील कथानकाचा काळ हा साधारण एकोणीसाव्या शतकाचा उत्तरार्ध (1870 ते 1900) आणि लेखनकाळ हा 1919 हा आहे हे कादंबरीतील आशयाचं आकलन होण्यासाठी अतिशय महत्वाचं आहे.

2. प्रकरण 2 – मला वेलाक्वेजपेक्षा (1599-1660) एल ग्रेको (1541-1614) आवडतो – यात एल ग्रेकोची पेंटींग पाहिली की लक्षात येईल की एल

ग्रेको, वेलास्क्वेझपेक्षा मागच्या पीढीतील असूनही त्याची शैली कशी आधुनीकतेकडे झुकणारी होती. पिकासोलासुद्धा ओल्ड मास्टर्सपैकी एल ग्रेको सगळयात जास्त आवडायचा. पिकासोच्या काही पेंटींगवर एल ग्रेकोचा प्रभाव जाणवतो. एल ग्रेकोचा प्रभाव तीनशे वर्षानंतर उदयाला आलेल्या नवचित्रकारांवर दिसून येतो यातच त्याचं महानपण आहे. पिकासोवर एल ग्रेको प्रमाणे गोगँचाही खूप प्रभाव होता. पिकासोच्या *Les Demoiselles d'Avignon* (1907) या सुप्रसिद्ध पेंटींगवर गोगँचा प्रभाव दिसून येतो.

3. प्रकरण 19 - स्ट्रोव्हला ब्लांशला बघून शेदाँच्या पेंटींगची आठवण होते कारण शेदाँची *बेनेडिसिते* आशिर्वाद या मालिकेतील घरगुती प्रसंगावर आधारित पेंटींग.

4. प्रकरण 39 – येथे वेलास्क्वेजचं इनोसंट एक्स – यथार्थदर्शन शैलीतील पेंटींग. वेलास्क्वेजने राजे महाराजे, पोप वगैरे उच्चपदस्थांची पेंटींग केलेली आहेत. वेलास्क्वेज हा त्या काळचा एक महान चित्रकार होताच पण दोनशे वर्षांनीही तीच शैली घोटवून पेंटींग करण्यात नवनिर्मीती, नाविन्य ते कोणते असं मॉमला येथे सुचवायचं आहे. शेदाँची (1791) पेंटींग म्हणजे आपल्या य. गो. जोशींच्या शैलीत 1970 मध्ये सुद्धा लिहीण्यासारखं आहे.

5. प्रकरण 42 – एदुआर्द मानेची लंशन ऑन ग्रास आणि ऑलिंपिया या पेंटींगवर अश्लील म्हणून झोड उठली होती. आपल्याकडे ओलेती या ठाकूरसिंगांच्या पेंटींगवर झालेली टीका आणि खटल्याची आठवण व्हावी

तसाच हा प्रकार होता. सगळे डोंगर इकडून तिकडून सारखेच असं म्हणतात त्याची प्रचिती यावी. अधिक माहितीसाठी चिन्हचा नग्नता हा विशेषांक वाचावा.

6. प्रकरण 44 – क्लॉद मॉने (1840-1926) हा या कादंबरीतील समकालीन चित्रकार. हा इंम्प्रेशनीझमचा पितामह म्हणून ओळखला जातो. स्ट्रोव्ह जेव्हा मला मॉने आवडतो असं म्हणतो तेव्हा त्याला चिडवण्यासाठी म्हणून स्ट्रिकलँड मुद्दाम होऊन त्याच्या मागच्या पिढीतील विंटरहॉल्टर (1805-1873) मला आवडतो असं म्हणतो. म्हणजे 1970 साली एखाद्याने तुला किशोर कुमार आवडतो का असं विचारल्यावर मला पंकज मलिक आवडतो असं म्हणण्यासारखं आहे. लेखकाला पॉल गोगँ आणि एल ग्रेकोमध्ये साम्य आहे असं वाटतं तर स्ट्रिकलँडला ब्रुघेल द एल्डर आवडत असतो. चित्रांचे विषय आणि चित्रप्रतिमा यांचा विचार केला तर ताहितीत गेल्यानंतर गोगँच्या शैलीमध्ये कोणता बदल होणार आहे याची चाहूल लेखकाला यातून सूचित करायची आहे.

7. प्रकरण 49 - ह्या पेंटींगमधल्या दोन मुलींनी डोक्यात तिअरची फुलं घातलेली आहेत. ताहितीयन प्रथेप्रमाणे लग्नाला आलेल्या तरूणी डोक्यात तिअरची फुले घालून सजतात. गोगँने हे पेंटींग त्याच्या हयातीत एका प्रदर्शनात पाठवताना त्याची किंमत फक्त १५०० फ्रँक एवढी ठेवली होती. पण तरीही त्याकाळी ते विकले गेले नाही. शेवटी १९१७ मध्ये जिनीव्हा मधील एका प्रदर्शनात स्टॅचेलीन नामक युरोपियन संग्राहकाने ते विकत घेतले. शंभर वर्षांनी २०१५ मधील एका लिलावात त्याच्या वारसदारांनी ते विकायला काढले तेव्हा एका अरब शेखने (कतार म्युझियम) ते २१०

दशलक्ष यूएस डॉलरला विकत घेतले. एखाद्या पेंटींगला तोपर्यंत मिळालेली ती सर्वोच्च किंमत होती.

8. प्रकरण 56 - गोगँ सिम्बिलिस्ट चित्रकारांमधील एक प्रमुख चित्रकार होता. तसेच पुढे प्रिमिटीव्हीजम आणि सिन्थेसिस्ट या नावाने ओळखू लागलेल्या शैलींचा तो प्रणेता होता. Where Do We Come From? What Are We? Where Are We Going? ही पॉल गोगँची सर्वात महत्वाची आणि गाजलेली दृष्टांतात्मक कलाकृती. ह्या प्रचंड आकाराच्या पेंटींगमध्ये पॉल गोगँला जे काही सांगायचे होते ते त्याने सांगितल आहे असं त्याने स्वत:च लिहून ठेवले आहे. हे पेंटींग करून झाल्यावर माझा मृत्यु होईल असं त्याने जाहीर केलं होतं. पॉल गोगँच्या इतर महत्वाच्या पेंटींग विषयी अधिक माहिती माझ्या ब्लॉगवरील नेव्हरमोअर (मौज दिवाळी 2014) या लेखामध्ये मिळेल.

https://jayantgune.blogspot.com/2014/01/nevermore-nevermore.html

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.